20415

जुनें वर्ष २६ वें.

वार्षिक वर्गणीः—
१-८-०
टपालखर्च निराळा.

# केरळ-कोकिळ

पत्ताः—
१९७, बुधवार पेठ,
पुणें शहर.

क्वचिज्झिल्लीनादः क्वचिदतुलकाकोलकलहः ।
क्वचित्फंकारास्त्रः क्वचिदपि कपीनां कलकलः ॥
क्वचिद्घोरः फेरुध्वनिरयमहो दैवघटनात् ।
कथंकारं तारं रसति चकितः कोकिलयुवा ॥ १ ॥

[वर्ष ४ थें.] जानेवारी १९१५. [अंक ७ वा.

## विषयानुक्रम


१ एका गौर तरुणीची विवाहचिंता (कविता) ... ... १
२ इराणी जनता (मागील अंकावरून पुढें चालू.) ... २
३ स्त्री-पुरुष-शिक्षण (लेखांक ८) ... ... ... ९
४ एका आसन्नमरण पक्ष्याचे उद्गार! (कविता) ... ... २०
५ गुलामगिरी (एक गोष्ट) ... ... ... २३
६ पोंच व अभिप्राय. ... ... ... ... ३९
७ वार्ताविहार. ... ... ... ... ४१
८ अमृताचे थेंब ... ... ... ... ४६
९ जीवन-रहस्य (चालू कादंबरी). ... ... ९६-११२


हें पुस्तक अच्युत चिंतामण भट यांनी पुणें, पेठ कसबा येथें आपल्या यशवंत छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

फक्त आगाऊ] **फ्रान्सची मर्दुमकी !** [नांवें नोंदवा

सध्यां युद्धांत गुंतलेलें फ्रेंच राष्ट्र किती जोमाचें व मर्दुम गाजविणारें आहे हें जर तुम्हांस बारकाईनें पहावयाचें असेल तर आमच्या विभूति-परिचय-मालेचें प्रथम पुष्प नेपोलियनचें चरित्र अवश्य वाचून पहा. हें चरित्र म्हणजे फ्रेंच लष्कराच्या अप्रतिम डावपेंचांचें, रणनीतिचें व त्यांच्या धीरोदात्त शौर्याचें एक अत्युत्तम चित्रच होय ! येत्या जानेवारीला तें बाहेर पडेल. तोंपर्यंत वर्गणीदार म्हणून नांवें नोंदविणारांस किं० रु. ॥. ट. ख. माफ. नंतर किं. ॥|. टपाल खर्च निराळा. बाह्यांग अंतरंगाप्रमाणेंच मनोहर केलें जाईल.

## श्रीगुरुचरित्र.

कागद ग्लेज व जाड, अक्षर मोठें, टाईप ठळक, प्रत्येक अध्यायास सुंदर रंगीत चित्र, प्रत्येक पेजला सुंदर वेल. सुटी प्रत किं- १। रु. रेशमी बांधणी १॥ रु. चातुर्मास्यांत मागविणारास दत्तजन्मकथा, बावनश्लोकी गुरुचरित्र, दत्त-स्तोत्रें, अष्टकें, आरत्या, पदें, मानसपूजा, ध्यान, गुरुगीता, अभंग, विडा इत्यादि सुंदर प्रकरणें असलेला संपूर्ण श्रीदत्तभजनसंग्रह किं.८४चा,बक्षीस पाठवूं.ट.ख.भि.

**श्रीमयूरेश पुस्तकालय, बेलबाग, पुणें शहर.**

# केरळकोकिळ.

वर्ष ४ थें.] जानेवारी १९१५. [अंक ७ वा.

## एका गौर तरुणीची विवाह-चिंता.

लेखक—म. ह. मोडक.

( Ella Wilcox बाईच्या ' To marry or not to marry ' या कवितेच्या आधारानें. )

चाल—दो दिवसांची...

म्हणते आई, न करीं घाई, सौख्य विवाहीं, धड नाहीं ॥
दगदग भारी, या संसारीं, ठावी पोरी, तुज काई? ॥ १ ॥
कथितीं आता, गभीर वाचा, लग्न सुखाचें, नव्हे बये ।
दास्य सदाचें, या पुरुषांचें, करितां जाइल, जीव सये ॥ २ ॥
बाबा म्हणती, मुली मालती, चंचल दिसती, तव वृत्ती ।
अरशी नादीं, या तरुणांच्या, फशीं पाडिती, तुच अंतीं ॥ ३ ॥
मोठी भगिनी, वदते स्वजनीं, दीर्घ सोडुनी, सुसकारा ।
परिणय खोटा, दारुण भोठा, संतत चिंते,-चा थारा ॥ ४ ॥
वृद्ध वांकली, आजीबाई, बसले ठायीं, भुणभुणते ।
कौमार्यासम, मौजचि नाहीं, अनुभव माझा, हा म्हणते ॥ ५ ॥

---

१ बापाच्या बहिणी. २ मुलीचें नांव. ३ संतति.

अनी पडोशी, दुबार डोशी, पाहुनि मजशीं, खेद करी ।
विवाहपाशीं, बेटा पडशी, बुद्धी तुजशीं, ही न बरी ॥ ६ ॥
साजण ऐशीं, सज्जन खाशीं, अनुभव देती, प्रतिकूल ।
पडला फांसा, उकलूं कैसा, न कळे मजला, मी मूल ॥ ७ ॥
' हितकर साचें, वच वृद्धांचें, ऐकावें ' जरि, विहित खरें ।
विवेकँ-दुबळा, होती अबला, चित्तीं जऱ्हां, काम शिरे ॥ ८ ॥
वल्लभ माझा, रुचिकर तोजा, प्राणाहुनिही, प्रिय गमतो ।
तन्मुख बघतां, उत्सव चित्ता, विस्मर देहा,--प्रति पडतो ॥ ९ ॥
अवाच्य तें सुख, इतरां न कळे, वृद्धां म्हणुनी, मी नमुनी ।
म्हणेन होत्यें, प्रियंकरगामी, सोडुनि रीति, सर्व जुनी ॥१०॥
हा नर नोहे, आला दैवें, सांद्रानंदचि, मम हातीं ।
प्रणयि समागम, स्वर्गचि पार्थिव, यथेच्छ भोगूं, दिनराती ॥११॥
प्रियसंगाविण, नीरस सारे, भूलोकींचे, आनंद ।
अऱ्हेरुनि मी, यास्तव वृद्धां, वरीन माझा, सुखकंद ॥ १२ ॥

---

# इराणी जनता.

[ मागील अंकावरून पुढें चालू ].

शुक्रवार हा इराणी लोकांचा मुख्य धार्मिक दिवस असतो. त्या दिवशीं सर्व कामकाज व बाजार बंद असतो. सर्व इराणी पुरुष त्या दिवशीं स्नान करून, धौतवस्त्रें परिधान करून दोन प्रहरच्या वेळीं मशिदींत निमाज

---

१ विशेष नांव. २ शेजारीण. ३ दोन वेळा. ४ विधवा झालेली. ५ सहा जण. ६ केवळ पोर. ७ विवेकदुर्बळ किंवा विचारहीन. ८. मदन. ९ प्रेमकारक. १० ध्यान. ११ प्रियाचे हस्तगत. १२ निविड आनंदच, मूर्तिमान्. १३ पृथ्वीवरील.

पढण्याकरितां जातात. मशिदींत गेल्यावर लहान-थोर; गरीब-श्रीमंत हा भेदाभेद मानण्यांत येत नाहीं. अत्यंत घाणेरड्या व भिकार मनुष्याशेजारीं मोठा श्रीमंत माणूसही विनतक्रार प्रार्थना करण्यास गुडघे टेंकून बसतो. प्रार्थनेच्या वेळीं सर्वांची दृष्टि मशिदींतील मेह्‌रबेकडे असते. ही मेहरब खुद्द महंमदपैगंबरही पूज्य मानीत होता, असें म्हणतात. सर्व मंडळी गुडघे टेंकून बसल्यावर तेथील मुख्य उपाध्याय प्रार्थना सुरू करितो व नंतर इतर मंडळी त्याचें अनुकरण करितात. याप्रमाणें १२ वेळ प्रार्थना म्हणून झाल्यावर मग तो उपाध्याय व्यासपीठावर उभा राहून 'खुतबा' (धार्मिक व्याख्यान) सांगतो. यामध्यें महंमद, त्याचे सहकारी व शहा यांचा निर्देश करितात.

इराणांत प्रत्येक मुलाचें व मुलीचें लग्न झालेंच पाहिजे असा नियम आहे. अविवाहित राहणें हें कमीपणाचें मानलें जातें. अविवाहित पुरुषाची समाजांत अप्रतिष्ठा होते. असा मनुष्य मेल्यावर त्याच्या प्रेतविधीस थट्टेनें लग्नविधि म्हणतात. म्हणून मुलगा वयांत येतांच त्याचे आईबाप त्याच्या लग्नाची त्वरा करूं लागतात. इराणी पुरुषांना अथवा मुलांना आपल्या नजीकच्या आप्तांखेरीज इतर स्त्रियांचें दर्शनही होण्याचा संभव नसतो. यामुळें मुलगी पाहण्याचें व ठरविण्याचें काम मुलाच्या आईस करावें लागतें. उपवर झालेल्या वधूवरांची माहिती देऊन लग्नें जुळविणाऱ्या कांहीं मध्यस्थ नायका असतात. त्यांच्या साह्यानें मुलांच्या माता आपल्या पुत्रांचे विवाह जुळवून आणितात. मुलगी निश्चित झाल्यावर मुलाची आई तिच्या घरीं तिला पाहण्याकरितां जाते. जर मुलीला तें स्थळ कोणत्याही कारणावरून पसंत नसेल, तर तिच्या घरीं तिच्या भावी सासूचें आदरातिथ्य नीटसें होत नाहीं. आणि तसें झाल्यास तें लग्न एकदम मोडलें. परंतु जर तिचें आदरातिथ्य समाधानकारक झालें, तर तें लग्न कायम ठरतें. त्यानंतर

ती मुलगी व तिची आई मुलाच्या घरीं येऊन चहा पितात. या वेळीं मुलानें आडून आपली भावी पत्नी पहाण्याचा प्रयत्न केल्यास कदाचित् तो सफल होतो. हा चहा पिण्याचा विधि झाल्यानंतर लवकरच उपाध्यायामार्फत जाहीररीतीनें वाङ्निश्चय होत असतो. या वेळेस मुलाला आपल्या भावी पत्नीचें स्वरूप पाहण्याची संधी मिळते. हा विधि झाल्यावर मुलाला मुलगी पसंत नसल्यास, त्यास मिळणाऱ्या हुंड्याच्या निम्मी रकम दंडादाखल मुलीच्या आईबापांस देऊन लग्न मोडतां येतें; परंतु हें कृत्य सामाजिक दृष्ट्या हलकेपणाचें—कमी दर्जाचें, अप्रतिष्ठेचें—मानलें असल्यामुळें अशा प्रकारचीं उदाहरणें क्वचित्च घडून येतात. हा वाङ्निश्चयाचा विधि मशिदींत न होतां घरांत होतो. तो झाल्यानंतर लवकरच लग्नविधि होतो. ह्या लग्नाचे सोहळे ४ पासून ८ दिवसपर्यंत चालू असतात, व ते खूप भपकेदारपणानें पार पाडण्याकरितां दोन्ही पक्ष पुष्कळ वेळा कर्जबाजारीदेखील होतात.

मुसलमानी धर्मशास्त्रान्वयें प्रत्येक इराणी पुरुषास चार बायका करण्याची परवानगी आहे. परंतु अंशतः दारिद्र्यामुळें व अंशतः सवतीमत्सराच्या त्रासामुळें एकीहून अधिक बायका करण्याच्या भरीस फारसा कोणी पडत नाहीं. ' एका घरांत दोन वाघिणी चालतील, पण दोन बायका खपावयाच्या नाहींत. ' अशी इराणी लोकांत म्हण आहे व तींत पुष्कळ तथ्य आहे. कारण, सवतीमत्सरामुळें नवऱ्यावर अगर सवतीवर विषप्रयोग झाल्याचे अनेक प्रसंग त्या समाजांत आजपर्यंत आलेले आहेत.

इराणी लोकांत पडद्याची ( गोषाची ) चाल फार सक्तपणें अंमलांत असल्यामुळें घरांतील नोकरचाकर यांची व्यवस्था व देखरेख पुरुषांसच करावी लागते. स्त्रियांसंबंधीं इराणी लोकांचें मत फारसें उच्च प्रकारचें नाहीं. ' स्त्रीच्या नादानें कोणीं वागूं नये ' अशा प्रकारचा उपदेश त्यांस लहान-

पणापासून त्यांच्या गुरुजी-(पंतोजी)-कडून होत असतो. स्वतःच्या स्त्रीला जरी इराणी मनुष्य फारसा मान देत नाहीं, तरी तो आपल्या मातोश्रीस फार पूज्य मानितो; व तिची आज्ञा मोडण्यास तो सहसा धजत नाहीं. आईबापांविषयीं विलक्षण पूज्यभाव, त्यांची आज्ञा पाळण्याविषयीं तत्परता व त्यांच्या सुखाकरितां स्वार्थत्यागपूर्वक परिश्रम करण्याची प्रवृत्ति हे गुण इराणी लोकांइतके इतरत्र क्वचित्‌च आढळून येतात.

इराणी माणूस जेव्हां मरणाच्या पंथास लागतो, तेव्हां त्याच्याभोंवतीं त्याचे सर्व आप्तइष्ट जमतात व तो मरेपर्यंत त्यांची बडबड, गुडगुडी पिणें, व चहापान हीं बिनदिक्कत चाललेलीं असतात. मरणकाल अगदीं नजीक आला, म्हणजे मरणाऱ्या मनुष्याचें तोंड मक्केच्या दिशेस करितात व त्याचें प्राणोत्क्रमण होतांच घरांत असलेलें सर्व पाणी फेंकून देण्यांत येतें. कारण तें पाणी प्याल्यास रोग होतो अशी त्यांची समजूत आहे. लागलीच मुल्ला लोक कुराणांतील विशिष्ट पाठ म्हणूं लागतात; व ऊर बडविण्याकरितां जमा केलेले अगर झालेले भाडोत्री मोठमोठ्यानें रडण्याचा हेल काढून ऊर बडवीत सुटतात! मृताच्या नजीकच्या नातेवाइकांनीं रडतां कामा नये, असें त्यांचें धर्मशास्त्र सांगतें, सबब हा भाडोत्री प्रकार प्रचारांत आलेला आहे. हा रडण्याचा विधि रडणारांच्या टोळ्या करून पाळीपाळीनें केला जातो. तो झाल्यावर प्रेत वाहून नेण्याची पेटी आणतात. नंतर त्यांत कापूर व इतर पदार्थ घालून मग त्यांत प्रेत ठेवितात. प्रेत नेण्याकरितां पुष्कळ मोठा जनसमूह जमा होतो व सर्वजण आळीपाळीनें प्रेत वाहून नेण्यास मदत करितात. स्मशानांत प्रेत आणल्यावर त्याचा दफनविधि होतो. त्या वेळीं 'फाथ्या' नामक पाठ म्हणतात. तो म्हटल्यानंतर मंडळी परत घराकडे येते. तिसरे दिवशीं मृताचे आप्तइष्ट मुल्लाला घेऊन पुन्हा त्याच जागीं जातात व त्याच्याकडून कुराणांतील पाठ म्हणवितात. मृताचें सुतक सुमारें एक

आठवडा पाळतात व तेवढ्या काळांत त्यास सद्गति मिळण्यास्तव त्याचे नातेवाईक पुष्कळ दानधर्म करितात. मरणारा मनुष्य जर आपल्या हयातींत कधीं मक्केची यात्रा करून आलेला नसेल, तर त्याच्या मृत्यूनंतर त्याचे आप्तइष्ट एका मुल्लाकडून ती यात्रा त्याच्याप्रीत्यर्थ म्हणून करवितात. असें केलें असतां यात्रेचें फळ मृताच्या आत्म्यास मिळतें, असा त्या लोकांचा समज आहे. कित्येक श्रीमंत लोक आपल्या पूर्वजांस सद्गति मिळावी, म्हणून त्यांचीं थडगीं क्षेत्राचे ठिकाणीं मशिदीच्या आवारांत बांधतात. इराणी लोक वर्षांतून तीन ठराविक दिवशीं मृतांच्या दर्शनाकरितां स्मशानांत जमतात. तेथें आल्यावर मुल्ला प्रार्थना म्हणत असतो, व इतर लोक फराळ करीत असतात! पुरुष जर धर्माप्रमाणें वागेल, तर त्यास मृत्यूनंतर स्वर्ग प्राप्त होतो; परंतु स्त्रीलामात्र स्वर्गांतही पुरुषाच्या बरोबरीचें स्थान—तिनें कितीही पुण्य केलें तरी—मिळत नाहीं, अशी इराणी लोकांची धार्मिक समजूत आहे. इराणी लोकांचा मनमोकळेपणा व गोड स्वभाव पाहून युरोपियन लोक त्यांस ‘ पूर्वेकडील फ्रेंच ’ ( Frenchman of the East ) असें म्हणतात. हे लोक आनंदी, अल्पसंतुष्ट, बुद्धिमान् परंतु सुखासीन, कपडालत्ता व शरीरसौंदर्य यांविषयीं दक्ष, जिज्ञासु, चौकस, उदार, भोळे व आपल्या मित्रांवर अत्यंत प्रेम करणारे असे आहेत. एका आंगठीखेरीज इतर कोणताही सोन्याचा दागिना अंगावर घालण्यास त्यांस त्यांच्या धर्मशास्त्राची मनाई आहे. त्यांचें संभाषण फार गोड असून त्यांत ‘ सादी,’ ‘ हाफीज ’ वगैरे कवींच्या उक्तींची रेलचेल असते. ‘ इनशाल्ला ’ ‘ बिसमिल्ला ’ ‘ अलमदुल्लिला ’ ‘ माशाल्ला ’ वगैरे शब्द त्यांच्या भाषणांत वारंवार येतात. यामुळें परकीय लोकांस कित्येक वेळा त्यांचें दीर्घसंभाषण कंटाळवाणें होतें. तसेंच नेहमींच्या व्यवहारांत ‘ अल्ली ’ अगर ‘ हसन ’ यांच्या शपथाही ते वारंवार व सहजासहजीं-

देखील घेत असतात. हेंही परक्यांस अंमळ चमत्कारिक वाटण्याजोगें आहे. वादविवाद—विशेषतः धार्मिक बाबीसंबंधानें वाद—करण्याची इराणी लोकांना मोठी हौस असते. परंतु स्वतःच्या देशाबाहेर काय चाललें आहे, याची व इतर देशांच्या इतिहासाची त्यांस बिलकूल माहिती नसते. धार्मिक इराणी लोक युरोपियन--फिरंगी--लोकांबरोबर भोजनविधि करीत नाहींत. व त्यांनीं शिवलेली गुडगुडी ओढीत नाहींत. परंतु इतर लोक हा नियम इतक्या कडक रीतीनें पाळीत नाहींत; कारण, तो न पाळल्याबद्दल कांहीं शासन होत नाहीं. या बाबतींत इराणी स्त्रियामात्र फार कडक रीतीनें वागतात. युरोपियन लोकांशीं संसर्ग ठेवणाऱ्या आपल्या मुलांचादेखील त्या आपल्या अन्नास स्पर्श होऊं देत नाहींत; व मुलानें एकदां वापरलेलें भांडें स्वतः वापरीत नाहींत! युरोपियन लोकांशीं संसर्ग ठेवून अन्नव्यवहार करणारास त्या काफीर ( नास्तिक ) असें समजतात. सामान्यतः इराणी लोकांत युरोपियन लोकांची आवड दिसत नाहीं. त्यांच्या तोंडावर जरी हे लोक त्यांना गोड वाटेल असें बोलतात, तरी त्यांच्या पाठीमागें ते त्यांस 'काफीर' ह्या विशेषणानेंच संबोधितात. ह्या परदेशस्थ लोकांपैकीं जर कोणी इराणी लोकांच्या मशिदींत जाईल, अथवा त्यांच्या धार्मिक जागेस स्पर्श करील तर इराणी लोक त्यास तत्काळ फाडून खातील, इतकें त्यांचें धर्मवेड जबरदस्त असतें. धर्मांतर करणारास देहान्तशासन करावें अशी त्यांच्या धर्माची आज्ञा आहे. इराणी लोक स्वभावतः क्रूर नाहींत. मुक्या जनावरावर ते फार प्रेम व दया करितात. जर अशा प्राण्यास आपण विनाकारण त्रास दिला, तर आपल्या मृत्यूनंतर पापपुण्याच्या झडतीच्या वेळीं तो प्राणी आपल्याविरुद्ध तक्रार करण्यास हजर असतो, अशी यांची समजूत आहे. आणि त्यामुळें ते जाणूनबुजून सहसा मुक्या जनावरांस व पशुपक्ष्यांस त्रास देत

नाहींत. इराणी गुन्हेगारांस पूर्वी भयंकर स्वरूपाच्या शिक्षा देत असत. परंतु अलीकडे ह्या शिक्षा पुष्कळ सौम्य करण्यांत आल्या आहेत. तथापि अद्याप चोरी करणाराचे हस्त छेदन करण्याची शिक्षा प्रचारांत आहे. जर इराणी शहाच्या मनांतून एखादा राजपुत्र अगर मंत्री यास देहान्तशासन करावयाचें असेल, तर त्या कामीं विषाचा उपयोग कारितात. इराणांत आतां नवीन लोकसत्ताकराज्यपद्धति सुरू झाली आहे. तेव्हां पूर्वींच्या ह्या व्यवस्थेंत इष्ट असे फेरफार लवकरच घडून येतील, अशी आशा करण्यास जागा आहे. इराणांत रस्ते चांगले नाहींत. यामुळें निरनिराळ्या प्रांतांतील लोकांचें दळणवळण असावें तितकें असत नाहीं. या कारणानें प्रत्येक प्रांतांतील लोकांच्या कल्पना व दृष्टि संकुचित असतात. राष्ट्रीयत्वाच्या कल्पनेच्या वाढीस ही स्थिति बाधक होण्यासारखी आहे. इराणी लोकांच्या अंगीं देशाभिमान आहे. परंतु तो प्रांतिक स्वरूपाचा–केवळ आपल्या गांवापुरता व फार तर जिल्ह्यापुरता–आहे. त्या कारणानें त्यांच्यामध्यें योग्य प्रकारची संघटना होऊं शकत नाहीं. आणि हेंच त्यांच्या आजपर्यंतच्या दुःखाचें मूळ कारण आहे. इराणमध्यें नुकतीच जी राज्यक्रांति झाली, ती इराणी लोकांनीं स्वतःच्या अकलेनें किंवा स्वतःच्या सामर्थ्यानें घडवून आणलेली नसून रशियाच्या जुलमास कंटाळलेल्या इराणच्या सरहद्दीवरील पठाण व कॉसॅक लोकांच्या साह्यानें ती घडून आली आहे. क्रांतीचें कार्य मुख्यतः ह्या लोकांनींच सुरू करून शेवटास नेलें, असें म्हटलें तरी चालेल. ह्या लोकांचें साहाय्य नसतें, तर केवळ इराणी जनतेकडून क्रांति पार पडली असती कीं नाहीं, याची शंकाच आहे.

# स्त्री-पुरुष-शिक्षण.

## लेखांक ८.

लेखक—एम्.

" Each has what the other has not: each completes the other and is completed by the other."

Ruskin.

गतांकीं जमिनीचे दृष्टान्तानें दाखविलें कीं, एकादे गांवाखालील सर्व जमीन जरी एकच पीक पिकविण्यास समर्थ असली, तरी एकच पीक करून निर्वाह होणार नाहीं; म्हणून व्यवहाराचे सुखार्थ प्रसंगीं अंशतः नुकसान पत्करूनदेखील भिन्न पिकें पिकविलींच पाहिजेत. त्याचप्रमाणें, जेथें व्यवहार आला, तेथें स्त्री व पुरुष हीं समबुद्धि व समानसामर्थ्याचीं असतात असें क्षणभर धरून चाललें तरीही उभयतांनीं एकच एक विद्या करणें व्यवहारांत सोईकर होत नाहीं. अतएव थोडासा अन्याय स्वीकारूनही त्यांनीं संसारसुखार्थ किंवा समाजसुखार्थही अंशतः भिन्न मार्ग स्वीकारलेच पाहिजेत. येथें आम्ही ' अन्याय स्वीकारून ' हें जें म्हटलें आहे, तें औपचारिक समजावें; खरें नव्हे. कारण एके परी व्यवहार म्हटला कीं साराच अन्याय आहे; निदान व्यावहारिक न्याय झाले, तरी ते अन्यायाचे पोटांतले न्याय असतात. केवळ न्याय हा फक्त कल्पनेंत शक्य आहे. परंतु कल्पनेचा किंवा 'केवला'चा प्रदेश उल्लंघून आपण व्यवहाराच्या हद्दींत आलों, म्हणजे तेथील यावत् न्याय सापेक्षच पत्करावे लागतात; त्याशिवाय गतिच नाहीं. पुष्कळदां आपण मनोराज्यांत ज्या गोष्टी अप्रतिबंध करूं शकतों, त्याच व्यवहारांत करूं गेलें कीं, पटदिशीं आपल्या गतीला प्रतिरोध होऊं लागतो. स्वप्नांत किंवा मनोराज्यांत आपण अनंत अंतरा-

ळांत अप्रतिहत स्वैरसंचार करूं शकतों, परंतु स्वप्नांतून जागृतींत आल्यावर स्वप्नांत पाहिलेल्या स्थलीं आपण जाऊं असा बेत केला, तर तत्काळ गुरुत्वाकर्षणाचा, पदार्थांच्या घनविरलभावाचा, वातावरणाचा इत्यादि अनेक न्याय ऊर्फ अन्याय किंवा नियम आडवे येतात. आतां हे नियम सनातन व सर्वव्यापी पडल्यामुळें शहाणे त्यांचे नांवानें ‘ अन्याय, अन्याय ’ म्हणून वृथा ओरड करीत न बसतां त्यांनाच न्याय समजून त्यांना संभाळून आपलें इष्ट जसें साधतां येईल तसें साधितात. त्यांना जागृतींत अंतराळांत संचार करावासें वाटलें, तर वरील नियमांना संभाळून एकादें आकाशयान निर्माण करून त्याचे द्वारानें ते संचार करून या मर्यादितसिद्धांतच आनंद मानतात आणि असें करणें हेंच शहाणपण आहे.

स्त्री-पुरुष-शिक्षणाचा विचारही वरील उभय दृष्टींनींच केला पाहिजे. पहिली म्हणजे केवल, शास्त्रीय, किंवा स्वतंत्र ऊर्फ निरपेक्ष; व दुसरी म्हणजे शबल, व्यावहारिक, किंवा परतंत्र ऊर्फ सापेक्ष. आणि या दोन दृष्टींचे स्वरूपांत मोठी तफावत आहे, तशी तफावत त्या दृष्टींनीं निर्णीत केलेल्या गोष्टींतही पडणारच हें उघड आहे; व तीबद्दल नाखुष होणें अन्यायाचें किंवा वेडेपणाचें आहे, असें आम्हांस वाटतें. प्रभुरामचंद्रांनीं भक्त मारुतीला प्रश्न केला असतां पूर्णप्रज्ञ मारुतिरायांनीं उत्तर केलें:—

देहबुद्ध्या तु दासोऽहं जीवबुद्ध्या त्वदंशकः ।
आत्मबुद्ध्या त्वमेवाऽहं इति मे निश्चला मतिः ॥

अर्थः—( हे भगवन् ) मी म्हणजे हा देहच, या दृष्टीनें जेव्हां मजकडे पहातों, तेव्हां आपण माझे स्वामी व मी आपला किंकर असें मी समजून चालतों. तोच देहदृष्टि सोडून जीवदृष्टीचा अवलंब केला, म्हणजे मी एक आपला अंशच आहे असें समजतों. आणि ही जीवदृष्टि उल्लंघून तिजपलीकडील आत्मदृष्टीचा स्वीकार केला, म्हणजे

आपणच मी (भेदच नाहीं) असा माझा ठाम सिद्धान्त ठरतो. मारुतिरायाच्या या दृष्टि सर्वांनीं लक्षांत वागविण्याजोग्या आहेत. निदान आम्ही तरी स्त्रीपुरुषशिक्षणाचा विचार कारितांना या मार्गानें जाणार आहों. आणि यामुळें आत्मा किंवा आत्मांश या दृष्टीनें स्त्रीपुरुष-शिक्षणाचा विचार करीत असतांना जें शिक्षण पुरुषांस तेंच स्त्रियांस असें आम्ही म्हणूं व म्हटलेंही आहे. कारण, आत्मज्ञानाचा किंवा तारकज्ञानाचा संग्रह करण्याचा अधिकार स्त्रीपुरुषांना अभेदानें आहे, असें आम्ही मागें स्पष्ट सांगितलें आहे. परंतु, व्यवहाराच्या भागांत, म्हणजे सापेक्ष प्रदेशांत येऊन या प्रश्नाचा विचार करूं लागलों म्हणजे वरील अभेददृष्टि कार्यसाधक होत नाहीं, असें आम्हांस वाटतें; बाकी, भेददृष्टि स्वीकारावी लागली म्हणून त्यांत मोठेंसें खेदाचें कारण आहे असें दिसत नाहीं. कारण एक तर ती अपरिहार्यच असल्यानें तिजबद्दल खेद करण्यापेक्षां, 'विधिवशात् प्राप्तेन संतुष्यताम्' या न्यायानें वागणें हेंच शहाणपणाचें आहे; व दुसरें, ही भेददृष्टि जरी पहिल्या तोंडीं असमाधानकारक भासली, तरी अखेर म्हणजे फलावाप्तीचे दृष्टीनें समाधानकारकच आहे असें आम्ही पुढें दाखविणार आहों. एतावता, आत्मदृष्टीनें जरी स्त्रीपुरुषांचें शिक्षण अभिन्न असावें, असें न्यायास आलें, तरी व्यवहारदृष्ट्या तें थोडें तरी भिन्न असलेंच पाहिजे, असें म्हणावें लागतें. आपण घरासाठीं लांकडाचे लाट आणितों, व त्यांतून कांहींचे खांब कारितों, व कांहींचीं तुळवटें कारितों. खांब उभे रोंवतों, तुळवटें त्यांवर आडवीं टाकितों. आतां या ठिकाणीं केवलदृष्टि धरून भांडूं लागलें म्हणजे एकाच काष्ठाचा एक तुकडा उभा रोंवावा व त्याचाच अर्ध आडवा घालावा, हा अन्याय आहे असें म्हणतां येईल; परंतु व्यवहारदृष्टि धरून अखेर कार्य जें वास्तुनिर्माण तिकडे पाहिलें, म्हणजे हा अन्याय जाचक होणार नाहीं—किंबहुना, अन्यायसा वाटणारही नाहीं. त्याचप्रमाणें स्त्रीपुरुषशिक्षणाचा प्रकार समजावा.

मागील लेखांत सांगितलेंच आहे कीं, स्त्रीस्वातंत्र्य व त्याचें अनुचारी स्त्रीसमानत्व ह्या दोन्ही गोष्टी पाश्चात्य देशांतील स्त्रीपुरुषसंख्यावैषम्यांत उद्भवून कालगतीनें त्या तेथें रूढ झाल्या, व सहवासानें किंवा निरुपायास्तव कां म्हणाना, त्या तेथें गोड वाटूं लागल्या. म्हणून त्या आम्ही आपल्या देशांत कारण नसतांना उसन्या आणून लादणें सोईवार होणार नाहीं; व असें करण्याचें आम्हांस कारणही नाहीं. कारण, आमचे समाजस्थितीला अनुकूल अशा शिक्षणाच्या व्यवस्था आमचे पूर्वज ऋषिवर्यांनीं लावून ठेविल्या आहेत, त्याच पूर्णपणें अमलांत आणिल्या म्हणजे आमचें भागतें आहे, असें पुढें दिसून येईल. आतां या व्यवस्थांचें सादूगुण्य ध्यानांत घेण्याला प्रथम एक मुद्दा ध्यानांत आला पाहिजे. भगवानदास म्हणतात, 'Identity, not equality is our ideal'. म्हणजे स्त्रीपुरुषसंबंधें आमचे शास्त्रकारांची भावना समानत्वाची नसून एकरूपत्वाची आहे; हें केव्हांही विसरतां कामा नये. कारण, तसें केलें असतां, त्यांचे पुढील न्याय पटणार नाहींत. याकरितां पुढील न्याय तपासतांना स्त्री व पुरुष उभय मिळून 'एकरूप' अर्थात् एक दुसऱ्याचें पूरक, हें सूत्र डोळयांपुढें अखंड ठेविलें पाहिजे. या एकरूपतेची समजूत किती प्राचीन व किती व्यापक आहे, याची थोडीशी तरी कल्पना यावयास पाहिजे तर—ज्याचा धर्मशास्त्राप्रमाणें किंवा समाजशास्त्राप्रमाणें, स्त्रीपुरुषांची योग्यता ठरविण्याशीं व्यावहारिक संबंध फारसा नाहीं, अशा शब्दशास्त्रानें ऊर्फ व्याकरणशास्त्रानें-देखील समासप्रकरणांत, एकशेष द्वंद्वाचें उदाहरण देतांना 'माता च पिता च =पितरौ; पुत्रश्च पुत्री च=पुत्रौ; श्वश्रुश्च श्वशुरश्च=श्वशुरौ;' असे विग्रह करून दाखविले आहेत. म्हणजे आपल्याला जन्म देणाऱ्यांपैकीं स्त्रीला माता व पुरुषाला पिता अशीं भिन्न नांवें आहेत, तरी त्या उभयतांचा इतपत एकभाव आहे कीं, त्यांचा एकत्र प्रयोग असतां त्या दोघांचा 'पितरौ'

या एकाच ( द्विवचनबोधक अर्थात् ) शब्दानें निर्देश केला आहे. आतां याच प्रकारावरून कोणी आधुनिक स्त्रियांचें पराधीनत्व ऊर्फ किंकरत्व, दास्य, म्हणजे पर्यायानें अकिंचित्करत्व सिद्ध करूं पहातील. ते असें म्हणतील कीं, पहा, या शुष्क शब्दव्यवहारांतदेखील, 'माता च पिता च=पितरौ' असें ठरलें; 'मातरौ' असें ठरलें नाहीं. अर्थात् वर्चस्व पुरुषाचें, स्त्री बापडी असून नसून सारखीच. तर तें त्यांचें म्हणणें रास्त नाहीं. शास्त्राच्या या कृतींतलें रहस्य स्त्रियांचें तुच्छत्व नसून त्यांचें पुरुषांशीं किंवा पतींशीं अभिन्नत्व दाखविणें हेंच आहे. कारण, स्त्रियांचे संबंधानें आमचे शास्त्रांत जेथें जेथें उद्गार आहेत, तेथें तेथें त्यांचें तुच्छत्व गाइलें नसून किंबहुना पुरुषांपेक्षांही वर्चस्वच गाइलें आहे. तैत्तिरीय उपनिषदांत 'मातृदेवो भव' हें वचन प्रथम असून 'पितृदेवो भव' हें त्याचे मागून आहे. त्याचप्रमाणें शिक्षाध्यायांत 'माता पूर्वरूपं' 'पितोत्तररूपं' 'प्रजा संधिः' असें म्हटलें आहे. उघडच, या दोनही स्थलीं मातेला म्हणजे स्त्रीला आद्यस्थान दिलें आहे. व्याकरणांतदेखील 'मातापितरौ' असाच स्त्रीपूर्वक प्रयोग आहे. येथें कोणी म्हणेल कीं, असा प्रयोग कांहीं अन्य कारणांनीं करावा लागला असेल, तर 'पितामात्रा' या सूत्रावर तत्वबोधिनीव्याख्याकार म्हणतात, 'पितुर्दशगुणं माता गौरवेणातिरिच्यते । इति स्मृतेर्मातुरभ्यहितत्वात् पूर्वनिपातः' म्हणजे 'माता ही गौरवानें पित्याहूनही दसपट अधिक आहे' असा स्मृतीचा अभिप्राय पाहून मातेच्या पूज्यत्वास्तव तिला पित्याचेही पूर्वीं स्थान दिलें आहे. तेव्हां स्त्रियांचे तुच्छत्वास्तव स्त्रीवाचक शब्दाचा लोप होऊन पुरुषवाचक अवशिष्ट राहिला, हें म्हणणें प्रमाण-

१ उपाध्यायान् दशाचार्य आचार्याणां शतं पिता ।
सहस्रं हि पितॄन् माता गौरवेणातिरिच्यते ॥

मनुस्मृति. अ० २-१४५

विधुर आहे. अर्थात् असें करण्यांत आम्हीं म्हटल्याप्रमाणें स्त्रीपुरुषांची परिणामीं एकरूपता हा जो आमचे धर्मशास्त्राचा तसाच समाजशास्त्राचा सिद्धान्त त्याला धरूनच वैय्याकरणांनींही असा प्रयोग केला. किंवा वैय्याकरण तरी नवीन प्रयोग कुठून करणार? ते बापडे 'रूढिशरण' असतात. अर्थात् वैय्याकरणांना मूळ भाषेंतच असा प्रयोग रूढ आढळला तो त्यांनीं घेतला, व त्याचें इंगित मात्र 'अभ्यहितत्वात्' या शब्दांनीं व्यक्त केलें, हें उघड.

सारांश, पाश्चात्यांत स्त्रियांची समानता स्वतंत्रतेला उत्तेजक आहे. आमच्यांत स्त्रियांची समानता पुरुषांशीं एकरूपतेंत मग्न होणारी आहे. अर्थात् आमचेकडे सर्व लोकयात्रेची वांटणी या दृष्टीनें करणें प्राप्त झालें, व त्या दृष्टीनेंच पूर्वशास्त्रकारांनीं ती केली आहे; व जोंपर्यंत पाश्चात्यांचें स्थितिवैषम्य आमच्यांत सुदैवानें प्ररूढ झालें नाहीं, तोंपर्यंत नव्या शास्त्रकारांनींही समाजव्यवस्था, किंबहुना धर्म, अर्थ, काम या त्रिविध पुरुषार्थांची व्यवस्था याच दृष्टीनें केली पाहिजे, तरच ती हितावह होईल. निदान आम्ही तरी या लेखांत या दृष्टीनें स्त्रीशिक्षणाचा विचार करणार आहों.

जगांत जो कोणी प्राणी–पशु, पक्षी, मनुष्य–आला, त्याला प्रियतम अशा गोष्टी दोन–आत्मरक्षण व आत्मवर्धन. संसारांत पडलेल्या अर्थात् घर थाटून बसलेल्या स्त्रीपुरुषांना ऊर्फ दंपतीलाही हीच गोष्ट लागू. प्रत्येक कुटुंबांतील स्त्रीपुरुषांना अत्यंत प्रिय अतएव अवश्य करणीय अशा मुख्य गोष्टी ह्याच दोन, एक अन्नादिकांनीं स्वतःचें (स्वकीयांचें त्यांतच आलें) रक्षण करणें, व अपत्यरूपानें आपली वृद्धि करणें, म्हणजे वंश वाढविणें. आणि सांसारिकांचीं हीं दोन प्रधानकर्तव्यें पडल्यामुळें त्यांच्या आचरणाचा रोंख या दोन गोष्टींचे सिद्धीला बळकटी आणण्याकडेच पाहिजे हें उघड आहे.

आपल्या पुराणग्रंथांत सृष्टिवर्णनप्रकरणीं असे उल्लेख आढळतात कीं, आरंभीं आरंभीं मानस किंवा अयोनिसंभव सृष्टि असे. सनत्कुमार-प्रभृति ब्रह्मपुत्र याचपैकीं आहेत. आजचे युगांतही अत्यंत नीच अशा जीवजंतूंत या अयोनिसंभव सृष्टीची साक्ष कायम आहे. कारण आज-कालचे जंतुशास्त्रावरील पाश्चात्यग्रंथांत A-sexual म्हणजे अ-मैथुन उत्प-त्तीचीं वर्णनें आढळतात. अर्थात् पुराणांतील वर्णन केवळ अशक्य किंवा काल्पनिक नसून वास्तविक आहे असें मानण्यास हरकत नाहीं. एवंच प्रथम अ-मैथुन सृष्टि असून नंतर विधात्यानें मैथुन-सृष्टि किंवा दांपत्य-सृष्टि निर्माण केली हें पुराणानें सिद्ध झालें. आतां शहाणा मनुष्य प्रयोजनावांचून वस्तुस्थितींत सहसा फरक करीत नाहीं, असें आपण व्यवहारांत पहातों. समजा, एक लांकडाचा बळकट अखंड ओंडा आहे. तो शहाण्या सुता-रानें मुद्दाम चिरून दुखंड करून पुन्हा ते खंड एकत्र खिळविले, तर या कृतींत प्रथमपेक्षां कांहीं तरी अधिक कार्य जर न साधेल, तर त्या कारा-गिरास मूर्ख किंवा रिकामटेंकडा असें लोक म्हणतील. परंतु, ही विविध व परम रमणीय अपार सृष्टि केवळ संकल्पानें निर्माण करणाऱ्या विश्व-शिल्प्याला वरील विशेषणें लावण्याचें धाडस कोणी करीलसें आम्हांस वाटत नाहीं. अर्थात् त्यानें जर एकाचीं दोन केलीं, तर या द्वैधांत त्यानें कांहीं तरी अधिक सोय पाहिली असली पाहिजे, हें उघड आहे. अर्थात् ही सोय म्हणजे कार्यविभाग हीच होय, व तिजबद्दल स्मृतींतून स्पष्ट उल्लेखही आहेत. भगवान् मनु म्हणतातः——

प्रजनार्थं स्त्रियः सृष्टाः संतानार्थं च मानवाः ।
तस्मात्साधारणो धर्मः श्रुतौ पत्न्या सहोदितः ॥

मनुस्मृति, अ० ९, श्लोक ९६.

---

१ पाटितोऽयं...पूर्वमेकदेहः स्वयंभुवा । पतयोऽर्धेन चार्धेन पत्न्यो-ऽभूवन्निति श्रुतिः । यावन्न विंदते जायां तावदर्धो भवेत्पुमान् ॥

अर्थः—स्त्रिया गर्भाचें धारण करण्यासाठीं व पुरुष गर्भाचें स्थापन करण्यासाठीं निर्माण केले; व म्हणून एकाचीच दोन ठिकाणीं विभागणी केल्यामुळें स्त्रीपुरुषांचा साधारण धर्म म्हणजे सहधर्मच वेदांत सांगितला आहे.

या द्विधा विभक्तीनें अपत्य निर्माण करण्यांत ज्या सोयी झाल्या, त्यांतील एक सोय अशी आहे कीं, हा जो मनुष्यदेहरूपी हाडामांसाचा सांगाडा आहे, तो निर्माण करण्यांतही स्त्रीपुरुषांना विभागणी लावून दिली आहे. संगीतरत्नाकरांत म्हटलें आहे:—

मृदवः शोणितं मेदो मज्जाप्लीहा यकृद्गुदम् ।
हृन्नाभीत्येवमाद्यास्तु भावा मातृभवा मताः ।
श्मश्रुलोमकचाः स्नायु-शिरा-धमनयो नखाः ।
दशनाः शुक्रमित्यादि स्थिराः पितृसमुद्भवाः ॥

अर्थः—( अपत्याचे शरीरांतील ) रक्त, चरबी, मज्जा, कवलु, यकृत्, गुद, हृदय, नाभि इत्यादि जे मिळून मृदु भाग आहेत त्यांचा पुरवठा मातेच्या अंशांपासून होतो; व अपत्याचे श्मश्रु ( दाढी ), लोम ( अंगावरील लंव ), डोकीवरील केंस, स्नायु, शिरा, नाड्या, नखें, दांत, अस्थि, शुक्र इत्यादि स्थिरांश यांचा पुरवठा पित्रंशांपासून होतो.

एकाच क्षेत्रांत दोन धान्यें पिकविण्यापेक्षां दोन पृथक् क्षेत्रांत दोन पिकविल्यानें तीं जशीं अधिक जोमदार निपजतात, त्याचप्रमाणें ह्या अंश-विभागामुळें कामगिरी अधिक सोईची व उमदी होत असली पाहिजे. हें पिंडनिर्माणांतील विभक्तितत्त्व अन्यत्रही अप्रयोजक होणार नाहीं, असें आम्हांस वाटतें; आणि म्हणूनच वर सांगितलेल्या सांसारिकांना अत्यंतावश्य व प्रियतम ज्या आत्मरक्षण किंवा भरण व अपत्यनिर्माण किंवा संतान-वृद्धि या दोन गोष्टी यांतही या विभागाची योजना अत्यंत ज़रूर आहे; व ती आजपर्यंत आमचे देशांत चालूही होती. ती अशी कीं, रक्षणाचा

किंवा भरणाचा प्रधान भाग किंवा भार पुरुषावर, व गौण भाग स्त्रीवर; म्हणजे दाराबाहेर अनेक प्रकारचे उद्यम करून द्रव्य व तद्द्वारा अन्न संपादून आणणें ही गोष्ट पुरुषानें करावयाची; आणि घरांत आणलेले अन्नाची ओजवणूक करून तें तोंडांत घालावयाची दुय्यम कामगिरी स्त्रीनें करावयाची. अपत्यनिर्माणाचे कामीं अधिक क्लेशाचा भाग स्त्रीकडे व कमी क्लेशाचा भाग पुरुषाकडे. याप्रमाणें या दोन्ही कामगिऱ्यांपैकीं एक कठिण व एक सोपी अशी उलटसुलट मिळून समभाग वांटणी करून व दोघांचें मिळून अंतिम साध्य एकत्र गुंफून देऊन आमचे शास्त्रकारांनीं कुटुंबाचें व त्याचेमागें समाजाचें गाडें सुयंत्र चालविण्याची सुरेख व्यवस्था लावून ठेविली. आणि ही व्यवस्था आज हजारों वर्षांचे अनुभवानें उत्तम अशी ठरली आहे. तेव्हां ही कायम राखणें हें सर्वथा इष्ट आहे. आतां देशकालानुसार सांप्रतचे मनूंत कांहीं नवीन गोष्टी आमचे समाजांत शिरत आहेत, व त्यांतील कांहीं योग्य व आदरणीयही आहेत. पुरुषांप्रमाणें स्त्रियाही सुविद्य व सुशिक्षित असाव्या, ही गोष्टही या आदरणीय गोष्टींपैकींच एक आहे. हिचें महत्त्व आम्हीं मागेंच दर्शविलें आहे; तें असें कीं, ज्ञानहीन मनुष्य तो पशुसमान, नव्हे जडच. आणि पाश्चात्य राष्ट्रें जर जडालाही कृत्रिम चैतन्य देऊन त्याजकडून चेतनाचीं कार्यें करून घेत आहेत, तर आम्हीं आमचेप्रमाणेंच चैतन्यपूर्ण ज्या आमच्या अर्धांगी त्यांस ज्ञानविहीन ठेवणें म्हणजे जात्या चेतन असतांना त्यांना जडमूढ बनविणें, यासारखें अनुदारत्वाचें, अन्यायाचें व आत्मघाताचें कृत्य दुसरें कोणतेंच नाहीं. अर्थात् स्त्रियांनाही विद्यादान अवश्य आहे, हें निर्विवाद.

आतां प्रश्न एवढाच उरला कीं, हें विद्यादान थेट पुरुषांचे जातीचें व पुरुषांचेच नमुन्यावर असावें कीं कसें? हें असें असावें, असें म्हणणारेही कित्येक विद्याभक्त आमच्यांत आहेत आणि ते वंद्यच आहेत. पण आमचा

स्वतःचा या कामीं समज असा आहे कीं, आम्हीं वर जी सांसारिकांची मुख्य दोन गोष्टींत प्रधानगौण भागांनीं उलटसुलट वांटणी सांगितली, त्या वांटणीला जेणेंकरून बाध येणार नाहीं, तेणें प्रकारें या शिक्षणाचा हिशोब बसाविला पाहिजे; मग त्यांत वैषम्य उत्पन्न झालें तरी हरकत नाहीं. कारण भगवंतांनीं म्हटलें आहे कीं, ‘ स्वे स्वे कर्मण्यभिरत: संसिद्धिं लभते नरः ’ म्हणजे जो तो आपापलें कर्म आस्थेनें केल्यानें सिद्धि मिळवितो; अर्थात् साधनांत वैषम्य किंवा भिन्नरूपता असली म्हणून साध्यांत वैषम्य उत्पन्न होतें, असें ठरत नाहीं; व कोठेंही साध्याचेंच महत्त्व अधिक आहे, साधन गौण आहे, हें कोणीही समंजस पुरुष मान्य करील. एतावता, स्त्रियांस शिक्षण द्यावें; मात्र तें वरील विभागणी संभाळून द्यावें. किंवा वरील विभागणीप्रमाणें त्यांच्या वांट्यास येणारें कर्तव्य त्यांजकडून सर्वोत्कृष्ट प्रकारें बजाविण्यास त्या पात्र होतील अशा धोरणानें तें द्यावें. आणि अशा धोरणानें देणें म्हणजे अर्थातच तें सर्वांशीं पुरुषांशीं तंतोतंत देतां येणार नाहीं, हें ओघानेंच येतें; तेथें आमचा निरुपाय आहे.

सुप्रसिद्ध विद्वान् रस्किन हा आपले ‘ सिसेम आणि लिलि ’ या ग्रंथांत म्हणतो:—

“ All such knowledge should be given to her not as knowledge–not as an object to know, but only to feel and to judge. It is of no moment, whether she knows many languages or one, but it is of the utmost that she should be able to show kindness to a stranger &c. It is of no moment to her worth or dignity that she should be acquainted with this science or that, but it is of the highest that she should be trained in the habits of accurate thought.

It is of little consequence, how many positions of cities she knows or how many dates of events, or how many names of celebrated persons–it is not the object of education to turn a woman into a dictionary.

\+ + + + +

Man's command (of a subject) should be foundational and progressive, hers general and accomplished for daily and helpful use.

भावार्थ–स्त्रीला कोणताही विषय शिकविणें तो तिला त्यांत पंडित करण्याइतका नको; फक्त तिला त्याची योग्यता कळण्यापुरता तो बस. तिला एक भाषा येते कीं अनेक भाषा येतात, यांत मुद्दा नाहीं; पण, पाहुण्यांचें अगत्य कसें करावें हें तिला उत्तम प्रकारें कळणें फार महत्त्वाचें आहे. तिला अमुक एक शास्त्र पूर्ण येण्यांत कांहीं मोठी थोरवी नाहीं; मात्र तिला अचूक निर्णय करण्याची शक्ति आली पाहिजे. तिला अमुक एक शहरांचीं स्थानें अचूक ठाऊक असणें, किंवा अमुक गोष्टींच्या तारखा बिनचूक पाठ असणें, किंवा मोठ्या इतिहासप्रसिद्ध पुरुषांची याद मुखोद्गत असणें, यांत कांहीं मोठा पुरुषार्थ नाहीं. कारण तिला कांहीं कोणा विषयाचा चालता बोलता कोश बनविण्याचा हेतु नाहीं.

पुरुषाचेंमात्र कोणत्याही विषयाचें ज्ञान भक्कम पायाचें व प्रागतिक असलें पाहिजे; व तिचें सामान्य चलाऊ असलें म्हणजे झालें.

विस्तारभयास्तव उतारा तोकडा दिला आहे. तथापि तेवढ्यावरून रस्किनचे विचारांची दिशा ध्यानांत येईल. ही दिशा आमचे म्हणण्याशीं पुष्कळांशीं जुळते आहे. तेव्हां या दिशेचें धोरण धरून स्त्रियांना शिक्षण

देणें इष्ट आहे. आतां त्याचें विशिष्ट स्वरूप कसें असावें याचा विचार पुढील अंकावर सोंपविणें बरें.

---

# एका आसन्नमरण पक्ष्याचे उद्गार !

पद ( चाल–हरिची भगिनी म्हणे सुभद्रा...)

१

वायुपरी मी पूर्वीं होतों स्वैरविहारी स्वच्छंदी ।
वनीं नभीं कीं मंदिरसौधीं कुठे न होती मज बंदी ॥ ध्रु० ॥
मृदुल मनोहर मधुमधु सुंदर थबथब ज्यांतुनि सुरस गळे ।
डाळिंबीचीं सिताफळीचीं सदा भक्षिलीं रम्य फळें ॥ १ ॥
मेघमुक्त मधु मुक्ताप्रभ जें तुहिनबिंदु तें जल प्यावें ।
खावें प्यावें सुखें फिरावें याहुनि अन्य न मज ठावें ॥ २ ॥
तरुताताच्या अंकावरतीं स्वस्थ यथारुचि पहुडावें ।
वनवेलींच्या मणिबंधीं कीं गुलगुल बोलत बैसावें ॥ ३ ॥
ऐन दुपारीं किंवा त्यांच्या हिंदोळयावारि बैसोनी ।
मुक्तकंठ मीं गंधर्वासम गोड गोड गावीं गाणीं ॥ ४ ॥
आकृति माझी काय वानुं रे ! डोळेभरु ही खरोखरी ।
रम्य पिसारा अनुपम माझा गोड असा मीं सर्वपरी ॥ ५ ॥
वनदेवींचा वनवेलींचा एकनिष्ठ मी भक्त भला ।
अपुल्यापरि मज केलें त्यांहीं, ताइत त्यांच्या गळयांतला ! ॥ ६ ॥
दुःखाचें मज नांव न ठावें सदा असा मी आनंदी ।
वनीं नभीं कीं मंदिरसौधीं कुठे न होती मज बंदी ॥ वायु० ॥ १ ॥

२

आनंदाचें परम सुखाचें निधान होतों असा जरी ।
तरी न होती ठावी मजला महती त्याची खरी खरी ॥ १ ॥

कटुतेविण ना कळे माधुरी, विरहावांचुनि सहवास ।
जठरतृप्तिची काय कल्पना? जरी न घडला उपवास ॥ २ ॥
श्रीमंतीचें कौतुक कैचें? जरि न पाहिली विपन्नता ।
पारतंत्र्य दे जाणिव करुनी काय वस्तु ती स्वतंत्रता ॥ ३ ॥
बोधायातें हें मज किंवा सृष्टिविषमता दावाया ।
आनंदाच्या शशिबिंबावरि दुर्भगभूची ये छाया ॥ ४ ॥
वृक्षस्कंधीं सेवित असतां ऊन कोंवळें सोनेरी ।
एकाएकीं अनपेक्षित मी सहज सांपडें तुझ्या करीं ॥ ५ ॥
पारतंत्र्य—छे—स्वातंत्र्याचें रूपांतर हें भलें बुरें ।
मानवलें मज बरें वाटलें कधीं कधीं मन जरी झुरे ॥ ६ ॥
पुढें पुढें परि हेंही गेलें पूर्वस्मृतिही नच झाली ।
संवय शोभते वहीण सख्खी स्वभावास ही अशी भली ! ॥ ७ ॥
कष्ट न करितां नियमित काळीं अयत्ता लोंदा तोंडिं पडे ।
वाण न होती मला कशाची वाइट माझें काय घडे ? ॥ ८ ॥
तुवां उबेचे पिंजऱ्याभोंतीं पडदे लावुनि परोपरी ।
लागाया नच थंडी मजला शीण घेतले किती तरी ॥ ९ ॥
हळूच न कळत मऊ रेशमी फांस, साधुनी तूं संधी- ।
कंठी म्हणुनी कंठीं माझ्या घालुनि केली मज बंदी ॥वायु० ॥२॥

३

प्रसंग पाहुनि गोड बोलुनी सैल दिखाऊ सरफांस ।
हासत हासत गोंजारित मज घट्ट कराया सजलास ॥ १ ॥
लाड कशाचे, कौतुक कैचें, परिहास न हा उपहास- ।
माझा केला, उभा करोनी मायेचा नव आभास ॥ २ ॥
सांजसकाळीं वेळिं अवेळीं बळेंचि डिंवचुनि बोटांनीं ।
शीळ घालुनी म्हणसी मजला 'गा, गा, गा' सुंदर गाणीं ॥३॥
चित्तीं नसतां रती रतिभरी गाणें कैसें स्यां गावें ।
तृप्ति न होतां तव चित्ताची मजला त्वां मग अपटावें ॥ ४ ॥

मला शिकविलें जें तें किंवा रुचेल तुज तें बोलावें ।
काढशील तूं त्यावांचोनी बाहेर न मीं कधिं यावें ! ॥ ५ ॥
तोचि पिसारा, तीच गोजिरी तनू, सूरही जरि तेच ।
अमूर्त चित्तीं पालट पडला तें न राहिलें परि तेंच ! ॥ ६ ॥
गेलें गेलें चित्त उडालें जीव लागला झुरणीस ।
त्यांतचि मजला दों दिवसांचा पडे असा हा उपवास ! ॥ ७ ॥
गोळा कंठीं प्राण जहाले त्राण न उरला मज अगदीं ।
पाणि फुकाचें तेंहि न दिधलें भला तूंहि रे ! स्वच्छंदी !॥वायु०॥

४

दुर्दैवाच्या तीव्र पावकें स्वर्गसुखाचा गोड झरा ।
अटला सारा एकाएकीं भोग ओढवे असा पुरा ॥ १ ॥
यक्षिणिची जणुं कांडी फिरली क्षणांत सर्वचि पालटलें ।
सर्व सुखाची होळी झाली रडूं कपाळीं या बसलें ॥ २ ॥
आनंदाच्या शैलावरुनी कडेलोट तूं हा केला ।
मृत्यूवांचुनि कोण धांवतो आतां माझ्या हांकेला ? ॥ ३ ॥
दुःखाच्या या दरींत दुर्धर खला ! दडपिलें त्वां मजला ।
अग्नीवरतीं मृदुल सुमांचा गुच्छ तुवां रे ! टाकियला ! ॥ ४ ॥
शेवटची मी हृदयविदारक एक फोडुनी किंचाळी ।
देत उसासे तनुपंजर हा त्यजीं पंजरीं मृतिकाळीं ॥ ५ ॥
नको धडपडूं नको नको तो घालूं वदनीं या कवळ ।
नको नको बा ! जल पाजूं तें, सुधा जरी ही हो गरळ ॥ ६ ॥
सान जीव हा त्वरें उडे बघ जुमानितां नच तव बंदी ।
नको नको बा ! नको जीववूं सेवाया ही दुर्गंधी ! ॥ वायु० ॥४॥

५

एकपरी परि भला मजवरी केला त्वां हा उपकार ।
इहदुःखांचा शेवट झाला सर्व संपला व्यवहार ॥ १ ॥

शेवट झाला गोड खरोखर किती हितावह परिणामीं ।
कृपा निरुपमा तुझी म्हणोनी वास मिळे हा स्वधामीं ॥ २ ॥
कोणी निर्दय म्हणोत तुजला गणोत कोणी निर्दयता ।
सदय परी तूं मला वाटसी निर्दयता तव वत्सलता ॥ ३ ॥
अपकृति करितां उपकृति घडली भूषण झालें तुज साजे ।
अपकृतिमाजीं उपकृतिचें बघ सुंदर कैसें बीज रुजे ! ॥ ४ ॥
खाया प्याया नच देण्याची जरी न घडती अशी दया ।
कारागृहिं-छे-स्वर्णपंजरीं भागचि होतें बसावया ॥ ५ ॥
वाईटांतुनि कधीं चांगलें होतें म्हणती निष्पन्न ।
उदाहरण हें ठळक तयाचें अनुभव आला मज पूर्ण ॥ ६ ॥
दयारसाचा प्रेमळतेचा कसा न म्हणुं तुज अंभोधी ।
कृपा करोनी घरीं जावया दिधली मज तूं ही संधी ! ॥ वायु०५॥

अनंततनय.

---

# गुलामगिरी.

लेखक—नारायण केशव बेहेरे, B. Sc.

१

" हाय हाय ! मी आपल्या हातानें आपल्या महत्त्वाकांक्षेचा, आपल्या प्रतिभेचा, आपल्या स्फूर्तीचा, आपल्या काव्यशक्तीचा नाश करून टाकला. प्रतिभेनें मला एकीकडे ओढावें व विमलेच्या सौंदर्यानें काव्याहून भिन्न जगांत मला आणावें. प्रथम प्रथम मी प्रतिभेचा कैवारी होतों, पण हळू हळू विमलेला जय मिळत चालला. विमलेच्या प्रेमांत मी बंदिवान झालों. रावसाहेब गोळ्यांच्या सुंदर, तरुण, सुशिक्षित व एकुलत्या एक मुलीचा मी पति. आज मला कोणतीच जबाबदारी वाटत नाहीं. पैशांचा

पाऊस झडत आहे; पोटासाठीं धडपड करावी लागत नाहीं. रावसाहेबांच्या मृत्यूनंतर मी विमलेसह या अवाढव्य संपत्तीचा व तिजमुळें लाभणाऱ्या ऐषआरामाचा उपभोग घेत आहें; पण मला हें सर्व तुच्छ वाटतें. मी बी. ए. झाल्यावर मॉरिस कॉलेजमध्यें फेलोचें काम करीत होतों, त्या वेळचें सुख, त्या वेळची स्वतंत्रता, त्या वेळची प्रतिभा आज नष्ट झाली आहे. मला हा ऐषआराम नको—माझा जन्म या सुखासाठीं नाहीं. माझी प्रतिभा कुठे गेली ?

या गुलामगिरीविरुद्ध मीं धडपड केली नाहीं असें नाहीं, पण विमलेची मूर्ति माझा निश्चय वितळून टाकी. तिचें मंजुळ भाषण कवितेला अवसर मिळूं देईना. विमलेचा स्वभाव जितका संसारी, तितकाच माझा काव्यमय; तिला नाटकें, गाडीघोडे प्रिय, तर मला काल्पनिक दु:स्थितींतील विहार रम्य भासतात. या भिन्न स्वभावांचें जुळावें कसें ? पण त्या वेळीं मला हें सुचलें नाहीं. माझे डोळे अंधच झाले होते; विमलेच्या सौंदर्यानें मनाला मोह पडला होता. तिच्या सद्‌गुणांच्या फांसांत मी सांपडलों होतों; तिच्या प्रेमांत मीं गुरफटलों होतों.

गेल्या तीनचार वर्षांत मी गुलामगिरींतच आनंद मानीत होतों. हीच स्थिति मी सुखावह मानीत होतों. मी आपलेपणा साफ विसरून गेलों होतों. काव्यहीन श्रीमंती हेंच माझ्या आयुष्याचें ध्येय होऊन बसलें. पण आज तें पद ऐकल्यापासून माझी वृत्ति पालटली. माझें पूर्व चरित्र मला आठवूं लागलें. अहाहा ! काय तें पद ! त्या ओळी माझ्या कानांत अजून गुणगुणत आहेत:—

“ कवि कवनीं रंगुनीया सृष्टीशीं बोलतो;
जगताला विसरुनीया प्रीतीला कवळितो !
रमणी त्या तुच्छ वाटे प्रतिभेशीं क्रीडतो;
संपत्ती काय त्याला पाश सुखें तोडितो. ”

मला आज त्या पदानें शुद्धीवर आणलें. माझी धुंदी साफ उतरली. मी आपलें स्वत्व पुन्हा प्रस्थापित करणार. विमलेच्या मोहांत सांपडून माझ्या ईश्वरी प्रेरणेशीं मी बेइमान होणार नाहीं. त्या पदांत नाटकांतील नायक आपली मनःस्थिति वर्णन करीत असतां माझ्या हृदयांत जी खळबळ झाली, ती माझी मीच जाणूं शकेन; दुसऱ्याला ती कशी समजणार, व मला कशी सांगतां येणार? माझ्या मनःस्थितीचेंदेखील त्या ओळींत पूर्ण प्रतिबिंब उमटलेलें होतें.

गेलीं चार वर्षें मीं कशीं घालविलीं, याचा विचार करतां माझी मलाच लाज वाटूं लागते. कवि म्हणून माझा लौकिक कोठें गेला? माझ्या लेखणीनें मी सगळ्यांचीं मनें आकर्षण करून घेत होतों; ती माझी लेखणी आज निर्जीव होऊन पडली आहे. मृत राष्ट्रांत चैतन्य उत्पन्न करणारी माझी प्रतिभा आज बुरशी येऊन बेकाम झाली आहे. या माझ्या पूर्वींच्या वह्या—किती तरी कल्पना अर्धवटच राहिल्या आहेत. अशीं काव्यें लिहीन, तसें करीन वगैरे माझ्या वल्गना फोल ठरल्या."

२

वसंतरावांना आज एका नाटकांतील पदानें श्रीमंतीचा वैताग आला होता. वसंतराव कॉलेजांत फेलो असतांना कविता लिहीत असत, व कवि या नात्यानें त्यांनीं महाराष्ट्रांत बराच नांवलौकिक मिळविला होता. वसंतराव सृष्टीचे प्रियभक्त होते. निसर्गांत त्यांची वृत्ति तल्लीन होत असे. ते शब्दचित्रें रंगविण्यांत ज्याप्रमाणें कुशल होते त्याचप्रमाणें कागदावर रंगांनीं काव्यें लिहिण्यांतही त्यांचा हात वाकबगार असे. वसंतराव भाविकालांत प्रसिद्ध महाराष्ट्रीय कवि होणार, अशी पुष्कळांना आशा उत्पन्न झाली होती. व ती अगदींच अनाठायीं होती अशांतलाही भाग नव्हता. पण—

भवितव्यतेचा जोर प्राणिमात्रावर चालत असतो. नागपुर येथील

प्रसिद्ध सुधारकाग्रणी रावसाहेब गाळे यांची एकुलती एक मुलगी विमला म्याट्रिक पास होऊन कॉलेजांत यावयाला व वसंतराव तेथें फेलो नेमले जाण्याला एकच गांठ पडली. विमला अत्यंत सुंदर होती. वसंतरावांचें मन हळू हळू तिच्याकडे वेधून गेलें. रावसाहेबांचे येथें वसंतरावांचें जाणें येणें सुरू झालें. रावसाहेबांना वसंतरावांचा संबंध इष्ट वाटला. वसंतराव विद्वान् सुशिक्षित व सद्‌गुणी होते. त्यांची घरची स्थिति चांगली नव्हती. ते लहानपणापासूनच पोरके झाले होते. त्यांचा प्रतिपाळ एका गरीब चुलत-चुलत्यानें केला होता. वसंतरावांना दरएक परीक्षेंत शिष्यवृत्ति मिळत गेल्यामुळें त्यांचें शिक्षण इतकें झालें होतें.

रावसाहेबांना यांची मुळींच कदर नव्हती. त्यांची श्रीमंती वसंतरावांना पुरून उरण्यासारखी होती. त्यांच्या अखिल श्रीमंतीची विमला एकटीच मालकीण होती; कारण रावसाहेबांना दुसरे कोणीच जवळचे नात-लग नव्हते. वसंतरावांना जांवई करण्यांत रावसाहेबांचा दुसरा एक स्वार्थ होता. रावसाहेबांचें आपल्या मुलीवर साहजिकच अतोनात प्रेम होतें. विमलेची आई मरून बरेच दिवस झालें होते; व रावसाहेबांना दुसरें कोणतेंच अपत्य नसल्यामुळें त्यांचें सर्व प्रेम विमलेवर एकवटलें होतें. विमला दूर होणें हें रावसाहेबांना अत्यंत जड वाटे; व यामुळें तिच्या लग्नाचें इतक्या लांबणीवर पडलें होतें. वसंतरावांचें व विमलेचें प्रेम जुळलें. सर्व गोष्टी मनासारख्या घडून आल्या. वसंतरावांशीं विमलेचें लग्न झालें. वसंतराव रावसाहेबांचे घरीं रहावयास आले. रावसाहेबांना समाधान झालें. विमला दूर होणार नाहीं ही त्यांची खात्री झाली. विमला सुखी आहे, हें त्यांनीं ओळखलें. वसंतरावांचा ओढा कोणत्याच नातलगाकडे नव्हता. त्यांच्या प्रेमाचा एकच विषय, व तो म्हणजे विमला. रावसाहेबांच्या मनावरचें ओझें नाहींसें झालें. विमलेच्या विवाहानंतर अवघ्या सहा महिन्यांनीं रावसाहेबांनीं हें नश्वर जग सोडून परलोकची वाट धरली.

विमला लहानपणापासून श्रीमंतींत वाढली होती. उलटपक्षीं वसंतरावांचें आयुष्य अगदीं गारिबींत गेलें होतें. यामुळें दोघांचीं मतें भिन्न होतीं. ऐषआरामाच्या वस्तू नसल्यास विमलेचें अडत असे. वसंतरावांना तें सर्व निरर्थक वाटे. विमलेच्या दृष्टीनें खरें सुख, गाडीघोडे उडविण्यांत, मित्रमैत्रिणींना मेजवान्या देण्यांत व मौजेखातर निरनिराळ्या देशांत प्रवास करण्यांत सांठविलेलें होतें. वसंतरावांची सुखाची कल्पना अगदीं भिन्न होती. सृष्टीशीं तादात्म्य पावण्यांत, तिचे अस्फुट बोल ऐकण्यांत व तिचीं गीतें गाण्यांत आणि श्रवण करण्यांत खरें सुख सांठविलें आहे, असें त्यांना वाटे. या भिन्न मनांत कांहीं दिवस झुंज चालली. विमलेला हळू हळू जय मिळूं लागला. तिच्या प्रेमानें वेडावलेल्या वसंतरावांना कॉलेजांतील नोकरीचा राजीनामा देणें भाग पडलें. वसंतराव स्वतंत्र झाले. विमलेला बरें वाटलें. पतीशीं गप्पागोष्टी करण्यास तिला सर्व दिवस मिळूं लागला.

वसंतराव दिवसेंदिवस चैनी होऊं लागले. मित्रमंडळींना पार्ट्या देण्यांत व विमलेशीं तासचे तास गोष्टी करण्यांत त्यांचा वेळ भरकन जाऊं लागला. मधून मधून त्यांना आपल्या कर्तव्याची, ध्येयाची व प्रतिभेची आठवण होई, पण ती उपरति स्मशानवैराग्याप्रमाणें क्षणभरच टिके; पुन्हां ते ऐषआरामांत दंग होत. याचा परिणाम असा झाला कीं, गेल्या चार वर्षांत महाराष्ट्रांतील रसिक वाचकांना वसंतरावांची एकही कविता वाचावयास मिळाली नाहीं. त्यांच्या मित्रांना वाईट वाटलें, पण ते काय करणार? विमलेपुढें प्रत्यक्ष प्रतिभेला हार खावी लागली. कांहीं दिवस तिनें वसंतरावांना आपल्या बाजूला वळवून घेण्याचा प्रयत्न केला; पण अखेर निरर्थक म्हणून तिला तो नाद सोडून द्यावा लागला. ही जेथें प्रतिभेची स्थिति, तेथें मित्रमंडळीचा पाड काय लागणार? वसंतराव पुरते काव्यहीन बनले.

३

वसंतराव आज नित्यक्रमाप्रमाणें नाटकाला गेले होते. तेथें एका नटाच्या तोंडून–' कवि कवनीं गुंगुनीया सृष्टीशीं बोलतो...'–हें पद ऐकून त्यांच्या चित्तवृत्तींत एकाएकीं बदल झाला. गेलेल्या शून्यजीवनाची त्यांना लाज वाटूं लागली. उद्विग्न मनानें नाटक अर्धवट सोडून ते घरीं परत आले. या गुलामगिरींतून ताबडतोब आपली सुटका करून घेऊन आपण आपलें गेलेलें स्वत्व परत मिळवावयाचें, असा त्यांनीं आपल्या मनाशीं ठाम निश्चय केला. आजपर्यंत त्यांनीं कैक वेळा असेच ठाम निश्चय केले होते, पण आजची तीव्रता कांहीं निराळीच होती. एखाद्या साध्या गोष्टीनें मनावर दृढ परिणाम घडून येतो असें म्हणतात, त्याचें हें दृश्य उदाहरणच झालें. हे विचार वसंतरावांनीं कैक वेळा ऐकले असतील, पण त्यांच्या मनावर ते उमटलेदेखील नाहींत. आजमात्र त्यांच्या प्रतिभेनें उचल खाल्ली. त्यांनीं जुन्या सामानांत पडलेल्या आपल्या कवितांच्या वह्या व अर्धवट काढलेल्या चित्रांच्या वह्या धुंडाळून काढल्या व त्या सर्व टेबलावर पसरल्या. आणि ते अनुतापानें स्वतःला दोष देऊं लागले.

निरनिराळ्या कविता ते वाचूं लागले, तों तों त्यांना अधिकच वाईट वाटे. अशीं अर्धवट रेखलेलीं चित्रें व अपूर्ण पडलेलीं रम्य काव्यें पाहून त्यांचें अंतःकरण सद्गदित झालें, व 'माझें आयुष्य व्यर्थ गेलें! माझें बोलणें फोल झालें! विमलेच्या प्रेमांत मी बंदिवान होऊन स्वतःला विसरून गेलों.' वगैरे शब्दांनीं गोष्टीच्या आरंभीं सांगितल्याप्रमाणें ते स्वतःला दोष लावीत हळहळ करीत बसले होते. त्यांचें मन आज या विचारांत इतकें गढून गेलें होतें कीं, विमला त्यांच्या खोलींत येऊन त्यांच्यामागें उभी राहिली हें त्यांना कळलेंदेखील नाहीं.

वसंतरावांचें आपल्याकडे आतां लक्ष जाईल, मग लक्ष जाईल, म्हणून

बराच वेळ वाट पाहिल्यानंतर विमला त्यांचे खांद्यावर हात ठेवून म्हणाली, ' हें काय, आज इतका कसला विचार चालला आहे ? ' वसंतराव दचकून उभे राहिले. विमलेला मनांतला निश्चय कसा कळवावा, याबद्दल ते विचारांत पडले. ते खालीं मान घालून स्तब्ध उभे होते. त्या वह्या विमलेच्या दृष्टीस पडल्या तेव्हां ती म्हणाली, " अगबाई ! या वह्यांनीं आपल्याला आज वेड लावलें वाटतें ? फेकायचें गडे हें सगळें एकीकडे, व माझ्याशीं रोजच्यासारखें प्रेमानें बोलायचें. कुठल्या मेल्या रद्दी......"

वसंतरावांना धैर्य आलें. ते उसळून म्हणाले, " माझ्या आयुष्यांत जर कांहीं रद्दी नसलें तर तें हेंच. माझें इतर आयुष्य तूं म्हणतेस तसेंच गेलें आहे."

विमला भांबावली. वसंतरावांच्या म्हणण्याचा अर्थच तिला कळेना. वसंतरावांच्या निश्चयी मुद्रेवरून त्यांना आपल्या प्रेमाचा कंटाळा आला असावा, असें तिनें ताडलें. ती म्हणाली, " आपणांला काय वाटतें तें आपण सरळ सांगावें. माझें प्रेम आपल्याला रद्दी वाटायला माझ्या हातून काय गुन्हा घडला हें जाणून घेण्याची माझी इच्छा आहे." ती दुःखानें हतबुद्ध होऊन एका खुर्चीवर बसली.

वसंतराव रागानें म्हणाले, " तुझा अपराध ? तूं माझ्या सर्व आयुष्याची माती केलीस. कल्पनेच्या साम्राज्यांतून तूं मला खालीं ओढून आणलेंस. सृष्टि माझ्याशीं बोलेनाशी झाली. आपले मार्ग भिन्न—आपले स्वभाव भिन्न; पण मला हें पहिल्यानें कळलें नाहीं. मी तुझा गुलाम बनलों. माझी काव्यशक्ति लोपून, माझें मन तुझ्या इच्छेनुसार या ऐषआरामांत न गेलें. मागें तूं एकदां मला म्हणाली होतीस कीं—" मीं मोठ्या प्रयासानें इकडच्या स्वारीचें मन आपल्याकडे ओढून घेतलें. कसा लहरी

स्वभाव असे, पण मीं इकडे या जगांत आणलें." असें म्हटल्याचें तुला आठवतें ना?"

विमला रागावून म्हणाली, "मीं असें म्हटलें होतें, व हें सर्व अगदीं खरें आहे. वाटेल तो सांगेल, पूर्वीं आपला स्वभाव किती लहरी होता तें!

"वाटेल तो सांगावयास नको. मला तें सर्व मान्य आहे. पण ज्या दिवशीं तुला माझी ही लहर घालविण्याबद्दल धन्यता वाटली, त्या दिवशीं मला मरणप्राय दुःख झालें. तुझ्या संगतींत माझ्या मनाची किती अधोगति झाली हें मला कळून आलें. माझी प्रतिभा नष्ट होऊन, मी एखाद्या पशूप्रमाणें काळ कंठीत पडलों आहें. मला ही तुझी संगति नको. माझ्यासारख्या काव्यप्रिय मनुष्याला कधीं गिरिशिखरावर तर कधीं खोल दरींत एकटेंच जावेंसें वाटलें तर त्यांत नवल काय? पण तूं माझ्या इच्छेंत खो घालीत आहेस. मी पहिल्यांदांच हें जाणलें असतें तर..."

विमलेचा राग अनावर झाला. तिला यांतलें कांहींच समजेना. ती भांबावली व तडक आपल्या खोलींत चालती झाली. ती गेल्यावर वसंतराव भानावर आले. आपण संदिग्ध बोलून विमलेचें मन फार दुखविलें, ही जाणीव त्यांना झाली. पण तिच्याशीं बोलून तिच्या मोहांत सांपडूं या भतीनें ते तिची क्षमा मागण्याकरितां गेले नाहींत. ते आपल्या जुन्या वह्या चाळूं लागले.

एका वहीच्या पहिल्या पानावर त्यांच्या कालेजांतील एका स्नेह्याचा फोटो चिकटविलेला होता, व वसंतरावांनीं त्या मित्राला उद्देशून एक कविताही लिहिली होती. ती वाचून त्यांचें मन क्षुब्ध झालें. ते आपल्या मित्राच्या फोटोकडे पाहूं लागले. आपला मित्र आपली थट्टाच करीत आहे, असा त्यांना भास झाला. आपल्याला आतांच्या आतां त्याची भेट घेतली पाहिजे. असें त्यांच्या मनानें घेतलें. त्याला भेटल्याशिवाय

आपल्या नूतन काव्य-जागृतीची पूर्णता होणार नाहीं, असें त्यांना वाटूं लागलें. एवढ्या रात्रीं तो भेटेल कीं नाहीं, अशी शंका त्यांचे मनांत येऊं लागली; पण कवि-मित्राचा विक्षिप्तपणा त्यांच्या परिचयाचा होता व तो बहुतेक जागत लिहीत बसला असेल, अशा उमेदीनें ते तेवढ्या रात्रीं घराबाहेर पडले.

४

घराच्या बाहेर पडल्यावर थंडीच्या कडाक्यानें आपला अंमल त्यांच्यावर बसविला. संतप्त झालेला मेंदू जरा शांत झाला. ते आज तीन वर्षांनीं आपल्या मित्राच्या घरीं चालले होते. त्यांच्या मित्राचें नांव आनंदराव होतें, व त्यांच्याही कविता महाराष्ट्र मासिकांत नित्य फडकत असत. ते कवि होते त्याचप्रमाणें चित्रकारही होते, व मासिकांत त्यांचीं चित्रें नित्य झळकत. शिवाय ते पदवीधर होते व नागपुर येथील शाळेंत ते शिक्षकाचें काम करीत असत. अद्यापि ते अविवाहित होते व यामुळें त्यांच्या घरीं कोणाला कोणत्याही वेळीं जाण्याला प्रत्यवाय नसे. हे कविमित्रदेखील बरेच लहरी असत व इतरांची निजानीज झाल्यावर ते तासचे तास लिहिण्यांत किंवा चित्रें काढण्यांत घालवीत. कलेच्या दृष्टीनें अभिज्ञ असणाऱ्या प्रत्येक कवीला चित्रकला येणें अगदीं साहजिक आहे; कारण काव्य चित्र आहे व चित्र हें काव्य आहे.

वसंतरावांची हाक ऐकतांच आनंदराव चकित झाले ! त्यांनीं दार उघडून वसंतरावांना आंत घेतलें. त्यांच्या डोळ्यांत फोटोंतल्याप्रमाणें विनोदाची चमक मारीत होती. ते म्हणाले, " वसंत ! तूं या वेळीं इकडे कोणीकडे ? प्रिय पत्नीच्या–विमला वहिनींच्या–गुलगुल गोष्टी सोडून आज तुला या कर्णकटु बोलणाऱ्या कविमित्राची आठवण कशी झाली ? मला तर हें कोडेंच पडलें आहे. "

वसंतराव आवेशानें म्हणाले, " आनंद! मी आपल्या गुलामगिरी-ची मगरामिठी तोडण्याकरितां येथें आलों आहें. माझी पैशांच्या दृष्टीनें चंगळ असली, तरी मानसिक दृष्टीनें माझा अधःपात झाला आहे, व तो आहे त्या स्थितींत टाळतां येणें अशक्य आहे. विमलेच्या बेडींतून माझी सुटका करून घेण्याच्या इच्छेनेंच मीं तुझा आश्रय घेतला आहे. आतां प्रतिभा पाजळून मी काव्यें लिहिणार, गाणीं गाणार व चित्रें रंगविणार!"

हळूहळू आपल्या काव्यशक्तीच्या अधःपाताची हकीगत वसंतरावांनीं आपल्या मित्राच्या कानांवर घातली. आनंदरावांना फार वाईट वाटलें. त्यांना आपल्या मित्राची कींव आली. त्यांनीं वसंतरावांना प्रेमानें आपण लिहिलेल्या कविता दाखविल्या, व रंगविलेलीं चित्रें त्यांच्यापुढें मांडलीं. वसंतरावांचें हृदय अगदींच भरून गेलें. आनंदराव गेल्या चार वर्षांत आपल्यापुढें किती निघून गेला, याची त्यांना जाणीव झाली. गेल्या चार वर्षांत त्यांनीं कविता वाचून पहाणेंही जवळ जवळ सोडलेंच होतें. आज त्यांना त्या कलेचें कौतुक वाटूं लागलें, व ते आनंदरावांचीं चित्रें मोठ्या प्रेमानें पाहूं लागले.

पहातां पहातां एका चित्राकडे त्यांचें लक्ष वेधलें. चित्र फारच सुंदर होतें. काळ्या आकाशांत एक तारा चमकत होती. तिच्या तेजानें सर्व सृष्टि आनंदमय झाली होती. कवि वर तिच्याकडे एकसारखा टक लावून पहात होता. ताराही हंसत होती. पाहतां पाहतां तारा अस्तंगत होत होती. वसंतरावांची प्रतिभा जागृत झाली. ते मोठ्यानें म्हणाले, " आनंद, ह्या चित्रानें मला वेड लावलें आहे. माझी एकतानता झाली आहे. तूं या चित्राचें नांव काय ठेवलें आहेस ? "

" मला अजून कोणतेंच नांव सुचलें नाहीं व म्हणूनच मी खालीं कांहीं लिहिलें नाहीं. तुला कोणतें नांव योग्य होईलसें वाटतें ?"

" आनंद! या चित्रामुळें एक गंभीर कल्पना--एक विश्वव्यापी चित्र माझ्या मनाला दिसत आहे. मी या चित्राला ' भावी आशा आणि परिस्थिति ' म्हणतों. मी आतां या विषयावर एक कविता लिहिणार. " असें म्हणून ते कागद व पेन्सिल घेऊन तेथल्या तेथें लिहिण्यांत दंग झाले. आपल्या मित्राच्या उच्च काव्यशक्तीची आनंदरावांना जाणीव होती; व मधल्या चार वर्षांच्या स्वप्नानंतर मित्राला आपल्या स्वभावाची पारख होऊन, त्याची प्रतिभा जागृत झाली हें पाहून त्यांस आनंद झाला व त्याच्यां परिस्थितीची कींवही आली. ते मनांतल्या मनांत ही परिस्थिति कशी टाळतां येईल याचा विचार करूं लागले. आपल्या मित्रासारख्या काव्यप्रिय मनुष्याला सध्यांची ऐषआरामी स्थिति आणि विमलेसारखी श्रीमंत व विलासप्रिय सहचरी उपयोगाची नाहीं, हें ते जाणून होते. पण हिंदु समाजांत जमलेली घडी विस्कटावी कशी? वसंतरावांचें लग्न लहानपणीं त्यांच्या आईबापांनीं केलेलें नव्हतें. नाहींपेक्षां त्यांच्यावर दोषारोप करून मोकळें होण्याला सांपडलें असतें. वसंतराव आपण होऊनच विमलेच्या सौंदर्यांत व प्रेमांत गुरफटून गेले. शहाण्याला शहाणा व जाग्याला जागा कोण कसा करूं शकणार? तरी पण एकदां विमलावहिनींची भेट घेऊन त्यांची कानउघाडणी करणें हें मैत्रीच्या दृष्टीनें आपलें कर्तव्य आहे, असा त्यांनीं निश्चय केला; व त्याप्रमाणें ते सकाळीं आठ वाजतां विमलाताईच्या घरीं जावयास निघाले.

वसंतराव रात्रभर कवितेंत दंग झाले होते. सकाळीं सात वाजण्याच्या सुमारास त्यांना अतोनात मानसिक श्रमांमुळें बसल्या जागींच गाढ झोंप लागली होती.

५

त्या रात्रीं विमलेचा वसंतरावांनीं धिक्कार केल्यापासून तिला अतोनात दुःख झालें. मीं आपली सर्व श्रीमंती यांच्या पायावर वाहिली, प्रेमानें

यांचें मन जिंकलें व आजपर्यंत यांना सुख व्हावें या इच्छेनें मीं आपल्याकडून कोणतीच कसर केली नाहीं; असें असूनही यांना माझा तिटकारा वाटावा, माझ्या प्रेमाला यांनीं तुच्छ मानावें, तूं माझ्या आयुष्याचा सत्यनाश केला, असे शब्द या मोबदल्यांत आपल्या कपाळीं यावे याचें तिला राहून राहून दुःख वाटूं लागलें. आपण वसंतरावांशीं प्रेमाची प्रतारणा कधींच केली नाहीं, त्यांचें म्हणणें कधींच मोडलें नाहीं व त्यांच्या सुखाविषयीं बेपर्वाई कधींच दाखविली नाहीं, अशीच खात्री तिला वाटूं लागली. यामुळें कांहींही अपराध नसतांना आपल्याला वसंतरावांनीं वाटेल तसें लहरींत बोलावें, याचें तिला फार वाईट वाटलें.

विमला श्रीमंतींत वाढल्यामुळें साहजिक विलासप्रिय बनली होती. तिला वसंतरावांचा कल्पनामय लहरी स्वभाव, व सौख्यनिरिच्छता कशी आवडणार ? तिनें आपल्या मंजुळ शब्दांनीं, प्रेमळ विनवण्यांनीं व सप्रेम नेत्रकटाक्षांनीं वसंतरावांना आपल्या नोकरीचा राजीनामा द्यावयास लाविलें. याच जादूनें तिनें त्यांच्या कवितांच्या व चित्रांच्या वह्या कपाटांत टाकविल्या; व याच प्रेमाच्या जादूनें तिनें त्यांनाही आपल्याप्रमाणें विलासप्रिय बनविलें, यांत तिचा बिचारीचा काय दोष ? वसंतरावांची काव्यप्रतिभा लोपून इतर श्रीमान् लोकांप्रमाणें तेही रंगेल तरुण बनले तर त्यांत काय नवल ? प्रेमाची जादूच तशी आहे.

विमलेच्या हातून वसंतरावांची मनःस्थिति पालटली गेली. त्यांच्या बुद्धीला गुलामगिरींत दिवस काढावे लागले. त्यांच्या जुन्या आशा पार मावळल्या ! पण या अपराधाची जाणीव विमलेला नव्हती. झालेला अपराध तिच्या हातून न कळत झाला. तिला वसंतरावांच्या प्रतिभेंत लहर दिसे, व तिच्या दृष्टीनें वसंतरावांत असलेलें वैगुण्य काढण्याचा तिनें प्रयत्न केला होता. श्रीमंतींत लोळत असतांना—'मी भिकारी झालों तर,'

नाटक पहात असतांना—'मी आंधळा झालों तर,' पत्नीसह प्रेमाच्या गुलगुल गोष्टी करीत असतांना—'कांता वारली तर,'...इत्यादि प्रकारचे विचार करणारे कवि तिच्या दृष्टीनें लहरी व वेडगळ ठरणें अगदीं साहजिक होतें. म्हणून तिनें असल्या मित्रांची संगत तोडावयास वसंतरावांना आपल्या प्रेमाच्या जादूनें भाग पाडलें होतें. तिच्या दृष्टीनें तिनें वसंतरावांना मनुष्यांत आणलें होतें व आपल्या प्रेमानें त्यांना आनंद चाखावयास लावलें होतें. पण वसंतरावांची दृष्टि अशी कोठें होती ? त्यांनीं तिचा धिक्कार केला. तिच्या प्रेमाबद्दल तिरस्कार दाखविला.

जों जों ती अधिक अधिक विचार करूं लागली तों तों, संतापानें तिचें डोकें बेफाम झालें व वसंतरावांची कानउघडणी करण्याच्या इच्छेनें ती त्यांच्या खोलींत गेली. पाहते तों वसंतराव पलंगावर नाहींत. तिनें सर्व घर धुंडाळिलें, पण वसंतराव दिसले नाहींत. निराश होऊन पुन्हा ती त्यांच्या खोलींत गेली. त्यांच्या टेबलावर चित्रांच्या व कवितांच्या वह्या अस्ताव्यस्त पडल्या होत्या. याच वह्यांनीं आपल्या पतीचें डोकें भणाणविलें, याच वह्यांनीं त्यांना आपला कंटाळा आणिला, अशी कल्पना मनांत येतांच त्या वह्या तिनें पायाखालीं तुडविल्या; व कांहीं कांहीं तर क्रोधाच्या भरांत तिनें फाडूनही टाकिल्या. चित्रांचीही तिनें तीच वाट लाविली होती. खालीं पडलेल्या पानांत आनंदरावांचें चित्र तिला चिकटविलेलें दिसलें. त्यासरशी ती दचकली. आनंदरावांच्याच घरीं वसंतराव गेले असतील अशी तिची खात्री झाली. तिनें तो कागद उचलून आपल्या हातीं घेतला. आनंदरावांची मुद्रा तिरस्कारयुक्त हंसतांना तिला दिसत होती. तिचें लक्ष भोंवतालीं गेलें. कविता व चित्रांचे कागद फाडलेले अस्ताव्यस्त पडले होते. तिला आपल्या मूर्खपणाची अतिशय लाज वाटली, व खोलीला कुलूप लावून ती परत आपल्या खोलींत येऊन बसली.

६

सकाळीं आठ वाजतां आनंदराव विमलाबाईस भेटावयास आले. विमलेची कानउघाडणी करण्याचा जरी त्यांचा निश्चय होता, तरी त्यांना कंपच सुटला. दुसऱ्याच्या घरांत जाऊन त्याच्यावर तोंडसुख घेते वेळीं अंगाला दरदरून घाम सुटला तर तें साहजिक आहे. आनंदरावांनीं आपण भेटीला आलों असल्याचा निरोप पाठविला; व ते दिवाणखान्यांत विमलाबाईची मार्गप्रतीक्षा करीत बसले. आपण बसंतरावांचे कविमित्र असल्यामुळें विमलावहिनींना आपण आवडत नाहीं, हें आनंदरावांच्या लक्षांत आलें होतें, व म्हणूनच ते वसंतरावांचे घरीं येण्याचें अलीकडे टाळीत असत. घडलेल्या प्रकारानंतर विमलावहिनी चवताळून येतील असें त्यांना वाटत होतें व पुढें काय होतें याबद्दल ते फिकीरींत होते.

पण अनपेक्षित प्रकार घडून आला. विमलाबाई अगदीं शांतपणें दिवाणखान्यांत आल्या व म्हणाल्या, " आमच्या घरची स्वारी तुमच्याकडे काल रात्रीं आली ना ? " वसंतरावांनीं मान डोलवतांच त्या पुढें म्हणाल्या, " आपण त्यांचा निरोप घेऊन आलां असाल ? "

" मी त्यांच्या तर्फे चार शब्द तुम्हांला सांगावयाला आलों आहें, पण मी इकडे आलों हेंमात्र वसंतरावाना माहीत नाहीं. "

" कोणाला हें खरें तरी वाटेल का ? "

" काय वाटेल तें वाटूं द्या. पण रात्रभर कविता लिहिण्यांत दंग असल्यामुळें सकाळपासून त्यांना गाढ झोंप लागली आहे. आपली कविताशक्ति तुमच्यामुळें गुलामगिरींत खितपत पडली, असें त्यांना वाटत आहे. "

" हो ! मला हें कालच समजलें. माझ्यासारख्या अरसिकेशीं त्यांची जन्माची गांठ पडली, याबद्दल मला फार वाईट वाटतें. चला, मी तुम्हांला माझ्या अरसिकतेचें प्रदर्शन दाखवितें. " असें म्हणून विमल

अनंदरावांना घेऊन वसंतरावांच्या खोलींत गेली. खोलीभर कवितांचा व चित्रांचा सडा पडला होता. हें पाहून आनंदराव हळहळून म्हणाले, " अरेरे! हें तुम्हीं काय केलें? वसंताला हें कळलें तर त्याच्या मनाला दारुण यातना होतील—त्याचा या कवितांवर फार जीव आहे. "

" मी करून गेल्यें पण मला आतां पश्चात्ताप होत आहे. काल ते मला वाटेल तसें टाकून बोलले; मीही रागाच्या सपाट्यांत वह्यांची अशी स्थिति केली. "

आनंदराव तीं पानें व चित्रें वेंचून नीट जमवूं लागले. विमला त्यांना मदत करूं लागली. चित्रांचें व कवितांचें आयुष्य बळकट म्हणून त्या फार जखमी न होतां जीव धरून होत्या. सर्व गोळा केल्यानंतर आनंदराव म्हणाले, " सुदैवानें फार नुकसान झालें नाहीं. पण पुढें तुम्ही काय करणार? तुमचें जुळावें तरी कसें? "

" तो विचार मीं काल रात्रींच ठरावला. मी या जगांत आतां राहूं इच्छित नाहीं. माझ्या प्रेमाची त्यांना गुलामगिरी वाटते, तर माझ्या जगण्यांत अर्थ कोणता? मी आपलें बरेंवाईट करून घेणार! त्यांना सुख तेंच मला करणें आहे. "

" पण त्यामुळें फायदा तरी काय होणार? तुम्हीं जीव दिला ही कल्पना वसंताच्या हातून कांहींच कार्य होऊं देणार नाहीं! त्याचें मन अस्थिरच राहील! "

" आतां तुम्हांला मी खरें सांगत्यें, त्यांचें मन जरी अस्थिर राहिलें, तरी निदान मी मेल्यें म्हणजे माझी सुटका होऊन माझें मन स्थिर होईल.
३ तुम्हीं एकाच बाजूनें विचार केला. आतां माझेंही थोडें म्हणणें ऐकून घ्या. आमच्या प्रेमाची जर तुम्हीं उलट फेड केली नाहीं, आमच्या प्रेमाकडे दुर्लक्ष करून जर तुम्हीं दिवसरात्र कल्पनासृष्टींत दंग राहूं लागलां, तर

आम्हांलाही त्या जिण्याचा कंटाळा येतो. आम्हां स्त्रियांना सुखाची प्रबल लालसा आहे. त्यामुळें त्याविषयीं निरिच्छ असणाऱ्या मनुष्याबरोबर जीवन काढणें आम्हांस फारच कष्टाचें आहे. ”

आनंदरावांनीं या दृष्टीनें विचारच केला नव्हता. त्यांना हें म्हणणें बऱ्याच अंशानें पटलें. पण कांहीं तरी बोलावें म्हणून ते म्हणाले, “ मग तुम्हीं यावर तोड काय सुचवितां ? ”

“ तोड मर्यादाचीच. मी आपल्या जिवाचें बरेंवाईट करून, माझी व त्यांची गुलामगिरींतून सुटका करून देणार ! ”

“ विमले ! पण मला तुझी गुलामगिरीच आवडत असली तर ? ” असें म्हणून एक व्यक्ति चटकन आंत आली ! वसंतरावांना पहातांच दोघेंही चकित झालीं !

वसंतरावांच्या येण्यांत फारशी जादू नव्हती. सकाळीं झोंपेंतून जागे झाल्याबरोबर त्यांना विमलेची प्रेमळ मूर्ति दिसूं लागली. त्यांना आनंदराव कोठेंच दिसले नाहींत. विमलेवांचून हें जग शून्य होईल असें त्यांना वाटलें. कवितेची धुंदी उतरल्यावर विमलेची गुलामगिरीच त्यांना प्रिय वाटूं लागली. विमलेचें दर्शन घेण्याला व तिची क्षमा मागण्याला ते तांतडीनें आले होते.

वसंतरावांचे शब्द ऐकतांच आनंदराव पटकन बाहेर निघून गेले.

७

दोन प्रेमळ हृदयें एकत्र झालीं. प्रीतीचें चिन्ह परस्परांनीं परस्परांच्या गालावर मुद्रित केलें.

वसंतराव प्रेमानें म्हणाले, “ विमले ! एखादे वेळीं माझी वृत्ति सृष्टीशीं तन्मय होऊन मी कल्पनासाम्राज्यांत गेलों तर तूं मला क्षमा करशील ना ? ”

विमलेनें उत्तर दिलें, "पण गडे ! आपण कविता लिहीत असतां एखादे वेळीं मी हळूच येऊन, मागून आपले डोळे झांकले तर माझा राग नाहीं ना येणार ?"

प्रीतीचा ध्वनी पुन्हा एकदां ऐकूं आला. वसंतराव गुलामगिरींतच खितपत पडले. पण महाराष्ट्रांतील प्रमुख मासिकांत त्यांच्या कविता पुन्हा फडकतांना दिसूं लागल्या !

---

# पोंच व अभिप्राय.

१ **स्वामी रामतीर्थ, भाग ५ वा**—रा. भास्कर विष्णु फडके व रामकृष्ण वासुदेव बर्वे, या विद्वद्द्वयानें चालविलेलें पुण्यकारक काम जोरानें चाललें आहे, हें पाहून आम्हांस अत्यंत समाधान वाटतें. महाराष्ट्राच्या हल्लींच्या पडत्या काळांत अशा तेजस्वी ग्रंथांची जितकी पैदास होईल, तितकी चांगलीच आहे. वेदान्ताच्या खऱ्या तत्त्वांच्या अज्ञानामुळें आज जो आमचा समाज फाजील श्रद्धाळू होऊन पंगू झाला आहे, त्याला ही स्वामींची दिव्य व खणखणीत वाणी खडबडून जागृत करील, अशी आम्हांला खात्री वाटते. त्याचप्रमाणें आमचें राष्ट्र वेदान्तानेंच पंगू केलें आहे, असा जो नवशिक्षितांचा त्याच्यावर अज्ञानमूलक कटाक्ष आहे, त्याचेंही हीं स्वामींचीं प्रवृत्तिपर वेदान्ताचीं व्याख्यानें चांगलेंच निरसन करतील, अशी आम्हांला बळकट आशा आहे. भाषांतराचें काम—मागील भागांप्रमाणेंच—या भागाचेंही सरस उतरलें आहे. मुळांतील जोर व स्फूर्ति कायम राखण्याचा प्रयत्न यशस्वी होत आहे, ही आनंदाची गोष्ट आहे. उत्कर्षाचें रहस्य, यशाची गुरुकिल्ली, स्फूर्तीचें हृद्गत , आध्यात्मिक शक्ति, व आरण्यक संवाद, इतकीं व्याख्यानें या भागांत आलीं असून प्रस्तावना-

न्तर्गत विषयप्रवेश हें भाषांतरकारांचें विवरणात्मक प्रकरण पुढील व्याख्यानांचे रहस्यावर लखलखीत प्रकाश पाडून वाचकांचा मार्ग सुकर करितें.

२ जीवितयात्रा—सामाजिक कादंबरी. लेखक, रा. नरहर नारायण पटवर्धन, मु० वाई. किं० १। रुपया. 'मकरंद' मासिकाच्या ग्राहकांना ही बक्षीस म्हणून दिली आहे. आपली जीवितयात्रा सुखमय व्हावी, ही प्रत्येकाची मनीषा असते; पण ती सुखमय करावी कशी, हें वास्तविकपणें मनुष्याला कळत नाहीं; म्हणून त्याची दिशाभूल होते. ही सुखाची खरी दिशा दाखवावी, हा या कादंबरीचा हेतु आहे. सुशिक्षण किंवा उदार शिक्षण या गोड नांवानें हल्लीं जें ओळखलें जातें, त्या शिक्षणानें मनुष्याचें मन सुसंस्कृत होत नाहीं. तो बोलतो बृहस्पतीसारखा, लिहितोही चांगला, पण त्यापैकीं आचरणांत कांहींही उतरत नाहीं. नियमितपणाचे तो गोडवे गाईल, एकीचें स्तुतिस्तोत्र करील, उद्योगाची महती वर्णील, आरोग्याची व शरीरसामर्थ्याची किंमत सांगेल, पण त्याच्या हातानें कांहीं होत नाहीं. तो बोलघेवडा किंवा पढतमूर्ख होतो. गृह-धन-दारा, भोगविलास, यांचा तो दास बनतो, व त्यांकरितां वाटेल तसें आचरण करण्यास तो कचरत नाहीं. धर्माचे व गृहशिक्षणाचे संस्कार त्याच्या मनाला होत नाहींत. त्याच्या अंगीं खरा स्वाभिमान येत नाहीं, तो सर्व शास्त्रांना, शास्त्रकारांना, आचारविचारांना, एकदम वेडगळ या सदरांत लोटून मोकळा होतो. स्त्रीशिक्षण, स्त्रीस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य, प्रीतिविवाह, जातिभेदनिर्मूलन, समाजसुधारणा, समता, बंधुता या गोड नांवांखालीं तो स्वैराचार करूं लागतो, बायकोचा दास बनतो, आईबापांना लाथा मारतो, भावांला घरांतून घालवून देतो. एकंदरींत त्याचे वर्तनांत जिकडे तिकडे रजोगुणाचें व तमोगुणाचें प्राबल्य दिसून येतें, पण या दोन गुणांचे पोटीं खऱ्या सुखाचा जन्म कधींच होत

नाहीं. धर्मश्रद्धा, ईश्वरनिष्ठा, पापभीरुत्व व कर्तव्याची पूर्ण जाणीव हे गुण अंगी असले, तरच मनुष्य स्वतांला, आपल्या कुटुंबाला व समाजाला सुख देऊं शकतो. धर्माच्या संस्कारांनीं मनुष्याची वृत्ति सत्त्वगुणप्रधान होते; व अंगीं सत्त्वगुण असला म्हणजे सत्याकरितां, कर्तव्याकरितां जगाचे आघात तो शांतपणें सोसतो व परिणामीं सुख पावतो. सत्त्वगुणी माणूस वीरासारखा असतो. संकटांना, प्रसंगांना तो डगत नाहीं, व विपत्तीचे कितीही तडाखे बसले, तरी नीतिभ्रष्ट किंवा कर्तव्यभ्रष्ट होत नाहीं. त्याचे ठिकाणीं इंद्रियनिग्रह व मनोविजय असल्यामुळें तो मोहाला कधीं बळी पडत नाहीं. तेव्हां ही सत्त्ववृत्ति व कर्तव्यपरता, हीच सुखाची खरी किल्ली आहे. रजोगुणात्मक पाश्चात्य शिक्षणानें सुखाचा खरा लाभ होत नाहीं व होणार नाहीं. असें या कादंबरींत दाखविलें आहे. रचनाकौशल्य किंवा कथानकाचा परिपोष या दृष्टींनीं ही कादंबरी मध्यम प्रतीची आहे, तरी ज्याला आपलें जीवित कांहीं तरी सुखपूर्ण व्हावें असें वाटत असेल, त्याला हींत पुष्कळच घेण्यासारखा भाग सांपडेल. भाषा बरी आहे, पण छपाईंत अशुद्धें फार राहिलीं आहेत.

---

## वार्ताविहार.

नोव्हेंबर महिन्याच्या **बालबोधांत** कै० वि० कों० ओक यांच्या चरित्राची सुंदर माहिती दिली आहे. तरुण पिढीनें तें चरित्र अवश्य वाचून त्याचें मनन करावें. त्यांनीं लहानमोठीं ४८ पुस्तकें आपल्या हयातींत लिहिलीं. त्यांची यादी देऊन **बालबोधांतील** चरित्रलेखक म्हणतात:—" **बालबोध** कै० ओकांनीं आज ३४ वर्षें अगदीं नियमितपणानें चालवून असंख्य महाराष्ट्रीय जनांस ज्ञानामृत पाजून सुमार्गास

लाविलें आहे. तें त्यांचें अखंड स्मारक म्हणून टिकेल, यांत शंका नाहीं. कै० ओकांच्या या ज्ञानसत्राची थोडीशी कल्पना येण्यास आम्ही येथें असें सांगतों कीं, बालबोधांत आजपर्यंत चरित्रें ४०२, कविता ४०२, नीतिपर निबंध ४२०, शास्त्रीय विषय ३७१, आणि किरकोळ विषय ८५० असे येऊन गेले आहेत. हें एवढें ज्ञानदान करण्याचें श्रेय कै० ओकांचें आहे. ही सद्विचारांची जी पेरणी त्यांनीं केली आहे, ती कधींही फुकट जावयाची नाहीं. तिला चांगलीं फळें आलींच पाहिजेत." अक्षरशः खरें आहे!

---

सांप्रत युरोपांत सुरू असलेलें महायुद्ध अनेक दृष्टींनीं अगदीं अपूर्व आहे. सध्यांच्या युद्धांत सुमारें एक कोट सैन्य रणांगणावर उभें आहे. इतकें सैन्य पूर्वी कोणत्याही युद्धांत गुंतल्याचें इतिहासांत नमूद नाहीं. जर्मनीनें या युद्धांत आणलेली अजस्र तोफही अपूर्वच आहे. तिचा पल्ला २७ मैल असून ती एकदां डागण्याला छत्तीस हजार रुपये खर्च येतो, असें म्हणतात. अर्थात् ती यांत्रिक साधनानेंच डागतात. त्याचप्रमाणें युरोपिअन युद्धांत हिंदी सैन्य मिसळल्याचेंही हें पहिलेंच उदाहरण आहे. व त्यानें त्या युद्धांत बजावलेली कामगिरीही अपूर्व व अकल्पित आहे. गंगासिंह नांवाच्या एका रजपूत हवालदारानें मोठ्या शौर्यानें शत्रूचे अकरा शिपाई एका बिकट प्रसंगीं ठार मारल्यामुळें त्याला व्हिक्टोरिया क्रॉस या नांवाचें एक थोर सन्मानचिन्ह ( पदक ) मिळालें, असें प्रसिद्ध झालें आहे. हिंदी सैनिकास असा सन्मान मिळाल्याचा हा पहिलाच प्रसंग आहे. यानंतर दरवानसिंग नांवाच्या एका दुसऱ्या हिंदी शिपायासही हा मान मिळाला आहे. त्यास हें पदक प्रत्यक्ष बादशहांनीं फ्रान्सांत असतां स्वहस्तें दिलें.

---

हिंदी सैन्यानें फ्रान्सांत जीं अपूर्व धाडसाचीं कामें केलीं त्यांमुळें जर्मन लोकांना हिंदी सैनिकांचा दरारा वाटूं लागला आहे म्हणतात.

---

चांगल्या वर्तणुकीच्या कैद्यांकडून न्यूझीलंडमध्यें जंगली झाडांची लागवड करविण्याला आठ वर्षांपूर्वी जंगलखात्यानें सुरवात केली. आज तेथें दहा हजार एकर जमिनींत तीन कोटी झाडांची लागवड झाली असून आजपर्यंत झालेल्या कामाची किंमत ६,००,००० रुपये आहे.

---

येथील डा० नरहर गोपाळ सरदेसाई यांनीं धूतपापेश्वर, झंडू फार्मसी, सोलापूर फार्मसी वगैरे देशी औषधांच्या कारखान्यांतून ताम्र-भस्म आणवून त्या प्रत्येक नमुन्याचें रासायनिक रीत्या पृथक्करण येथील रानडे एकॉनॉमिक इन्स्टिटयूटमध्यें करविलें. त्यांत सोलापूर येथील फार्मसीचें भस्म सर्वोत उत्तम ठरलें. कांहीं ठिकाणच्या भस्मांत कांहींच्या बाहींच पदार्थ दिसून आले. नंतर त्यांनीं सोलापूर फार्मसींतून सुवर्णराज-वंगेश्वर, समीरपन्नग, देशी आयोडाईन, वगैरे औषधें मागवून तपासविलीं व तींही उत्कृष्ट ठरलीं. आनंदाची गोष्ट आहे. सोलापूर फार्मसीच्या चालकांना ही गोष्ट अत्यंत भूषणास्पद आहे. हल्लीं वाटेल त्यानें औषधांची जाहिरात द्यावी, असा प्रकार फार वाढला आहे. खोटीं किंवा कुसंस्कृत औषधें वापरल्यानें लोकांच्या प्रकृतीला उलटा अपाय होतो. या गोष्टीला आळा बसणें अत्यंत जरूर आहे. या कार्यासाठीं जुन्या व नव्या पदवी-धरांचें एक मंडळ असावें, व त्यानें सर्व औषधांची तपासणी करविण्याची तजवीज करून उत्तम औषधांना गुणपत्र द्यावें, अशा अर्थाची जी डा० सरदेसाई यांनीं सूचना केली आहे, ती योग्य असून त्याप्रमाणें तजवीज व्हावी हेंच इष्ट आहे.

---

खिस्ती धर्माचें पुस्तक बायबल याचा ४३२ भाषांत तरजुमा झालेला आहे!

---

हिंदुस्थानांत एकंदर १४७ भाषा प्रचारांत असून जाती व पोटजाती यांची संख्या २३७४ आहे!

---

महाराष्ट्र-साहित्य-संमेलन येत्या एप्रीलमध्यें ईस्टरच्या सुटींत मुंबई येथें भरविण्याचें ठरून त्यासंबंधानें सेक्रेटरींचें विनंतीपत्रही आम्ही गेल्या अंकीं प्रसिद्ध केलें होतें. परंतु त्याच वेळीं उमरावती येथें प्रांतिक सामाजिक परिषद् भरावयाची असल्यामुळें त्या परिषदेच्या सेक्रेटरींच्या विनंतीवरून संमेलन शिमग्याच्या सुटींत भरवावें, असें साहित्य-संमेलनाच्या कार्यकारी मंडळीनें ठरविल्याचें जाहीर केलें आहे.

---

लिआन्स ( फ्रान्स ) येथील लष्करी इस्पितळांत जखमी होऊन आलेल्या फ्रेंच शिपायांपैकीं बऱ्याच शिपायांच्या आंगांतून फार रक्त निघून गेल्यामुळें ते अत्यंत अशक्त झाले होते. तरुण व निरोगी माणसांचें रक्त या शिपायांचे अंगांत भरल्यावांचून त्यांचा शक्तिपात थांबावयाचा नाहीं, असें वैद्यांचें मत पडून त्याप्रमाणें जाहीर नोटीस निघाली. त्याबरोबर स्वदेशाकरितां आपलें रक्त खर्च करणाऱ्या त्या शिपायांचे जीव वांचविण्यासाठीं शेंकडों लोक आपल्या अंगांतील रक्त देण्यास तयार झाले! या लोकांत पुरुष होते तशाच कित्येक स्त्रियाही होत्या!

---

फक्त जपानमध्येंच तयार झालेल्या वस्तु जपानी लोकांनीं वापराव्या, परदेशी जिन्नस वापरूं नयेत, म्हणून जपानांत हल्लीं चळवळ सुरू

झाली असून तिचा उगम राजवाड्यांत झाला आहे. उत्कर्षाचा काल याव-याचा असला, किंवा येत असला, म्हणजे सर्व बाजूंनीं सुबुद्धिच होते.

---

चालू युद्धांत इंग्लंडचा रोजचा खर्च सुमारें दीड कोटी रुप-यांचा आहे!

---

महायुद्धाचा वणवा भडकला त्या वेळीं बडोद्याचे लोकप्रिय व बहुश्रुत महाराज श्रीमंत सयाजीराव हे युरोपांत सपत्नीक होते. महाराणी मातुश्री चिमणाबाईसाहेब या तर प्रत्यक्ष शत्रूच्या घरांत अडकल्या होत्या. अशा परिस्थितींत उभयतां श्रीमंतांबद्दल सर्वांना—विशेषतः बडोद्यांतील प्रजा-जनांना—मोठी चिंता उत्पन्न झाली होती. त्यांचे पाय एकदां येथें सुखरूपपणें कसे लागतात, असें होऊन गेलें होतें. पण गेल्या महिन्याचे आरंभीं श्रीमंतांच्या स्वाऱ्या बडोद्यास सुखरूप परत आल्या व तेथें त्यांचें खूप थाटाचें स्वागत झालें. आम्हीही या प्रसंगीं उभयतां श्रीमंतांचें आनं-दानें व प्रेमानें अभिनंदन करितों.

---

आपले परमपूज्य बादशहा पांचवे जॉर्ज हे नोव्हेंबरच्या अखेरच्या आठवड्यांत फ्रान्सच्या रणभूमीवर प्रत्यक्ष गेले होते. दवाखान्यांत जाऊन त्यांनीं जखमी हिंदी शिपायांची स्वतः विचारपूस केली, लढाईचा देखावा प्रत्यक्ष पाहिला, युद्धाच्या स्वरूपासंबंधानें सेनाधिपतींबरोबर खलबतें केलीं, मेजवान्या दिल्या—घेतल्या व स्वारी ५ दिसेंबर रोजीं लंडन येथें सुखरूप परत आली.

---

मद्रास इलाख्यांत एका गृहस्थाचे घरीं श्राद्ध होतें. त्याकरितां बोलाविलेल्या ब्राह्मणांत पुनर्विवाहितांशीं अन्नव्यवहार केलेला एक होता.

इतर ब्राह्मण त्याच्या पंक्तीला बसतना. तेव्हां यजमानानें त्याला घालवून दिलें. यावर त्यानें यजमानावर अन्ननुकसानीचा दावा आणला. मॅजिस्ट्रेटनें नुकसानीबद्दल वीस रुपये देवविले. पुढें या निकालावर अपील झालें. अपिलांत शेवटीं हायकोर्टानें असा निकाल दिला कीं, अशा विशेष परिस्थितींत ब्राह्मणाला घालवून दिल्यानें त्याच्या अन्नाची कांहीं नुकसानी होत नाहीं.

---

## अमृताचे थेंब.

जन्मास येऊन तुम्हीं ब्रह्मज्ञान संपादलें कीं, सत्याच्या आधारावर तुम्ही प्रतिष्ठित झालांच; पण त्याचें ज्ञान जर तुम्हीं करून घेतलें नाहीं, तर तुमचा पुरा नाश झालाच, असें समजा. —केनोपनिषद्.

---

जो मनुष्य ईश्वरप्राप्तीची इच्छा करीत नाहीं, तो महत्पापी होय.
—स्वामी विवेकानंद.

---

स्पेन्सर साहेबांचें ‘ अज्ञेय तत्त्व ’ म्हणजे काय? आपण ज्याला माया म्हणतों तेंच तें. पाश्चात्त्य तत्त्वज्ञांना अज्ञेयाचा मोठा बाऊ वाटतो; पण आपल्या तत्त्वज्ञांनीं अज्ञेयप्रदेशांत झांप टाकून अनंताचा ठाव शोधून काढला आहे. —स्वामी विवेकानंद.

---

राष्ट्रीयदृष्ट्या पुरुषांचीच अनेक बाजूंनीं अवनति करणारें शिक्षण जर भराभर स्त्रियाही मोहानें स्वीकारूं लागल्या, तर त्या सदोष शिक्षणापासून होणारी राष्ट्रीय हानि शतगुणित होते. —प्रबुद्ध भारत.

---

ऋषींनीं आंखलेल्या मार्गानें जे कधींही गेले नाहींत, व ज्यांनीं त्यांच्या उपदेशाप्रमाणें कधीं वर्तन केलें नाहीं, तेच घमेंडखोर लोक त्यांना ( ऋषींना ) नांवें ठेवतात व त्यांच्याशीं विरोध करितात. त्यांच्या उपदेशाप्रमाणें मी तंतोतंत वागलों आहें, आणि मला कांहीं तसा ( त्यांच्या म्हणण्याप्रमाणें ईश्वरदर्शनाचा ) अनुभव आला नाहीं; तेव्हां ते ( ऋषि ) केवळ थापेबाज आहेत, असें छातीला हात लावून सांगणारा अद्यापि कोणीही माणूस पुढें आला नाहीं. अनेक वेळा जे अगदीं आणीबाणीच्या प्रसंगांत सांपडले आहेत, व अशा वेळीं ईश्वरानें आपल्याला सोडलें नाहीं, असा ज्यांना अनुभव आला आहे, अशीं माणसें पुष्कळ आहेत. संसाराचें स्वरूप असें आहे कीं, त्यांत ईश्वरनिष्ठेनें आपल्याला शांतिलाभ होत नसेल, तर आत्महत्या करून घेणें बरें. —स्वामी विवेकानंद.

---

एक मिशनरी होता. तो कांहीं कामाकरितां कुठे गांवीं गेला. मागें त्याचे तीन मुलगे अकस्मात् पटकीच्या विकारानें वारले. त्याच्या बायकोनें त्या पोटच्या लाडक्या गोळ्यांचीं तिन्ही प्रेतें नीट झांकून ठेवलीं व ती दरवाजांत नवऱ्याची वाट पहात उभी राहिली. जेव्हां तो आला, तेव्हां त्याला दरवाजांतच थांबवून ती म्हणाली, "हें पहा, तुमच्याजवळ कोणीं कांहीं आपला ठेवा ठेवला असला, आणि आपण नसतांना तो तो आपला ठेवा घेऊन गेला; तुम्हांला त्याबद्दल वाईट वाटेल का?" त्यानें उत्तर केलें, "अलबत, नाहीं वाटणार!" नंतर तिनें त्याला आंत नेलें आणि पांघरूण काढून त्याला तीं तीन प्रेतें दाखविलीं. त्यानें दुःखाचें कांहीं चिन्ह न दाखवितां त्या प्रेतांची पुढील व्यवस्था केली. निश्चांत ज्याच्या आज्ञेवांचून पानही हालत नाहीं, त्या दयामूर्ति परमेश्वराच्या अस्तित्वावर ज्यांची अचल श्रद्धा असते, त्यांचीं मनें अशीं खंबीर असतात.

—स्वामी विवेकानंद.

सर्व आयुष्यांत मनुष्याचे मनांत प्रेमाग्नि एकदांच भडकतो. तो विझाल्यावर मागें कांहीं काळ त्याची नुसती ऊब राहील, पण कांहीं केलें तरी त्याला पुन्हा पहिलें तेज म्हणून येणार नाहीं. —ॲडिएक्स.

---

धर्म नाहींसा झाला कीं, सर्वच कुलावर (कुटुंबावर) अधर्माचा पगडा बसतो. असा अधर्माचा पगडा एकदां कुटुंबावर बसला कीं, त्या कुलांतील स्त्रिया भ्रष्ट होतात. स्त्रिया भ्रष्ट झाल्या कीं, वर्णसंकर होतो. आणि वर्णसंकराच्या शेवटीं नरक ! —श्रीमद्भगवद्गीता.

---

जन्माला आलास तेव्हां तूं रडलास व बाकी सगळयांना आनंद झाला. आतां तूं आपल्या आयुष्याचा असा सदुपयोग कर कीं, तुझ्या मृत्यूच्या वेळीं तूं आनंदून जाशील व बाकी सगळे रडत बसतील !

—मार्किस डी क्रेकी.

---

दुसऱ्याचे मोहरीएवढे दोष मनुष्याला दिसतात; पण स्वतांचे बेलफळाएवढे मोठे असले, तरी ते पाहूनही तो तिकडे दुर्लक्ष करितो.

—हितोपदेश.

---

तरुणपणीं भावी सुखमय कल्पना करीत असावें व वृद्धपणीं मागें झालेल्या चुकांबद्दल रडत बसावें, हा सृष्टीचा अनादि क्रम चालू आहे.

—रॅचेपेडर.

---

लुच्चांची चार दिवस चलती चालली, तरी अखेरीस जय व्हायचा सच्च्यांचाच ! —गेसेट.

---

# केरळकोकिळ.

वर्ष ४ थें.] फेब्रुवारी १९१५. [अंक ८ वा.

## वधूपरीक्षा-परीक्षण.

लेखक—विनीत, पुणें.

रा. रा. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, बी. ए. एल्. एल्. बी., संगीत वीरतनय, मूकनायक, गुप्तमंजूष-प्रभृति नाटकांचे कर्ते, सुदाम्याचे पोहे, व भारतीय ज्योतिर्गणित या पुस्तकांचे कर्ते, यांनीं 'वधूपरीक्षा' नांवाचें गद्यात्मक नाटक लिहून आपल्या कृतींत भर घातली आहे. हें नाटक रा. कोल्हटकर यांनीं १९१३ च्या नाताळांत, म्हणजे सुमारें आठदहा दिवसांत लिहिलें; त्यानंतर एकदोन महिन्यांतच दोन नाटक मंडळ्यांनीं त्याचे प्रयोग सुरू केले. रा. कोल्हटकर यांचें हें पहिलेंच गद्यात्मक नाटक असल्यामुळें, तें लोकांना कितपत रुचतें याची त्यांना शंकाच होती; परंतु या नाटकाच्या प्रयोगाकडे रसिकांनीं आजपर्यंत जी कृपादृष्टि ठेविली आहे, तिजवरून आपल्या इतर कृतींप्रमाणें ही कृतिही ते गोड करून घेतील, अशी आशा वाटून आपली ही नवी कृति प्रसिद्ध करण्यास आपणास उत्तेजन येत आहे, इत्यादि मजकूर रा. कोल्हटकर यांनीं आपल्या पुस्तकाच्या प्रस्तावनेंत दाखल केला आहे. "रसिक प्रेक्षकांची कृपादृष्टि" या चिजेस रा. कोल्हटकरांसारख्या विद्वान् ग्रंथकारानें दिलेलें हें फाजील

महत्त्व पाहून कोणासही आश्चर्य व खेद वाटल्यावांचून राहणार नाहीं. महाराष्ट्रांत रंगभूमीस आश्रय देणारा वर्ग कोणता आहे, आणि त्याला कोणत्या प्रकारचे नाटकप्रयोग पसंत पडतात, अथवा ज्या नाटकप्रयोगास दर आठवड्यास शेंकडों किंबहुना हजारों रुपये मिळतात, त्या नाटकांची वाङ्मयांत योग्यता कितपत असते, इत्यादि गोष्टींची विस्तरतः चर्चा येथें करण्याचें आम्हांस प्रयोजन दिसत नाहीं. खुद्द रा. कोल्हटकर यांसदेखील या बाबतींत सरळ उत्तर देण्याची इच्छा असली, तर वस्तुस्थितीबद्दल त्यांचा आमचा मतभेद आहे, असें त्यांच्या मुखांतून निघणार नाहीं, असा आम्हांस भरंवसा आहे. असें असतां प्रेक्षकांची कृपादृष्टि इतक्या थोर जागीं बसवून रा. कोल्हटकरांनीं तिची आराधना करण्यास लागावें, हा कलेचा व शीलाचा अधःपात आहे, असें म्हणावयास पाहिजे. एका अर्थी 'वधूपरीक्षे'च्या कर्त्यावर या खोट्या देवतेच्या आराधनेचा दुष्परिणाम आतांच दिसूंही लागला आहे, असें म्हणतां येईल. आपल्या अंगच्या इतर गुणांप्रमाणें आपण फार जलद नाटक लिहितों, ही गोष्ट प्रसिद्ध करून तिजबद्दलही बहुजनसमाजाकडून वाहवा मिळवावी, असा मोह प्रस्तुत ग्रंथकर्त्यास झालेला दिसतो; नाहीं तर एका नाताळाच्या सुटींत आपण हें नाटक लिहिलें, हें जाहीर करण्याऐवजीं गुप्त ठेवावें, असें त्यांना वाटलें असतें. आपल्या कृतीच्या परीक्षकांबद्दल इतका अनादर कोणत्याही विद्वानास शोभत नाहीं. " नाटकाचे खरे परीक्षक म्हणजे पदरचे पैसे खर्चून त्याचे प्रयोग पाहण्यास येणारे लोक, आणि नाटकवाल्यांस झालेली पैशाची किफायत हें त्या पसंतीचें माप, " असा रोकडा जबाब अगदीं निकृष्ट दर्जाच्या नाटककर्त्यांनीं आजपर्यंत अनेक वेळा दिला आहे, आणि पैशाच्या प्राप्तीमुळें चढून जाऊन असलीं बेपरवाईचीं उत्तरें त्यांनीं द्यावीं, अशी परिस्थिति अनेक वेळा उत्पन्न होते, हें आपण पाहतों. पण रा. कोल्हट-

कर यांनीं आपण स्वतः उठून त्यांच्या पंगतीस जाऊन बसावें, हें आम्हांस विचित्र वाटतें. रा. कोल्हटकर यांच्यासारख्यांनीं लोकमत किंवा प्रेक्षकांचा उदार आश्रय याबद्दल बेफिकीर असूं नये, तर दुसऱ्या कोणीं असावें, हें आम्हांस समजत नाहीं. रंगभूमि अथवा वाङ्मय यांच्या क्षेत्राबाहेरही हाच न्याय पुष्कळ ठिकाणीं पाहण्यांत येतो. खरा गुण, खरी थोरवी, यांच्या प्राप्तीसाठीं हाडांचीं काडें करून देह झिजविण्यापेक्षां वरकांती चांगुलपणा मिळविण्यांत असंख्य लोक दंग होतात आणि आपल्या थोरवीचें मातेरें करितात. सामान्य जनतेचे आपण गुरु, त्यांना चांगलें वळण लावणें, हें आपलें कर्तव्य, हें विसरून तिचे हे दास बनतात, आणि अडाणी असमंजस लोकांनीं वहावा केली कीं, तोच मोक्ष समजून खऱ्या थोरवीशीं द्रोह करून आपला व इतरांचा अधःपात करण्यास सिद्ध होतात; हें किती खेदकारक आहे, याचा अनुभव महाराष्ट्रास तरी भरपूर आला आहे. अंगीं खऱ्या गुणाचा लेश नसतां लौकिक दृष्ट्या उत्तम ठरलेले, व क्वचित् व्यावहारिक दृष्ट्या गब्बर बनलेले वैद्य, वकील, गवई, चित्रकार, वर्तमानपत्रकर्ते, ग्रंथकर्ते, आणि लोककल्याणकर्ते यांचा धुडगूस महाराष्ट्रांत आज पुष्कळ वर्षें सुरू आहे; त्यांत आणखी भर घालण्याची हांव धरून शहाण्या लोकांनीं प्रसिद्धीस येऊं नये, एवढेंच आमचें म्हणणें आहे.

ललित वाङ्मयाच्या इतर भेदांप्रमाणें नाटकाचा मुख्य उद्देश मनोरंजन हा असला, तथापि कांहीं मर्यादेपर्यंत त्यांत तत्त्वनिरूपण अथवा बोध गौणपणें असणें अनुचित नाहीं, हें प्रस्तुत नाटककर्त्यांस मान्य आहे; आणि म्हणूनच आपण आपल्या संगीत नाटकांत कांहीं तत्त्वांचें मंडन करण्याचा जसा प्रयत्न केला आहे, तसा वधूपरीक्षेंतही केला आहे, असें त्यांचें म्हणणें आहे. त्यांच्या संगीतनाटकांतील तत्त्वमंडन काय आहे व तें कितपत साधलें आहे, हें या लेखांत पाहण्याचें कारण नाहीं; परंतु प्रस्तुत नाट-

कांत मुख्य तत्त्व अनुलोमविवाह हें असून त्याच्या अनुरोधानें बालाविवाह, विषमविवाह, जातिभेद, यांचा विचार आणिला आहे, असें ग्रंथकर्त्याचें म्हणणें आहे. या नाटकांतील नायिका शूद्रकन्या असावी असा कांहीं काळ संशय आला होता, पण पुढें ती ब्राह्मणकन्या ठरून नायक मोठ्या प्रसंगांतून बचावले आहेत! पुनर्विवाहितांच्या पंक्तीस भोजनास जाण्याचा संकल्प करून ऐनवेळेस उपोषणाची आठवण होऊन न जेवतां घरीं माघारें यावें, आणि सुधारणेस हातभार लाविल्याचा आविर्भाव करावा, पुढें ग्रामण्य उपस्थित झालें तर " मी जेवलों नाहीं " ही सबब पुढें आणावी, अशा बाणेदार वर्तनांत जी मुख्य गोम आहे, तीच या नाटकांतील तत्त्वमंडनांत आहे. सोडमुंजीच्या वेळीं काशीयात्रेस जाण्याचा बहाणा बटूस करावा लागतो, पण त्याच्या पाठीवरच्या शिधासामुग्रीच्या गांठोड्यावरूनही तो तो काशीस खराच जाणार, असें कोणी समजत नाहीं. तीच अवस्था या प्रकारच्या ढोंगी तरफदारीची आहे. असल्या तरफदारीनें सुधारणेचा गाडा चिखलांतून बाहेर निघेल असें ज्यांस वाटतें, त्यांची कींव करावी तेवढी थोडी असें आम्हांस वाटतें. ही लंगडी तरफदारीदेखील फक्त अनुलोमविवाहाबद्दल आहे; प्रतिलोमविवाहाची वाट काय? रा. कोल्हटकरांच्या " नायिकेसारख्या सद्गुणसंपन्न बालेस केवळ ती हीनजातीय आहे म्हणूनच उच्चवर्गीयानें पाणिग्रहणयोग्य न मानणें अन्याय आहे, " एवढा ग्रह जरी तटस्थांच्या मनांवर झाला, तरी सार्थक झालें, असें त्यांचें म्हणणें आहे: अर्थात् प्रतिलोमविवाह आपणांस संमत नाहीं, असें नाटककर्त्याचें मत दिसतें. हा तर्क खरा असेल, तर जातिभेदाचें खरें शल्य आणि विवाहादि संबंधांचें खरें रहस्य, यांचा सांगोपांग विचार अद्यापि त्यांनीं करावा तसा केला नाहीं, असेंच म्हणणें प्राप्त आहे. स्त्रीजातीविषयीं असावा तितका आदरही या नाटकांत दिसून येत नाहीं. स्त्री म्हणजे एक उपभोग्य वस्तु;

ती सुंदर असावी, प्रेमळ असावी, पतीच्या जिवास जीव देणारी असावी; पण यापेक्षां अधिक योग्यतेची किंवा स्वातंत्र्याची तिला अपेक्षा नसावी; पुरुषांच्या सुखासाठीं जेंवढे अवश्य तेवढे गुण तिनें संपादन करून पतीचें मन रिझवावें, परंतु पुरुषावर अवलंबून न राहतां आपलें जीवित कंठण्याचा विचारही तिनें मनास शिवूं देवूं नये; स्त्रियांना वेगळें असें जीवित किंवा कर्तव्य नाहीं; मूर्ख, लहरी किंवा लबाड पतीच्या पदरीं पडलेल्या स्त्रीनेंही सर्वदां त्याच्या आज्ञेंत राहून आपलें मातेरें करून घ्यावें, हाच त्यांचा धर्म होय, हाच बोध अथवा हेंच तत्त्वमंडन नवीन नाटकांत करावयाचें असेल, तर आपण एखादी अपूर्व गोष्ट करीत आहों, असें कोणत्याही नाटककर्त्यानें मनांत आणावयाचें कारण नाहीं. तत्त्वमंडन हें नाटकाचें प्रधान अंग नव्हे. कला या दृष्टीनें पाहतां मनोरंजन हें मुख्य अंग आहे, म्हणून या नाटकाच्या अंतीं भिन्नजातीय वधूवरांचा विवाह घडवून आणिला नाहीं, "तसें केल्यानें कलेच्या दृष्टीनें बरीच हानि होईल," असें रा० कोल्हटकर यांस वाटत आहे! म्हणजे ज्या तत्त्वाच्या मंडनानें कुंठित होऊन सामान्य जनतेनें हजारों वर्षे अंगीं खिळलेले ग्रह, आणि धार्मिक बनलेले आचारविचार सोडावे, अशी नाटककर्त्यांची अपेक्षा आहे, त्याच तत्त्वाच्या मंडनानें स्वतः नाटककर्त्यास आपल्या स्वतःच्या काल्पनिक अपत्यांत मिश्र विवाह घडवून आणण्याचें धैर्य होत नाहीं! तें धैर्य इतरांस आपल्या पोटच्या हाडामांसाच्या अपत्यांच्या विवाहाच्या वेळींमात्र यावें, अशी नाटककर्त्यांची अपेक्षा किती व्यर्थ आहे, हें विद्वान् रा० कोल्हटकरांच्या लक्षांत येऊं नये, हें मोठेंच आश्चर्य आहे. 'पुराणांतलीं वांगीं पुराणांत' म्हणून एक जुनी म्हण आहे; पण येथें तिच्यावर ताण झाली आहे.

तत्त्वमंडन हें गौण अंग याप्रमाणें लुळें पडल्यावर मुख्य अंगास

त्यानें बिलकुल जोर येत नाहीं, हें सांगावयास नको. आतां नाटकाच्या प्रधान अंगाकडे वळूं. नाटक हें वस्तुस्थितीचें इष्टपरिणामकारक चित्र, असें म्हटलें, किंवा शास्त्रीय परिभाषेंत अशा अर्थाची दुसरी एखादी व्याख्या केली, तरी वस्तुस्थिति सोडून असंभाव्य अशा कल्पित परिस्थितीं वर नाटकाच्या वस्तूची म्हणजे मुख्य कथानकाची रचना कधींही चित्त-वेधक होणें शक्य नाहीं. नाटककर्त्यानें हें वर्णन केलें आहे, पण असें खऱ्या सृष्टींत होणें शक्य आहे काय, हा प्रश्न प्रेक्षकांच्या किंवा वाचकांच्या मनांत वरचेवर उभा राहूं लागला, आणि त्याचें उत्तर आरंभापासून अखेर-पर्यंत नकारात्मक द्यावें लागलें, तर रसहानि होऊन मनाचा विरस होतो, आणि मनोरंजनाऐवजीं मनस्ताप उत्पन्न होऊन विपरीत परिणाम होतो, हें सहृदय वाचकांस किंवा कवींस अनुभवानें माहीत असतें. नाटकांत किंवा काव्यांत वर्णिलेल्या स्थितीचा अथवा विचारांचा प्रत्य-पदोपदीं श्रोत्यांस व्हावयास पाहिजे; तो जर येईनासा झाला, तर रसहानि होण्यास दुसरें काय पाहिजे? वधूपरीक्षेचें कथानक सर्वथा असंभवनीय म्हणून उद्वेगजनक आहे, असें मोठ्या नाखुषीनें आम्हांस म्हणावें लागत आहे. हें कथानक थोडक्यांत येथें सांगण्याचा प्रयत्न करून पाहूं व तें सांगतां सांगतांच त्यांतील असंबद्धतेचें दिग्दर्शन करूं:—धुरंधर नांवाचे एक तरुण राजपुत्र आपला इतमाम बाजूला ठेवून विलायतेहून परत आपल्या बंदरांत परत आले. त्यांचे वडील वारले होते, आणि विधवा मातुःश्री चिरं-जिवाच्या आणि राज्याच्या पालनकर्त्या होत्या; त्या बऱ्याच चाणाक्ष, धोरणी परंतु अमळ जुन्या चालीच्या होत्या. चिरंजिवाच्या या 'गुप्तरूपानें येण्या-वरून' बाईंनीं तर्क काढिला ( कसा कोण जाणे! ) कीं, आपल्या चिरं-जिवाच्या मनांत, प्रथम आपली वधू स्वतःच पसंत करावयाची, आणि नंतर प्रजाजनांना खऱ्या रूपानें दर्शन द्यावयाचें, असा विचार आहे!

चमत्कार हा कीं, हा अंदाज खरा ठरला, आणि थोडे आढेवेढे घेऊन मातुःश्रींनीं चिरंजिवास गुप्तरूपानें राहून आपल्या वधूची निवड करावयास परवानगी दिली; परंतु आईसाहेबांच्या प्रेमळ हृदयांत शंका उत्पन्न झाली कीं, वधूची निवड करण्याच्या नाजुक कामगिरींत गुप्तरूपानें चिरंजीव गुंतले असतां " त्यांचें खरें स्वरूप जर कां उघडकीस आलें, तर ( कां कोण जाणे! ) त्यांचा बेत फसून प्राणावरही संकट यावयाचें ! " त्याची कांहीं खबरदारी घेण्यासाठीं त्यांनीं अशी तोड काढिली कीं, धुरंधरमहाराजांनीं दाढीस कायमची रजा द्यावी. राज्यांतील एकानेंही त्यांना गेल्या बारा वर्षांत पाहिलें नव्हतें, आणि लोकांस त्यांची ओळख दाढीनिशीं काढलेल्या चित्रांवरून झालेली, तेव्हां दाढीस रजा दिली कीं, ओळख बुजाली. याच्या जोडीला असें जाहीर करावयाचें कीं, एक तोतया, राजपुत्राची गादी रूपाच्या साहश्याच्या जोरावर बळकावूं पहा.. आहे, म्हणून (पुनः, कां कोण जाणे!) "खऱ्या राजपुत्रास तूर्त विश्वासू रक्षकांच्या पाहऱ्यांत बंदोबस्तानें ठेविलें आहे ! " इतकें केल्यावर धुरंधर महाराज 'ज्योतिष्याचा वेष' घेऊन 'वधूसमुद्रांतून अत्यंत उज्ज्वल रत्न शोधून काढण्याच्या' अवघड कामास लागले आहेत. ज्योतिष्याचा वेष हा काय असतो, हें आम्हांस माहीत नाहीं; व पुस्तकांतील चित्रावरूनही त्याचा बोध होत नाहीं. धुरंधरमहाराजांच्या या कामगिरीच्या वेळीं भार्गव या नांवाच्या एका मित्राचें त्यांनीं साहाय्य घेतलें आहे. या मुलाचे वडील मृत्यु पावल्यानंतर तो पोरका झाला, आणि त्याच्या पालन-पोषणाची जबाबदारी संस्थानाकडे आली. तेव्हां राणीसाहेबांनीं त्याला पोटच्या पोराप्रमाणें वागवून, आणि धुरंधरमहाराजांनीं आपल्या बंधूप्रमाणें मानून त्यावर "डोंगरासारखे" (!) उपकार केले! ते यथाशक्ति फेडण्याचा त्याचा निश्चय होता. धुरंधरमहाराजांबरोबर तो नुकताच विलायतेहून परत आला

होता. तो परत आल्यावर राणीसाहेबांनीं त्याच्या वडिलांचें मृत्युपत्र म्हणून बंद केलेला एक लखोटा त्याच्या हातीं दिला. त्यांत त्याच्या वडिलांनीं आपल्या हातून घडलेल्या एका गुप्त अपराधाची सविस्तर हकीकत कथन केली होती. "सतरा वर्षांपूर्वी आपल्या घरीं एक अनोळखी गृहस्थ येऊन त्यानें आपली सोन्यासारखी मुलगी व तिच्या खर्चाकरितां सोन्यानें भरलेली एक पिशवी माझ्या स्वाधीन ठेव म्हणून ठेविली. त्याच दिवशीं दुसरा एक नवखा गृहस्थ आपल्या घरीं पांथस्थ म्हणून बिऱ्हाडास आला. हें पाहून मीं दुष्टानें द्रव्याच्या अभिलाषानें, व ठेव ठेवणारा लवकर परत येईल या भीतीनें, त्या पांथस्थाच्या बिस्तीवर त्याच रात्रीं त्या मुलीला टाकून कुटुंबासह देशांतर केलें. सुदैवानें त्या मुलीच्या गळयांतील जस्ती ताईत तसाच राहूं देण्याची बुद्धि मला झाली." पुढें परमुलखांत "तापाच्या सांथींत" भार्गवाचे सर्व आप्त आणि वडीलही मरण पावले. त्या मृत्युपत्रांत भार्गवाच्या वडिलांनीं त्यास अखेरीस आज्ञा केली होती कीं, "त्या मुलीला तुझी धाकटी बहीण समजून तिचा त्या जस्ती ताईताच्या धोरणानें शोध करून तिला शक्य तितक्या वैभवास चढवावें, ही माझी अखेरची इच्छा आहे." भार्गवानें लहानपणीं एक लहान मुलगी पाहिली होती, पण तिची तोंवर त्याला आठवणदेखील नव्हती, परंतु या मृत्युपत्रानें त्याच्या स्मृतिपटलावरची धूळ उडून तें उज्ज्वल झालें, आणि त्याला आपल्या ताईची "सुंदर केंविलवाणी मुद्रा" दिसूं लागली! त्याला आपली ताई इतकी सुंदर वाटूं लागली कीं, तिला आपल्या संस्थानिक मित्राची पत्नी करून संस्थानची मालकीण करण्याची महत्त्वाकांक्षाही त्याच्या मनांत उद्भवली! पण अडचण इतकीच कीं, त्या बहिणीचा शोध अद्यापि लागला नव्हता. कदाचित् ती आधींच मृत्यु पावली असेल, असाही संभव आहे, असेंही त्याच्या मनांत येऊं लागलें होतें.

धुरंधरमहाराज विलायतेंत असतां त्यांच्या "आईसाहेबांनीं आटोकाट धोरणानें राजधानींतील अठरा वर्षांखालील मुलांमुलींकरितां सक्तीच्या ब्रह्मचर्याचा व शिक्षणाचा नियम करून तो अमलांतही आणिला. त्याचीं गोड फळें आतां चोहोंकडे दिसत होतीं; केवळ शरीरानेंच नव्हे, तर मनानेंसुद्धां सुंदर बांधेसूद व पूर्ण वाढ झालेल्या अशा मुली संस्थानांत शेंकड्यांनीं मोजितां येतील," अशी स्थिति झाली होती! धुरंधरमहाराज विलायतेस गेल्यावर सक्तीच्या ब्रह्मचर्याचा आणि विद्येचा कायदा राजधानीपुरता करण्यांत येऊन तो अंमलांत आला, आणि अवघ्या पांचचार किंवा फार तर दहाबारा वर्षांच्या अवधींत संस्थानच्या सामाजिक चालीरीतींत आणि विचारसरणींत इतका जमीनअस्मानाचा फरक पडलेला पाहून रा. कोल्हटकरांची नाट्यसृष्टि एखाद्या भाडोत्री ब्रह्मदेवानें घडविली असली पाहिजे, असें वाटूं लागतें! ब्राह्मण-शूद्रादि-वर्णव्यवस्थांकित समाजांत "संस्थानांतील झाडून साऱ्या उपवर मुली शहरांत गोळा झाल्या आहेत." विलायतेंतील एखाद्या हवा खाण्याच्या मैदानावर किंवा समुद्रकाठीं, तरुण विवाहेच्छु किंवा कामी जन परस्परांच्या दर्शनाच्या आशेनें हिंडतात, आणि एकमेकांच्या समागमांत कांहीं काळ घालवितात. त्याप्रमाणें रा. कोल्हटकरांच्या संस्थानांतही "देवदर्शनासाठीं" अनेक 'रमणी व त्यांचे वल्लभ' एकत्र जमतात. त्यामुळें कधीं कधीं "स्त्रीलताकुंजांत" पुरुषांची दिशाभूल होते, "रमणीलहरींत" दोन क्षुद्र पुरुषनौकांची अथवा पडावांची चुकामूक होते, किंवा त्यांच्या 'चक्रव्यूहांत' अचुक वाट काढणें दुरापास्त होतें. "गादीचा नुकताच वयांत आलेला मालक परदेशींचा आपला अभ्यासक्रम आटोपून राज्यसूत्रें हातीं घेण्याकरितां परत आला आहे व त्याबरोबरच विवाहसूत्रानें बद्ध होण्याचाही त्याचा विचार आहे, या क्षोभजनक वार्तेनें संस्था-

नचें मंथन " होऊन त्याचें " संपूर्ण युवतिरूप नवनीत " एकत्र जमतें; या तरुण, विवाहेच्छु, आणि सौंदर्याच्या जाळ्यांत कामी मृगांस पकडण्यास तयार झालेल्या मुलींच्या आयादेखील, विलायतेंतील आपल्या भगिनींप्रमाणें लग्नें जुळविण्याच्या कामांत अगदीं चूर झालेल्या, आणि नाना प्रकारच्या युक्त्या लढविणाऱ्या, अहंमन्य, पराकाष्ठेच्या मत्सरी, आणि परोत्कर्षासहिष्णु बनल्या आहेत. म्हातारेकोतारे पुरुषदेखील तरुण जनांच्या तोंडून " ही माझी रमणी, " किंवा " हा माझा वल्लभ " अशीं वर्णनें ऐकितात, हे वल्लभ रमणींची प्रेमाराधना करितात, तें हे निमूटपणें पाहतात, आणि त्यांत त्यांना कांहीं आश्चर्य वाटत नाहीं; न्यायाच्या कचेऱ्यांतदेखील वृद्ध-तरुण स्त्रिया खटले पाहण्यास आणि आपखुषीनें साक्षीदार म्हणून साक्षीदाराच्या पिंजऱ्यांत जाऊन उभ्या राहण्यास तयार आहेत. तात्पर्य रा. कोल्हटकर यांच्या मनःसृष्टींतील हा विचित्र समाज ना हिंदी, ना युरोपियन, अशा तऱ्हेचा बनला आहे. धुंरधरमहाराज विलायतेहून अभ्यास संपवून परत येतात, तों त्यांच्या संस्थानच्या रीतीभातींत इतका फरक पडलेला पाहून आपण स्वदेशीं आहों कीं परदेशीं, याचा त्यांस भ्रम पडावयास पाहिजे होता; पण ते स्वतः रा० कोल्हटकरांनींच निर्माण केलेले असल्यामुळें त्यांना तसा भ्रम झाला नाहीं. सक्तीच्या ब्रह्मचर्याचा आणि विद्येचा कायदा पास करून आणि अंमलांत आणून एवढ्या थोड्या अवधींत एवढा मोठा फरक पडणें शक्य आहे, असें रा० कोल्हटकर यांचें खरोखरच मत असेल, तर त्यांच्या भोळेपणाची कींव करावयास पाहिजे ! सरकारी कायद्यानें सामाजिक सुधारणा झपाट्यानें घडवून आणिली पाहिजे, असें प्रतिपादन करणाऱ्या प्रमुख सुधारक वीराच्या स्वप्नांतदेखील अशी गोष्ट कधीं आली नसेल; कारण शेकडों वर्षें चालत आलेल्या रूढि आणि समजुती अपायकारक आहेत,

असें विवेकदृष्ट्या सिद्ध करून दाखविलें, तरी त्यांचा मनुष्यमात्रावरचा पगडा एकाएकीं नाहींसा होत नाहीं, सुधारणेसदेखील कालाची मदत घ्यावी लागते, हें त्यांस चांगलें अवगत असतें, आणि अनुभवासही आलेलें असतें. म्हैसूर, बडोदें या संस्थानांत कोल्हटकरांच्या संस्थानासारखे कायदे पास होऊन आणि अंमलांत येऊन पुष्कळ वर्षें लोटलीं आहेत. तेथें सामाजिक चालीरीतींत असा कांहीं फरक पडला आहे कीं काय, याची चौकशी नाटककर्त्यानें केली असती, तर कदाचित् त्याच्या हातून असा प्रमाद घडला नसता. प्रस्तुत नाट्यसृष्टींतदेखील या कायद्याच्या जडीबुट्टीचा गुण फक्त ब्राह्मणलोकांवर झालेला दिसतो. या नाटकांत ब्राह्मणेतर पात्रें आहेत तीं अगदीं अशिक्षित आणि अडाणी आहेत. त्यांच्या बाबदींत कायदा लागू कां केला नव्हता, हें कळत नाहीं.

धुरंधरमहाराजांनीं स्वत: 'वधूसमुद्रांतून अत्यंत उज्ज्वलरत्न ' शोधून काढण्याची कामगिरी शिरावर घेतली, परंतु आपल्या मातु:श्रीचा अनुभव आपणास ' ध्रुवाप्रमाणें मार्गदर्शक होईल ' अशी त्यांची निष्ठा होती, म्हणून त्यांच्या सूचनेवरून, त्यांच्या शहरांत विश्वेश्वरशास्त्री नांवाचे एक घरंदाज गृहस्थ होते, त्यांची गंगू नांवाची एक सुरेख व गुणी मुलगी होती, तिजकडे त्यांनीं आपलें सुकाणूं वळविलें. या मुलीची मैत्रीण यमुना हीदेखील ' वाखाणण्यासारखी ' होती. या दोघी नापसंत झाल्या, तरच दुसरीकडे ठरविण्याचें त्यांनीं आपल्या मातु:श्रीपाशीं कबूल केलें होतें. विश्वेश्वरशास्त्र्यांच्या घरीं ज्योतिष्याच्या वेषानें धुरंधर, आणि यमुनेच्या घरीं मस्तकशास्त्री या वेषानें त्यांचे मित्र भार्गव, हे जाऊन राहिले. यमुनेचे मातापितर कोण होते, याचा प्रेक्षकांना अखेरपर्यंत पत्ता नाहीं, आणि पुढें या मुलीचें लग्न ठरतें तेव्हांही ते बापडे पुढें येत नाहींत, हादेखील सक्तीच्या ब्रह्मचर्याचा आणि विद्येच्या कायद्याचा महिमा असावा !

धुरंधरमहाराजांच्या संस्थानांतच हल्लीं न्यायाधीशाच्या जाग्यावर काम करीत असलेले प्रयागपंडित नांवाचे एक ब्राह्मण गृहस्थ होते. भार्गवाच्या बापाजवळ आपली तान्ही मुलगी देऊन तिच्या खर्चाकरितां 'सोन्यानें भरलेली पिशवी' ज्यांनीं ठेविली होती, ते हेच गृहस्थ. यांची पत्नी तेव्हां नुकतीच मरण पावली होती, यामुळें वैतागून ते तीर्थयात्रेस निघून गेले होते. "न जाणों, कदाचित् ब्राह्मणाची बुद्धि फिरावयाची, आणि तें द्रव्य गिळंकृत करून वर मुलीचा तो त्यागही करावयाचा, अशी भीति वाटून व तसें झाल्यास मुलगी पुढें ओळखतां यावी, म्हणून एका कागदावर एक सांकेतिक आकृति काढून, त्याचा अर्धा तुकडा एका जस्ती ताईतांत घालून तो ताईत मुलीच्या गळ्यांत अडकवून दिला, आणि दुसरा तुकडा प्रयागपंडितांनीं आपणापाशीं ठेविला." जो मनुष्य पैशाच्या लोभानें मुलीचा जाणूनबुजून त्याग करील, त्याला गळ्यांत अडकवलेला ताईत काढून घेतां येईल, हा संभव या पढतमूर्ख पंडितांच्या स्वप्नींही आला नाहीं! असो, ही प्रयागपंडितांची कन्या या वेळीं वयानें सुमारें गंगूइतकीच असून ती विश्वेश्वरशास्त्र्यांच्या घरींच रहात होती. कारण भार्गवाच्या बापानें ज्यांच्या भिस्तीवर तिला टाकून पैसा घेऊन पलायन केलें होतें, ते हेच गृहस्थ होत. विश्वेश्वरशास्त्र्यांच्या घरीं एखाद्या आश्रिताप्रमाणें राहून या मुलीनें सर्वांचें प्रेम संपादन केलें होतें. विश्वेश्वरशास्त्र्यांचें कुटुंब वाराणशीबाईमात्र या मुलीचा म्हणजे त्रिवेणीचा अलीकडे हेवा करीत असे. त्रिवेणीमुळें गंगूच्या लग्नाचा संभव तितका कमी होणार, हें तिजसारख्या चाणाक्ष आणि विवाहकारस्थानपटु स्त्रीला कळून चुकलें होतें. धुरंधरमहाराज ज्योतिष्याच्या वेषानें त्यांच्या घरीं राहिले, अर्थात् त्यांनीं गंगू, यमुना आणि त्रिवेणी यांना त्यांच्या भावी स्थितीविषयीं भविष्यें सांगितलीं, आणि त्यांतच त्यांचा स्वभाव, शिक्षण आणि महत्त्वाकांक्षा यां-

विषयीं त्यांना अंदाज करितां आला. याच वेळीं यमुनेचें प्रेम आपला स्नेही भार्गव–जो मस्तकशास्त्री म्हणून तिच्या घरीं बिऱ्हाडास राहिला होता त्यावर बसलें आहे, ही गोष्ट त्यांना समजली. धुरंधरमहाराजांचें प्रेम गंगूवर न बसतां त्रिवेणीवर बसलें. गंगूचें लग्न महाराजांशीं झालें तर त्रिवेणीचें लग्न तिच्या वशिल्यानें राजघराण्यांत जन्म पावलेल्या पार्थिव नांवाच्या एकाशीं करून देतां येईल, असें वाराणशीबाई म्हणत होत्या. वस्तुतः धुरंधरमहाराजांस वाराणशीबाईनीं किंवा गंगूनें कधीं पाहिलें नव्हतें. त्यांच्या पदवीस, श्रीमंतीस आणि ऐकींव किंवा काल्पनिक गुणांस भुलूनच गंगू त्यांची भार्या होण्यास आतुर झाली होती. पार्थिवानें गंगूस मागणी घातली, पण ती याच कारणानें नाकारण्यांत आली होती. खरें पाहतां यांत गंगूचा किंवा तिच्या मातुःश्रीचा नीचपणा कांहींच नव्हता. त्रिवेणी गरीब, आश्रित म्हणून संस्थानिकाची राणी होण्याची महत्त्वाकांक्षा तिला झाली नाहीं. तिनें आपलें प्रेम एका ज्योतिष्यास अर्पण केलें यांतही तिचें सौजन्य दिसत नाहीं.

भार्गव आपल्या वडिलांच्या आज्ञेस अनुसरून जस्ती ताईताच्या खुणेवरून आपल्या बहिणीचा शोध काढूं लागला. त्यासाठीं त्यानें ‘ दुंदुभि ’ पत्रांत एक जाहिरात दिली. नायिकेचे वडील प्रयागपंडित, जे हल्लीं न्याया-धीशाच्या कामावर होते, त्यांच्या अवलोकनांत ही जाहिरात आली. त्याच-प्रमाणें त्रिवेणी ज्या विश्वेश्वरपंडिताच्या घरीं राहिली होती, त्यांसही या जाहिरातीनें त्रिवेणीच्या जन्मदात्या पित्याचा शोध लागेल, असें वाटूं लागलें. हे तिन्ही गृहस्थ आपणांस एका गुप्त कारस्थानाचा आज छडा लागणार, या समजुतीनें जाहिरातींत सांगितल्याप्रमाणें स्मशानांत जमाव-याचे. पण प्रयागपंडितांनीं शहरच्या अक्षरशत्रु फौजदारास, व त्यानें आपल्या मुलास स्मशानांत पाठविलें; विश्वेश्वरशास्त्र्यांनीं आपल्या घरच्या

आश्रित जोशीबोवास म्हणजे धुरंधरास पाठविलें. या दोघांची व भार्गवाची गांठ पडली, तेव्हां जाहिरातीबद्दल किंवा तींत वर्णिलेल्या मुलीच्या जन्माबद्दल अवाक्षरही न निघतां तिघेही आपल्या वाटेनें परत गेले. परंतु त्रिवेणी जातीची कुणबी असावी असा धुरंधरांस संशय आला, व तो त्यांनीं विश्वेश्वरास सांगितला. त्याबरोबर त्यांच्या घरीं मोठी खळबळ उडून गेली. गांवांत बोभाटा होऊन आपणास बहिष्कार घालतील, म्हणून घरांतलीं सर्व माणसें आरामबागेंत शास्त्रीबोवांनीं मोठ्या पहाटेस रवाना केलीं पाहिजेत असें ठरविलें, आणि सोबत जोशीबोवांस जावयास सांगितलें. सुधारलेल्या संस्थानांत बहिष्कारास्त्र एवढें तीव्र कसें राहिलें, आणि बागेंत पाठविल्यानें बचाव कसा होणार, याचा कांहींच बोध होत नाहीं. त्रिवेणीनें आपल्या हीन जातीविषयीं बातमी आडून ऐकिली, तेव्हां तिला फार दुःख झालें, व तिची निराशा झाली. त्या भरांत त्याच रात्रीं तिनें विहिरींत उडी घेतली. तिची सुटका धुरंधरानें केली. विहिरींतून बाहेर काढल्यावर धुरंधरानें आश्वासन देऊन तिची समजूत केली, आणि तूं शूद्र आहेस हें अनुमान बरोबर नाहीं; व तें खरें आहे असें घटकाभर कबूल केलें तरी शूद्री व ब्राह्मण यांचा अनुलोमविवाह करण्यास शास्त्र प्रतिकूल नाहींच, असें सांगून तिला धीर दिला!—या नाटकाचा मध्य तो हाच. येथून पुढें नाटकाच्या कथानकाच्या कमानीस उतार लागला आहे.

यमुनेचें प्रेम भार्गवावर होतें, आणि तो जस्ती ताईत गळ्यांत असलेल्या मुलीच्या शोधांत आहे असें पाहून यमुनेस त्रिवेणीचा हेवा वाटूं लागला. आणि तिनें तो ताईत तिच्या गळ्यांतून काढून एका मोलकरणीच्या गळ्यांत घातला. यामुळें जस्तीताईताच्या मुलीचा शोध करणारांची बरीच दिशाभूल झाली.

धुरंधराचा एक दूरचा भाऊ पार्थिव म्हणून होता. धुरंधरामागें

गादीचा वारसा त्याच्याकडे जात होता. त्याला धुरंधराचें वेषांतर आणि तोतयाचें थोतांड बिलकुल माहीत नव्हतें. तो कोतवालाच्या मदतीनें तोतयाचा शोध करीत होता. या शोधांत त्याला धुरंधराचे कपडे आणि दागिने विश्वेश्वराच्या घरीं सांपडले, परंतु धुरंधर कोठें सांपडेना. तेव्हां त्याचा खून झाला असला पाहिजे, असा तर्क त्यानें बांधिला आणि तो आरोप हे कपडे व दागिने ज्याजवळ सांपडले त्यावर, म्हणजे खुद्द धुरंधरावर शाबीद करण्यासाठीं पुरावा गोळा करूं लागला. अखेरीस न्यायाधीशापुढें, म्हणजे त्रिवेणीच्या बापापुढेंच खटला चालून धुरंधरास शिक्षा सुनावण्यापर्यंत त्याची मजल गेली. इतक्यांत आईसाहेब येऊन सर्व घोटाळा मिटवितात. आणि अखेरीस सर्व खुलासा होऊन विवाह लागतात.

याप्रमाणें सर्वथा असंभवनीय, आणि नीरस असें या नाटकाचें कथानक आहे. यांत कोणतेंही तत्त्वमंडन झालें नाहीं, किंवा श्रोत्यांच्या मनावर एकादा ठसाही उमटला नाहीं. यांत स्वभाववैशिष्ट्य साधलें असेल, तर त्रिवेणी, यमुना आणि वाराणशी यांचें होय. बाकीच्या पात्रांत वैशिष्ट्य असें फारसें दिसत नाहीं. नायिकेची भूमिकाही असावी तितकी उदात्त नाहीं. दुसऱ्याचें बोलणें आडून ऐकणें आणि समजून उमजून खोट्या गोष्टी साक्षींत प्रतिज्ञेवर सांगणें, हे दोष आमच्या दृष्टीनें फार मोठे व अक्षम्य आहेत. उज्ज्वल सत्यनिष्ठेनें एखादी साधीभोळी स्त्रीदेखील आदरास कशी पात्र होते, हे स्कॉटच्या 'जेनी डीन्स' या पात्राच्या स्वभाववर्णनावरून दिसण्यासारखें आहे. या नाटकांतही अशी सत्यनिष्ठा दाखविणें अशक्य नव्हतें. सत्य जयास जात नाहीं म्हणून वैतागानें असत्य पुढें करणें हा नेभळेपणा आहे, व नायिकेची भूमिका यानें हीनकस झाल्यावांचून रहात नाहीं. धुरंधर, भार्गव, विश्वेश्वरपंडित हीं अगदीं वैशिष्ट्यहीन माणसें आहेत. प्रयागपंडिताच्या चरित्रांतमात्र दुःखाची छटा दिसत आहे,

ती रसपरिपोषक आहे. रा० कोल्हटकरांच्या भाषेविषयीं सामान्यतः लिहावयाचें तर ती चांगली आहे असेंच म्हटलें पाहिजे; तथापि वेळीं अवेळीं केवळ शब्दश्लेष साधण्यासाठीं त्यांचीं सर्वच पात्रें ओढाताण व धडपड करितात हें पाहून विरस होतो. इंग्रजी वाक्यसंप्रदायांचें भाषांतर केल्याचाही जागोजाग प्रत्यय येतो. परंतु हल्लींच्या काळीं ही गोष्ट थोडीशी अपरिहार्य आहे हें कबूल केलें पाहिजे. या ग्रंथांत प्रसंगानुसार कित्येक चित्रें घातलीं आहेत, तीं या नाटकाचे प्रयोग करितांना जो नेपथ्य करण्यांत येतो, त्याचीं दर्शक असतील, तर ग्रंथकर्त्याप्रमाणेंच अभिनय करणारांतही औचित्यविचाराचा पूर्ण अभाव दिसतो. विहिरींत उडी घेतलेल्या त्रिवेणीचें वस्त्र कोरडें आहे; प्रयागपंडित हायकोर्टाच्या जज्जाप्रमाणें गौन, मानपट्टया घातलेले, इतकेंच नव्हे, तर डोक्के भांग काढलेले खुर्चीरूप न्यायासनावर बसले आहेत ! पुरुषपात्रांच्या पोषाखांचाही धेडगुजरीपणा लक्षांत आल्यावांचून रहात नाहीं. असो. रा. कोल्हटकर यांचा हा प्रयत्न जसा साधावयास पाहिजे तसा साधला नाहीं, असें म्हणणें जरी आम्हांस प्राप्त आहे, तरी त्यांच्यासारखी अनुकूलता फारच थोड्या मराठी ग्रंथकर्त्यांस असते, हें कबूल केलें पाहिजे. त्यांची प्रतिभा, त्यांची कल्पनाशक्ति, त्यांचें भाषेवरील प्रभुत्व इत्यादि अनेक गुण वाखाणण्यासारखे आहेत. त्यांनीं विशेष काळजी घेऊन लिहिलेल्या कृति मराठी वाङ्मयांत पुष्कळ मोठ्या योग्यतेच्या ठरल्यावांचून राहणार नाहींत, अशी आम्हांस खात्री वाटते.

---

१७

# क्षमेची तृष्णा.

लेखक–नारायण सिताराम फडके.

स्वदेशत्याग दुर्घट व दुःसह असला, तरी स्वदेशपर्यटण पुष्कळ सुखदायक असतें. केवळ पोटासाठीं अनेक इंग्लिश लोकांनीं देशांतर केलें आहे. परंतु हिंदुस्थानांतील लोक पोटासाठींसुद्धां स्वदेश सोडण्यास लवकर तयार होत नाहींत. तरी देशत्याग, व ज्या गांवीं जन्म झाला त्याच गांवीं चिकटून राहण्याची वेडी इच्छा या दोन्ही टोकांकडे धांव न घेतां मधल्याच मार्गाचा अवलंब लोक हळूहळू करूं लागले आहेत. पुष्कळ महाराष्ट्रीय कुटुंबें सध्यां वऱ्हाडांत नांदत आहेत. कांहीं दाक्षिणी मंडळी गंगेनें सुपीक करून सोडलेल्या वंगदेशांत सुखानें आयुष्य घालवीत आहेत. थोडेसे महाराष्ट्रांतील लोक रावी, चिनाब वगैरे नद्यांनीं घेरलेल्या प्रांतांतील आपल्या लहानशा पण टुमदार घरांत आपल्या मुलांबाळांच्या लीलांकडे कौतुकानें पहात आहेत.

रावी नदीच्या कांठीं झाडांच्या गर्दीतून हळूच डोकें वर काढण्याऱ्या बंगल्यांची जी रांग दिसते, त्या रांगेमधील दोन बंगल्यांची बांधणी व एकंदर ठेवण महाराष्ट्रीय असल्याचें तेव्हांच लक्षांत येत होतें. त्या बंगल्यांच्या बागांमधील तुळशीच्या रोपट्यांची गर्दी, फाटकापासून दरवाजापर्यंत जाणाऱ्या पायवाटेवर घातलेल्या रांगोळ्या, आणि दरवाजावरील कोनाड्यांमधून वरददृष्टि टाकणाऱ्या गणपतीच्या मूर्ति, या व इतर गोष्टींवरून मराठी भाषा बंगल्यांतील माणसांच्या तोंडीं खेळत असली पाहिजे, असा तेव्हांच तर्क बांधतां येत होता. परंतु असा वांकडा घांस घ्यावयाची जरूरच नव्हती. बंगल्यांच्या फाटकांवर असलेल्या नांवांच्या पाट्या वाचल्या कीं,

एका बंगल्यांत लेफ्टनंट धैर्यवान व शेजारच्या बंगल्यांत दिलदार आय. एम. एस. रहात आहेत, ही गोष्ट उघड होत होती. धैर्यवानांनीं बंगला बांधल्याला पुष्कळ दिवस झालेले दिसत होते. दहाबारा वर्षांपूर्वी जेव्हां ते लेफ्टनंटच्या जागेवर पंजाबांत आले, त्या वेळींच त्यांनीं तो बांधलेला असावा. बंगल्याची व्यवस्था नानासाहेब धैर्यवानांनीं चांगली ठेवलेलीच होती; परंतु त्यांच्या पश्चात् ( त्यांना स्वर्गवासी होऊन दोन वर्षें झालीं होतीं. ) त्यांच्या चौघां मुलांनींही बंगल्याची जोपासना नीट चालवली होती. शिवाय सगुणाकाकूंना बागेचा फार शोक, त्यामुळें मुलांनीं सुंदर सुंदर वेलींनीं बंगल्याच्या पुढचें आवार शृंगारलें होतें. सध्यां सगुणाकाकूंचे चारी मुलगे सैन्यांत होते; परंतु एकटा बाळासाहेबच आईजवळ असून बाकीचे इतर ठिकाणीं होते. बाळासाहेब जरी सर्वांत धाकटा होता, तरी लष्करी शिक्षणांतील कुशलतेमध्यें त्यानें आपल्या भावांना मागें सारलें होतें, व तो आपल्या बापाच्याच जागीं काम करीत होता. इतर तिघे भाऊही शूर, उदार व लोकप्रिय असेच होते. त्यामुळें वृद्ध सगुणाकाकूंना आपल्या मुलांविषयीं अभिमान व कौतुक वाटे.

पलीकडच्या बंगल्यांत डॉक्टर दिलदार राहत असत. त्यांच्या कुटुंबांतील माणसें म्हणजे ते, त्यांची बायको व त्यांची पंधरा वर्षांची मुलगी. अण्णासाहेब दिलदारांना इकडे येऊन एकच वर्ष झालें होतें, परंतु सगुणाकाकूंचें कुटुंब व दिलदारांचें कुटुंब यांमध्यें तेवढ्या अवधींत अत्यंत स्नेहभाव वाढला होता. एक तर परदेशांत—परमुलखांत म्हणा—येऊन राहिलेलीं हीं दोनच महाराष्ट्रीय कुटुंबें जवळ जवळ होतीं, व शिवाय दोन्ही कुटुंबांतील मंडळी अत्यंत प्रेमळ व मनुष्यप्रिय होती. यामुळें दोन्ही घरची मंडळी एकच असल्याप्रमाणें वागत. डॉक्टरांची बायको पार्वतीबाई आपल्या शांतीला घेऊन सगुणाकाकूंच्या घरीं आठवडेच्या आठवडे राही.

कारण अण्णासाहेब पुष्कळदां फिरतीवर जात, व अशा वेळीं सगुणाकाकूंचें पार्वतीबाईंना आग्रहाचें आमंत्रण हटकून येई.

संध्याकाळ झाली होती. धैर्यवानांच्या बंगल्यांतील बागेला माळी पाणी घालीत होता. बाळासाहेबाचे दोन कुत्रे इकडून तिकडे बागडत होते. माडीच्या सज्जांत टांगलेल्या पिंजऱ्यांतील पोपट अर्थशून्य बडबड करीत होता. दिवाणखान्यांतील घड्याळाचा मिनिटकांटा साडेपांच वाजले, असें सांगण्यासाठीं सहांच्या आंकड्याकडे धडपड करीत जात होता. समोरच्या भिंतीला लागून जें टेबल मांडलें होतें, त्याच्या पुढील खुर्चीवर शांताबाई बसली होती. टेबलावर थोडासा टेंकून आणि दोन्ही पाय शांताबाईच्या खुर्चीवर ठेवून बाळासाहेब बसला होता. बाळासाहेबानें उजवा हात खुर्चीच्या पाठीवर ठेवला होता, आणि डाव्या हातानें तो आपले केंस कुरवाळीत होता.

'तुला त्यांतलें कांहीं समजावयाचें नाहीं शांताबाई!' बाळासाहेब हंसत हंसत म्हणाला, 'आतांपर्यंत इतका वाद मीं घातला तरी तुझें आपलें म्हणणें कायमच कसें?'

'तसें नव्हे.' शांताबाई म्हणाली, 'तुमचें काय म्हणणें कीं, त्या सोल्जरचें कृत्य अगदीं रास्त होतें?'

केंसावर फिरणारा हात डाव्या मांडीवर ठेवून बाळासाहेब म्हणाला, 'हो; तसेंच मी म्हणतों. काय झालें तें मी नीट पुन्हा तुला सांगतों, आणि तुला काय वाटतें तें पुन्हा सांग. हें बघ, दोन बाजूंमध्यें फुटबॉलची मॅच चालली होती. खेळाच्या झटापटींत एका सोल्जराचा दुसऱ्याला मोठा धक्का बसून तो कोलमडून खालीं पडला. वास्तविक त्याला मुद्दाम पाडलें नव्हतें. तरी तो उठून एकदम त्याला शिव्या देऊं लागला. शेवटीं अत्यंत घाणेरडी अशी शिवी देऊन तो हिः हिः करून हंसूं लागला. हा

नीचपणा सहन न झाल्यामुळें पहिल्या सोल्जरानें त्याच्या छातींत एवढ्या जोरानें बुक्की मारली कीं, तो मूर्च्छा येऊन खालीं पडला व रक्त ओकूं लागला. झालें. दोन तासांनीं त्याचा प्राणही गेला. त्या दुसऱ्या सोल्जराला एकदम फांशीं देण्यांत आलें व...'.

शांताबाई मध्येंच म्हणाली, ' मग ? त्याला अगदीं योग्य शिक्षा मिळाली. ' तिची समजूत घालण्याच्या उद्देशानें बाळासाहेब म्हणाला, ' मग, प्राणास प्राण या न्यायाप्रमाणें शिक्षा ठीक झाली; पण त्याचा झालेला अपमान तूं लक्षांत आणीत नाहींस. आणि शिवाय प्राणहानि करण्याचा त्याचा उद्देश नव्हता हेंही तूं विसरतेस. या दोन गोष्टी लक्षांत ठेवल्यास तर तूं माझ्याप्रमाणेंच म्हणशील कीं, शिक्षा अयोग्य झाली. ' असें म्हणून शांताबाईची खात्री झाली कीं नाहीं, हें पाहण्यासाठीं बाळासाहेब तिच्याकडे पहात राहिला. परंतु ती कसली वस्ताद ! ती फिरून म्हणाली, ' तें कांहीं नाहीं. अशा पिसाळलेल्या माणसाला ठार केला तेंच बरें झालें. आणखी कोणाचा मेल्यानें जीव घेतला असता नाहीं तर !'

बाळासाहेब त्रासून टेबलावरून उठून खालीं उभा राहिला. ' तुझी समजूत पडायची नाहीं कांहीं केल्या. लष्करांतले मानापमान तुला समजायचे नाहींत एक, आणि शिवाय तुझ्यासारखी हट्टी मुलगी तूंच असल्यामुळें— '

' अरे हो हो, अशीं भांडतां कां एकमेकांशीं ? ' असें म्हणत पार्वतीबाई सगुणाकाकूंना घेऊन दिवाणखान्यांत आल्या. त्यावर सगुणाकाकू म्हणतात, ' बघा बाई पार्वतीबाई. या दोघांचें लग्न ठरवून आपण वाङ्निश्चयसुद्धां केला खरा, पण हीं दोघें एकमेकांशीं अशीं तंडत असतात. '

चेष्टा लांबवण्याच्या हेतूनें पार्वतीबाई म्हणाल्या, ' बाळासाहेब, तुझी ती बायको झाली, तरी ती आमची मुलगी आहेच हो. आमच्या मुलीला असा जाच नको बाबा करूंस.'

शान्ताबाईकडे पाहून बाळासाहेब पार्वतीबाईंना म्हणाला, ' जाऊ कोणाचा कोणाला आहे हें तिलाच विचारा बरें काकू ! '

हें बोलणें चालू असतांना शान्ताबाई खालीं मान घालून बांगड्यांशीं खेळत स्वस्थ राहिली होती. या संकटांतून तिला सोडवण्याच्या इच्छेनें सगुणाकाकू म्हणाल्या, ' जाऊं दें; आणखी दीड महिन्यांनीं लग्नविधि झाला कीं मग नाहीं हो अशीं भांडणें व्हायचीं. '

अशा रीतीनें तें बोलणें थांबल्यावर सगळी मंडळी खालीं चहाला गेली. चहा झाल्यावर पार्वतीबाई आणि सगुणाकाकू गार्डीत बसून फिरावयास गेल्या. बाळासाहेब आणि शान्ताबाई चालत चालतच निहालसिंग बागेकडे निघालीं.

आपल्या वाङ्निश्चित वधूला घेऊन बाळासाहेब निघाला होता; आणि आपल्या वाङ्निश्चित पतीबरोबर शान्ताबाई लडिवाळपणें चालली होती. वाटेनें जाणारीं माणसें त्या दोघांकडे पाहून एकमेकांत कुजबुजत, रस्त्याच्या दुतर्फा वाढणारीं झाडें त्यांच्याकडे पाहून माना तुकवीत. सुगंध वाहून नेणारा वायु त्यांच्या पुढून नम्रपणें जाई. रस्त्यावरील धुळीचे कण विनयानें त्यांच्यापासून लांब पळत. मावळणाऱ्या सूर्याचे किरण तोंडावर पडल्यामुळें शान्ताबाई लाजल्याचा भास होई. अशा समयीं वाटेनें बाळासाहेबानें शान्ताबाईची किती चेष्टा केली, शान्ताबाईनें रागावल्यासारखें कितीदां दाखविलें, वगैरे गोष्टी सांगण्याची आवश्यकता नाहीं. मात्र घरून निघाल्यापासून शान्ताबाईला एका गोष्टीवरून बाळासाहेबाचा थोडा थोडा खरोखरीचा राग येऊं लागला होता. तीं दोघें घरांतून बाहेर पडल्यापासून त्यांच्या मागोमाग दोन युरोपियन आपल्या दोनतीन कुत्र्यांना घेऊन येत होते. बाळासाहेबाला व शान्ताबाईला उद्देशून ते दोघे सारखी वाणेरडी थट्टा करीत चालले होते. शान्ताबाईला एक-

सारखें वाटे कीं; बाळासाहेब या दोघांचा चांगला समाचार घेईल. परंतु एकदां मागें वळून तिरस्कारपूर्ण पाहण्यापलीकडे बाळासाहेबानें कांहींच केलें नाहीं. त्या युरोपियनांची चेष्टा तर सारखी वाढत चालली होती. शान्ताबाईच्या अंगाचा ज्यास्त ज्यास्तच तिळपापड व्हावयास लागला. शेवटीं त्या दोघां मूर्खांची चांगली रग मोडण्याबद्दल बाळासाहेबाला स्पष्ट सांगावें, असेंसुद्धां तिनें मनाशीं ठरवलें. परंतु सुदैवानें त्याच सुमारास ती बागेच्या फाटकापाशीं पोंचलीं, आणि ते युरोपियन दुसऱ्याच फुटपाथनें गेल्यामुळें त्यांची फांटाफूट झाली. कारंजाशेजारचें एक चांगलेंसें बांक पाहून त्याच्यावर बाळासाहेब व शान्ताबाई बसलीं. कारंजाकडे पहात बराच वेळ बसल्यावर शान्ताबाई म्हणाली,

'समोरच्या गुलाबाच्या फुलाचा रंग किती बहारीचा आहे; नाहीं?'

बाळासाहेब हंसत म्हणाला, 'तुला तें केसांत घालायला हवें असेल, दुसरें काय?'

'हो, मग हवेंच आहे; त्याची एवढी चोरी कशाला? माळ्याला पैसा देऊन घेऊं या आपण विकत.'

बाळासाहेबानें लगेच माळ्याला हांक मारली, व पैसा दिला; लगेच शान्ताबाई हौसेनें फूल तोडण्यासाठीं पुढें झाली. ती पुढें व्हावयास आणि मघांचे ते दोन युरोपियन त्या वाटेनें यावयास एकच गांठ पडली. तिला फूल तोडतांना पाहून ते एकमेकांत मोठ्यानें हंसले व 'सावकाश! हात दुखेल.' अशा अर्थाचे शब्द त्यांनीं उच्चारलेले तिनें स्पष्ट ऐकले. आतां-मात्र शान्ताबाईचा राग अनावर झाला. आतां तरी बाळासाहेब कांहीं करील, असें वाटून तिनें त्याच्याकडे पाहिलें. बाळासाहेब शांतपणें त्या दोघांकडे पहात होता. त्याच्या दृष्टीशीं दृष्टि मिळतांच ते दोघे निमूटपणें चालते झाले. परंतु शान्ताबाईचें तेवढ्यानें समाधान झालें नाहीं. ती

तशीच रागारागानें बांकापाशीं परत आली. तिच्या हातांतल्या फुलाकडे बघत बाळासाहेब म्हणाला, 'तूं तोडल्याबरोबर त्या फुलांच्या रंगांची बहार पार नाहींशी झाली, बघ—

रागाच्या भरांत शान्ताबाई फटदिशीं म्हणाली, 'अगदीं बोलूं नका! भ्याड आहां झालें. गोरें कातडें पाहिल्याबरोबर भ्यालां!'

शूर शिपाई वाटेल तें सहन करील, परंतु भित्रेपणाचा आरोप त्याच्यानें कधीं सहन करवावयाचा नाहीं. एका हातानें घोड्याचा लगाम खेंचून दुसऱ्या हातानें तोफेचें तोंड बंद करतांना तो शांत राहील; तोफांचा गडगडाट ऐकतांना त्याच्या अंगांतील रक्त शांतपणें वहात राहील; शत्रूनें आपल्याकडे रोंखलेली बंदूक पाहतांना तो धिमा राहील; परंतु 'भ्याड' शब्द उच्चारल्याबरोबर तो रागानें लाल झाल्याशिवाय राहणार नाहीं. शान्ताबाईनें आपल्याला भ्याड म्हटलेलें ऐकून बाळासाहेबाला मनस्वी संताप आला. परंतु सगळा राग गिळून तो शांतपणें म्हणाला, 'शान्ताबाई!—' पुढें त्याच्यानें बोलवेना. शान्ताबाई त्याच्याकडे पहात राहिली, आणि तो आपल्या वळलेल्या मुठीकडे पहात राहिला. थोड्या वेळानें बाळासाहेब हळूच म्हणाला,

'मला तूं काय म्हणालीस ठाऊक आहे तुला?'

शान्ताबाई अजून रागाच्याच आवेशांत होती. 'हो! भ्याड म्हटलें.'

'कां म्हटलेंस?'

'कां म्हणजे? माझा इतका झालेला अपमान तुम्हांला सहन तरी कसा झाला? कोण मेले दोन फाटके साहेब येऊन माझी नाहीं नाहीं ती चेष्टा करतात, आणि तुम्ही त्यांच्याकडे पहात स्वस्थ बसतां, याचा अर्थ तरी काय? दोन-अडीच तासांपूर्वी मला मानापमानाच्या गोष्टी तुम्हीच शिकवीत होतां, आणि—'

तिचा हात दाबून बाळासाहेब म्हणाला, ' शान्ताबाई, हलके बोल; आपण बागेंत आहों, हें तूं विसरतेस. मीं तुला मानापमानाच्या गोष्टी सांगितल्या हें खरें, आणि आतां मी स्वस्थ बसलों हेंही खरें. परंतु याच्या कारणाचा तूं विचार केला नाहींस. माझ्या अंगांत शक्ति नव्हती, म्हणून मीं शांत राहिलों असें तुला वाटतें? ते दोघे जण युरोपियन होते, म्हणून मीं कांहीं केलें नाहीं अशी तुझी कल्पना आहे? माझ्या मनांत असतें तर मीं एका बुक्कींत एकेकाला लोळवला असता, असें तुला वाटत नाहीं? आणि माझ्या स्वतःच्या सामर्थ्याविषयीं मला असा दृढ विश्वास असल्यामुळें आणि तोंडच्या बाष्कळ शब्दापलीकडे मजल न गेल्यामुळें ते बिचारे सुटले, हें कसें तुझ्या लक्षांत येत नाहीं! मूर्खपणाच्या बडबडांशिवाय त्यांनीं जर दुसरें कांहीं केलें असतें, तर मीं त्यांना केवळ खेळत खेळत चिरडून टाकलें असतें, ही खातरी ठेव. आणि—'

' पण शब्द झाले म्हणून तो काय अपमान नव्हे कीं काय? त्यांची बडबड चालू देण्याइतकें तरी त्यांना काय म्हणून भ्यायचें? '

' काय? माझ्यावरचा भित्रेपणाचा आरोप तूं अजून परत घेत नाहींस? '

' हो, नाहीं घेत! '

' नाहीं घेत? '

' ना– हीं! '

' पुन्हा विचारतों, नाहीं घेत? '

शान्ताबाई जमिनीकडे पहात स्वस्थ उभी राहिली.. आतांमात्र बाळासाहेब चिडून गेला. हलके परंतु स्पष्टपणें तो म्हणाला, ' शान्ते, मी दुसरी कोणचीही गोष्ट सहन केली असती, परंतु आज तूं केलेली ही जखम कधींच बरी व्हायची नाहीं. त्या दिवशीं याच बागेंत प्रेमाचें चिन्ह

म्हणून तुझ्या करांगळींत मीं आंगठी घातली. याच बागेंत ती माझी मला परत दे. आण. काढ ती. दे इकडे ! आटप ! ”

बाळासाहेबाचे हे शब्द ऐकून व त्याची एकंदर चर्या पाहून शान्ताबाईला रडूं कोसळलें. परंतु मनुष्यस्वभाव तरी कसा विचित्र; आपल्या तोंडून निघून गेलेले शब्द परत घेण्याची कांहीं शान्ताबाईला इच्छा होईना. एकीकडे आंगठी काढतांना जीव कसावीस झाला; परंतु ‘ बरें, मीं चुकल्यें,’ असे शब्द ओंठावर आले तरी परत जात.

आंगठी हातांत पडल्याबरोबर ‘ चला घरीं. ’ असें म्हणून बाळासाहेब चालूं लागला. त्याच्या मागोमाग शान्ताबाई निघाली. वाटेनें दोघंही मुकाट्यानें चाललीं होतीं. या वेळीं रस्ता किती तरी लांब वाटला. ज्या रस्त्यानें नेहमीं हांसत, चेष्टा करीत जावयाचें, त्याच रस्त्यानें एखाद्या कैद्यासारखी जातांना स्वत:ला पाहून शान्ताबाईला किती तरी वाईट वाटलें. वाटेनें ती सारखी रडत होती. बाळासाहेब भराभरा चालला होता. हजार वेळा शान्ताबाईच्या मनांत आलें कीं, एकदां क्षमा मागावी. पण छे ! तोंडच जणूं बंद झालें होतें, एक शब्द कांहीं बाहेर फुटेना. अश्रुमात्र घळघळा वाहत होते. परंतु तिच्या रडण्याकडे बाळासाहेब लक्षच देत नव्हता.

या गोष्टीला तीन दिवस लोटले. हे तीन दिवस शान्ताबाईला तीन वर्षांप्रमाणें लांब वाटले. तेवढ्या अवधींत तिला आपल्या जिवाचा अगदीं कंटाळा आला. अन्नपाणी कांहीं गोड लागेना. पार्वतीबाईनाही प्रकृतींतल्या या फरकाचें कोडें उलगडेना. चोरून, कोणाला न कळत, एखादी शांत जागा शोधून शान्ताबाई मनसोक्त रडे. बाळासाहेबाची क्षमा मागायलाही तिनें आपलें मन आतां तयार केलें. परंतु त्याची गांठच कांहीं केल्या पडेना. घाईघाईनें जेवून तो जो घरांतून जाई, तो पुन्हा जेवण्याच्या वेळीं येई. आणि जेवणाच्या वेळीं बाळासाहेब एकटा नसे. बाळासाहेब अशा तांतडीनें

कुठे जातो, म्हणून सगुणाकाकूंना विचारतां त्या म्हणाल्या, 'अग, परदेशांत कुठेशी लढाई उपटली आहे म्हणे. तिकडे सैन्य जायची तयारी चालली आहे वाटतें. नाना, अण्णा, सगळे काल कां परवां गेले; अन् बाळासाहेबसुद्धां दोनतीन दिवसांत जाणारसें दिसतें आहे. हे शब्द ऐकून शान्ताबाई ज्यास्तच बावरून गेली. क्षमा मागायला कांहीं आतां सावकाशीचा वेळ आपल्याला मिळत नाहीं, हें ती समजली. आतां कसेंही करून बाळासाहेबाची थोडा वेळ कां होईना, भेट घेऊन त्यांचे पाय धरावयाचे, असा तिनें निश्चय केला; आणि इतर वेळीं तो सांपडत नाहीं तर उद्यां तो उठण्याच्यापूर्वींच त्याच्या खोलींत जायचें, असेंही तिनें ठरविलें. हा निश्चय केल्यामुळें तिचें मन थोडें शांत झालें. आज ती आईशीं थोड्या थोड्या गप्पा मारायला लागली. रात्रीं अंथरुणावर अंग टाकल्यावर क्षमा कशी व कोणत्या शब्दांनीं मागायची, हा विचार करतां करतांच तिला झोंप लागली. पहाटे पहाटे तिला वाईट स्वप्नें पडूं लागल्यामुळें ती अंथरुणावर उठून बसली. इतक्यांत घड्याळांत पांचांचे ठोके पडलेले तिनें ऐकिले. 'काकूंच्याकडे जात्यें,' असें आईला सांगून जवळजवळ धांवतच ती बाळासाहेबाच्या खोलीपाशीं आली. पण तेथें पाहते तों खोलीला बाहेरून कुलूप, व खोलीच्या सार्‍या खिडक्या लावलेल्या. या प्रकाराचा तिला कांहींच अर्थ समजेना. तिच्या मनाची स्थिति आतां मोठी चमत्कारिक झाली. आपला क्षमा मागण्याचा बेत सिद्धीस जाऊं न देण्याचा ईश्वरानेंच संकल्प केल्यासारखें तिला वाटलें. तिला मनांत तर दुःख झालेंच; पण शिवाय ती अगदीं तिरसट होऊन गेली. माजघरांत सगुणाकाकू दिसल्याबरोबर ती जरा जहाल स्वरांतच म्हणाली, 'काकू, दिवाणखान्यापासल्या खोलीला कुलूप काय म्हणून?' तिच्याकडे पाहून काकू म्हणाल्या, "शान्ते, अशी काय घाबरल्यासारखी दिसतेस? अन् बाळा-

साहेब काल रात्रींच सैन्याबरोबर लढाईवर गेला, हें तुला नाहीं का ठाऊक ?—"

' नाहीं हो काकू ! '

' म्हणजे ! तुझ्याकडे अन् पार्वतीकाकूंच्याकडे जाऊन येतों, असें म्हणून बाळासाहेब रात्रीं जेवल्याबरोबर कुठेसा जाऊन आला; अन् तूं म्हणतेस तुला कांहीं ठाऊक नाहीं !–'

' नाहीं काकू, आम्हांला कांहींच कळलेलें नाहीं. अन्— ' इतके शब्द शान्ताबाई बोलते आहे तोंच तिला मोठा हुंदका आला. आतांपर्यंत तिनें दाबून ठेवलेले अश्रु एकदम डोळ्यांत उभे राहिले. तें पाहून सगुणाकाकूंना मोठें आश्चर्य वाटलें. त्या म्हणाल्या,

' अग बाई ! शान्ते, रडतेस काय वेड्यासारखी ! बाळासाहेब लढाईवर गेला त्यांत वाईट वाटण्यासारखें काय आहे ? माझे चार मुलगे परदेशांत गेले आहेत, पण मला त्यांचा अभिमानच वाटतो आहे. बाळासाहेबांचें कांहीं बरें-वाईट झालें तरीसुद्धां मला आनंदच होईल. लढतांना मरण येणें किती पवित्र; अन् तें आपल्या ब्राह्मण लोकांना दुर्मिळ झालेलें. तें जर माझ्या मुलाला मिळालें, तर मला तिळभरसुद्धां दुःख व्हायचें नाहीं. तुला रडतांना पाहून मी तर बाई थक्कच झाल्यें ! अशी वेड्यासारखी मुळमुळ रडतेस काय ? ' शान्ताबाई अजून रडायची थांबेना. तेव्हां तिला पोटाशीं धरून काकू म्हणाल्या, ' छे ! तुझ्या रडण्याचें कारण कांहीं तरी दुसरें दिसतें आहे. सांग मला, रडूं नकोस. इतक्या सकाळच्या प्रहरीं कां आलीस ? बाळासाहेब गेलेला ऐकून रडायला कां लागलीस ? सांग मला. इतके प्रेमळ शब्द ऐकल्यावर तर शान्ताबाई ज्यास्तच स्फुंदून रडूं लागली. रडण्याचा उमाळा ज्यास्तच जोरानें आला. त्या भरांत तिनें भांडणाची सर्व हकीकत सांगून टाकली. ती सांगितल्यावर मग शान्ताबाई म्हणाली:—

'काकू, केवढें मीं पाप केलें आहे बघा! आतां मी काय करूं सांगा मला. माझें पाप धुऊन टाकायला मला एकच मार्ग दिसतो आहे. मी थोडी शिकलेली आहें. मी नर्स म्हणून गेल्यें, तर त्यांची गांठ पडल, अन् मला क्षमा मागायची संधी मिळेल. इथे राहून मला माझा जीव नकोसा होईल.'

छावणींतील आयुष्याचा अनुभव बाळासाहेब घेऊं लागल्याला आज जवळ जवळ महिना होत आला होता. फ्रान्स देशांतील थंड हवा, चहूं बाजूंना सारखी सुरू असलेली धामधूम, लढाईच्या बातम्यांची गडबड, छावणी बदलण्याचे प्रसंग, आणि प्रत्यक्ष युद्धांत पराक्रम दाखविण्याची हांव, या गोष्टींमुळें जरी बाळासाहेबाला घरचा थोडासा विसर पडला होता, तरी शान्ताबाईची आठवण झाली कीं, त्याच्या मनाला यातना होत. एखादे प्रसंगीं घरीं पत्र लिहितांना तिची विचारपूस करावी, असें त्याला वाटे. परंतु ती इच्छा मारून टाकण्याचा तो प्रयत्न करी. शान्ताबाई या वेळीं कोठें असेल, हा प्रश्न त्यानें आपल्या मनाला कितीदां तरी केला असेल. त्याला काय माहीत कीं, आपल्या छावणीपासून जवळच असलेल्या एका इस्पितळांत शान्ताबाई नर्सचें काम मोठ्या आनंदानें करीत आहे! परोपकारांत दिवस घालविल्यानें आपल्याला क्षमा मागण्याची संधी खास येईल, असा तिला विश्वास उत्पन्न झाला होता. वरिष्ठ अधिकारी काय जें काम देतील तें हौसेनें करावयाचें, असा तिनें निश्चय केला होता. कदाचित् बाळासाहेबाला इस्पितळांत येण्याचा प्रसंग आल्यास तो याच इस्पितळांत येवो, अशी ती रोज ईश्वराची प्रार्थना करी. येथें आल्यावर मग आपण क्षमा सहज मागूं, अशी तिला आशा होती. तिच्या इच्छा मोठ्या चमत्कारिक आणि परस्परविरोधी झाल्या होत्या. एकीकडे तिला वाटे कीं, बाळासाहेबाला थोडीशी जखम होऊन जर तो आपल्याच

वार्डमध्यें आला तर बरें होईल; परंतु लढाईतून बाळासाहेब सुखरूपपणें वांचावा–कोणत्याही प्रकारची थोडीसुद्धां इजा त्याला होऊं नये–अशी तर तिची पोटांतील इच्छा.

शान्ताबाईची मनःस्थिति अशा प्रकारची असतांना, एके दिवशीं संध्याकाळीं ती आपल्या वार्डमध्यें काम करीत होती. एकीकडे दुखणाइताच्या डोक्याची जखम बांधीत असतांताना, घरीं आई काय करीत असेल, असें तिच्या मनांत आले. एकीकडे जखम धूत असतांना, सगुणाकाकू या वेळीं कोणचा विचार करीत असतील, असा तिनें आपल्या मनाला प्रश्न केला. सगुणाकाकूंचा विचार आल्याबरोबर बाळासाहेबाची मूर्ति तिच्या डोळ्यांपुढें उभी राहिली. बाळासाहेबाविषयींची माहिती आपण ज्या शिपायाची शुश्रूषा करीत आहों त्याला ठाऊक असण्याचा संभव आहे, त्याला ती विचारावी असें तिला हजारदां वाटलें. परंतु अशा गोष्टी बोलत बसण्याला परवानगी नसल्यामुळें तिला स्वस्थ बसणें भाग पडलें. कोणतीही इच्छित गोष्ट मिळण्यास अडचण आली कीं, ती ज्यास्तच हवीशी वाटूं लागते. बाळासाहेब खुशाल आहे किंवा नाहीं, त्याला कोणत्या तुकडीवर नेमला आहे, तो कोणत्या ठिकाणच्या लढाईत गुंतला आहे, इत्यादि कांहींच बातमी जेव्हां कळेनाशी झाली, तेव्हां शान्ताबाईच्या मनांतील काळजी वाढत चालली. बाळासाहेबाविषयींचे तिच्या मनांतील विचार ज्यास्त उत्कट व्हायला लागले. इतक्यांत ‘ लेफ्टनंट धैर्यवान ’ हे शब्द तिच्या कानीं पडले. त्याबरोबर ती दचकली. इस्पितळाच्या कोपऱ्यांत कांहीं ऑफिसर बोलत उभे होते, तिकडे ती धांवत धांवतच गेली. आपलें धांवणें लोकांना चमत्कारिक दिसेल, हा विचारसुद्धां तिच्या मनाला शिवला नाहीं. परंतु इतक्या उत्सुकपणें धांवत जाऊन जी बातमी तिनें ऐकली ती फारच अमंगल होती ! लेफ्टनंट धैर्य-

बान आज रणांगणावर मरण पावल्याची बातमी जिकडे तिकडे पसरली होती; आणि त्याविषयींच या ऑफिसरांचें बोलणें चाललें होतें. तें ऐकून शान्ताबाईच्या पोटांत एकदम चर्र झालें. तिचा जीव कासावीस झाला. तिच्या तोंडाला कोरड पडली. पाय कांपायला लागले. व ती मटकन खालींच बसली; परंतु तिला बसवेनासुद्धां. तिच्या डोळ्यांपुढें सगळें इस्पितळ गरगर फिरूं लागलें. तिला मोठी घेरी आली; आणि कण्हत कण्हतच तिनें एकदम आपलें अंग जमिनीवर टाकून दिलें.

शुद्धीवर आल्यावर शान्ताबाई पाहते तों, आपल्या पायगतीं आपले वडील दुसऱ्या एक दोन डॉक्टरांशीं बोलत उभे आहेत, आपल्या डाव्या बाजूला दोनतीन नर्सेस कांहीं ग्लास धुण्यांत आणि फडकीं कातरण्यांत गुंतल्या आहेत; शेजारींच एक शिपाई हातांत रिकामें पाकीट घेऊन उभा असून, त्यांतला कागद आपल्या वडीलांच्या हातांत आहे, असें तिच्या दृष्टीस पडलें. आणि उजव्या बाजूला तिनें दृष्टि फिरवली तों काय! ती स्वप्नांत तर नाहीं ना? शेजारच्या कॉटवर गुरफटून ठेवलेला बाळासाहेबच ना? ते मिटलेले, डोळे बाळासाहेबाचेच ना? आणि कळाहीन झालेलें तें तोंड बाळासाहेबाचेंच ना? ती एकदम अंथरुणावरून उठून उभी राहिली. तिला उठतांना पाहून तिचे वडील व त्या नर्सेस तिला धरूं लागल्या. 'शान्ते. निजून रहा.' असें तिचे वडील तिला म्हणाले. परंतु ती कांहीं केल्या निजेना. 'मी बरी झाल्यें समजा. पण याचा अर्थ मला सांगा.' असें म्हणून तिनें बाळासाहेबाकडे बोट दाखविलें.

बाळासाहेब रणक्षेत्रावर घायाळ होऊन पडला असतांना तो गतप्राण झाला, असा सैन्यांतील लोकांचा समज कसा झाला; इतर डॉक्टरांनींही त्याच्या प्रकृतीची विशेष काळजीपूर्वक तपासणी न केल्यामुळें बाळासाहेबाचें शरीर प्रेत म्हणून बाजूस कसें काढण्यांत आलें; डॉ.

दिलदार त्या ठिकाणीं आल्यावर, बाळासाहेब गमावलेला ऐकून त्यांना अत्यंत दुःख कसें झालें; अत्यंत काळजीनें परीक्षा करून अजून थोडीशी धुगधुगी आहे, अशी त्याची खात्री झाल्यामुळें बाळासाहेबाला इस्पितळांत किती जपून आणलें, आणि इस्पितळांत आल्यावर शान्ताबाईस त्या ठिकाणीं, त्या स्थितींत पाहून डॉ. दिलदारांना किती दुःख व आश्चर्य वाटलें; वगैरे हकीगत ऐकून शान्ताबाईला आनंद वाटला कीं दुःख झालें, हें सांगतां येणें कठीण आहे. जिवंत असलेल्या बाळासाहेबाचा जर प्रेत म्हणून निकाल लागला असता, तर काय भयंकर प्रसंग ओढवला असता, ही कल्पना मनांत आल्याबरोबर तिच्या अंगावर शहारे आले; परंतु आपल्या वडिलांच्या हातून बाळासाहेबाचा जीव वांचला, या विचारानें तिला जरा बरें वाटलें. आणि "लेफ्टनंट धैर्यवानांना बरें करण्यासाठीं वाटेल तितका पैसा खर्च करून वाटेल तो उपाय योजा. असा लढवय्या आम्हांस लाभणें कठीण आहे. त्यांच्या प्राणापुढें लाखों रुपड्यांची किंमत कमी आहे. आज ज्या प्रसंगीं शत्रूचे असंख्य वीर त्यांनीं गारद केले, तो प्रसंग आम्हीं विसरणें अशक्य आहे. त्यांच्या तुकडींतील वीरांचें त्यांच्यावर असलेल प्रेम तर खरोखर कौतुक करण्यासारखें आहे. त्यांच्या प्राणांची आम्हांला किंमतच करतां येत नाहीं. कांहीं करा; पण ते बरे झालेच पाहिजेत!" अशा आशयाचें पत्र जनरलकडून आपल्या वडिलांना आलेले जेव्हां तिला समजलें, तेव्हां तर 'धन्य धन्य बाळासाहेब!' असें ती आपल्याशींच पुटपुटली. सर्व डॉक्टर बाळासाहेबांच्या प्रकृतीसंबंधीं एकमेकांचा सल्ला घेण्यांत गुंतले आहेत, असें पाहून ती बाळासाहेबाच्या तोंडाकडे टक लावून पहात राहिली; आणि 'देवा, माझा प्राण घे, पण यांना वांचीव, आणि मला क्षमेची भीक मागूं दे!' अशी ईश्वराची प्रार्थना ती करूं लागली.

१२

अनन्यभावानें प्रार्थना करण्यांत शान्ताबाई गढून गेली असतांना डॉ. दिलदार तिच्याजवळ आले. तिच्या खांद्यावर प्रेमळपणें हात ठेवून ते हळूच म्हणाले, 'शान्ते–'

शान्ताबाई दचकून त्यांच्याकडे पाहूं लागली. डॉक्टर म्हणाले 'विशेष आशा दिसत नाहीं.'

'म्हणजे ?'

'डॉक्टर ब्राऊनशिवाय आम्हां सर्वांना मुळीं पूर्ण निराशा वाटते; कारण, बाळासाहेबांच्या दोन्ही हातांवर दोन इंच खोल अशा भयंकर जखमा झाल्या आहेत, अन् त्यांतून रक्तप्रवाह अतिशय होतो आहे. आतां, ब्राऊन म्हणतात कीं, या जखमासुद्धां बऱ्या करतां येतील; परंतु—'

'परंतु ? बऱ्या करतां येतील ना ? मग परंतु अन् बिरंतु कशाला ? वाटेल तितका पैसा खर्च करायची तर परवानगी आहे, अन्—'

'पैशाचा प्रश्न नाहीं शान्ते.'

'मग कशाचा आहे ?'

'त्या जखमा बऱ्या करण्याचा फक्त एकच उपाय आहे. अन तो उपाय म्हणजे दुसऱ्या कोणा तरी माणसाच्या हाताचें कातडें काढून त्या ठिकाणीं शिवायचें—'

'कोणा तरी माणसाचें कशाला ? मी जिवंत असतांना असे शब्द काढण्याची जरूरी तरी काय ? माझे हात आणखी दुसऱ्या कोणच्या ज्यास्त चांगल्या उपयोगाला पडणार आहेत ? बाबा, तुम्हांला माझ्या सहनशीलतेबद्दल शंका वाटत असल्यास ही पहा मीं आपल्या मनगटावर शांतपणें जखम करून घेत्यें.' असें म्हणून लगेच तिनें शेजारच्या लोखंडी पलंगावर इतक्या जोरानें मनगट मारलें कीं, त्यांतून भळभळां रक्त वाहूं लागलें.

डॉ. दिलदार आश्चर्यानें अगदीं स्तब्ध उभे राहिले. शान्ताबाईनें आवेशानें काढलेले उद्गार, तिची गंभीर मुखचर्या, तिचा आविर्भाव आणि तिचें हें कृत्य पाहून त्यांना आपल्या मुलीविषयीं एक प्रकारें कौतुक आणि अभिमान वाटला.

शांताबाई आपल्या हाताचें कातडें कापविण्यास अधीर झाली होती; कारण, एकेक मिनीट मूल्यवान आहे, असें ती समजली होती. ब्राऊन शस्त्रें घेऊन आल्याबरोबर तिनें आपले हात उघडे केले. क्लोरोफॉर्म देण्यामध्येंसुद्धां वेळ घालवूं नका, असें ती डॉक्टरला म्हणाली. तिचे ते सुकुमार हात कातडें काढण्यासाठीं हातांत घेतांना डॉ. ब्राऊनच्यासुद्धां मनास चरका बसला. क्षणभर त्यानें तिच्या तोंडाकडे पाहिलें. तिची मुद्रा शांत होती. तिचे पाणीदार डोळे त्याच्या शस्त्राकडे लागून राहिले होते. तिच्या कपाळावर अधीरपणाच्या आंठ्या पडल्या होत्या. अधीरतेमुळें दोन्ही ओंठ एकमेकांपासून वेगळे झाले होते. ब्राऊननें दृष्टि फिरवली. त्याच्या हातातलें शस्त्र शांताबाईच्या हातामध्यें घुसलें. रक्ताची धार बाहेर पडली! सोललेलें कातडें घेऊन ब्राऊननें बाळासाहेबाची जखम शिवून काढली. दुसरी जखमही अशीच शिवली आणि शांताबाईनें आपले हात खालीं केले.

या गोष्टीस दोन महिने झाले. बाळासाहेब एका महिन्यांतच बरा होऊन इतर जखमी शिपायांबरोबर परत घरीं आला होता. डॉ. दिलदार आणि शांताबाईही त्याच्याबरोबर आलीं होतीं. ज्या क्षमेसाठीं शांताबाईनें एवढी धडपड केली, ती क्षमा करणें बाळासाहेबास भागच होतें. शांताबाईच्या हातांवरही आतां नुसते वण राहिले होते.

बाळासाहेब आणि शांताबाई यांचें लग्न झाल्यास आज पंधरा दिवस झाले होते. व बाळासाहेब पुन्हा लढाईवर जाण्याच्या तयारींत होता. प्रसंग पाहून एकदां शांताबाई म्हणाली, 'मी येतें लढाईवर.'

होता याबद्दल संशय नाहीं, हें खास. आणि इतकेंच आम्हांस बस्स आहे. हिंदुपदपादशाईची भव्य इमारत उभारण्याची अद्वितीय करामत ज्याचे बुद्धींत होती, तो लिपिकार नसला म्हणून कांहीं हानिही नाहीं व दूषणही नाहीं; उलट तें भूषणच आहे.

महाजनींचें हें निरीक्षण प्रत्येक शिक्षणवाद्यानें, निदान फाजील-शिक्षणवाद्यांनीं तरी हृत्पटलावर कोरून ठेवण्यासारखें आहे. विद्वत्ता म्हणजे शहाणपण नव्हे. विद्वत्तेला प्रतिशब्द साक्षरता खुशाल द्यावा, परंतु शहाणपणा हा मात्र जपूनच वापरावा. आतां लोकांत साक्षरतेची महती अधिक आहे, कीं शहाणपणाची महती अधिक आहे, हें सुज्ञांनीं विचारून पाहिल्यास असें दिसेल कीं, जगांत अद्भुत गोष्टी ज्यांनीं ज्यांनीं केल्या आहेत, ते सर्वच मोठे सटीक विद्वान होतेच असें नाहीं; मात्र ते मोठे धूर्त, धोरणी, साहसी व शहाणे असे होते. यावरून साक्षरतेचें व शहाण-पणाचें साहचर्य असूं शकत नाहीं, असेंमात्र आमचें म्हणणें कोणीं समजूं नये. साहचर्य असूं शकतें, असतेंही; परंतु तें अव्यभिचारी साहचर्यमात्र नव्हे. बाकी तसेंही असलें म्हणून साक्षरता केवळ तुच्छ किंवा सर्वथा निरु-पयोगी असें नव्हे; तिचाही उपयोग आहे. पण तो असा, ‘ शहाणपणा ’ हा मूळ धातु आहे, आणि साक्षरता हें त्या धातूला आकार देऊन मोहक बनविणारें एक उपकरण आहे; व या दृष्टीनें त्याचें महत्त्व आहे, हें निर्वि-वाद आहे. पण लोकांत जें पुष्कळदां साक्षरतेचें ऊर्फ विद्वत्तेचें फाजील स्तोत्र गाइलें जातें, तेंमात्र रास्त नव्हे; आणि त्यामुळेंच साक्षरतेला हेतु-भूत जें विद्यालयीन शिक्षण त्याचेंही फाजील स्तोम त्याच मानानें अप्र-शस्त समजावें.

शिक्षणाच्या या फाजील स्तोमाबद्दल एक स्पष्टवक्ता लेखक म्हणतो:—

परंतु, खेदाची गोष्ट ही कीं, स्त्री-शिक्षणाचें आजकाळचें वळण आम्ही ज्या राष्ट्रांपासून उचलीत आहों, त्यांकडे पहावें तर त्यांतील स्त्रियांची हांव शक्य तितक्या बाबतींत पुरुषतुल्य किंबहुना पुरुषच बनण्याची दिसत आहे ! या म्हणण्याचे सत्यतेबद्दल अगदीं ताजें उदाहरण म्हणजे गौरांगनांनीं स्वीकारलेला मुखवासनविधि होय. यापूर्वीं तिकडील सुवासिनी या वासनविधीचा इतका तिटकारा करीत असत कीं, त्या स्वतःच काय, पण त्यांचे सहृदय कैवारी पुरुषदेखील याविरुद्ध फार ओरड करीत. आमचे इकडील सुप्रसिद्ध स्त्रीकैवारी मलबारी शेट यांनीं आपल्या 'नेटिव्ह आय ऑन इंग्लिश लाईफ' नामक पुस्तकांत पुरुषांचा या व्यसनाबद्दल कडक शब्दांनीं निषेध करून अखेर अशी तोड सुचविली आहे कीं, पुरुषांची धूम्रपानाची ही घाणेरडी संवय सोडविणें तर स्त्रियांनीं पुरुषांचा स्त्रीमुखचुंबनाचा ( osculatory right ) हक्क बंद करावा ! पण, आज तारखेस जर मलबारी शेट हजर होऊं शकतील, तर त्यांना आपण अस्थानीं तरफदारी केली, असें वाटल्याशिवाय रहाणार नाहीं. कारण अलीकडे तिकडील 'कॉंटिनेंट' वरील किती तरी तरुणी पुरुषांचे बरोबरीनेंच धुराचे भपकारे सोडीत आहेत, व ही एक आपण नवीन कमाई केली असें मानीत आहेत. हा प्रकार पाहून आमच्यासारख्याला तर,

"विवेकभ्रष्टानां भवति विनिपातः शतमुखः ।"

असें म्हटल्याशिवाय रहावत नाहीं.

वरील गोष्ट कोणाचीही नालस्ती करण्याचे हेतूनें नमूद केली नाहीं. कारण दुसऱ्याची निंदा करण्यांत आम्हांला कांहीं सुख नाहीं. पण त्यांची कृति त्यांना लखलाभ होवो, ती आम्हांस नको, ही गोष्ट सुचविण्यांतला हेतु इतकाच कीं, आम्हांला आमचे स्त्रियांना शिक्षण देणें आहे, तर त्या

कामीं तिकडील कित्ता पुढें ठेवण्याची जी बरीच वहिवाट पडली आहे, ती जरूरीची नाहीं. इकडील स्त्रियांना शिक्षण देणें इष्ट आहे; पण तिकडील स्त्रियांना दिलें जातें म्हणून आम्हीं दिलें पाहिजे, व तिकडील नमुन्यावर दिलें पाहिजे, हे दोन्ही विचार आम्हांस असंमत आहेत. स्त्रीशिक्षणाची आवश्यकता व उपयुक्तता दाखविण्यास आम्हांला परक्यांकडे पहावयास नको आहे. आमचे स्वतःचेच विचारशक्तीचें गुरुत्व या कामीं आम्हांस पुरेसें आहे.

हें आमचें म्हणणें ऐकून कित्येकांस हंसू येईल. पण आजकाल कित्येक तरुणांना त्यांचे आईबापांनीं सांगितलें कीं, 'बाबांनो, तुम्हांला भर्जी, बिस्कुटें पाहिजेतच तर घरीं करून खा, पण त्या हाटेलांतून घेऊं नका;' तर हें ऐकून जसें हंसू येतें, तशांतलेंच हें हंसू आम्ही मानितों व त्याचा आम्हांस मुळींच खेद नाहीं. आमचें पुनर्वार हेंच म्हणणें आहे कीं, आमचे स्त्रियांना शिक्षण दिलेंच पाहिजे; पण, तें परकीयांचे अनुकरणानें नको. आमचा पूर्वेतिहास, आमचे आचारविचार, आमचीं आयुष्यांतील ध्येयें, आमची गृहस्थिति व परिस्थिति या सर्वांचा विचार करून, योग्य होईल तशा तऱ्हेचें तें पाहिजे आहे.

आमचे इकडे तिकडीलप्रमाणेंच थेट मुलांचेंच शिक्षण जें मुलींना शाळांतून व कालेजांतून दिलें जात आहे, त्याचे बुडाशीं बहुधा दासराष्ट्रांचे अंगीं येणारी परप्रत्ययनेयता किंवा स्वाम्यनुकरणबुद्धि ही असून दुसरें एक याहूनही सबळ कारण आहे. हें कारण म्हणजे "शहाण्या आयांचीं मुलें शहाणीं निपजतात." किंवा, हेंच निराळ्या शब्दांनीं मांडणें तर, "आया विद्वान असल्यानें मुलें विद्वान होतात." कारण, मातृशिक्षाप्रभावाचीं स्तोत्रें सर्वत्र आढळतात. अर्थात्च आजपर्यंतची खुळी प्रजा निपजण्याचें कारण इकडील आया खुळ्या होत्या. इतउत्तर आया सुशिक्षित, सुविद्य, चतुर

बनल्या म्हणजे त्यांची संततिही सहजीं, निदान अल्पायासानें, तशीच होईल, ही भावना. म्हणजे आजकाल मुलींना जें शिक्षण दिलें जातें त्यांत त्यांच्या स्वोन्नतीची कल्पना आहेच, तरी पण, स्वोन्नतीपेक्षांही अपत्यो-न्नतीचे कल्पनेचा अंश अधिक प्रबळ आहे. पुढील पिढी किंवा पुढील पुढील संतति अधिकाधिक शहाणी निपजावी, व तदर्थ शक्य त्या इष्ट साधनांचा अवलंब करावा, ही भावना सर्वथा श्लाघनीय आहे, तीबद्दल वाद नाहीं. पण या भावनेचे मुळाशीं जो सिद्धान्त आधारभूत मानिला जातो, त्याचे निर्बाधतेबद्दलचा थोडासा वाद आहे.

याचें कारण असें कीं, प्रथमतः, कृतविद्य किंवा पढीक तेवढा 'शहाणा' हा जो एक समज आहे, तोच थोडा भ्रामक आहे, असें समाजांतील कित्येक व्यक्तींकडे म्हणजे त्यांच्या व्यावहारिक वर्तनाकडे पाहिलें म्हणजे मोठ्या दुःखानेंच खरें, पण सत्यप्रेमास्तव पत्करावें लागतें. व हें आजचेच व आमचेच समाजास लागू आहे असें कोणीं समजूं नये. पुरा-तन कालापासून हाच अनुभव आहे. अशी साक्ष आपले भाषेत रूढ झालेले 'पढतमूर्ख' 'छांदिष्ट' वगैरे शब्द देत आहेत. संस्कृतांतील

अपि शास्त्रेषु कुशलाः लोकाचारविवर्जिताः ।
अवश्यं हास्यतां यांति यथा ते मूर्खपण्डिताः ॥

हा श्लोक सुप्रसिद्धच आहे. इंग्रजींतही 'Knowledge' किंवा 'Learning' आणि 'Wisdom' किंवा 'Discretion' हे शब्द मार्मिक लोक एकार्थक मानीत नाहींत, याचें कारण तरी हेंच. मराठी राज्याचे संस्थापक शिवछत्रपति हे साक्षर होते कीं निरक्षर होते, हा वाद आपलेकडे उपस्थित झाला असतां, मार्मिक विद्वान् रावबहादुर विष्णु मोरेश्वर महाजनी यांनीं या वादांत एक खुबीदार समाधान असें दिलें कीं, छत्रपति साक्षर कीं निरक्षर, याबद्दल जरी संशय असला, तरी तो 'शहाणा'

होता याबद्दल संशय नाहीं, हें खास. आणि इतकेंच आम्हांस बस्स आहे. हिंदुपदपादशाईची भव्य इमारत उभारण्याची अद्वितीय करामत ज्याचे बुद्धींत होती, तो लिपिकार नसला म्हणून कांहीं हानिही नाहीं व दूषणही नाहीं; उलट तें भूषणच आहे.

महाजनींचें हें निरीक्षण प्रत्येक शिक्षणवाद्यानें, निदान फाजील-शिक्षणवाद्यांनीं तरी हृत्पटलावर कोरून ठेवण्यासारखें आहे. विद्वत्ता म्हणजे शहाणपण नव्हे. विद्वत्तेला प्रतिशब्द साक्षरता खुशाल द्यावा, परंतु शहाणपणा हा मात्र जपूनच वापरावा. आतां लोकांत साक्षरतेची महती अधिक आहे, कीं शहाणपणाची महती अधिक आहे, हें सुज्ञांनीं विचारून पाहिल्यास असें दिसेल कीं, जगांत अद्भुत गोष्टी ज्यांनीं ज्यांनीं केल्या आहेत, ते सर्वच मोठे सटीक विद्वान होतेच असें नाहीं; मात्र ते मोठे धूर्त, धोरणी, साहसी व शहाणे असे होते. यावरून साक्षरतेचें व शहाण-पणाचें साहचर्य असूं शकत नाहीं, असेंमात्र आमचें म्हणणें कोणीं समजूं नये. साहचर्य असूं शकतें, असतेंही; परंतु तें अव्यभिचारी साहचर्यमात्र नव्हे. बाकी तसेंही असलें म्हणून साक्षरता केवळ तुच्छ किंवा सर्वथा निरु-पयोगी असें नव्हे; तिचाही उपयोग आहे. पण तो असा, ‘ शहाणपणा ’ हा मूळ धातु आहे, आणि साक्षरता हें त्या धातूला आकार देऊन मोहक बनविणारें एक उपकरण आहे; व या दृष्टीनें त्याचें महत्त्व आहे, हें निर्विं-वाद आहे. पण लोकांत जें पुष्कळदां साक्षरतेचें ऊर्फ विद्वत्तेचें फाजील स्तोत्र गाइलें जातें, तेंमात्र रास्त नव्हे; आणि त्यामुळेंच साक्षरतेला हेतु-भूत जें विद्यालयीन शिक्षण त्याचेंही फाजील स्तोम त्याच मानानें अप्र-शस्त समजावें.

शिक्षणाच्या या फाजील स्तोमाबद्दल एक स्पष्टवक्ता लेखक म्हणतोः—

" शिक्षण काय करील? अंगचें असेल तें रूपास आणील, यापलीकडे तें काय करणार? पण असें असून आम्ही शिक्षणाचें जें महत्त्व गातों, तें केवळ हास्यास्पद वाटतें. नुकताच फ्रान्सिस थामसन हा कवि वारला. तेव्हां तो ज्या गांवचा होता तेथील वृत्तपत्रांनीं आपल्या क्षेत्राचें जें साभिमान माहात्म्य गाइलें तें पुसूं नका. स्थलमाहात्म्यामुळें अलौकिक पुरुष निपजला, हें म्हणणें हंसूं येण्यासारखें असूनही आम्ही तें टाकीत नाहीं. खरा प्रकार असा असतो कीं, तो अलौकिक पुरुष स्वयंभूच तसा असतो. विद्यालय त्याला अलौकिक करीत नाहीं. एक वेळ उलट असें म्हटलें तर चालेल कीं, विद्यालय त्याला हीनतेस आणूं शकलें नाहीं. विद्यालयाचे अंगीं जर अलौकिक पुरुष निर्माण करण्याचें सामर्थ्य असेल, तर मग एक-अर्धाच कां? तें सर्वच कां तसे निपजवीत नाहीं? *

उदंड विद्या किंवा विद्यालयीन शिक्षण असूनही व्यवहारशून्य माणसाचें एक ठळक उदाहरण नेपोलिअनचे चरित्रांत दिलें आहे. नेपोलिअनचे वेळीं लॅप्लेस म्हणून एक अत्यंत निष्णात गणिती होता. गणिती म्हणजे मोठे सूक्ष्मदर्शी, दूरदर्शी, हिशोबी व दक्ष, असा सर्वत्र समज आहे. (व म्हणून 'गणित' हा विषय, वरील गुण विद्यार्थ्यांत यावे म्हणून शिक-

* ... We make the most ridiculous claim for education. Recently when Francis Thomson, the poet, died, the local newspaper of his birth-place said, it should be proud to have produced him. We may laugh at this conception of the genesis of genius, but we all talk in this fashion. A genius was educated at Eton, and we say Eton produced him. If Eton produced him why does not it produce thousands like him? There is plenty of material &c.

वितात.) नेपोलिअननें लॉप्लेसला बोलवून त्यास आपला कारभार सांगितला. पण फळ काय? सुभाषितांत जशी एका दशग्रंथी जांवयाची नक्कल लिहिली आहे कीं, बायकोनें प्रथमरात्रीं विडा पुढें करितांच वेदमूर्ति 'देवस्य त्वा 'इ. मंत्र म्हणूं लागले, व तें पाहून त्या बायकोनें आपले कपाळावर हात मारून घेतला; तसाच प्रकार येथें झाला. नेपोलिअन म्हणतो: "काय कपाळ सांगावें! त्याला कोणत्याच गोष्टीचें घाऊक स्वरूप कांहीं कळेना. तो ज्यांत त्यांत दांत कोरूं लागला. प्रश्नाचें उत्तर म्हणजे, 'असें केल्यास असें होण्याचा संभव आहे' याहून निश्चयात्मक कधींच नाहीं; आणि राज्यकारभारांतदेखील गणितांतली बारकाई!"

मातृशिक्षणप्रभावाचे कामींही विद्यालयीन शिक्षणाप्रमाणेंच सर्वथा नसली तथापि अंशतः तरी अवास्तव स्तुति होत आहे. एका इंग्रजी वाक्याचें कोणीं 'जिच्या हातीं पाळण्याची दोरी, ती पृथ्वीचें राज्य करी,' अशा प्रकारचें भाषांतर करून तें वाचनपुस्तकांत घातलें आहे. व नेपोलिअनसारखा अप्रतिभटवीर निपजण्यास मुख्यत: त्याची आई कारण होती, यावरून मातृशिक्षणाचें सामर्थ्य केवढें आहे पहा, असें सांगितलें जातें. आणि यावरून सुविद्य मुलें निपजण्यासाठीं आया सुविद्य केल्या पाहिजेत, असें सिद्ध करून दाखविलें जातें. हें सर्व करणें सद्भावनेचें आहे, त्या अर्थी त्याची कुत्सा करण्याला तें मुळींच पात्र नाहीं. पण एवढें म्हटल्याशिवाय रहावत नाहीं कीं, या कामींदेखील थोडा अतिप्रसंग होतो. नेपोलिअनची आई लेटीशिआ मोठी धीराची, शिस्तीची व चतुर बायको होती, ही गोष्ट

---

१ 'He (Laplace) searched for subtleties everywhere, had only problematic ideas, and carried the spirit of infinitisimals even into his administrative work.' Napoleon.

निर्विवाद आहे. नेपोलिअन तिचे पोटांत असतांना तिचा नवरा रणांगणावर निघाला असतां ही घोड्यावर बसून त्याजबरोबर स्वारीवर गेली. तारीख १५ आगष्ट १७६९ या दिवशीं प्रातःकाळीं ती प्रार्थनामंदिरांत बसली असतां, तिला प्रसूतिसमय जवळ आलासें भासतांच ती घरीं गेली; व ईलिअड या महाकाव्यांतील शूर योद्ध्यांचीं व संग्रामाचीं जींवर चित्रें काढलीं आहेत, अशी चादर पसरलेल्या आपल्या पलंगावर प्रसूत झाली. ह्यावरून तिची दक्षता, धिटाई, चतुरस्रता हीं निःसंशय दिसून येतात. पुढें नवरा मेल्यावरही तिनें स्त्रीजात होऊन आपले मुलांचें पालन व शिक्षण मोठ्या अकलेनें केलें व शिस्त लावण्याचे कामीं तर तिची शिकस्तच होती असें स्वतः नेपोलिअननेंच म्हटलें आहे.[1] हें सर्व खरें, पण या बाईचा प्रत्येक मुलगा नेपोलिअन झाला नाहीं, हेंही खरें आहे. तेव्हां असली आई नसती तर नेपोलिअन असा झालाच नसता, असें नाहीं; कारण नेपोलिअनचें दूर राहो; पण आपल्या या देशांत इंग्रजी भाषेचा विशेष प्रचार होऊन विश्व-विद्यालयांतून पदवीधर मंडळी निपजूं लागल्याला उणींपुरीं ६० वर्षें होत आलीं, व पदवीधर स्त्रिया निपजूं लागल्याला पुरीं १० वर्षेंही झालीं नाहींत. अर्थात् आजपर्यंतच्या पदवीधरांत पदवीधर मातांचीं कुक्षिरत्नें शिरलीं नाहींत. तो भाग्याचा काळ पुढें आहे. तूर्तास सर्व पदवीधर अपदवीधर जननींचींच अपत्यें आहेत. किंबहुना त्यांतील पुष्कळसे निरक्षर मातांचेही पुत्र आहेत. तथापि त्यांनीं काबीज केली नाहीं, अशी विद्या-मार्गांतील एकही पदवी शिल्लक राहिली नाहीं. कित्येक तर इतके समर्थ आहेत कीं, त्यांनीं दोन दोन, तीन तीन, चार चार पदव्या हिरावल्या आहेत. कित्येक दुखंडकीर्ति, त्रिखंडकीर्तिही आहेत. कित्येक पद-वाक्य-

---

१ अॅबटकृत नेपोलिअनचरित्र, पा. ४ पहा.

प्रमाण-पारा-वारीण[1] आहेत. आणि यांच्या माता बिचाऱ्या अशास्त्रावित्‌च आहेत. मग हे अतुलकीर्ति पुत्र अशा आयांना कसे संभवले, किंवा आयांचे निरक्षरत्वानें ह्यांची काय हानि झाली, हें नीटसें कळत नाहीं.

कोणी म्हणतील, निरक्षर आयांचे पुत्र जर इतपत विद्वान्‌ झाले, तर साक्षर किंवा पदवीधर आयांचे पुत्र याहूनही बहुगुण विद्वान्‌ होतील. ठीक आहे. संतोषाची गोष्ट आहे. पण ही मानण्यास एकदोन शंका आड येतात. पहिली अशी कीं, पदवीधर आयांचे पुत्र जरी गणण्याइतके आज नाहींत, तथापि पदवीधर पित्यांचे पुत्र शेंकडों आहेत; व शिक्षक-आयांचा मनु जरी अजून विद्यमान नसला, तरी शिक्षक-पित्यांचा मनु या भूमींत हजारों पिढ्या चालत आला आहे. तथापि 'बाप से बेटा सवाई' असा अव्याहत अनुभव तीन किंवा चार पिढ्या सतत आला आहे, अशीं इतिहासप्रसिद्ध किंवा लोकप्रसिद्ध उदाहरणें कितीशीं आहेत? दिगंत-विश्रांत-कीर्ति असे जे जे विद्वान्‌ पूर्वी होऊन गेले, किंवा आज आहेत, त्यांचे पुत्र 'तुल्यकीर्ति' असलेले कितीसे आढळतात? कादंबरीकार बाणभट्टांसारख्या किंवा चिपळूणकरांसारख्या पितापुत्रांच्या जोड्या कितीशा प्रसिद्ध आहेत? आमच्या देशांत राहोत, इतर देशांत तरी कितीशा आहेत? पुष्कळ ठिकाणीं तर अलौकिक विद्वान्‌ संततिहीनच आढळतात. बाकी ज्या कित्येक सभाग्यांना संतति लाभते अशांतदेखील सवाईशहाणी संतति अशी थोड्यांनाच. आतां बाप-लेक पदवीधर अशा जोड्या पुष्कळ आहेत, हें खरें; पण त्यांतलें इंगित केवळ बाप पदवीधर असल्यानेंच पुत्रही तुल्य झाला हें नव्हे. रहस्य एवढेंच कीं, बाप विद्येचें महत्व जाणणारा असल्यानें त्यानें आपले मुलाला हरयत्नानें विद्येच्या मार्गाला लाविलें, व सुदैव.

---

१ व्याकरण, न्याय, मीमांसा, वेदान्त यांत उत्तीर्ण.

जुना पुस्तक जपून पहा

मुलगा मूळचा बुद्धिवान् असल्यानें मार्ग क्रमून गेला. 'गवयाचें पोर रडलें तरी सुरावर रडेल' अशी म्हण आहे, तींत तरी अनुभवास येणारा भाग एवढाच आहे कीं, गवईबापाचे घरांतील मुलाचे कान गाण्याचे सुरांनीं बरेचसे भरतात व त्याला देवानें कंठ दिला असला, तर त्या संस्कार-सातत्यानें तो कंठ रूपास येतो. बाकी प्रत्येक गवयाचा मुलगा सुरेल असतोच असें नाहीं.

हाच नियम शहाण्या किंवा सुविद्य आयांचे मुलांना लागू होणार आहे. म्हणजे सर्व सुविद्य आयांचे पुत्र सुविद्यच होतील असें म्हणवत नाहीं. आत्र स्वतः आयांना विद्येचें महत्त्व कळत असलें, म्हणजे बापांप्रमाणेंच आपल्या संततीला विद्येचे मार्गास लावण्याचा त्या शक्य तो प्रयत्न करतील व सुयोगानें संतति ग्रहणपटु—धारणापटु—असल्यास त्यांच्या प्रयत्नाचें चीज होऊं शकेल; पण विद्येचें महत्त्व कळणाऱ्या आया बनविण्याला त्यांना आजचे-प्रमाणें पुत्राचे भारंभार विद्वान् आगाऊ बनवून ठेवण्याची कडोकोट जरूर आहे असें आम्हांस वाटत नाहीं. हें एक. दुसरें असें कीं, ही कडाकूट पत्करून भारंभार विद्वान् होऊन राहिल्या तरीही त्यांच्या त्या विद्वत्तेचा विनियोग संततीचे शिक्षणाकडे करण्याचा सुयोग येई तों निमीशिमी विद्वत्ता लुप्तप्राय होऊन जाते. याचा शेकडों पदवीधर बापांना अनुभव आहेच. स्वतः बी. ए. असले तरी मुलगा बी. ए. चे वर्गांत येई तों ते विषय शिकवितां येण्याइतक्या तरतरीत स्थितींत ज्याचे मेंदूंत राहिले आहेत, असे स्मृतिसागर आम्हांस तरी फारच थोडे आढळतात. कित्येकांचे तोंडांतून आम्ही असे उद्गार ऐकिले आहेत कीं, तें त्या वेळचें त्या वेळीं गेलें. अर्थात् पितरांची विद्वत्ता मुलांचे उपयोगीं पडण्याचे दिवसापर्यंत भारंभार टिकणें ही गोष्ट बरीच दुरापास्त आहे.

हें जर खरें, तर प्रश्न असा उद्भवतो कीं, ज्यांना अमुकच विषय आणि तेही अमुक मर्यादेपर्यंत पढलेच पाहिजेत अशी अपरिहार्य अडचण नाहीं, अशा आमच्या स्त्रीवर्गानें याहून अधिक महत्त्वाचे व अगत्याचे विषयांची हेळसांड करून आजचेप्रमाणें पुरुषांचे बरोबरीनें चेंचट विषयांची माथेपची करीत बसण्याची हौस कां धरावी, किंवा त्यांच्या पालकांनीं तरी या वेडे हौसेचे नादीं कां भरावें ? आमचे देशांतील समजुतीप्रमाणें म्हटलें तरीही विद्येकरितांच ज्यांचा जन्म आहे, किंवा विद्या करणें हीच ज्यांची धन्यता व इतिकर्तव्यता मानली गेल्यामुळें ज्यांना विद्यार्जनाचे कामीं निष्प्रतिबंध स्वातंत्र्य आहे, अशा आमच्या पुरुषवर्गालाच विचारिलें कीं, सत्य स्मरून सांगा, तुम्हांला जर आवडेल तोच व तितकाच विषय शिकावा अशी शिक्षणक्रमांत मुभा असती, तर तुम्हीं आजकाल विद्यार्थ्यांवर सरसकट लादले जाणारे विषयांपैकीं किती विषय, किंवा भाग टाळले असतेत ? आम्हांला तर वाटतें कीं, ‘ तीन चतुर्थांश ’ असें जवळ जवळ उत्तर येईल; आणि तें उत्तर सर्वथा न्याय्यच होईल. कारण पुढील आयुष्यांत ज्यांची कधींही जरूरी नाहीं, किंवा ज्यांपासून काडीमात्र फायदा नाहीं, असे किती तरी विषय परीक्षेचे अटीकरितां म्हणून आपलेसे करण्यांत होतकरू तरुणांचे अमोल आयुष्याचा व्यय नव्हे—क्षय होत असतो. जे. डब्ल्यु. ए. यंग नामक अमेरिकन विद्वानानें ‘ दि टीचिंग ऑफ मॅथेमॅटिक्स ’ ( गणित—शिक्षा ) नांवाचा एक सुंदर ग्रंथ लिहिला आहे, त्या ग्रंथाचीं पानें १३।१४ यांत तो म्हणतो:—

“गणितविषय अत्युच्च व व्यापक खरा, तथापि सामान्य नागरिकाला अंकगणिताच्या ठोकळ तत्त्वांपलीकडे जाण्याची जरूरी किंवा प्रसंग आयुष्यांत विरळाच. हीच गोष्ट इतर विषयांनाही इतक्याच जोरानें लागू आहे.

खुद इंग्रजी भाषाज्ञानाबद्दलेदेखील हेंच. नित्यव्यवहाराला शुद्ध सोपी वाक्यरचना करितां आली म्हणजे भागलें. याखेरीज शाळांतून जेवढे मिळून विषय शिकविले जातात, त्यांपैकीं पुढील आयुष्यांत ज्यांचा बहुतेक विद्यार्थ्यांना उपयोग पडतो, असे विषय कोणते हें सांगणें कठीण आहे. हें सामान्य विषयांच्या सामान्य ज्ञानाबद्दल झालें. मग एकवर्ग समीकरण सोडाविणें, किंवा, छंदःशास्त्रांतील षट्पदी वृत्तांची गणमांडणी करणें, वनस्पतिशास्त्राधारें एकादे पुष्पाचे आंतर रचनेचें वर्णन करणें, किंवा वाटर्लूचें लढाईची नेमकी तारीख सांगणें, असल्या गोष्टींच्या जरूरीचें तर नांवच काढावयास नको.

या विद्वानाचें हें म्हणणें अनुभूतच आहे. इतर विषयांचें राहो; पण आजकाल सर्व विद्वत्तेचा सौभाग्यबिंदु म्हणून गणली जाणारी जी इंग्रजी भाषा तिजसंबंधीं जर आमचे इकडील पुरुषांस वरप्रमाणेंच प्रश्न केला, तर आम्हांस वाटतें कीं, सगळे नाहींत तरी निम्याहून अधिक लोक असें उत्तर सांगतील कीं, दुसरी गति असती तर आम्ही असली नाठाळ भाषा प्रेमानें म्हणून कधीं शिकलों नसतों. असल्या संपन्न, गुलजार व समर्थ भाषेला वरील विशेषण दिलेलें पाहून तिच्या भक्तांपैकीं पुष्कळांचा आम्हांवर घुस्सा होईल हें आम्ही जाणून आहों. पण सत्यापुढें आमचा नाइलाज आहे. म्हणून आम्हांवर घुस्सा करण्यापूर्वीं वाचकांनीं खालीं दिलेला इंग्रजी उतारा मननपूर्वक वाचावा. या भाषेतील पहिला नाठाळ भाग म्हणजे स्पेलिंग. त्याबद्दल कॉमनवील पत्राचे तारीख १३ मार्च सन १९१४ चे अंकाचें पान २०९, यांत एक लेखक म्हणतो:—

---

१ हें लिहिणाराची ही जन्म भाषा असून त्याची सर्व ऊठबस याच भाषेत व्हावयाची असून त्याचें तिजविषयीं हें मत आहे, हें वाचकांनीं विसरूं नये.

... Certainly in the languages of the west, most notably in English the spoken sound and the written form have become very arbitrarily and often very remotely related. To illustrate this for English is superfluous, as every one knows it; but as an extreme example the following jocular demonstration may be quoted. It has been argued that the simple word 'Potato' might also be spelled 'gheauphtheightteough', without any change in pronounciation, if we recall the 'gh' in 'hiccough', the 'eau' in 'beau', the 'phth' in 'phthisis', the 'eigh' in 'weight', the 'tte' in 'gazette', and the 'ough' in 'though'

In fact English rivals Tibetan in the discrepancy between its spelling and its pronounciation. But to a geater or lesser degree all modern languages suffer from the same defect. German, Swedish, French, Greek, Dutch, Spanish aud scores of other languages alike exhibit it.

The result is that a vast amount of energy is wasted by the young of all countries where these languages are spoken, in learning unnecessary rules and unnatural distinctions and that a steady and appreciable percentage of labor, time and money is wasted all the year round in writing and printing superfluous and wrong letters &c.

भावार्थः—पश्चिमचे भाषांत व विशेषतः इंग्रजींत शब्दोच्चार व वर्णवटिका यांत फार तफावत असते. बोलणें एक आणि लिहिणें भलतेंच; असली कांहीं बेबंदी आहे. याचें गमतीचें उदाहरण म्हणून एकानें पोटॅटो ( बटाटा ) हा शब्द वीस अक्षरांनीं बनवून दाखविला आहे. कारण, असल्या घटनेला भाषेंत बळकट दाखले आहेत. थोड्याफार फरकानें हाच अभ्यास जर्मन, स्वीडिश, फ्रेंच, ग्रीक, डच, स्पॅनीश इत्यादि शेंकडों भाषांत आहे.

याचा परिणाम काय म्हणाल, तर जेथें जेथें या भाषा चालतात, तेथील तरुणांची प्रचंड शक्ति या नाठाळ भाषांचे निष्कारण नियम व बारकावे शिकण्यांत अखंड क्षीण होत आहे. आला तो दिवस फाजील किंवा चुकीचे वर्ण लिहिणें किंवा छापणें यांत अनेक जीवांचे श्रम, काल व द्रव्य यांची ध्यानांत घेण्याजोगी हानि होत आहे !

वरील लेखकाचें म्हणणें खोटें कोण म्हणेल ? उच्चारांत पहावें तों एक अक्षर, आणि लेखांत चार, पांच, सहादेखील. उदाहरणार्थ, ‘दो’ शब्द; याची लिपी म्हणजे टी, एच्, ओ, यू, जी, एच ! कोण कहर हा ! विचार करा, कीं या जुलुमापायीं अनेक जीवांची केवढी हानि होत आहे ! नाहीं तर आमची देवभाषा व तिच्या लेकी महाराष्ट्रादिक किती उज्ज्वल, किती सत्य ! ‘बोले तैसा चाले’ असें त्यांचें व्रत. जो उच्चार तीच लिपि. किती सुख, किती साधेपणा, किती अल्पश्रम ! परंतु फळ काय ? व्यसनी जीवांना ज्याप्रमाणें व्यसनाचे वस्तूपायीं घरदार धुण्याची पाळी आली तरीही त्याचें संकट वाटत नाहीं, उलट अधिक गोडीनेंच ते आपलें सर्वस्व खर्चीं घालीत असतात, तशांतलीच आम्हांपैकीं पुष्कळांची स्थिति झाली आहे. खरोखर असल्या भाषा शिकण्यांत

कोंवळीं कोंवळीं जी मुलें रक्तसांड करितात, तिकडे पाहिलें म्हणजे दुःख होतें व एका कव्युक्तीची आठवण होते. कवि म्हणतोः—

शीतवातातपेक्लेशान् सहंते यान्पराश्रिताः ।
तदंशेनापि मेधावी तपस्तप्त्वा सुखी भवेत् ॥

म्हणजे—श्ववृत्ति पत्करलेले लोक दुसऱ्याचे ताबेदारींत जे शीतोष्णादि क्लेश सोसतात, त्या क्लेशांचे एकांशानेंदेखील एकादा बुद्धिमान् मनुष्य तप करून कायमचा दुःखमुक्त होईल.

हाच न्याय धरला तर असें म्हणतां येईल कीं, आजकाल असत्य क्लिष्ट भाषा स्वाधीन करून घेण्यांत जे अनिवार कष्ट कोमल मुलें सोशितात, त्यांचे एकांश अन्यत्र श्रम जर ते करतील तर किती तरी सुखी होतील. पण काय करावें ? दैवाची दुर्निवारता इतकी जबरदस्त आहे कीं, जो तो या नादीं; ज्याला कारण आहे तो—ज्याला नाहीं तोही. आयकांची एक म्हण आहे कीं " घरची उघडी आणि बाहेरचीला बुगडी. " तसा मासला होऊन राहिला आहे.

असो; लेख लांबला, यासाठीं या मुद्द्यापासून काय घ्यावयाचें तें सांगणें पुढील लेखांकावर सोंपवितों.

---

जुनें वर्ष २६ वें.

# केरळ-कोकिल

वार्षिक वर्गणीः—
१-८-०
टपालखर्च निराळा.

पत्ताः—
४९७, बुधवार पेठ,
पुणें शहर.

क्वचिज्झिल्लीनादः क्वचिदतुलकाकोलकलहः ।
क्वचित्कंकारावः क्वचिदपि कपीनां कलकलः ॥
क्वचिद्घोरः फेरुध्वनिरयमहो दैवघटनात् ।
कथंकारं तारं रसति चकितः कोकिलयुवा ॥ १ ॥

वर्ष ४ थें.] मार्च १९१५. [अंक ९ वा.

विषयानुक्रम

१ स्मरणी ! ( कविता )... ... ... ... १
२ समाजशास्त्रावरील व्याख्यानें. ( परीक्षण )... ... १५
३ जवानसिंगाची किताब. ( गोष्ट ) ... ... २४
४ कोलंबोपासून आल्मोरापर्यंत. ( व्या० १७ वें ) ... ३३
५ पोंच व अभिप्राय. ... ... ... ... ४१
६ मोहन-रहस्य ( जादू कादंबरी ).... ... १२८-१४४

हें पुस्तक भरयुत चिंतामण भट यांनीं पुणें, पेठ कसबा येथें आपल्या यशवंत छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

( पृष्ठ ४८ वरून पुढें चालू. )

७ आधुनिक सुशिक्षिताचा वेदान्त—लेखक, प्रो० महा मल्हार जोशी, एम्. ए; प्रकाशक, रा० वामन मल्हार जोशी, एम्. तांब्यांचा वाडा, २३० शनिवार पेठ, पुणें. किंमत ४ आणे. एकदी वर्षांपूर्वी केसरींत हे लेख प्रसिद्ध झालेले असल्यामुळें ते महाराष्ट्रा पूर्ण परिचयाचे आहेत. सदर मार्मिक लेख पुस्तकरूपानें छापून प्रो० जोश यांनीं त्यांना टिकाऊ रूप दिलें, ही आनंदाची गोष्ट आहे. वेदान्ताच आधुनिक पद्धतीनें चर्चा व्हावी, त्याचें खरें स्वरूप व महत्त्व आधुनि सुशिक्षितांच्या लक्षांत यावें, वेदान्त निवृत्तिपर नसून प्रवृत्तिपर आहे, लोकांच्या मनांना पटवावें, वेदान्तांत जे कांहीं निवृत्तिपर सिद्धान्त दिस तात त्यांचा खरा अर्थ काय, याचा विचार लोकांना करायला लावावें,— तात्पर्य, "सध्यां चालू असलेलीं वजनेंमापें व कसोटी घेऊन वेदान्तरूपी सुवर्णाचें महत्त्व व त्याची निर्दोषता" लोकांना दाखवावी व "तें सुवर्ण पितळेच्या मोलानेंच जाण्याचा (जो) संभव आहे," तो टाळण्याचा प्रयत्न करावा, युक्तिवादाचा आश्रय करून वेदान्ताची चर्चा करावी व अशा रीतीनें लोकांत वेदान्ताबद्दल जागृति उत्पन्न करावी, या हेतूनें प्रो० जोशी यांनीं ही लेखमाला हातीं घेतली. तसेंच, "अगदीं निरक्षर मनुष्यास नाहीं तरी साधारण सुशिक्षित मनुष्यास कळेल, अशा रीतीनें वेदान्तांतील सिद्धान्तांचें प्रतिपादन स्वबुद्ध्यनुसार करावें," हा प्रो० साहेबांचा ही माला गुंफण्यांत दुसरा हेतु होता. प्रो० जोशी यांच्या विद्वत्तेला व मार्मिक-तेला साजेल, अशाच रीतीनें त्यांच्याकडून हें कार्य झालें असल्यामुळें त्यांचे वरील दोन्ही हेतु बरेच तडीस जातील, अशी आमची समजत आहे. प्रत्येक मनुष्यानें हें पुस्तक विचारपूर्वक एकदां तरी वाचावें, अशी आमची इच्छा आहे.

[रंगीत पृष्ठ ३ पहा.]

# केरळकोकिळ.

वर्ष ४ थें.] मार्च १९१५. [अंक ९ वा.


## स्मरणी.

( कवि—नारायण केशव बेहेरे, बी. एस्. सी. )

[ १ ]

गत सौख्याचे ॥ ओढितों मणी स्मरणींचे ॥ ध्रु० ॥
कोमल कलिका लतिकेवरची,
मूर्तिच केवळ मुग्धपणाची,
प्रथम पाहिली, त्या दिवसाची,
सदा स्मृति होई ॥ हृदयाला भरती येई ॥ १ ॥
मज बघतां ती लतिका वदली—
'माझी कलिका बघण्या आली,
का मज सांगा स्वारी अपुली ?
कळी जरि गोड ॥ तिज लाधो अपुली जोड' ॥ २ ॥
हृदयीं धरुनी प्रेमभरानें,
पुसे लता तिज हास्य मुखानें—
'आवडला का पति हा सोने ?
नीट घे बघुन ॥ रत्न असे दुर्लभ जाण !' ॥ ३ ॥
किती लाजली, किती ठुमकली,

---

१ हें माझ्या पत्नीचें माहेरचें नांव; यामुळें मी तिला 'सोने' किंवा 'बाळे' म्हणून हांक मारीत असें.

अर्धोन्मीलित कलिका झाली,
वक्र कटाक्षें बघुनी वदली—
'ईश्श ग आई ! ॥ मी तुजशीं बोलत नाहीं '॥ ४ ॥
प्रीती नयनीं परी चमकली,
चोरुनि मजला बघूं लागली,
दृष्टादृष्टच होतां लपली,
प्रीति हृदयांत ॥ सोनीही माजघरांत ॥ ५ ॥
त्या दिवसाचा ॥ ओढितों मणी स्मरणांचा ॥ ध्रु० ॥

* * *

[ २ ]

मैत्री जुडली, प्रेमा वाढ,
प्रत्येकाची दुसऱ्या ओढ,
उरली नाहीं कांहीं तेढ,
प्रेमौघाला ॥ अडथळा कोठला आला ? ॥ १ ॥
विचार जुळतां हृदयें जुळलीं,
भिन्नत्वाला जागा नुरली,
प्रेममयी मग वृत्ती बनली,
परिस्थिति भिन्न ॥ विसरलों प्रणयिं रंगून ॥ २ ॥
मीलन झालें उद्यानांत,
धरिला कोमल कर हातांत,
वचन दिलें कीं, तुज हृदयांत-
ठेविन बाळे ! ॥ साक्षी हे तरुवर अपुले ॥ ३ ॥
आनंदानें कंपित झाली,
तनु तव स्मरते मज त्या काळीं,
शब्दावांचुन प्रीती कळली,
फूल देऊन ॥ निज हृदय गूढ उकलून ! ॥ ४ ॥

फूल तुझें मी धरुनी हृदयीं,
प्रीतीच्या मग रमलों पायीं !
तुजविण जगतीं कांहीं नाहीं,
भावना झाली ॥ तूं प्रीति-देवता गमली ! ॥ ५ ॥
त्या दिवसाचा ॥ ओढितों मणी स्मरणीचा ॥धृ०॥

*   *   *

[ ३ ]

परिस्थितीचे भीषण, भेसुर,
अडवे आले काळे डोंगर,
लपला तेव्हां आशाभास्कर !
मेघ हृदयांत ॥ जमले मग गिरक्या घेत ! ॥ १ ॥
एकच देवी हृदयीं होती,
शस्त्रास्त्रें तिज ठाऊक नव्हतीं,
प्रेमळ दृष्टी—केवळ शक्ती
हासतां प्रीती ॥ भीषणता जळली चित्तीं ॥ २ ॥
परिस्थितीचा चूर जाहला,
प्रेमाचा हा प्रभाव कळला,
आशाभास्कर उदया आला !
त्याच तेजांत ॥ धरिला मग अंतरपाट ॥ ३ ॥
मंत्र ऐकिले प्रीतीचे ते,
पाठच पूर्वी मजला होते,
श्रवणानें परि आलें भरतें,
कळलें सार ॥ रंगला प्रेम-संसार ! ॥ ४ ॥
गळ्यांत माझ्या माळा पडली,
प्रीति कपोलीं करि मग केलि,
प्रीति-नर्तनें लज्जित झाली,

अधोमुखि बाळा ॥ घातली तिला मीं माळा! ॥ १५ ॥
त्या दिवसाचा ॥ ओढितों मणी स्मरणीचा ॥ ध्रु० ॥

* * *

[ ५ ]

'मंगलगौरी'[1] कविता बघतां,
मोद जाहला अपार चित्ता,
जागृत झाली माझी कविता,
गद्यमय वृत्ती ॥ लपुनी ये प्रेमळ स्फूर्ती ॥ १ ॥
लाज वाटली माझी मजला,
क्षणीं विसरलों गद्य जगाला,
वंदन केलें त्वत्प्रतिभेला,
धावुनी आली ॥ काव्यानें वृत्ती भरली ॥ २ ॥
प्रेमाची मज व्याप्ती कळली,
चराचराशीं वृत्ती रमली,
सुंदरता जगताची दिसली,
गाइलीं गाणीं ॥ पसरलीं वाङ्मयोद्यानीं ! ॥ ३ ॥
प्रसिद्ध झाली कविता पहिली,
प्रेमभरानें तुज दाखविली,
तूंही तिजला सुंदर म्हटली,
अंतरीं धालों ॥ नव गीतें गाया सजलों ॥ ४ ॥
कविता रचण्या मला शिकविलें—
कोणीं ? ऐसें तुज मीं पुसलें,
'ठाउक नाहीं' उत्तर आलें !

---

१ लग्नानंतर लवकरच सोनीनें 'मंगलागौर' म्हणून एक कविता लिहिली. ती वाचूनच मी कवि झालों. कारण, तोंपर्यंत मीं एकही कविता लिहिली नव्हती.

तूं गुरु झाली ॥ तुजमुळेंच कविता सुचली ! ॥ ५ ॥
प्रतिभेची तूं सुंदर मूर्ती,
उज्ज्वल भारी तव ती स्फूर्ती,
तुझ्याच संगें लाभे मज ती,
गूढ सृष्टीचें ॥ उमगलें क्षणीं मज साचें ! ॥ ६ ॥
लाजुनि मजला तेव्हां वदली—
'ट'ला 'ट'ची कविता कसली ?
प्रेमें अपणां रम्य भासली !
काजवा शशिला ॥ शिकवि का तेज देण्याला ? ॥ ७ ॥
त्या दिवसाचा ॥ ओढितों मणी स्मरणींचा ॥ ध्रु ॥

*    *    *    *

[ ५ ]

जुन्या पुराण्या रूढि नाचती,
लपे बिचारी खरी संस्कृती,
परंपरेचा वारा भंवतीं,
भेसुर वाही ॥ सत्यता लपाली, पाहीं ! ॥ १ ॥
पुतळे आम्ही स्वतंत्रतेचे,
अबलांवरतीं प्रभुत्व अमुचें,
अज्ञानांतच डोळे त्यांचे,
टाकुं भ्रमवोनी ॥ मोकळी अम्हां ही अवनी ॥ २ ॥
कवि-कवयित्री एक जाहलीं,
प्रतिभेची मग ज्योती फुलली !
रूढि पुराणी पार दडाली,
कोठल्या कोठें ॥ शून्याच्या गेली वाटे ! ॥ ३ ॥
सृष्टीमाजीं स्वैर हिंडलों,
लतिकांसंगातिं खेळ खेळलों,
भृंगांपाशीं रानीं रमलों,

स्वैर सृष्टींत ॥ हिंडलों गूढ उकलीत ॥ ४ ॥
ओढ्याच्या मग कांठीं बसुनी,
गूढ गुंफिलें नूतन कवनीं,
तींच गाइलीं प्रेमळ गाणीं,
सृष्टिही डोले ॥ आनंदें मानस हाले ! ॥ ५ ॥
लोक बोलती, "असती वेडे,
काय मिळे यां बघुनी झाडें,
टाकुनि नगरामधले वाडे,
येति रानांत ॥ कवि अशास कीं वदतात ! " ॥ ६ ॥
गाण्याची परि तान ऐकली,
गद्यवृत्ति ही पार निमाली,
प्रतिभेची मग ओळख पटली,
बघति भंवतालीं–॥ जगताला चढली लाली ! ॥ ७ ॥
पुष्पें फुललीं क्षणिं उद्यानीं !
फळें लागलीं पानोपानीं !
गाती पक्षी सुस्वर गाणीं,
रूप पालटलें ॥ रुक्ष वन स्निग्धच झालें ! ॥ ८ ॥
तेच[1] बोलती, भाग्यवंत हे,
प्रीती यांच्या हृदयीं राहे,
प्रेमकटाक्षें सुंदरता ये,
जगतिं नाचाया ॥ स्वर्गरूप जगता द्याया ! ॥ ९ ॥
ऐकुनि वच हें मोद जाहला,
वंदन केलें त्या प्रतिभेला,
किती गुंफिल्या कविता-माला,

---

१ पूर्वी नांवें ठेवीत तेच लोक.

गुंगलें चित्त ॥ प्रेमाच्या मधु तंद्रींत ! ॥ १० ॥
त्या दिवसाचा ॥ ओढितों मणी स्मरणींचा ॥ ध्रु० ॥

*   *   *

[ ६ ]

प्रीति-तरूच्या पुष्पामागें,
लहानसें फळ शोभूं लागे,
कल्पनेंत मन धांवे वेगें,
बांधी किल्ले ॥ अति भव्य मोठमोठाले ! ॥ १ ॥
आशेची जगिं महती मोठी,
अपुरी तिजला सारी सृष्टी,
अदृश्याच्या शिरते पोटीं,
बोलते बोल ॥ दाविति जे भावी काल ॥ २ ॥
तिच्याच नादीं मती रंगली,
तुझी मनीषा तुजला पुसली,
लाजुनि मजला तेव्हां वदली—
"माझा बाळ ॥ कवि थोर जगीं होईल ! ॥ ३ ॥
महाराष्ट्र त्या गणील 'शेले',
प्रीति-गायनीं यन्मन डोले,
नव्या दमाचे तोही झेले,
महाराष्ट्राला ॥ देईल सजिव करण्याला !" ॥ ४ ॥
रंगवलीं मग चित्रें भावी,
बघतां ज्यांना मति गुंगावी,
क्षुधातृषाही सर्व हरावी,
कल्पना थकली ॥ चित्रें परि नयनां दिसलीं ॥ ५ ॥
सुंदर चित्रें तीं बघण्यांत,
रजनी सरली नच ध्यानांत,

अवचित दिसतां नव प्रभात,
बोलिलों बोला ॥-" वंदिते स्नुषा तव तुजला " ॥६॥
" निसर्गरमणी योग्यचि बाळा,
प्रेमें तोही नमविल काळा,
पार न राहिल आनंदाला,
भावि आशेनें ॥ सृष्टीचें खुललें फुलणें ! " ॥ ७ ॥
त्या दिवसाचा ॥ ओढितों मणी स्मरणीचा ॥ ध्रु० ॥

* * *

[ ७ ]

'राधागीता'[1] लिहीत बसलों,
काव्यानंदीं गुंग जाहलों,
बाह्य जगाला विसरुनि गेलों,
कविताचरणीं ॥ एकतान गेलों बनुनी ॥ १ ॥
प्रतिभा तेव्हां तेजें स्फुरली,
दिव्य कल्पनाज्योति पेटली,
विचारलहरी चित्तीं उठली,
मन मोहियलें ॥ कृष्णाविण कांहिं न दिसलें ! ॥ २ ॥
ब्रह्मानंदीं लागे टाळी,
कृष्णमयी मम वृत्ती झाली !
सहज निघाला मग त्या वेळीं,
पूर शब्दांचा ॥ फोडुनी बांध हृदयाचा ! ॥ ३ ॥
हात कसा तरि लिहीत होता,
भान न होतें परि या चित्ता,
कंठ दाटला गातां गातां,

---

१ गेल्या वर्षी याच दिवसांत म्हणजे डिसेंबर १९१३ त मीं 'राधागीत' हें काव्य लिहिलें. हें अजून अप्रसिद्ध आहे.

डोळे मिटले ॥ संगीत मानसीं चाले ! ॥ ४ ॥
खांद्यावरतीं हात ठेविला,
कुणी तरी, हा भास जाहला,
आनंदानें वदलों बोला-
राधिकेवीण ॥ दे सौख्य कोण स्पर्शून ? ॥ ५ ॥
" बाई ! बाई ! राधा कुठली,
बरीच स्वारी दिसते चळली,
विभागली मम प्रीती गेली
पुरुनि राधेला ॥ उरली ती दिधली मजला " ॥ ६ ॥
नेत्र उघडले, मागें वळले,
दृष्टीमीलन निमिषीं झालें,
प्रेमाचें अधिराज्यच कळलें,
हृदयीं धरिली ॥ राधा मीं तेव्हां अपुली ! ॥ ७ ॥
उठलों केव्हां, हात पसरले,
हृदयीं तिज कां बोलाविलें ?
कांहिं न मजला यांतिल कळलें,
शेवट कळला ॥ हृदयांचा संधी झाला ! ॥ ८ ॥
हंसुनी वदली कीं, " लिहिण्यांत,
करी अडथळा वेडी नित्य,
रागवलें कां अपुलें चित्त ?"
"काव्यीं गुंग ॥ असतां तूं केला भंग ! " ॥ ९ ॥
" केव्हांची मी उभी राहिलें,
स्वारीला परि नच हें कळलें,
वाट पाहुनी जेव्हां थकलें,
लाविला हात ॥ अपराध काय हा होत ? ॥ १० ॥
गुंग रहावें काव्य-लेखनीं,

प्रीतीचे परि बोल अर्पुनी
सुखवावी कधि वेडी पत्नी !
काव्य वाचून ॥ शांति नच अम्हांलागून ! ॥ ११ ॥
प्रीतीचें जल आम्हां मिळतां,
ओलावाही येइल चित्तां,
प्रेमभरानें गाऊं गीतां,
काव्यरस सेवूं ॥ प्रेमाविण वेड्या राहूं ! ॥ १२ ॥
त्या दिवसाचा ॥ ओढितों मणी स्मरणीचा ॥ ध्रु ॥

*  *  *

[ ८ ]

गेलों होतों मी यात्रेला,[1]
तुझ्याजवळ परि जीव गुंतला,
सुचे न कांहीं तेथें मजला,
यात्रा कसली ॥ भावशून्य कर्में केलीं !॥ १ ॥
तुझ्या विषयिंच्या येति कल्पना,
मानस साहीं किती यातना,
स्वप्नीं तूं नित दिससी नयना,
धर्म-कवाईत ॥ टाकितें काय पदरांत ?॥ २ ॥
कसे बसे ते विधी उरकिले,
पितर जणों ते स्वर्गी धाले,
तारेंतुन मज वृत्तहि कळलें—

---

१ माझे वडील या सुमाराला ( मार्च १९१४ ) वारल्यामुळें मला काशी-यात्रेस जावें लागलें. माझा जरी यात्रर मुळींच विश्वास नाहीं, तरी ती० मातोश्रीच्या समाधानार्थ जाणें भाग पडलें. सोनी थोडीबहुत घरीं आजारीच होती. दहाच दिवस—पण तीं युगें झालीं. या दहा दिवसांत सोनीचें दुखणें वाढून पुढें ती बरी झाली नाहीं.

'याच धावून ॥ काळजी लव न मानून' ॥ ३ ॥
चरका हृदयीं कैसा बसला,
पीळ अंतरीं कैसा पडला,
जीव कसाही मग तळमळला!
आजारी तूं ॥ ठावें मज, नुरला किंतू! ॥ ४ ॥
चोविस घंटे कसे कंठिले-
विचार करितां थकाल सगळे!
जीवाचेंही मंगल गेलें,
भेसुर तर्क ॥ चिंतानें मन झालें गर्क! ॥ ५ ॥
पक्ष्यांचा मज हेवा वाटे,
पंखांची मनिं इच्छा दाटे,
दुःखानें मम हृदयहि फाटे,
मानस उडलें ॥ गाडी परि हळुहळु चाले! ॥ ६ ॥
येतां वसलों तुझ्या उशाशीं,
अश्रू आले किति नयनासीं,
हृद्गत कळलें प्रत्येकाशीं,
कळलें सार ॥ प्रेम हें जीवनाधार! ॥ ७ ॥
अश्रू पडले मम तव गालीं,
फिकट कपोला लाली आली,
कळी उमलली तव त्या वेळीं!
दंवबिंदूंनीं ॥ फुलति कळ्या जगदुद्यानीं! ॥ ८ ॥
फूल उमललें, बिंदु सांचले,
गालावरुनी वाहुं लागले,
सौगंधानें मन मोहियलें,

१ अशी जरी तार आली, तरी सोनीचा आजार वाढला असेल, हें स्पष्ट कळत असल्यामुळें मनाला चरका बसणें स्वाभाविक होतें.

मधु चुंबून ॥ फुलविलें अधिक तें सुमन ! ॥ ९ ॥
वदलों तेव्हां तुजला, " बाळे—
तुला पाहुनी मानस धालें !
हृदयावरचें ओझें गेलें,
मीलन झालें ॥ देवें हे क्षण दाखविले " ॥ १० ॥
स्त्रीहृदय परी पूर्ण प्रीतिनें,
त्याची मनुजा सर नच येणें,
स्वर्ग जाहली भू ही तेणें,
सत्यता कळली ॥ सोनी मज जेव्हां वदली—॥ ११ ॥
"[1]ब्रह्मांडें जरि मध्यें असलीं,
शून्यच झणिं तीं होतिल सगळीं,
दिसेल मूर्ती अंतीं अपुली,
भरंवसा धरून ॥ कंठिले दिवस मोजून ! " ॥ १२ ॥
ओष्ठांचें मग मीलन झालें,
ब्रह्मांडाचें अंतर विरलें !
सत्य मनाला तेव्हां कळलें—
प्रेमापुढतीं ॥ काळाची नाहीं शक्ती ! ॥ १३ ॥
त्या दिवसाचा ॥ ओढितों मणी स्मरणीचा ॥ धृ० ॥

* * *

### मेरुमणी.

काळाची परि साउली तुजवरी लागे पडाया त्वरें,
यत्नांची मम जाहली परिमिती, आशा न कांहीं उरे !

---

१ या चार ओळी राधागीतांतल्या आहेत. राधागीत सोनीला बहुतेक पाठ झालें होतें व त्यांच्यांतल्या बऱ्याच ओळी ती आपल्या दुखण्यांत वारंवार म्हणत असे.

वेडा मी गवतास हातिं धरुनी दैवासवें झुंजलों,
रक्षाया तुजला अहर्निशि सखे! पाशीं तुझ्या बैसलों ॥१॥
बाहूंचा तट मी सभोंवतिं सखे! बांधीं तुझ्या रक्षणा,
हांकाया यमदूत ते प्रभुवरा केल्या किती प्रार्थना!
अश्रूंचा नयनांतुनी तव पदीं वर्षाव केला किती,
काळाचा परि रोग-दूत न ढळे; मृत्यू तया सारथी! ॥ २ ॥
प्रेमें तूं बघतां सखे मजकडे हांसें बळें आणिलें,
दुःखाश्रू मम चुंबनीं लपविले! तूतें कळूं ना दिलें,
जेव्हां तूं पुसलें मला प्रियतमे! होईन कां हो बरी?
चित्तीं दुःख जरी, वदें हसुनिया 'वेडी पहा ही खरी!' ॥३
माझा एकुलताच बंधु त्यजुनी स्वर्गास गेला जरी,
नाहीं दुःखच दाविलेंहि कवणा, अश्रू गिळीं अंतरीं!
'भावोजी मज भेटण्यास अजुनी आले न कां हो मुळीं?'
ऐसें तूं पुसतां मदीय हृदयीं होळी कशी पेटली! ॥ ४ ॥
हांसोनी वदलों—" पहा निजुनिया पंचायती ही करीं
हलीं ते नच येथ, बोलवुं तयां होशील जेव्हां बरी!
व्हावें सौख्य तुला म्हणोनि झटलों सारेंच रात्रंदिन,
होते फोलच ते जरी श्रम, तुझे गेले सुखानें दिन! ॥ ५ ॥
झाले डॉक्टर, वैद्य; सर्व असती काळापुढें दुर्बल
जाणें हें ठरलें जगांतुनि तुझी मूर्ती सखे प्रेमळ!
नाहीं होउं दिलीच जाणिव तुला प्रेमामुळें मीं सखे!
राही चित्त तुझें प्रसन्न म्हणुनी तंद्रींत त्या सारखें! ॥ ६ ॥

---

१ या वर्षी ( ८ जून १९१४ ) माझ्या पाठचा भाऊ एकाएकीं आठ दिवस ताप येऊन स्वर्गलोकीं चालता झाला. सोनीच्या मनाला धक्का बसेल या भीतीनें आम्हीं तिला हें वर्तमान अखेरपर्यंत मुळींच कळूं दिलें नाहीं.

दोन्ही मास असे उशागतिं तुझ्या, झाले मला ते क्षण,
याचें कारण एक—नित्य मजला होई तुझें दर्शन !
आशातंतु न भंगला मम कधीं, सारें जरी स्पष्ट तें,
' कांहीं होय अशक्य शक्य ' असली मात्रा मना लाभते ! ७
लागे झोंप तुला, निवांत बसुनी ढाळीं किती आसवें,
राही जें हृदिं दुःख गुप्त दिवसा, मातें न तें साहवे !
येतां हाक तुझी, तयास पुरुनी देई समाधी मनीं,
हास्या पांघरुनी तुझ्याजवळ मी बैसें पुन्हा येउनी !॥ ८ ॥
आला हा ! परि घातवार[1] निकटीं सांगूं कुणा काय ही,
सारी सुंदरता उजाड दिसली, खायास धावे मही !
नाहीं हा ! बल, दुःखमेरु पुढला जाण्यास उल्लंघुनी,
जावें[2] मागुति मेरुपासुन पुन्हा, ऐशी रुढी या जनीं !॥ ९ ॥
मेरूपासुनि जाउनी मुळपदीं, येईन मेरूकडे,
ऐशी ही स्मरणी मनीं फिरवितां आनंद चित्ता जडे !
मर्यादा जर लंघिली चुकुनिया पेटेल होळी हृदीं,
आणूं कोठुनि आग ती विझविण्या प्रीतीजलाची नदी? १०
माझी ही स्मरणी कशी फिरतसे चित्तीं सदासर्वदा,
कांहींही करतां तुझें स्मरण दे, झाली किती सौख्यदा !
माळा ओढिति लोक, ईशचरणीं तल्लीन होण्यास्तव,
मातें भेट घडो तुझी पर जगीं, देवा करीं हा स्तव ! ॥११॥

---

१. २८ मे, १९१४. २. माळ फिरवितांना मेरुमणी कधींही ओलांडीत नाहींत, हें सर्वांना ठाऊक असलेच.

# समाजशास्त्रावरील व्याख्यानें.

## परीक्षण.

१

फर्ग्युसन कॉलेजांतील प्रोफेसर रा. रा. गो. चिं. भाटे यांनीं, आपण मुंबईस सोशल सर्व्हिस लीगच्या तर्फे दिलेलीं समाजशास्त्रावरील इंग्रजी व्याख्यानें मराठींत छापून काढिलीं आहेत. प्रो० भाटे यांचीं कॉलेजांत नेहमीं होणारीं अथवा वसंतव्याख्यानमालेंत क्वचित् होणारीं व्याख्यानें ज्यांनीं ऐकलीं असतील, किंवा मराठी मासिकांतून येणारे त्यांचे लेख ज्यांनीं वाचले असतील, त्यांना त्यांची प्रतिपादनाची शैली फार थोर दर्जाची असते, ही गोष्ट पटल्याशिवाय राहिली नसेल. प्रस्तुत पुस्तकावरूनसुद्धां तीच गोष्ट चांगली निदर्शनास येते. ते आपला विषय पद्धतशीर रीतीनें मांडतात; इतकेंच नव्हे, तर मजकुराचा पाल्हाळ ते क्वचितसुद्धां दिसूं देत नाहींत. प्रस्तुत विषय आपल्याला नवीनच असल्यामुळें कल्पनाव्यक्तीसाठीं बरेच स्वतंत्र शब्द त्यांना बनवावे लागले आहेत. त्यांतील बहुतेक सगळे मूळ इंग्रजी शब्दांकडे न पहातांही सहज उमगतात. प्रस्तावनेवरून पहातां पुस्तक फार घाईनें व अडचणीनें प्रसिद्ध झालें आहेसें दिसतें. कांहीं व्याख्यानें मराठींत आणलेलीं व कांहीं मराठींत एकदमच भराभरा लिहून काढलेलीं अशीं असूनसुद्धां आपल्या सुबोधपणानें भराभर ध्यानांत भरतात, शास्त्रीय म्हणून अवघड वाटत नाहींत. भाषेंत कसलाच अलंकार नाहीं, पण विषय शास्त्रीय पडल्यामुळें अलंकाराची उणीव भासमान होत नाहीं. पहिलीं तीन व्याख्यानें व दुसरीं तीन व्याख्यानें, असे या पुस्तकाचे दोन ठळक भाग पडतात. पहिल्या भागांत यूरोपामध्यें समाजशास्त्राच्या झालेल्या वाढीचा व त्यांतील मुख्य मुख्य प्रमेयांचा वृत्तान्त दिला आहे; व दुसऱ्यांत आपल्या

चालीरीतींचा या शास्त्राच्या दृष्टीनें विचार केला आहे. पहिला भाग मनो-रंजक आहे व दुसरा उपयुक्त आहे. पहिला माहिती करून देतो, व दुसरा विचार करावयास भाग पाडतो. पहिला वाचतांना वाचक लेखकाचे आभार मानतो, व दुसरा वाचतांना वादाला प्रवृत्त होतो. पहिला भाग लेखकाचें विस्तृत वाचन दर्शवितो; व दुसरा, बाबा पदमनजी, जोतीबा फुले, इत्यादींपासून तों कै. आगरकरांपर्यंतच्या सुधारकांनीं केलेल्या टीकेहून व दोषदर्शनाहून नवीन कांहीं सांगत नसल्यामुळें, उगाच कंटाळवाणा वाटतो. पण इतकें खरें आहे कीं, या दुसऱ्या भागांत फुल्याबिल्यांच्या द्वेषाचा व टवाळीचा आणि आगरकरांच्या कठोर तिरस्काराचा मागमूससुद्धां नाहीं. उलट पहिला भाग केवळ शास्त्रीय असल्यामुळें व त्यांतील विचारांच्या साह्यानें दुसऱ्यांतील मुद्दे वाचावयाचे असल्यामुळें दुसऱ्या भागाला सुधार-की विचारांचा नेहमींचा ग्राम्य रंग न रहातां एक तऱ्हेचा शास्त्रीय उदात्त-पणा प्राप्त झाला आहे. हा या पुस्तकाचा विशेष आहे. पहिल्या भागांतील शास्त्रीय विचार म्हणजे आहे तरी काय, हें वाचकांस कळावें म्हणून त्यांतील मुद्दे खालीं दिले आहेत.

प्लेटोच्या रेपब्लिक या ग्रंथांत समाजशास्त्रासंबंधीं कांहीं विचार आले आहेत. परंतु हें शास्त्र राजनीतिशास्त्र व नीतिशास्त्र यांहून भिन्न असें त्यानें केलेलें नाहीं. आरिस्टॉटलनेंही आपल्या नीतिशास्त्रावरील व राजनीति-शास्त्रावरील विचारांत या शास्त्रासंबंधीं कांहीं विचार ग्रथित केले आहेत. परंतु त्यानेंही या शास्त्राला स्वतंत्र स्थान दिलेलें नाहीं. रोमन लोकांनीं या बाबतींत फार थोडा विचार केलेला आढळतो. समाजशास्त्रांत अंतर्भूत होणारें जें कायदेशास्त्र त्याची बरीच वाढ यांनीं केली, इतकेंच. पुढें ख्रिस्ती-धर्म सुरू होऊन धर्मोपदेशाच्या विरुद्ध येणाऱ्या कोणत्याही मताचा बीमोड होऊं लागल्यामुळें सर्व मानसिक व नैतिकशास्त्रांची वाढ खुंटली. परंतु हें

१७ कृपया पुस्तक जपून वापरावें

' तमोयुग ' फार दिवस टिकलें नाहीं. यूरोपचें पुनरुज्जीवन सुरू झालें. लोक स्वतंत्र विचार करूं लागले; शिक्षांनासुद्धां कोणी जुमानीना. पदार्थविज्ञान, गणित या शास्त्रांची व त्यांबरोबरच नीतिशास्त्र व समाजशास्त्र यांचीही वाढ झपाट्यानें होऊं लागली. नीतिशास्त्र धर्मशास्त्रापासून अलग झालें. आणि कॉम्ट या तत्त्ववेत्त्यानें, " समाजाची उत्पत्ति व त्याची वाढ ज्या नियमांना व सिद्धान्तांना अनुसरून होते, त्यांचा शोध लावणें अवश्य आहे; व सामाजिक संस्था, चालीरीती, नीतिकल्पना यांचें ज्ञान व्हावयास समाजाचें व सामाजिक कारणपरंपरेचें शास्त्रीय ज्ञान मिळविलें पाहिजे. " असें प्रतिपादन सुरू केलें. हाच समाजशास्त्राचा पाया होय, व हीच समाजशास्त्राची पूर्वपीठिका होय.

निरनिराळे लोक एक कसे झाले, एकच धर्मकल्पना, एकच चालीरीती, एकच भाषा त्यांच्यांत कशा रूढ झाल्या, इत्यादि गोष्टींचें यथातथ्य ज्ञान देऊन, समाजाचीं अंतिम ध्येयें काय असावीं, व तत्प्राप्त्यर्थ समाजाचा विकास कसा व्हावा, हें ठरविणें या शास्त्राचें काम आहे, असें ठोकळ मानानें म्हणतां येईल. कांहीं शास्त्रवेत्ते, यांत अजून कित्येक गोष्टींची भर घातली पाहिजे म्हणतात; व कांहीं असें प्रतिपादतात कीं, ज्या अर्थी राजनीतिशास्त्र, नीतिशास्त्र, कायदेशास्त्र, अर्थशास्त्र, सुप्रजानिर्माणशास्त्र इत्यादि शास्त्रें समाजाच्या निरनिराळ्या अंगांचा स्वतंत्र विचार करीत आहेत, त्या अर्थीं समाजशास्त्राला करावयाचें असें कांहींच उरत नाहीं व म्हणून त्या नांवाचें एक स्वतंत्र शास्त्र नकोच. जे कोणी ' भर घालावी ' म्हणतात, ते मानवशास्त्राचा अंतर्भाव या शास्त्रांत करितात. आतां ही बेरीजवजाबाकी युक्तीला जुळत नाहीं. मनुष्यप्राणी कसा उत्पन्न झाला आणि ऐतिहासिक कालापर्यंत त्याला कोणकोणच्या अवस्थांतून जावें लागलें, याच गोष्टींचा विचार मानवशास्त्रांत होत असल्यामुळें,

जें जें कांहीं समाजविषयक--मनुष्यप्राणिविषयक नव्हे--त्याचा विचार करणाऱ्या समाजशास्त्रांत जें केवळ मनुष्यप्राणिविषयक त्याचा अन्तर्भाव करणें इष्ट नाहीं. पुन्हा, भिन्न भिन्न शास्त्रें निर्माण झालीं म्हणून समाजशास्त्राला कामच उरत नाहीं, हेंही म्हणणें सयुक्तिक नाहीं. या शास्त्रांची प्रगति होत आहे व तीं समाजाच्या हिताला जरूर आहेत, हें खरें आहे; परंतु पुष्कळ वेळा असें दिसून येतें कीं, त्या शास्त्रांचे विचार केवळ एकांगी राहतात, व समाजविषयक प्रत्येक गूढाचा उलगडा आपल्याच विचारादिशेनें होतो, असा आग्रह तीं धरतात. त्या त्या गोष्टीच्या घटनेला कांहीं अन्य कारणें असू शकतील या गोष्टीची जाणीव त्यांस रहात नाहीं. म्हणून या निरनिराळ्या शास्त्रांचे सिद्धान्त एकत्र करून विवाद्य गूढ त्यांतील कोणत्या सिद्धान्तानें उकलतां येण्यासारखें आहे, हें साकल्यानें विचार करून ठरविण्याचें काम समाजशास्त्रालाच करावें लागतें. याप्रमाणें समाजशास्त्राची आवश्यकता काय आहे, हें सांगून वक्ते त्या शास्त्रांतील कांहीं प्रमेयांकडे वळले आहेत.

'समाज कसा अस्तित्वांत आला?' या प्रश्नाचें उत्तर ग्रीक तत्त्ववेत्ता प्लेटो यानें 'श्रमविभागानें.' असें दिलें आहे. माणसाच्या सर्व वासना व गरजा त्याला स्वतांच्या श्रमानेंच भागवितां येणें शक्य नसतें. म्हणून भिन्न भिन्न व्यवसाय करणारीं माणसें एकमेकांच्या सोयीसाठीं एकत्र रहातात व अशा रीतीनें समाज घडत जातो. म्हणजे विशिष्ट व्यवसाय करणारी व्यक्ति ही समाजाची घटक आहे, असा प्लेटोचा सिद्धान्त ठरला. यावर ॲरिस्टॉटलनें प्रतिपादलें कीं, एक व्यक्ति ही समाजघटक नसून एक कुटुंब हें समाजघटक आहे. परस्परांच्या सोयीसाठीं एकत्र राहिलें पाहिजे, ही भावना त्याच्या ठिकाणीं उदित व्हावयाच्या आधीं कौटुंबिक सुखाची व समाधानाची लालसा त्याच्या ठिकाणीं उत्पन्न होते. व तो कुटुंब म्हणजे घर करतो; म्हणून ॲरिस्टॉटलच्या मतें कुटुंब हेंच

समाजघटक आहे, केवळ गरजू व्यक्ति नव्हे. यानंतर समाजवृद्धीची दुसरी पायरी—या तत्त्ववेत्त्याच्या मतें—खेडें ही होय. व तिसरी म्हणजे शेवटची पायरी नगर ही होय. नगराहून पुढें म्हणजे सर्व देशाकडे त्याची मजल पोंचली नाहीं. कारण ग्रीक लोकांत एक एक नगर म्हणजेच एक स्वतंत्र राज्य असे. ग्रीकांच्या मागून आलेल्या रोमन लोकांनीं समाजशास्त्रांत कांहीं नवीन प्रमेयें काढलीं नाहींत. यानंतर समाजाच्या स्थित्यन्तरासंबंधानें एक नवें प्रमेय आडामस्मिथच्या ग्रंथांत आढळून येतें. समाज प्रथमतः मृगयावृत्ति म्हणजे शिकारीवर पोट भरणारा असतो. मागून तो गोपालवृत्ति म्हणजे जनावरें बाळगून उपजीविका करणारा बनतो. तदनंतर तो कृषिवृत्ति म्हणजे शेतकीवर चरितार्थ चालविणारा होतो. पुढें तो उद्यमवृत्ति म्हणजे व्यापार व इतर निरनिराळे उद्योग करून योगक्षेम वहाणारा होतो. समाजस्थित्यन्तरांची ही परंपरा आडामस्मिथनें केवळ सामान्य म्हणून ठरविलेली आहे. प्रत्येक समाज या सर्व स्थितींतूनच वर गेला आहे, असा कांहीं त्याचा ठाम सिद्धान्त नाहीं. वरील प्रमेयांवरून समाजस्थित्यन्तरांस बाह्य उपाधिच बहुंशीं कारण होतात, असें आडामस्मिथचें मत होतें, असें स्थूलमानानें म्हणण्यास हरकत नाहीं. यानंतर कॉम्टचें मत लक्षांत घ्यावयाचें. तो म्हणतो, समाजप्रगतीचें कारण समाजांतील व्यक्तींची बुद्धि व समाजाचें मन यांची उन्नत अवस्था हें होय. समाजांत प्रथमतः गणिताच्या कल्पना उत्पन्न होतात. नंतर ज्योतिषाच्या, नंतर पदार्थविज्ञानाच्या, नंतर रसायनाच्या, नंतर जीवनशास्त्राच्या, पुढें समाजशास्त्राच्या व शेवटीं नीतिशास्त्राच्या. समाजाच्या प्रगतींत ही परंपरा दिसून येते, यांपैकीं ज्या अवस्थेत एकादा समाज असेल, त्या अवस्थेवरून त्याच्या परिणतीचें अनुमान बांधावें. ही बुद्धीची कसोटी झाली. आतां मनाच्या निरनिराळ्या अवस्थांवरूनसुद्धां समाजाच्या परिणतीची कल्पना बांधतां येते.

असें त्याचें मत आहे. अगदीं प्रथम, 'अवघें वस्तुजात देवानें केलें आहे' असा मोघम निकाल देऊन मनुष्य मोकळा होतो. या अवस्थेला कॉम्टनें 'दैवी' अवस्था हें नांव दिलें आहे. याच अवस्थेंत वस्तुपूजा, अनेकेश्वरपूजा, एकेश्वरपूजा या तीन मानसिक उन्नतींचा अंतर्भाव त्यानें केला आहे. कारण 'परमेश्वराचेंच हें सर्व कर्तृत्व आहे' ही कल्पना या सर्व उन्नतीस सामान्य आहे. 'दैवी' अवस्थेनंतर 'तात्त्विक' अवस्था येते. या मनःस्थितींत प्रत्येक वस्तूचें कारण म्हणजे एक अमूर्त तत्त्व आहे, अशी मनुष्य आपल्या मनाची समजूत करून घेतो व त्यानें त्याचें समाधान होतें. प्रत्येक गोष्ट एकदम थेट देवाशींच नेऊन भिडविण्याऐवजीं तिच्यालगत मागें एखादें अमूर्त कारण आहेसें तो मानतो. यापुढची अवस्था म्हणजे 'चक्षुर्वै सत्यं' ही होय. या तीनही अवस्थांच्या समजुतीसाठीं 'जातिभेद कसा झाला' हा प्रश्न घेऊन पाहिला, तर दैवी अवस्थेंतील मनुष्य म्हणेल, 'देवानेंच केला': तात्त्विक अवस्थेंतील मनुष्य म्हणेल 'सत्त्व, रज, तम या त्रैगुण्यानें झाला': व 'चक्षुर्वै सत्यं'–वाला अथवा शास्त्रीय अवस्थेंतील मनुष्य म्हणेल, 'वाङ्मयांतील दाखल्यांवरून व उल्लेखांवरून हा भेद स्वाभाविक सामाजिक परिस्थितिमुळें उद्भवला असें मी म्हणेन.' कॉम्टच्या या तत्त्वानंतर स्पेन्सरनें आपलें तत्त्व प्रतिपादिलें. प्राण्यांच्या उत्पत्तीची मीमांसा करण्याच्या कामीं जें 'उत्क्रांतितत्त्व' डार्विननें उपयोजिलें तेंच समाजप्रगतीच्या चिकित्सेंत स्पेन्सरनें सरसकट लावून टाकलें. त्याच्या उत्क्रांतीचा अर्थ हा कीं, कोणतीही वस्तु प्रथमतः एकसारखी, एकस्वरूप असते, पण कालांतरानें ती भिन्नरूप, बहुविध बनत जाते. रानटी स्थितींतील समाज हा एकरूप असतो. त्यांतील प्रत्येक व्यक्तीचा व्यवसाय सारखाच असतो. तो जसजसा सुधारत जातो तसतशी त्याला विविधता येते: म्हणजे त्यांतील व्यक्ति भिन्न भिन्न व्यवसायांचा अंगीकार करतात. स्पेन्सरचें दुसरें प्रमेय

म्हणजे समाज हा निर्जीव परमाणुसमुदायासारखा नाहीं, तर सेन्द्रिय प्राण्या-प्रमाणें आहे; व सेन्द्रिय प्राण्यांत जशीं निरनिराळीं इंद्रियें कामें करतात, त्याप्रमाणें समाजांत निरनिराळीं कामें करणारे समाजाचे वर्ग असतात. सेन्द्रिय प्राण्याला जितकीं म्हणून इंद्रियें, तितके वर्ग समाजाला असलेच पाहिजेत, असें त्याचें आग्रहाचें प्रतिपादन आहे. स्पेन्सरच्या या दोनही कल्पना मनाला पटत नाहींत. त्याच्या काळीं 'उत्क्रांतितत्त्व' फार जोरांत असल्यामुळें त्यानें तेंच जिकडे तिकडे लावून दिलें आहे. उत्क्रांतीनें विजातीयता उत्पन्न होते हें म्हणणें उगाच आहे. श्रमविभागांत विजातीयता येते हें खरें असेल, पण समाज जसजसा सुधारत जातो, तसतसा विजातीयपणापेक्षां त्यांत सारखेपणाच ज्यास्त भासत जातो. पुन्हा, समाजाची सेन्द्रिय प्राण्याशीं तुलनासुद्धां भ्रामकच आहे. दोन गोष्टींत कांहीं सादृश्य पाहिलें कीं, त्यांच्या अंशाअंशांतसुद्धां तें आहे असें ठरविण्याचा इरादा केल्यासारखा त्यांत दिसतो. शिवाय स्पेन्सरच्या काळची अशीही एक कल्पना होती कीं, समाजाची प्रगति त्याच्या परिस्थितीवर अवलंबून आहे. समुद्रकांठचे लोक धाडसी, सुपीक प्रदेशांतील लोक आळशी, थंडांतले उद्योगी असतात, हीं या कल्पनेचीं उदाहरणें होत. परंतु प्रत्यक्ष पारखून पाहिलें, तर ही कल्पना फोलच ठरते. ती ती परिस्थिति तो तो परिणाम अंशत: घडवून आणीत असेल, पण तो तो परिणाम इतर कारणांनीं बळकट होत असेल किंवा अजीबात धुऊनही जात असेल. अर्थात् या कल्पनेंत एकतर्फीपणाचा दोष आहे. येथपर्यंत ज्यांना अर्वाचीन समाजशास्त्रज्ञ म्हणतां येत नाहीं, अशांचीं प्रमेयें व सिद्धान्त दाखल केले: आतां अर्वाचीनांचीं मतें पाहूं.

अर्वाचीनांनीं समाजशास्त्राचे स्थित्यात्मक व गत्यात्मक असे दोन भाग केले आहेत. पहिल्यांत समाज कसा उद्भवतो व कसा चालू राहतो,

याचा विचार केलेला असतो व दुसऱ्यांत समाजांत फेरबदल कसे होतात याची मीमांसा असते. माणसें एकत्र कां येतात ? तर त्यांच्यांत सहानुभूति आहे म्हणून, म्हणजे सहजाकर्षकता आहे म्हणून; दुसरें, त्यांना एकटें रहाणें आवडत नाहीं म्हणून; तिसरें, त्यांच्या ठिकाणीं न्यायप्रियता आहे म्हणून, म्हणजे न्याय्य तेंच घडून यावें अशी सहजेच्छा असते म्हणून. या कारणांचें कार्य कसें कसें घडून येतें, हें दाखविणें स्थित्यात्मक समाजशास्त्राचें काम आहे. गत्यात्मक समाजशास्त्रानें समाजांतील फरकाचीं कारणें एकंदर सात दिलीं आहेत. १ लें, लोकसंख्येची वाढ; २ रें, संपत्तीची वाढ; ३ रें, परिस्थित्यन्तर म्हणजे एक परिस्थिति—देश वगैरे—सोडून दुसऱ्या परिस्थितींत जाणें; ४ थें, समाजांतील थोर विभूतिः कारण थोर विभूति स्वयंप्रेरणेनें व स्वसामर्थ्यानें आपल्या मनोदयाला अनुकूल असें रूप समाजाला देतात; ५ वें, भिन्न संस्कृतींचा संयोग; ६ वें, भिन्न समाजांचें संगटन; व ७ वें, दोन समाजांचें संमिश्रण. गत्यात्मक समाजशास्त्राचें म्हणणें असें कीं, समाजांत जे फरक होतात, ते यांपैकीं एका किंवा अनेक कारणांनीं होतात. तें कारण किंवा तीं कारणें इतिहासांत शोधून पहावीं. येथपर्यंत समाजशास्त्रांतील सर्व प्रमेयें नमूद करून आतां ‘समाजाचा व्यक्तीवर दाब किती असावा’ या प्रश्नाचा विचार करण्यास व्याख्यात्यांनीं सुरवात केली आहे.

समाजवादी म्हणतात, व्यक्तीनें समाजाप्रमाणें चाललेंच पाहिजे. समाजाच्या इच्छेपुढें स्वतःची इच्छा दूर सारली पाहिजे. व्यक्तिवादी म्हणतात, स्वतःच्या मनाला जें पवित्र वाटेल तें करण्यास प्रत्येक मुखत्यार आहे. समाजानें उगाच मध्यें तोंड घालूं नये. अर्वाचीन शास्त्रज्ञ म्हणतात, सामाजिक निर्बंधांचा हेतु समाजकल्याण हा आहे, व हें कल्याण साधण्यास पोषक असे जे निर्बंध असतील, ते समाजानें बेलाशक घालावे; पण त्या निर्बंधांनीं मनुष्य आपल्या वैयक्तिक कारभारांतसुद्धां जो जखडला जातो

तो जाऊं नये; म्हणून समाजशास्त्रज्ञांनीं सामाजिक निर्बंधांना पुढील मर्यादा घालून दिल्या आहेत. १. निर्बंधानें होणाऱ्या सोयी व गैरसोयी यांची वजाबाकी करतां सोयी जर शिल्लक उरत असतील, २. स्वातंत्र्यभावना दुखविली गेल्यामुळें प्रतिकारबुद्धि जर जागृत होत नसेल, ३. न्याय, दया, इत्यादींना जर धक्का बसत नसेल, ४. अनीतिकारक गोष्टी आपोआप नाहींतशा होत असतां त्यांस अडथळा जर होत नसेल, व ५. जीवनार्थ झगडत असलेल्या व्यक्तीच्या प्रयत्नांच्या आड जर येत नसेल, तर तो निर्बंध समाजानें व्यक्तीला घालावा; एरव्हीं एकाद्याचे हातपाय उगाच बांधूं नयेत.

प्रो. भाटे यांनीं दिलेल्या सहांतून पहिल्या तीन व्याख्यानांचा गोषवारा वर दिला आहे. समाजशास्त्र समाजशास्त्र, हें प्रकरण तरी काय आहे, अशी जिज्ञासा कोणालाही होणारच. ती सहज शमावी म्हणून व बाकीच्या तीन व्याख्यानांसंबंधानें प्रस्तुत मासिकाच्या पुढील अंकांत येणारे विचार सहज समजावे म्हणून हा गोषवारा दिला आहे. यांत एकही मुद्याचा विचार सोडलेला नाहीं. पुष्कळ ठिकाणीं पुस्तककारांचेच शब्द सोयीचे म्हणून घेतले आहेत. प्रत्येक ठिकाणीं अवतरण चिन्हांचा खटाटोप करीत बसलों नाहीं. असो. बाकीच्या तीन व्याख्यानांत आपल्या विवाहपद्धति, आपला जातिभेद, आपलें सोंवळें इत्यादि अनेक प्रश्नांची चर्चा प्रो. भाटे यांनीं केली आहे. त्यांपैकीं कांहीं महत्त्वाचे प्रश्न उचलून त्यांसंबंधानें आम्ही आपले विचार पुढील खेपेस लिहूं व आमच्या शंका प्रोफेसर साहेबांपुढें विचारासाठीं मांडूं.

---

# जवानसिंगाची चिनाब.

लेखक:—नारायण सिताराम फडके.

महायुद्ध सुरू झाल्यास पांचसहा दिवस झाले होते. वर्तमानपत्रांचे रकाने युद्धाच्या बातम्यांनीं भरून निघत होते. रस्त्यांत, दुकानांत, घरांत, सारांश जेथें जेथें म्हणून चारपांच माणसें एके ठिकाणीं जमण्याचा संभव, तेथें तेथें युद्धाशिवाय दुसरी गोष्टच कोणी बोलत नव्हतें. गटारबातम्यांना तर नुसता ऊत आला होता. वाटेल त्यानें वाटेल तशी बातमी उठवावी; आणि प्रश्न केला असतां 'असें म्हणतात बुवा!' म्हणून बातमीच्या खरेपणाविषयींची आपल्या अंगावरील जबाबदारी उडवून लावावी. युद्धाची अशा प्रकारची धांदल जिकडे तिकडे चालू असतांना, जमादार जवानसिंगाच्या लहानाशा घरांतमात्र पूर्ण शांतता होती. परंतु ती शांतता इतकी अखंड होती कीं, ती शांतता दुःखमय असलीच पाहिजे असें वाटत होतें. आणि तेंही खरेंच. जवानसिंगाची एकुलती एक मुलगी आजारी होती. तिची आई पंधरा दिवसांपूर्वींच वारल्यामुळें तीच जवानसिंगाचें सर्वस्व होती. बायको वारल्यापासूनच जवानसिंग अगदीं खचून गेला होता. त्या पंधरा दिवसांत तो किती वेळा रडला असेल त्याची गणतीच नाहीं. त्याची आई त्याचें समाधान करण्याचा प्रयत्न करी; परंतु अशा वेळचे प्रयत्न कोठले सफळ व्हायला? त्या दुःखांतच मुलीच्या आजाराची भर पडली. जवानसिंगाची चिनाब अत्यंत लाडकी होती. ती जें म्हणेल तें करायला तो तयार असे; आणि चिनाब पोरसुद्धां मोठी गोड होती. तिचें बोलणें, खेळणें, हंसणें, सर्वच कांहीं कौतुकास्पद होतें. जवानसिंग आपल्या आईला 'अशा मुलीची कां ग आई मरावी?' असा प्रश्न करी, आणि रडूं लागे. परवां संध्याकाळपर्यंत चिनाब चांगली खेळत होती. परंतु काल सकाळपासून ती

जी अंथरुणाला खिळून राहिली ती राहिलीच. काय होतें आहे म्हणून विचारलें कीं, ती म्हणे, बोलायला किंवा चालायला लागलें कीं, माझ्या छातींत भयंकर कळ येते. आज दोन दिवसांत तिनें एकसुद्धां शब्द तोंडाबाहेर काढला नव्हता. या सगळ्या प्रकारानें जवानसिंग अगदीं घाबरून गेला होता. आपली लाडकी चिनाब आतां आपल्याला अंतरणार, असें त्याच्या मनानें घेतलें. पंधरा दिवसांपूर्वी आपण किती सुखी होतों, आणि आज आपल्यावर कोण हा गहजब ! आणि शिवाय युद्ध सुरू झालेलें. आपल्याला लढाईवर जाण्याचा हुकूम केव्हां येईल, त्याचा कांहीं नियम नाहीं. या क्षणीं जरी हुकूम आला तरी गेलें पाहिजे. चिनाब अशा स्थितींत असतांना तिला सोडून जावें लागणार. आपण गेल्यावर आपल्यामागें तिचें कांहीं बरेंवाईट झाल्यास मग ?— या सार्‍या विचारांनीं जवानसिंग अगदीं वेडा होऊन गेला. ' छे छे ! देवा ! देवा ! असें करूं नकोस. माझ्यावर इतकी अवकृपा कां करतोस ? ' असें जवानसिंग पुटपुटला.

इतक्यांत, ' जवान, तुझे डाक्तर आले बाळ. ऊठ.' असें म्हणून आईनें त्याला उठविलें. डॉक्टर सैन्यांतलेच होते. त्यांना घेऊन जवानसिंग खोलींत गेला. डॉक्टरनीं बराच वेळ चिनाबची प्रकृति तपासून पाहिली. जवानसिंग सारखा त्यांच्या तोंडाकडे पहात होता. बर्‍याच वेळानें डॉक्टर म्हणाले, ' जवानसिंग, घाबरूं नका. अजून धीर सोडण्यासारखें कांहीं झालेलें नाहीं. ' डॉक्टर असें जरी म्हणाले, तरी खरी स्थिति फार निराळी असून, चिनाब फार तर आठदहा दिवसांची सोबती आहे, असें जवानसिंगानें ताडलें. तो डॉक्टरांस म्हणाला, ' डॉक्टरसाहेब, माझ्या मुलीला काय रोग झाला आहे ? काय असेल तें मला स्पष्ट सांगा. ' डॉक्टरनीं उत्तर टाळण्याचाच प्रयत्न करून पाहिला, परंतु जवानसिंग ऐकेनाच. तेव्हां डॉक्टर म्हणाले, ' तुम्हांला सोप्या भाषेत सांगायचें म्हणजे तिच्या

छातींत काळजाभोंवतीं एका विशिष्ट प्रकारच्या पदार्थाचा थर बसलेला आहे. तो मी कापून काढणार होतों. परंतु तसें करण्यांत फार धोका आहे. अगदीं कांहीं दिव्यच झालें तर तो थर फुटून जाईल. नाहीं तर फार तर एक महिनाभर ही पोर जगेल.'

डॉक्टर गेल्यावर जवानसिंग बराच वेळ स्वस्थ बसला होता. त्याची आई चिनाबच्या पायांवरून हात फिरवीत होती.

शेवटीं जवानसिंग म्हणाला, 'हे डाक्तर अगदीं गाढव असतात, नाहीं का ग आई?'

म्हातारी कांहींच बोलली नाहीं.

'आई, मला लढाईवर जावें लागलें तर ग?' पुन्हा जवानसिंग म्हणाला.

'गेलें पाहिजे बाबा. आपल्या कामाला आपण जागलेंच पाहिजे.'

'छे! छे! मीं नाहीं जायचा.' असें म्हणून त्यानें चिनाबला आपल्या पोटाशीं घट्ट धरलें. 'माझ्या लाडकीला अशी सोडून मीं कधीं जायचा नाहीं. मीं कुठे जायचा नाहीं. नाहींच जायचा.' त्यानें चिनाबचे पटापट मुके घेतले. 'आई, खरें सांग माझी चिनाब मला ज्यास्त, कां माझें काम ज्यास्त?'

'तुझें काम बाळा. तुझे वडील आपल्या कामापुढें सर्व गोष्टी कस्पटासारख्या समजत. विश्वासूपणानें चाकरी बजावण्याचें तर आपलें ब्रीद. मुलीच्या मोहांत पडून बेइमानी होऊं नकोस. तूं लढाईवर गेलास तरी चिनाबला मी चांगली संभाळीन. तूं कांहीं चिंता करूं नकोस. तुला आपल्या कामाला जागलेला पाहून ईश्वर आपणां सर्वांना सुखरूप ठेवील अन्—'

'पण आई, हिला सोडून माझ्याच्यानें जाववणार नाहीं. छे! मला हुकूम आला तरी मी जायचा नाहीं.'

'छे! छे! वेडा कुठला! असें भलतें काहीं करूं नकोस. तूं आपल्या मुलीसाठीं घरीं राहशील. दुसरा कोणी आपल्या बायकोसाठीं राहील. तिसरा आईसाठीं जायचा नाहीं. अशानें सरकारच्या पदरचे सारेच शिपाई घरीं बसल्यावर लढाईचें काय व्हायचें ? भलतेंच डोक्यांत घेऊं नकोस. माझें ऐक—'

टक् टक् ! कोण ? दाराशीं कोण आहे ? पोष्टाचा शिपाईच तो. दार उघडल्याबरोबर 'जवानसिंग परदेशी !' असें ओरडून एक जांभळें पाकीट टाकून पोष्टमन निघून गेला. जवानसिंगानें झटकन तें पाकीट फोडून वाचलें. तों काय ?

२७ आगस्ट १९१४.

१२ वी खाकी ३० तारखेला निघणार. ३० तारखेस सकाळीं बंदरावर हजर व्हावें.

झालें! जी गोष्ट यायला नको, यायला नको, असें जवानसिंग म्हणत होता, तीच त्याच्यापुढें दत्त म्हणून उभी ! आतां काय करावें ? तो मोठ्या विचारांत पडला. एकदां त्यानें पत्राकडे पाहिलें. नंतर चिनाबकडे दृष्टि फेंकली. नंतर आईकडे क्षणमात्र पाहून तो पुन्हा पत्राकडे पाहूं लागला.

'काय रे, काय पत्र आहे ?' म्हातारीनें विचारलें.

डाव्या हातानें डोकें खाजवीत, चिनाबकडे पहात, जवानसिंग सुस्कारा टाकून म्हणाला, 'लढाईवर जायचा हुकूम !'

दुसऱ्या दिवशीं सकाळीं जवानसिंग अधिकाऱ्याकडे गेला. आपली सर्व हकीकत त्यानें सांगितली; व आपली घरीं राहण्याची उत्कट इच्छा असल्याचेंही त्यानें कळविलें.

'हं' साहेब हिंदुस्थानींत म्हणाला, 'समजलों. तुला घरीं राहणें जरूरीचें आहे हेंही माझ्या लक्षांत आलें. पण तुझ्यासारखें जर प्रत्येक शिपाई म्हणूं लागला तर कसें होईल ? तूं घरीं राहिलास कीं, एक वाईट धडा तूं घालून दिलास असें नाहीं का व्हायचें ?

'पण साहेब, लढाईचें एखादें काम येथें करण्यासारखें असलें, तर तें करायला मी तयार आहें; पण मला येथें राहूं द्या.'

'रहा! येथें रहा. येथें राहूनही काम करण्यासारखें आहे. पण विचार कर, तुझ्यासारख्या शिपायाला हें शोभत नाहीं. तुझा बाप बोअरप्रकरणांत नांव करून गेला; त्याच्या मुलाला घरीं राहणें चांगलें दिसायचें नाहीं. आपलें नांव घालवशील. उद्यांपर्यंत विचार कर. घरीं रहावेंसें वाटणें कायम राहिलें तर मला उद्यां भेट. मी तुला मग काय तें काम नेमून देईन. पण नीट विचार कर. कामाला जाग.'

'कामाला जाग !' 'कामाला जाग !' त्याची आईही त्याला तेंच म्हणाली होती. साहेबानेंही तेंच सांगितलें. त्याचें मनही आतां तेच शब्द बोलूं लागलें. तेच शब्द त्याच्या कानांत घुमूं लागले. साहेबाच्या बंगल्यांतून बाहेर पडल्यापासून रस्त्यांतील धुळींत, घरांच्या भिंतींवर, दुकानांतील फळ्यांवर, जिकडे तिकडे 'कामाला जाग !' हेच शब्द लिहिलेले त्याला दिसूं लागले. हळू हळू त्याचा निश्चय होत चालला. घरीं आल्यावर 'आई, मी जाणार परवां !' असें तो म्हणाला. 'शाबास !' म्हातारी म्हणाली.

३० तारखेला पहांटे चिनाबचे अगणित मुके घेऊन, तिला अनेक वेळा कुरवाळून, आलेले हुंदके दाबतां दाबतां आईच्या पायां पडून, जवानसिंगानें घराच्याबाहेर पाऊल टाकलें.

महायुद्धामध्यें जे कित्येक रणसंग्राम झाले, त्या सर्वांत 'ऐसनी' चा रणसंग्राम अत्यंत भयंकर आणि घनघोर होता. त्या रणसंग्रामांत कित्येक

थोडे गतप्राण झाले. जवानसिंगाला नुसती जखमच झाली, हें त्याचें मोठें भाग्यच. इस्पितळांत जवानसिंगाला पोंचविण्यांत आलें. त्या ठिकाणीं दोन दिवस तो बेशुद्धच होता. शुद्धीवर आल्यावरसुद्धां आठदहा दिवस तो बोलत नव्हता. नंतरमात्र तो भराभर सुधारत चालला. परंतु त्या पंधरा दिवसांत 'घरीं चिनाबची काय स्थिति असेल ?' या काळजीनें तो अगदीं वाळत चालला. सोळाव्या दिवशीं एका नर्सनें त्याला एक पत्र आणून दिलें. तें पत्र येऊन सातआठ दिवस झाले होते, परंतु पत्र वाचण्याच्या स्थितींत त्या वेळीं तो नसल्यामुळें त्याला पत्र उशीरां देण्यांत आलें, असें त्या नर्सकडून त्याला कळलें, तेव्हां त्यानें मनांतल्या मनांत अधिकाऱ्यांना पुष्कळ शिव्या दिल्या. त्यानें अधीरतेनें पत्र उघडून पाहिलें. पत्रांतलें अक्षर अगदींच गिचमीड होतें, त्यावरून आईनें तें पत्र एकाद्या शेजारच्या लहान मुलाकडून लिहविलें असावें, असें त्यानें ताडलें. पत्रांत तोच तोच मजकूर पुन्हा पुन्हा लिहिलेला होता. 'चिनाब तूं गेलास तेव्हांपेक्षां बरी आहे. आतां ती चालतेसुद्धां.' असा पत्राचा मथितार्थ होता. पत्र वाचल्यावर त्याला जरा बरें वाटलें. परंतु 'आतां लढाई संपण्यास किती तरी दिवस लागणार ! तोंपर्यंत चिनाबचें कांहीं बरेंवाईट झालें नाहीं म्हणजे मिळवली.' असा विचार मनांत येऊन त्यानें एक सुस्कारा सोडला. परंतु त्याला पुन्हा आठवण झाली कीं, पत्र येऊन बरेच दिवस झाले आहेत, कदाचित् या पत्रानंतर दुसरेंही पत्र आलें असेल. असें वाटून त्यानें नर्सला विचारलें, 'माझें दुसरें एखादें पत्र आहे का ?' 'नाहीं.' असें नर्सनें सांगितल्यावर त्यानें पुन्हा एक सुस्कारा सोडला. पत्र नाहीं म्हटल्याबरोबर त्याच्या मनांत अनेक तर्कवितर्क आले. एकच पत्र कां यावें ? आईनें एक पत्र पाठविलें तसें तिला दुसरेंही पाठवितां आलें असतें. मग पुन्हा पत्र नाहीं याचा अर्थ काय ? कां चिनाब दगावली ? दुसरें पत्र

न येण्याचें हेंच एक कारण दिसतें आहे. असे एक ना दोन, नाना विचार त्याच्या मनांत उभे राहिले. अरेरे ! पुन्हा एकदांच कां होईना, पण एकदां तरी चिनाबला पोटाशीं घट्ट धरतां आलें तर देवाचे किती उपकार होतील, असें त्याला वाटलें. चिनाब जिवंत असेल किंवा नाहीं, याशिवाय दुसरा विचारच त्याच्या मनाला शिवेना.

जखमी शिपायांपैकीं जे साधारण बरे झाले असतील त्यांना हिंदुस्थानांत कांहीं दिवस पाठविणार, ही बातमी दुसरे दिवशीं जवानसिंगाला कळली, तेव्हां त्याला आनंद झाला. 'आतां आपण घरीं जाऊं; बहुतकरून चिनाब आपल्याला भेटेल.' वगैरे वगैरे चांगले विचार त्याच्या मनांत गर्दी करूं लागले. तीन दिवसांनीं तो इतर मंडळीबरोबर बोटीवर चढला. केव्हां एकदां बोट हिंदुस्थातच्या बंदरांत शिरते आहे, असें त्याला झालें होतें. वेळ जातां जाईना. परंतु ते चोवीसपंचवीस दिवस कसेबसे गेले ! बंदरावर जवानसिंग उतरला आणि आपल्या गांवीं जाणाऱ्या रेलवेंत धांवतच जाऊन बसला. स्टेशन जवळजवळ येत चाललें. स्टेशन आलेंसुद्धां. तोंच जवानसिंग गाडींतून उतरला व टांग्यांत बसला. घर जवळजवळ येत चाललें, तसतसें त्याचें अंतःकरण ज्यास्त ज्यास्त धडधडूं लागलें. 'घरीं आपल्यासाठीं काय वाढून ठेवलें आहे कोण जाणे !' अशी त्याच्या मनाची धाकधूक व्हायला लागली. गांवाच्या टोंकाचीं घरें लागलीं. एकदोन चौक ओलांडले. त्याच्या आळीच्या टोंकाचीं घरें दिसूं लागलीं. त्याच्या घराचा पुढचा भागही दिसला. लगेच जवानसिंगानें टांग्यांतून उडी मारली व धांवतच तो घरांत शिरला. ओटीवरच चिनाब झोंपाळ्याशीं खेळत होती. तिनें जवानसिंगाकडे पाहिलें व 'बाबा, बाबा, तुम्ही !' म्हणून ती मोठ्यानें ओरडली. जवानसिंगानें तिला उराशीं धरलें. त्याच्या डोळ्यांतून आंसवें खालीं पडूं लागलीं. 'आई, आई !' म्हणून त्यानें हांका मारल्या; परंतु ओ मिळेना.—हाय !

परंतु हें काय ? चिनाब अशी निश्चल कां ? जवानसिंग पहातो तों ती बेशुद्ध झालेली. हें पाहून तो घाबरला. इतक्यांत त्याची आई आंत आली. त्याला पाहतांच ती दचकली. 'कोण जवान ? तूंच का तो ?' असें ती पुटपुटली. ती पुढें कांहीं बोलणार तोंच जवानसिंग म्हणाला, 'आई, चिनाबला धर.. मी डाक्टरला आणतों.' म्हातारीनें एखाद्या यंत्राप्रमाणें हात पुढें केले. आणि लागलीच मुलीला तिच्या हातांत देऊन जवानसिंगानें डाक्टरच्या घराकडे धूम ठोकली.

जवानसिंगाला पाहिल्याबरोबर डॉक्टर आश्चर्यचकित झाले ! 'जवानसिंगजी ! तुम्हीच का ते ? तुम्ही कसे आलां ?' डॉक्टर म्हणाले.

'म्हणजे ?' जवानसिंगानें प्रश्न केला.

'तुमचें नांव तर मेलेल्या शिपायांच्या यादींत वाचल्याचें मला आठवतें. बरें असो. तुमचें नांव चुकून छापलें गेलें असेल. या, बसा.'

'छे ! बसायला वेळ नाहीं. आधीं घरीं चला.'

घरीं आल्यावर चिनाबची प्रकृति डाक्टरनीं तपासून पाहिली. बऱ्याच वेळानें ते म्हणाले, 'जवानसिंग, तुमची चिनाब आतां अगदीं बरी झाली असें समजा. ती आत्तां शुद्धीवर येईल.'

थोड्या वेळानें चिनाब शुद्धीवर आली.

डॉक्टर पुन्हा म्हणाले, 'मेलेल्या शिपायांच्या यादींत तुमचें नांव आलें होतें, हें एक प्रकारें बरेंच झालें म्हणावयाचें. ती दुःखद वार्ता तुमच्या आईला आणि मुलीला आम्हांलाच कळवावी लागली होती.'

'हं ! तरीच एक पत्र पाठवल्यानंतर आईनें कांहींच लिहिलें नाहीं.' जवानसिंग आपल्याशींच म्हणाला.

डॉक्टर पुढें म्हणाले, 'तुम्ही मेलां अशा समजुतींत ही मंडळी दिवस काढीत होती. आज तुम्ही आलेले पाहून या मुलीला अतिशय

आनंद झाल्यामुळें तिच्या काळजाला धक्का बसला. परंतु हा धक्का बसला ही चांगलीच गोष्ट झाली. कारण मीं तुम्हांला मागें सांगितलें होतें कीं, तिच्या काळजाभोंवतीं एक विशिष्ट प्रकारचा थर बसलेला आहे. तो कापून काढणें फार कठिण होतें. परंतु आजच्या धक्क्यानें तो थर आपो-आप फुटून गेला. आतां तुमची चिनाब अगदीं साफ बरी झाली, असें खुशाल समजा.'

यानंतर तीनचार दिवसांनीं सकाळच्या प्रहरीं म्हातारी चुलीवर चहा उकळीत बसली होती. 'मला दोन पेले चहा पाहिजे.' असा हट्ट धरून चिनाब रडणें उकरून काढीत होती. बराच वेळ तिनें कुरकूर केल्यावर म्हातारी म्हणाली—

'जवानबरोबर तूं लढाईवर जाणार आहेस ना ?'

'हो ! मग ?' एकदम रडणें थांबवून चिनाननें विचारलें.

'मग लढाईवर तर मुळींच चहा नसतो !'

'नसला तर नसला ! माझे बाबा तर असतील ना माझ्याजवळ ?'

इतक्यांत तोंड धुऊन पुशीत पुशीत जवानासिंग आंत आला. चिनाबचे वरील शब्द ऐकल्याबरोबर त्याला गहिंवर आला. तिचा एक मुका घेऊन तो आईला म्हणाला, 'आई, तुझ्या उपदेशाप्रमाणें मीं लढाईवर गेलों नसतों तर माझी लाडकी चिनाब मला परत मिळाली असती का ग ?'

---

३२

# कोलंबोपासून आल्मोरापर्यंत.

( स्वामी विवेकानंद यांचीं व्याख्यानें. )

## व्याख्यान १७ वें.

### कलकत्ता येथील मानपत्र व त्याला स्वामींचें उत्तर.

स्वामी मद्रासहून कलकत्याला आले. तेथें त्यांचें फारच थाटाचें स्वागत झालें. सुमारें वीस हजार लोक जमले होते. तोरणें व पताका यांनीं रस्ता सुशोभित केला होता. त्या दिवशीं कलकत्याचे लोकांत कांहीं अपूर्व उत्साहाचें वारें संचरलें होतें. त्यांच्या पवित्र मूर्तीचें दर्शन घेण्याकरितां रस्त्यांत इतकी खेंच उडून गेली होती कीं, पदोपदीं त्यांच्या गाडीची गति अगदीं रुद्ध होऊन जाई.

स्वामींच्या स्वागताचा औपचारिक विधि करण्याकारितां सुमारें एक आठवड्यानें राजा राधाकांत देव यांच्या वाड्याच्या भव्य पटांगणांत सभा भरली होती. समाज सुमारें पांच हजार होता. राजा विनयकृष्ण देव यांनीं अध्यक्षस्थान स्वीकारलें होतें. लहानसें प्रास्ताविक भाषण केल्यानंतर अध्यक्षांनीं पुढील मानपत्र वाचून एका सुंदर रौप्यकरंडकांतून तें स्वामींना अर्पण केलें.

मानपत्र.

श्रीमत्स्वामी विवेकानंद यांस---

प्रिय बंधो,---

कलकत्ता व बंगाल्यांतील इतर अनेक ठिकाणें येथील आम्ही हिंदु रहिवासी, आपण आपल्या जन्मभूमीला सुखरूप परत आलां, तेव्हां अगदीं अंतःकरणपूर्वक आपलें स्वागत करितों. हें आपलें स्वागत करितांना आम-

च्या मनांला जितका अभिमान वाटतो, तितकीच कृतज्ञताही वाटते; कारण, जगाच्या पाठीवरील निरनिराळ्या देशांत जाऊन जें आपण महत्कार्य बजाविलें आहे, व जें थोर उदाहरण घालून दिलें आहे, तेणेंकरून आपण आमच्या धर्माच्या गौरवाची वृद्धि केली आहे; इतकेंच नव्हे, तर आमच्या सर्व देशाचें आणि विशेषेंकरून या आमच्या प्रांताचें मुख उज्ज्वल केलें आहे.

सन १८९३ सालीं अमेरिकेंतील शिकागो शहरीं जगांतील सर्व कलाकौशल्याच्या वस्तूंचें जेव्हां प्रदर्शन भरलें, तेव्हांच तेथें सर्व जगांतील मान्य धर्मांच्या प्रतिनिधींची जी परिषद भरली, त्या परिषदेंत आपण आर्यधर्माच्या तत्त्वांचें विवरण केलें. त्या सभेंतील श्रोत्यांपैकीं बहुतेकांना आपल्या व्याख्यानांतील तत्त्वें केवळ देववाणीप्रमाणें भासलीं; तसेंच, आपली भाषणशैलीही अत्यंत ओजस्वी व मधुर असल्यामुळें तिनें सर्वांचीं मनें हरण करून टाकलीं. आपण प्रतिपादिलेल्या तत्त्वांच्या सत्यतेविषयीं कांहींच्या मनांत कदाचित् संशय उभा राहिला असेल, आपल्या व्याख्यानांवर कांहीं थोड्या माणसांनीं कदाचित् टीकाही केली असेल, पण त्या व्याख्यानांचा सामान्य परिणाम असा झाला कीं, सुशिक्षित अमेरिकन लोकांपैकीं बहुतेकांच्या धर्मविचारांत क्रांति होऊन गेली. त्यांच्या मनांत नवीन प्रकाशाचा उदय झाला; व ते स्वभावसिद्ध उत्साही व सत्यानुरागी असल्यामुळें या नूतन ज्ञानप्रकाशानें आपला होईल तेवढा फायदा करून घ्यावयाचा, असा त्यांनीं दृढसंकल्प केला. आपल्या कार्यक्षेत्राचा परिघ वाढूं लागला; आपल्या उपदेशाचें बीज अंकुरित होऊन त्याचा वृक्ष होऊं लागला; अनेक संस्थानांतील अनेक शहरांकडून आपल्याला बोलावण्यावर बोलावणीं येऊं लागलीं; अनेक प्रश्नांचीं आपल्याला उत्तरें द्यावीं लागलीं; नाना संदेह दूर करावे लागले; आणि अनेक शंकांचें समाधान करावें

लागलें. आपण हीं सर्व कामें मोठ्या दक्षतेनें, अगदीं मनापासून व यथास्थितपणें पार पाडलीं; व त्याचे परिणामही चांगले स्थायिक झाले आहेत. अमेरिकेच्या स्वतंत्र संस्थानांतील अनेक सुशिक्षित लोकांच्या मनांवर आपल्या उपदेशानें चांगला पगडा बसविला आहे, त्यांच्या शोधकबुद्धीला व विचारशक्तीला उद्दीपन दिलें आहे, व पुष्कळांच्या धर्मविचारांत कायमची क्रांति घडवून आणून हिंदुधर्माची सत्यता त्यांच्या मनांना पटविली आहे. निरनिराळया धर्मांची चर्चा करण्याकरितां व आध्यात्मिक तत्त्वांचें संशोधन करण्याकरितां स्थापन झालेल्या मंडळांची तिकडे जी भराभर वाढ होत आहे, तीच आपण पाश्चात्त्य देशांत केवढें कार्य केलें याचें प्रमाण आहे. लंडन शहरांतील वेदान्तविद्यालयाचे आपण संस्थापक आहां, असें मानायला कांहीं हरकत नाहीं. आपण तेथें नियमितपणें व्याख्यानें दिलीं आहेत, श्रोतृगणानें नियमितपणें येऊन तीं ऐकलीं आहेत, व जिकडे तिकडे त्यांची वाहवा झाली आहे. व्याख्यानगृहाच्या भिंतींच्यापलीकडेही त्यांनीं (व्याख्यानांनीं) आपला प्रभाव गाजविला आहे. आपण लंडन सोडलें, त्या वेळीं तेथील वेदान्ताध्ययनशील गृहस्थांनीं आपल्याला मानपत्र दिलें; त्यांत त्यांनीं जी विलक्षण कृतज्ञताबुद्धि व्यक्त केली आहे तीवरून, आपल्या उपदेशानें आपल्याविषयीं त्यांच्या मनांत केवढी श्रद्धा व काय भक्ति उत्पन्न केली आहे, हें स्पष्टपणें दिसून येतें.

आपलें आर्यधर्माचें ज्ञान अगाध आहे, त्यांत आपण पूर्ण पारंगत आहां, आणि लेखन व व्याख्यान यांचे द्वारें त्या धर्माचीं तत्त्वें विशद करण्याची आपली हातोटी कांहीं विलक्षण आहे, हें खरें; पण धर्मप्रसाराचे कामीं आपल्याला जो एवढा यशोलाभ झाला; त्याचें कारण केवळ तेच गुण नव्हत; तर त्याचें श्रेय—त्याचें बहुतेक श्रेय—आपल्या चारित्र्याला आहे. आपलीं व्याख्यानें, आपले निबंध व आपले ग्रंथ यांचें आध्यात्मिक व

वाङ्मयिक महत्त्व फार आहे, व त्यांनीं आपला प्रभाव गाजवायचा तो गाजविलाच आहे. पण आपलें साधें, सरळ, स्वार्थशून्य आचरण आणि आपला विनय, निष्ठा व उत्साह, यांनीं तो प्रभाव किती वाढला आहे, हें शब्दांनीं सांगतां येणार नाहीं.

आमच्या उदात्त धर्माचा प्रसार करण्यांत जी कामगिरी आपण बजाविली आहे, तीसंबंधानें कृतज्ञता व्यक्त करितांना, आपले परमपूज्य गुरु श्रीरामकृष्ण परमहंस यांचा सादर उल्लेख करणें आमचें कर्तव्य आहे, असें आम्हांला वाटतें. आपला लाभ आम्हांला झाला, याबद्दलही आम्ही त्यांचेच ऋणी आहों. आपल्या ठिकाणीं असलेला दिव्य ज्योतीचा स्फुलिंग आपल्या दिव्य दृष्टीनें पहिल्यानें पुष्कळ दिवसांपूर्वी त्यांनींच पाहिला; व पुढें आपले हातून फार मोठी कामगिरी होणार आहे, असें त्यांनींच भविष्य करून ठेविलें; व आनंदाची गोष्ट ही कीं, तें भविष्य आज पूर्ण होण्याच्या मार्गांत आहे. ईश्वरी प्रसादानें आपल्याला जी दिव्य दृष्टि व दिव्य बुद्धि प्राप्त झाली होती, तिच्यावरील आवरण काढून ती त्यांनींच खुली केली; आपल्या विचारांना व आकांक्षांना आपल्या पवित्र स्पर्शानें त्यांनींच योग्य ती गति दिली; अदृश्य जगाचा ठाव काढण्याकरितां आपली जी धडपड चालली होती, तींत आपल्याला साहाय्य त्यांनींच केलें,--त्यांनीं पुढील पिढ्यांकरितां जें काय करून मागें ठेविलें, त्यांत ' आपण ' हाच सर्वांत अमूल्य टेवा आहे.

महाराज! आपण जो मार्ग पसंत केला आहे, त्या मार्गानें कार्य करीत नेटानें व स्थैर्यानें पुढें चला. सर्व जग आपल्याला जिंकायला आहे. जे अज्ञान आहेत, नास्तिक आहेत, व समजून उमजून ज्यांनीं अंधत्व पतकरिलें आहे, त्यांना हिंदुधर्म आपल्याला समजावून द्यावयाचा आहे. आपण ज्या जोमानें कार्याला आरंभ केला आहे, तो जोम आम्हांला अत्यंत

प्रशंसनीय वाटतो; व आपण आजपर्यंत जें यश संपादिलें आहे, त्याला जगाच्या पाठीवरील अनेक देशांची साक्ष आहे. पण अद्याप पुष्कळच कार्य करावयाचें आहे; व आमचा देश—आमचा म्हणण्यापेक्षां आपलाच देश—आपली वाट पाहत आहे. हिंदुधर्माचीं तत्त्वें बऱ्याच हिंदु लोकांना समजावून द्यावयाचीं आहेत. तेव्हां आपण हें थोर कार्य करण्याला कंबर बांधा. आपल्यावर व आमच्या पक्षाच्या सत्यतेवर आमचा पूर्ण भरंवसा आहे. आमच्या राष्ट्रीय धर्माला भौतिक विजय अगदीं नको आहे. त्याचें ध्येय आध्यात्मिक आहे; जड नेत्रांना न दिसणारें व विचारदृष्टीलामात्र प्रतीत होणारें, असें जें सत्य तेंच त्याचें अस्त्र आहे. आपले अंतश्चक्षु उघडा, इंद्रियांच्या प्रदेशाच्यापलीकडे जा, शास्त्रग्रंथांचें यथार्थ अध्ययन करा, परमसत्याला सन्मुख व्हा, मनुष्य या नात्यानें जगांत आपली योग्यता काय व मनुष्यजन्माचें अंतिम साध्य काय, तें ओळखून त्याप्रमाणें वागा, इत्यादि गोष्टी आपण जगाला व जरूर पडेल तेथें हिंदु लोकांना अधिकारानें सांगा. असें अधिकारानें सांगण्याला, किंवा अशी जागृति उत्पन्न करण्याला आपल्यापेक्षां अधिक योग्य असा दुसरा कोणी नाहीं; व विधात्यानें जें कार्य आपल्याकडे सोंपविलेलें दिसत आहे, त्या कार्याला आमची अंतःकरणपूर्वक सहानुभूति व दृढ सहायता आहे, हें आम्ही आपल्याला निश्चित सांगतों.

आपले

प्रेमांकित बंधु व भक्त.

## स्वामींचें उत्तर.

मनुष्य आपली मुक्ति साधण्याचे प्रयत्न करीत असतां जगत्प्रपंचाचे सर्व संबंध एकदम तुटावे, अशी त्याची इच्छा असते. स्वजन, स्त्री, पुत्र, बंधु, इत्यादिकांची माया तोडून तो संसारापासून दूर, अगदीं दूर पळून जातो; देहगत सकल संबंध सुटावे, मागील सर्व संस्कार पुसून जावे, आपण मनुष्य

आहों हेंही आपण विसरून जावें, म्हणून त्याची जिवापाड खटपट सुरू असते; पण त्याच्या अंतःकरणाच्या सप्तपाताळांत एक मृदु अस्फुट ध्वनि स्फुरत असतो, त्याच्या कानांत एक सूर सर्वदा घुमत असतो, व तो त्याला मृदु स्वरानें असें सांगत असतो कीं, "जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसी." भारतसाम्राज्याच्या राजधानीचे पौरजन हो! आपल्या पुढें मी उभा आहें, पण संन्यासी या नात्यानें नाहीं, छे! अगदीं नाहीं! किंवा धर्मप्रचारक या नात्यानेंही नाहीं. मी लहान असतांना पूर्वी जसा आपल्याशीं बोलत असें,—कलकत्त्यांतील एक लहान मुलगा असतांना जसा मी आपल्याशीं बोलत असें,—तसेंच कांहीं बोलावें, कलकत्त्यांतील एक लहान मुलगा या पूर्वीच्या नात्यानें आपल्याशीं चार शब्द बोलावे, म्हणून आज आपल्यापुढें मी उभा राहिलों आहें. बंधुजन हो! या शहरांतील रस्त्यांच्या धुळींत बसून बाळपणच्या सरळ भावानें मन मोकळें करून आपल्याशीं बोलावें अशी माझी फार इच्छा आहे! तेव्हां आपण मला 'बंधु' या गोड शब्दानें संबोधिलें, याबद्दल मी आपला अत्यंत आभारी आहें. खरें आहे, मी तुमचा भाऊ आहें, व तुम्ही माझे भाऊ आहां. पाश्चात्त्य देशांतून इकडे येण्याकरितां मी निघण्याचे सुमारास एका इंग्रज मित्रानें मला प्रश्न केला: "स्वामीजी! विलासाचें केवळ क्रीडामंदिर, वैभवाचें माहेरघर, व शक्तीचें आगर, अशी जी पाश्चात्त्य भूमि, त्या भूमींत चार वर्षें काढल्यानंतर आपल्याला आपली जन्मभूमि कशी काय आवडते?" मी त्याला असेंच उत्तर दिलें: "मी इकडे येण्यापूर्वी हिंदुस्थानावर माझें प्रेम होतें; आतां हिंदुस्थानची मातीही मला पवित्र वाटूं लागली आहे, तिथला वाराही मला आतां पवित्र आहे, ती भूमि म्हणजे आतां मला एक पवित्र तीर्थच वाटत आहे."

कलकत्तावासी जन हो!—बांधव हो!—आपण माझ्यावर जो अनुग्रह केला, त्याबद्दल मी आपला किती ऋणी आहें, हें मला शब्दांनीं

सांगतां येत नाहीं. हो, पण खरें म्हटलें, म्हणजे मला आपले आभार मानण्याचेंही कारण नाहीं; कारण आपण माझे बंधु आहां, आपण केवळ बंधुत्वाचें कर्तव्य बजाविलें आहे.—हिंदुबंधूंचें जें स्वभावसिद्ध कर्तव्य तेंच आपण केलें आहे. अहो! हिंदुबंधूंचें हें स्वाभाविक कर्तव्यच आहे. कारण, अशीं ( या देशांतल्यासारखीं ) कौटुंबिक बंधनें, असे आप्तसंबंध, असें प्रेम या आपल्या जन्मभूमीच्या सीमांच्या बाहेर कुठेंही नाहीं.

शिकागो येथील धर्मपरिषद् फार मोठी थाटाची झाली, यांत कांहीं शंका नाहीं. या देशांतील अनेक शहरांतून आम्ही त्या सभेच्या व्यवस्थापकांचे आभार मानले, आणि त्यांनीं आम्हांला ज्या प्रेमानें वागविलें, तें प्रेम पाहतां त्यांना आम्ही जे धन्यवाद दिले, त्या धन्यवादांना ते पात्रही होते. पण या धर्मसभेचा यथार्थ इतिहास जर आपल्याला जाणण्याची इच्छा असेल, तिचें खरें मर्म जर आपल्याला समजावून घ्यावयाचें असेल, तर मी काय सांगतों तें ऐका. त्यांना इतर धर्मांवर कुरघोडी करून खिस्ती धर्माची प्रतिष्ठा स्थापावयाची होती. तिकडे असे कांहीं लोक होते कीं, त्यांच्या मनांत मूर्तिपूजकांच्या धर्माचा तमाशा उडवून देऊन खिस्ती धर्माचें श्रेष्ठत्व दाखवावयाचें होतें. पण परिणामीं त्यांच्या इच्छेनुरूप न होतां विपरीत होऊन बसलें. विधिघटना निराळीच असल्यामुळें तसें होणें अपरिहार्य होतें. पुष्कळांनीं आम्हांला सदयतेनें वागविलें, पण त्याबद्दल आम्ही त्यांना यथेष्ट धन्यवादही दिले आहेत.

पण वास्तविक पाहिलें असतां, मीं जी अमेरिकेची यात्रा केली, ती केवळ धर्मसभेकरितां नाहीं. तें केवळ एक कामांत काम होतें; सभा हें केवळ निमित्त होतें; सभेमुळें मला आयती संधी मिळाली व मीं ती साधली, इतकेंच. अशी आयती संधी आणली, याबद्दल सभेच्या पुरस्कर्त्यांचे आम्ही अत्यंत ऋणी आहों. पण खरें बोलायचें म्हटलें, म्हणजे

आतिथ्यशील व उन्नत असें जें अमेरिकन राष्ट्र—अमेरिकेंतील संयुक्त संस्थानें—त्यांतील लोकांचे आम्ही खरे ऋणी आहों. इतर लोकांपेक्षां त्या लोकांत भ्रातृभावाचा विशेष विकास झालेला आहे. कोणाही अमेरिकन गृहस्थाची व तुमची आगगाडींत पांच मिनिटें गांठ पडली कीं पुरे, तुम्ही त्याचे मित्र बनलांच. लागलाच तो तुम्हांला आपल्या घरीं आग्रहानें पाहुणा म्हणून घेऊन जातो व दिल खुला करून आपल्या मनांतल्या सगळया गोष्टी सांगतो. अमेरिकन लोकांचा स्वभाव हा असा आहे, आणि त्याचें आम्हांला मोठें कौतुक वाटतें. त्यांनीं मला किती ममताळूपणानें वागविलें, तें शब्दांनीं सांगतां येत नाहीं. त्यांनीं माझ्यासंबंधानें जी अपूर्व दया दाखविली, ती बोलून दाखवायला मला किती तरी वर्षें लागतील.

अटलांटिक महासागराचे परतीराला असणारें जें दुसरें राष्ट्र--अर्थात इंग्लंड--त्यालाही तितकेच धन्यवाद देणें उचित आहे. इंग्लंडच्या भूमीवर मीं पाय ठेवला, तेव्हां इंग्रज लोकांसंबंधानें माझ्या मनांत जितका तिरस्कार वागत होता, तितका कधीं कोणाच्याही मनांत वागला नसेल. या पीठावर जे माझे इंग्रज मित्र बसले आहेत, तेच या गोष्टीची साक्ष देतील. पण जेव्हां त्यांचा माझा सहवास घडला, जेव्हां मी त्यांच्यांत मिसळूं लागलों, ब्रिटिश लोकांचें राष्ट्रीयजीवनरूपी यंत्र कसें चाललें आहे, हें जेव्हां मला दिसूं लागलें, तेव्हां त्यांच्या राष्ट्रदेहाच्या हृदयाची क्रिया कुठें चालली आहे, हें मला उमगलें व जितका मी त्यांचा तिरस्कार करीत होतों, तितकेंच त्यांच्यावर माझें प्रेम बसलें. बंधुजनहो! आतां इंग्रज लोकांवर माझें जितकें प्रेम आहे, त्याहून त्यांच्यावर ज्यास्त प्रेम करणारा येथें हजर असणारांत कोणीही नसेल. त्यांची नीट माहिती झाली पाहिजे, तिथे काय चाललें आहे, तें नीट पाहिलें पाहिजे, त्यांच्यांत जाऊन मिसळलें पाहिजे आपल्या तत्त्वज्ञानानें, आपल्या राष्ट्रीय वेदान्तशास्त्रानें ज्याप्रमाणें 'अज्ञान'

हेंच एकंदर दुःखाचें मूल आहे, असा निश्चित सिद्धान्त केला आहे, त्याचप्रमाणें इंग्रज व आपण यांच्यामध्यें जो विरोधभाव आहे, तो केवळ अज्ञानमूलक आहे, हें लक्षांत ठेविलें पाहिजे. आम्ही त्यांना बरोबर ओळखीत नाहीं, व ते आम्हांला बरोबर ओळखीत नाहींत.

दुर्दैवानें पाश्चात्त्य लोकांची अशी समजूत आहे कीं, धर्म–धर्म कशाला ? नीतिसुद्धां–व सांसारिक उन्नति यांची अखंड सांगड आहे; आणि जेव्हां एखादा इंग्रज गृहस्थ, किंवा दुसरा कोणी पाश्चात्त्यदेशीय गृहस्थ या देशाच्या भूमीवर पाऊल टेवतो, व या देशांत पसरलेलें विलक्षण दैन्य व दारिद्र्य पाहतो, तेव्हां तो लागलाच असा सिद्धान्त आपल्या मनाशीं बांधून बसतो कीं, या देशांत धर्माचें, नव्हे नीतीचेंही, नांव असावयाचें नाहीं ! त्याचा स्वतांचा अनुभव तसा असतो खरा. थंड हवेचा विलक्षण कडाका व दुसरीं अनेक कारणें, यांमुळें युरोपांत दारिद्र्य व पाप यांचें नेहमीं साहचर्य असतें; पण हिंदुस्थानांत तशी स्थिति नाहीं. उलट हिंदुस्थानासंबंधानें माझा अनुभव असा आहे कीं, मनुष्य जितका दरिद्री ज्यास्त, तितका तो नीतिमान् ज्यास्त. पण ही स्थिति लक्षांत येण्याला काळ लागतो. आणि हें समजून घेण्याकरितां–हिंदुसमाजाचें हें हृद्गत समजून घेण्याकरितां–हिंदुस्थानांत दीर्घ काळ राहणारे कितीसे परदेशी लोक आहेत ? नेटानें राष्ट्रीय चरित्राचें अध्ययनपूर्वक ज्ञान करून घेणारे थोडेच. दारिद्र्य व पाप हीं तुल्यार्थसूचक किंवा समानार्थक नाहींत, असें मानणारे लोक इथे, फक्त इथेच आहेत; एवढेंच नव्हे, तर इथे दारिद्र्याला अग्रपूजेचा मान आहे; दरिद्री संन्याशाच्या कफनीला इथे उच्चासन मिळतें. त्याचप्रमाणें पाश्चात्त्य सामाजिक रीतिनीतींचें अध्ययन आपल्याला सावकाशीनें केलें पाहिजे. घाईनें त्यांविषयीं एकदम वेडगळ सिद्धान्त ठोकून चालावयाचें नाहीं. त्यांचें स्त्रीपुरुषांचें एकत्र मिसळणें, त्यांच्या चाली, त्यांच्या

रीति, त्यांचे आचारव्यवहार, या सगळ्यांना अर्थ आहे, या सगळ्यांना चांगली बाजू आहे; मात्र लक्षपूर्वक तुम्हांला त्यांचें समालोचन केलें पाहिजे. माझा असें म्हणण्याचा हेतु नाहीं कीं, आम्ही त्यांच्या आचारव्यवहारांचें अनुकरण करूं, किंवा ते आमच्यांचें करतील; तसें कदापि होणार नाहीं. कारण, प्रत्येक देशाचे जे आचारव्यवहार असतात, ते शेंकडों वर्षांच्या मंद व क्रमागत विकासानें तद्देशीय समाजांत मुरलेले असतात व त्यांत खोल अर्थ भरलेला असतो. तेव्हां आमच्या आचारविचारांचा उपहास त्यांनीं करूं नये, त्यांच्या आचारविचारांचा आम्हीं करूं नये.

या सभेपुढें दुसरें एक विधान करावें, असें माझ्या मनांत आहे. माझ्या मतें अमेरिकेपेक्षां इंग्लंडांतच माझें धर्मप्रचाराचें कार्य अधिक संतोषकारक झालें आहे. इंग्रज लोक धाडसी आहेत, शूर आहेत, त्यांची चिकाटी कांहीं विलक्षण आहे; पण इतर लोकांच्या मानानें त्यांचीं डोकीं कांहींशीं जड आहेत, असें म्हणायला हरकत नाहीं; पण एकदां कां एकादी कल्पना त्यांच्या डोक्यांत भरविली, कीं ती कायम बसलीच; मग ती बाहेर म्हणून निघायची नाहीं. त्या लोकांच्या अंगीं उत्साह व कार्यकारिणी शक्ति दांडगी असल्यामुळें त्या बीजभूत कल्पनेला लवकरच अंकुर फुटून ती फळांनीं ओथंबून जाते. असें दुसऱ्या कोणत्याही देशांत होत नाहीं. या लोकांत जी अनंत कार्यकारिणीशक्ति आहे, जो अफाट जिवटपणा आहे, जो अमर्याद जोम आहे, तो दुसऱ्या कोठेंही दिसून येत नाहीं. यांच्यांत कल्पनाशक्ति थोडी पण कार्यकारिणी शक्ति दांडगी! आणि इंग्रज लोकांच्या अंतःकरणाचा मूळ झरा कोठें आहे, हें कोणाला ठाऊक आहे? किती विपुल कल्पना, किती अगाध भाव तिथे भरून राहिला आहे! तें खरें वीरांचें राष्ट्र आहे, खरे क्षत्रिय आहेत ते! आपल्या मनांतील भाव गुप्त ठेवावा, कांहीं झाल्या बाहेर दिसूं देऊं नये, असेंच त्यांचें शिक्षण आहे.

बाळपणापासून त्यांना असेंच वळण मिळालेलें आहे. आपल्या हृदयाचा भाव, उमाळा किंवा वृत्ति बाहेर दाखवणारा इंग्रज गृहस्थ बहुधा क्वाचित्‌च तुमच्या दृष्टीस पडेल; पुरुषाची गोष्ट कशाला ? इंग्रज स्त्रीही आपल्या हृदयाचा आवेग कधींही बाहेर दिसूं देणार नाहीं. इंग्रज स्त्रियांना मीं अशीं कामें करितांना पाहिलें आहे कीं, तीं करण्याला मोठा धाडशीही बंगाली मागें पाय घेईल--कचरेल ! पण या वीरत्वाच्या कवचाच्या आंत, या क्षत्रियाला शोभणाऱ्या कठोरतेच्या मागें जाऊन इंग्रज मनुष्याचें हृदय जर कोणीं तपासून पाहिलें, तर तिथे भावनिर्झर अखंड झुळझुळ वाहतांना त्याला दिसेल. एकदां तुम्हांला तो गांठतां आला, एकदां तिथे तुमचा प्रवेश झाला, एकदां इंग्रज गृहस्थाचा व तुमचा प्रत्यक्ष परिचय झाला, एकदां तुमची व त्याची दाटी झाली, कीं तो आपलें अंतःकरण तुमच्याजवळ खुलें करील, तुमचा कायमचा मित्र बनेल, तुमचा दास होईल. या कारणामुळेंच माझ्या मतानें इतर ठिकाणांपेक्षां इंग्लंडमध्यें माझें धर्मप्रचाराचें कार्य अधिक संतोषकारक झालें. माझी अशी पक्की खातरी आहे कीं, मी जरी उद्यां मेलों, तरी माझें तिथलें काम कांहीं मरणार नाहीं, पण तें सारखें विस्तारतच जाईल. ( अपूर्ण. )

---

## पोंच व अभिप्राय.

१ कॅलेंडर--१९१५ सालचें. मध्यमागीं महाराणी मेरी व पंचम जॉर्ज, व चार कोंपऱ्यांना बडोदा, कोल्हापूर, इंदूर व ग्वालेर येथील महाराज यांचीं सुंदर व स्पष्ट चित्रें असून रीतीप्रमाणें इंग्रजी महिन्यांच्या तारखा व मुख्य हिंदु सण दिले आहेत. काम एकरंगी असूनही साधें पण सुरेख आहे.

२ ग्रहलाघवीय सुलभ पंचांग--पुढील सालचें. यांत सर्व पंचांगांत आढळणारी सामान्य माहिती असून ज्योतिषविषयासंबंधानें उपयुक्त

माहिती थोडक्यांत पण कोणालाही समजेल अशा रीतीनें दिली आहे. वधू-वरांच्या पत्रिका पाहण्याची रीति स्पष्ट व सुलभपणें दिली आहे. तिचा उपयोग लोकांना फार होणार आहे. रोजचे ग्रह स्पष्ट केले आहेत. एकंदरींत अनेक प्रकारची माहिती देऊन पंचांग शक्य तितकें उपयुक्त करण्याचा प्रयत्न केला आहे व तेणेंकरून तें लोकादरास चांगलेंच पात्र होईल, अशी आमची खात्री आहे. छपाई चांगली आहे. त्या मानानें किं. ८२ बेताची आहे.

३ डायरी—चालू सालची. माहिती भरपूर. आंखलेली. किं. ८६. बांधणी चांगली.

या तिन्ही जिनसा ग्रंथसंपादक व ग्रंथप्रसारक मंडळीच्या तर्फे मे. दामोदर सांवळाराम आणि मंडळी, मुंबई, यांजकडून अभिप्रायार्थ आल्या, त्याबद्दल आम्ही त्या मंडळीचे आभारी आहों.

४ स्वामी रामतीर्थ—भाग सहावा. पांचव्या भागानंतर लवकरच हा भाग प्रसिद्ध झालेला पाहून समाधान वाटतें. सनातन धर्म, चित्ताची समता, दुःखांतून स्वानंदाकडे, सुखसंवाद, वैराग्याचें सामर्थ्य, व आरण्यक संवाद हीं व्याख्यानें या भागांत आलीं आहेत. प्रस्तावना व विषय-प्रवेश या भागांत आत्मसाक्षात्काराच्या साधनांचें सुंदर विवेचन केलें आहे. भाषांतराचें काम कसें झालें आहे, हें आतां निराळें सांगण्याची—मागील पांच भागांच्या अनुभवावरून—जरूर दिसत नाहीं.

५ नवपत्रमाला—लेखक—रा० बळवंत हरि पंडित, बी. ए. एल्. एल. बी; प्रकाशक—द० गो० सडेकर, संपादक—लोकमित्र, खानापूर; किंमत चार आणे. जीवितकार्य, आश्रमचतुष्टय, वाचन आणि लेखन, स्त्रीपुरुष आणि विवाह, संपत्ति आणि तिचा विनियोग, संगति आणि मैत्री, परोपकार, धर्म आणि नीति, मृत्यु या अति महत्त्वाच्या विषयांचें

विवेचन या पुस्तकांत रा. पंडित यांनीं केलें आहे. पुस्तक पत्ररूपानें लिहिलें आहे; त्यामुळें प्रत्येक विषयाचा सविस्तर विचार न होऊन नुसतें 'दिग्दर्शन' झालें आहे. 'संसार नेटका' करून परमार्थ साधणें, हेंच जीवितकर्तव्य होय. हें कर्तव्य पार पाडण्याला उपयोगी पडतील, असेच विषय रा० पंडितांनीं निवडले असून त्यांचें प्रतिपादनही त्यांनीं समतोल मनानें केलें आहे. जुन्यानव्याच्या कांटेरी जगलांतून जातांना त्यांनीं वाट चांगली मोकळी केली आहे. एकंदरींत पुस्तक तरुण पिढीच्या हातीं पडण्यासारखें आहे. पत्ररूपानें विषयाचें प्रतिपादन करणें ही पद्धति आपल्या फारशी परिचयाची नाहीं. इंग्लंडांत ती बरीच लोकमान्य आहे. आपल्याकडे पहिल्यानें 'सगुणाबाईचीं पत्रें' व 'गोविंदरावांचीं पत्रें' करमणुकींत प्रसिद्ध झालीं. ही पद्धति चांगली खरी, पण पत्राच्या व निबंधाच्या भाषेंत कांहींसा फरक असतो. तसा फरक प्रस्तुत पुस्तकात दिसत नाहीं. फक्त मथळ्यावरून व शेवटच्या 'आशीर्वादा' वरून हें पत्र आहे, हें लक्षांत येतें. 'सगुणाबाई'च्या व 'गोविंदरावां'च्या पत्रांत जो चटकदारपणा, जो मोहकपणा, जो प्रेमळपणा दिसून येतो, त्याचा अभाव प्रस्तुत पुस्तकांत पदोपदीं भासतो. पत्रांना तोंडी भाषा असावी, ग्रांथिक केव्हांही नसावी; तरच तिच्या अंगीं वरील गुण येऊन विषयालाही सोपेपणा येतो. प्रस्तुत पुस्तकांत त्यांतले त्यांत 'परोपकार' हाच काय तो विषय सोपा झालेला आहे. 'लोकमित्राच्या बालवाचक बंधुभगिनीवर्गास ही ( माला ) बोधपर होईल, अशा आशेनें त्यांस सप्रेम अर्पण' केली आहे, हें योग्य आहे. पण त्यांतील प्रतिपादनाची शैली, अवतरणांची गर्दी, भाषेचा व शब्दांचा कठिणपणा यांमुळें ती बालांना झेंपणार नाहीं, असें आम्हांस वाटतें. प्रौढांनामात्र फार चांगली आहे.

६ भुरळ—' आमचीं गृहचित्रें ' या मालेंतील दुसरें चित्र—अर्थात्

कादंबरी. चित्रकार--रा. नारायण हरि आपटे, सातारा. प्रकाशक—रा. महादेव गणेश गोरे, दादर—मुंबई. किं. १। रुपया. ही कादंबरी लिहिण्याचा हेतु याच पुस्तकाच्या ३२ व्या पानावर नायिकेच्या तोंडून ग्रंथकारांनीं वदविला आहे, तो असा:--"सुशिक्षित स्त्रियांवर एक मोठा आरोप (कोणता ?) असतो! तो आरोप आपणावर लागू होऊं नये, म्हणून नव्हे (काय नव्हे ?), तर स्त्रीला सुशिक्षण हें किती शोभा देणारें, विनय देणारें, शील बनविणारें आहे, हें जगाला--नव्हे आमच्या निर्बुद्ध समाजाला---दाखविण्याचा इंदिरेनें निश्चय केला." तसेंच, "सापत्न माता सरसकट दुष्ट असतात ह्यावर तांबडी रेघ मारून 'स्त्रिया स्वभावतः कोमलहृदयी पण अज्ञान असतात. त्यांना सांभाळून घेतल्यास त्यांच्या स्वभावांत दुष्टपणा येणें कठिण आहे.' असें लोकमत व्हावें, याबद्दलही ती आपल्या वर्तनानें प्रयत्न करणार होती." या उद्देशाप्रमाणें ग्रंथकारांनीं आपली नायिका इंग्रजी सहा इयत्ता शिकून सत्त्वगुणप्रधान झाली, असें कल्पिलें आहे. पण आम्हांस तिच्या आंगचा सत्त्वगुण मूळचाच होता, असें वाटतें; हल्लींच्या सुशिक्षणानें (?) तो तिच्या आंगीं आला असें वाटत नाहीं. हल्लींच्या रजोगुणप्रधान शिक्षणाचा स्त्रीपुरुषांवर असा परिणाम झालेला दिसत नाहीं. शिवाय प्रस्तुत नायिकेपेक्षांही सत्त्वाढ्य स्त्रिया पूर्वींच्या काळीं —जेव्हां शिक्षण नव्हतें अशा काळीं—होऊन गेल्या आहेत. आम्ही स्त्रीशिक्षणाच्याविरुद्ध नाहीं; पण हल्लींचें शिक्षण म्हणजे केवळ परीस आहे, असें आम्हांला तरी वाटत नाहीं. तेव्हां कादंबरी लिहिण्याचा मूळ हेतु प्रस्तुत कथानकानें साधेल, असें आम्हांला दिसत नाहीं. एकंदरींत ही कादंबरी वाचून आमची अत्यंत निराशा झाली. हल्लीं ज्या हलक्या दर्जाच्या कादंबऱ्या रोज प्रसिद्ध होत आहेत, त्यांतच कोठें तरी हिला बसावें लागेल. कथानकांत रमणीयता नाहीं, रचनेंत फारशी कुशलता नाहीं, पात्रांचा

स्वभावपरिपोष व्यवस्थित नाहीं, निरनिराळ्या प्रसंगांत हृदयंगमता नाहीं, व वर्णनांत आनंददायकता नाहीं. भाषेचा गचाळपणा तर विचारूं नये. तींत प्रसंगोचितता मुळींच नाहीं. गंभीर प्रसंगीं बाष्कळ शब्दांची रेलचेल उडवून दिलेली आहे. इंग्रजी म्हणी, इंग्रजी वाक्प्रचार, इंग्रजी वाक्यरचना हीं पुस्तकांत जागजागीं पेरलेलीं असल्यामुळें मराठी भाषेला भ्रष्ट करण्याचें महापातकमात्र रा. आपटे यांनीं जोडिलें आहे. शिवाय केवळ मराठी जाणणारांना अनेक वाक्यें परकीयपणानें दुर्बोध होणारीं आहेत. कादंबरी जर निराधार किंवा स्वतंत्र आहे, तर भाषेंत असा धेडगुजरीपणा कां यावा, याचा उलगडा आम्हांला तरी होत नाहीं. अशा इंग्रजीच्या धर्तीवर गेलेल्या वाक्यांचे नमुने आम्हीं हजारों दाखविले असते, पण तितकें विस्तृत परीक्षण करण्याला आम्हांला सवड नाहीं. एकच वाक्य पुढें देतों म्हणजे शितावरून भाताची परीक्षा या पुस्तकाच्या बाबतींत तरी वाचकांनीं आमच्या भरंवशावर खुशाल करावी. "अच्युतरावही धडधडत असलेल्या हृदयानें (?) दरवाजाच्या आंत शिरले." अच्युतराव 'हृदयानें' कसे शिरले कोणाला ठाऊक! समासघटित शब्द जोडलेले नाहींत, उद्गारचिन्हांचे जागीं अनेक ठिकाणीं प्रश्नचिन्हें घातलीं आहेत, स्वल्पविरामांच्या जागीं पूर्णविराम घातले आहेत, व लिपिदोषांचा केवळ सुकाळ आहे! तात्पर्य, रा. आपटे यांना आमचें असें सप्रेम सांगणें आहे कीं, मराठींतील उत्तम कादंबरीकार होण्याची हांव धरण्यापूर्वीं त्यांनीं मराठी व्याकरणाचें, वाक्यरचनेचें व वाक्संप्रदायांचें पायाशुद्ध अध्ययन करावें. केवळ इंग्रजी भाषेच्या ज्ञानाच्या जोरावर मराठी भाषेची अशी नाचक्की मांडूं नये. रा. आपटे हे होतकरू आहेत, महत्त्वाकांक्षी आहेत, व्यासंगी आहेत; म्हणूनच हितकर बुद्धीनें त्यांच्या बऱ्यासाठीं हे कटु शब्द लिहिणें आम्हीं पत्करिलें. त्याचा त्यांनीं विषाद न मानतां आत्मसंशोधनानें आपली सुधारणा करून घ्यावी, इत-

कीं आमची त्यांना नम्र विनंती आहे. कडक शब्द वापरल्याबद्दल त्यांची क्षमा मागून आम्ही येथेंच पुरे करितों.

---

७ यूरोपांतील महायुद्ध—लेखक, 'एक इतिहासभक्त.' प्रकाशक, दामोदर सांवळाराम आणि मंडळी, ठाकूरद्वार–मुंबई. किंमत १॥ रुपया. पण इंदुप्रकाश व सयाजीविजय या पत्रांच्या ग्राहकांस फुकट. या दोन्ही पत्रांच्या वर्गणीदारांना दरसाल एकादें उपयुक्त पुस्तक भेट म्हणून प्रकाशकाकडून मिळतें. आजपर्यंतचीं भेटीचीं प्रकाशकांनीं दिलेलीं बहुतेक पुस्तकें उत्तमच होतीं. पण यंदांचें हें पुस्तक लोकांना खरोखर फारच उपयुक्त आहे, यांत शंका नाहीं. युरोपांत महायुद्ध पेटल्यापासून सर्व जगाचें लक्ष युद्धाच्या माहितीकडे विशेष लागलें आहे. त्याप्रमाणें हिंदुस्थानांतील लोकांचें तिकडे साहजिक लक्ष वेधून राहिलें आहे. आज हा युद्धाचा विषय अगदीं अग्रस्थान पटकावून बसला आहे. अशा वेळीं युरोपीअन राष्ट्रांविषयीं, तेथील राजकारणांविषयीं, युरोपीयन युद्धनीतीविषयीं, तिकडील आधुनिक शस्त्रास्त्रांविषयीं व प्रस्तुत युद्धाच्या कारणांविषयीं अनेक प्रकारची उपयुक्त माहिती या पुस्तकाच्या द्वारें आपल्या ग्राहकांना देण्याची व्यवस्थापकांनीं केलेली योजना अगदीं योग्य व प्रशंसनीय आहे. पुस्तक पुष्कळ माहितीनें भरलेलें तर आहेच; पण त्याला नकाशे जोडण्याची व्यवस्था केल्यानें व अनेक चित्रें आंत दिल्यानें त्याच्या उपयुक्ततेंत चांगलीच भर पडली आहे. युद्धाच्या माहितीनें भरलेलीं एक दोन पुस्तकें मराठींत मागें झालेलीं आहेत; पण हें पुस्तक त्या सर्वांना मागें टाकणारें आहे, असें आम्हांस वाटतें. तात्पर्य, युरोपांतील राष्ट्रांची व त्यांच्या डावपेंचांची माहिती करून घेऊं इच्छिणारांनीं हें पुस्तक जरूर वाचून पहावें. भाषाही फार चांगली व बहुतांशीं निर्दोष अशी आहे.

---

जुनें वर्ष २६ वें.

# केरळ-कोकिळ

वार्षिक वर्गणीः—
१–८–०
टपालखर्च निराळा.

पत्ताः—
४९७, बुधवार पेठ,
पुणें शहर.

कश्चित्झिल्लीनादः कचिदतुलकाकोककलहः ।
कचित्फूंकारावः कचिदपि कपीनां ककलः ॥
कचिद्घोरः फेरुध्वनिरयमहो दैवघटनात् ।
कथंकारं तारं रसति चकितः कोकिलयुवा ॥ १ ॥

वर्ष ४ थें.] एप्रील १९१५. [अंक १० वा.

## विषयानुक्रम


| | | |
|---|---|---|
| १ | महागनवियोग (कविता) | १ |
| २ | स्त्री-पुरुष-शिक्षण (ले० १०) | ३ |
| ३ | किती विचित्र भेट! (एक गोष्ट) | १८ |
| ४ | कै० गोपाळ कृष्ण गोखले. | २८ |
| ५ | कोलंबोपासून आल्मोरापर्यंत. | ४१ |
| ६ | वार्ताविहार. | ४७ |
| ७ | जीवन-रहस्य (चालू कादंबरी) | १४५-१६० |


हें पुस्तक अच्युत चिंतामण भट यांनीं पुणें, पेठ कसबा येथें आपल्या यशवंत छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

स्वाधीन झालेले त्यांनी पाहिले, आपल्याच देशांतील लोक सन्माननीय पाहुण्यांप्रमाणें त्यांचें स्वागत करीत आहेत,--जणूं काय त्यांचें कृत्य मोठें अनुकरणीय आहे--असें त्यांना दिसलें, म्हणजे त्यांच्या मनांवर काय परिणाम होईल? जपानी शिपायांच्या मनांवर याचा भलताच परिणाम होणाचा संभव आहे. जे निर्लज्जपणानें शत्रूच्या स्वाधीन झाले, त्यांचा जर असा जिकडे तिकडे मान होतो आहे, तर त्यांनीं ( जपानी शिपायांनीं ) स्वाधीन होण्यापेक्षां मरण कां पत्करावें? जपानी लोकांनींच तेवढें शूर व राजनिष्ठ असावें, बाकीच्यांनीं असूं नये, असें का त्यांनीं समजायचें? परकीयांच्या बाबतींत जी गोष्ट सन्मानाला व सुखाला कारण होते, तीच गोष्ट जपानी लोकांच्या बाबतींत निंद्य समजली जावी, हें निदान चमत्कारिक आहे. जपानी शिपायांना पूर्वीं बंदिवास जितका अपमानास्पद वाटत होता, तितका ही स्थिति पाहिल्यानंतर वाटेल का? जर्मन कैद्यांना हल्लींपेक्षां निष्ठुरतेनें वागवावें, असें सुचविण्याचा हेतु नाहीं; पण या उदाहरणाचा जपानी शिपायांच्या मनांवर भलताच परिणाम होऊन त्यांचें ( जर्मन शिपायांचें ) ते अनुकरण करणार नाहींत, व जपानी शिपायांचा मूळ बाणा कमी होणार नाहीं, याकारितां शक्य ती तजवीज केली पाहिजे."

---

# केरळकोकिळ.

वर्ष ४ थें.] एप्रील १९१५. [अंक १० वा.


## महाजनवियोग !

### नामदार गो. कृ. गोखले यांचा शोकजनक मृत्यु !!

पद—( चाल—भला जन्म हा तुला ......... )

अयि गोपाला ! स्वजनवत्सला ! आत्मनिष्ठ मंगला ! ।
कसा ये वीट आमुचा तुला ? ॥ ध्रु० ॥
या अंजाळीं चिंताजाळीं जीवनकलहानळीं ।
त्यजुनियां जासी कोण्या स्थळीं ॥
देवदानवीं परम भयंकर कलह पुन्हा मांडिला ।
म्हणुनि का जासी स्वर्मंडला ? ॥
चिरवियोग तव हा सांग केविं सोसवे ।
होईल कसें तुजमागें अमुचें, कवे ! ।
हितगूज करावें आतां कोणासवें ? ।
कोण आमुचीं दुःखें आतां नृपकर्णीं प्रेमला ! ।
घालिल, सांग सांग वत्सला ! ॥ १ ॥
दाद आमुच्या देशभूमिची भरतसचिवमंदिरीं ।
कोण वद लाविल वरचेवरी ? ॥
“ भारतसेवकमंडलमंदिर ” उदास तुजविण दिसे ।

जीवनाभावीं सर तें असें ॥
जी अपूर्ण तव बा ! कार्यावलि राहिली ।
संपूर्ति तिची जो करील बहु चांगली ।
मज असा दिसेना संप्रति कोणी बली ।
जन्महेतु का तुजला अपुला सफल दिसे जाहला ? ।
म्हणुनि चिरविश्रम हा घेतला ॥ २ ॥
सार्थक झालें तव जन्माचें, तूंच खरा जन्मसी ।
वाटतें विचार करितां मसीं ॥
जग उफराटें नाथें कथिलें खोटें म्हणुं तें कसें ? ।
पदोपदीं अनुभव मज येतसे ॥
जनता म्हणते मृत तुज गणिते, न्याय काय हा असा ? ।
म्हणावें अंध कसें डोळसा ? ॥
हा प्रतिदिनिं नेमें कार्यभार सारुनी ।
जरि बुडे सागरीं तेजस्वी दिनमणी ।
हा निमे वसुमती वसंत शृंगारुनी ।
लतिकाराधाजीवन माधव मेला रविही भला ।
म्हणावें न कळे कैसें मला ! ॥ ३ ॥
वन्यसृष्टि ही कुसुमाभरणीं मंडित जोंवरि दिसे ।
गणावें वसंत मेला कसें ? ॥
जगज्जीवनाधार तरणि हा प्रकाश जरि देतसे ।
तया तरि मृत मीं मानूं कसें ?॥
जोंवरी तुझी ती दिव्यतमा वाग्झरी ।
घुमतसे सारखी माझ्या श्रवणांतरीं ।
जोंवरी तुझ्या त्या सती सुकृति सुंदरी ।
येती दिसती नयनांपुढती रात्रंदिन मंगला !
म्हणावें मृत वद कैसें तुला ! ॥ ४ ॥
आशावादी आशारत तूं, आशा तव देवता ।

नव्हे- तूं आशामूर्ति स्वतां ! ॥
चिरंजीविनी वदती आशा मृत्यु न तिजला कधीं ।
सांगतो अनुभवयोगी सुधी ॥
बा ! सांग तुला मी मृत मग मानूं कसें ? ।
लागलें दिसे या जनांस अवघ्या पिसें ।
कां करोनि घेती न कळे ऐसें हंसें ।
आशा साऱ्या दिसति जोंवरी मृत्यु न केव्हां तुला ।
रडे कां जनता न कळे मला ! ॥ ५ ॥
जीवमान तूं परंतु आम्ही जीवन्मृत मज गमे ।
आमुचें स्वार्थी नित मन रमे ॥
असोनि आम्ही काय लाभ वद ? नसोनि हानी नसे ! ।
सुकार्यी व्यत्यय असुचा असे ।
मग सांग कोण बा ! तूं कीं आम्ही मृत ।
जीवंत अजुनही वदतों तुज निश्चित ।
हें रुचे न कोणा निःस्पृह जरि मन्मत ।
' आप मुवे पर डुब गयि दुनिया ' कबिरवचीं या तुला ।
मानुं का मृत मी आजि मंगला ! ॥ ६ ॥

—अनंततनय.

---

# स्त्री-पुरुष-शिक्षण.

## लेखांक १०.

लेखक—एम्.

" The errors of our educational system have much to do with the physical degeneracy of the race. The pressure to which our children are subjected in

the public schools has the result of sapping their vitality, retarding their physical growth, undermining their nervous system and preparing the way for a debilitated, incompetent manhood as a neurasthenic unwomanly womanhood. Our public schools, as an established institution, is simply a reflection of the perverted civilization which it rpresents."

Macfadden.

मागील लेखांत, पढिक किंवा सुशिक्षित आणि शहाणा किंवा मेधावी यांतील तारतम्य सांगून सुशिक्षित मुलें निपजणें तर तुल्यशिक्षणाच्या आया पाहिजेत हें म्हणणें कितपत सत्य आहे, हें दाखविलें; व आजकाल मुलांमुलींच्या गळ्यांत कंठभूषण म्हणून बांधल्या जाणाऱ्या इंग्रजी वगैरे पाश्चात्त्य भाषांची निरर्थक अक्षरघटना व तीपायीं होतकरू तरुणांची अखंड होत असणारी द्रव्यबलकालहानि हिचें दिग्दर्शन केलें, हें वाचकांस स्मरत असेलच. आजचे अंकांत या भाषांतील आणखी कांहीं क्लेशदायक गोष्टींचा प्रथम उल्लेख करून मग पुढील सामान्य विचारास लागूं.

इंग्रजी भाषेचें बिकटपणाला भर घालणारी दुसरी गोष्ट म्हणजे आमचे देशी भाषांशीं थेट व्युत्क्रम स्थितींत असणारी तिची क्रियाकर्मव्यवस्था व विभक्तिप्रत्ययाभाव. आमची व्यवस्था म्हणजे प्रथम कर्ता, नंतर कर्म, अखेर क्रियापद. इंग्रजी व्यवस्था म्हणजे प्रथम कर्ता, नंतर क्रिया, अखेर कर्म. आम्ही म्हणणार, साप बेडुक किंवा बेडकास खातो. इंग्रज म्हणणार, 'साप खातो बेडुक'. आमचे मुलांना बालाभ्यास स्वभाषेचा, तेव्हां तीं पुष्कळ काळपर्यंत या वाक्यरचनेंत ठेंचळतात व कितीकदां तरी ऐनवेळीं अप्रदक्षिण परिषेक करणाऱ्या कुंभार-ब्राह्मणाप्रमाणें विद्वानांसमोर फजीत होतात. कारण चिराभ्यासामुळें ते स्वभाषेचे वळणावर

जाऊन चटादेशीं कर्ता, कर्म, क्रिया अशी योजना इंग्रजींतही करितात. आणि ह्या स्थलविपर्यास देशी भाषेंत इतका अक्षम्य झाला नसता असा तो इंग्रजींत होतो; तेथें तो नुसता अक्षम्य नव्हे—अनर्थावहच—होतो. आणि याला कारण त्या भाषेंतील प्रत्ययाभाव. आमचे मराठींत, किंवा संस्कृतांत, कर्ता-कर्म-क्रिया-क्रमाचा प्रसंगीं व्यत्यासही झाला, तरी त्यापासून बहुधा अनर्थ होत नाहीं. कारण ज्याचा त्याचा बंदोबस्त ज्याचे त्याचेपाशीं असल्यानें कोणतेंही पद कोठेंही पडलें तरी भय नसतें. ' रामानें रावणास मारिलें ' (मराठी), किंवा ' रामो रावणं जघान '( संस्कृत ) या वाक्यांतील पदक्रम कसाही फिरविला तरी अनर्थ मिळून नाहींच उत्पन्न होत. खरी कस्तुरी कोठेंही पडली, तरी तिचें कस्तुरीपण नाहींसें होत नाहीं. पण नेपाळेश्वर-भालासारख्या विशिष्ट स्थानाचे आश्रयामुळेंच क्षणभर कस्तुरी-पदवीला पोंचणारा कर्दम स्थानभ्रंश होतांच जसा मातीमोल होतो, त्याचप्रमाणें पदव्यत्यासामुळें अप्रत्यय पदांची इंग्रजी भाषेंत अवस्था होते. 'राम किल्ड रावण ' याचे ऐवजीं ' रावण किल्ड राम ' अशीं पदें ठेवतांच केवढा अनर्थ गुजरतो, हें तज्ञांस सांगणें नकोच.

याच प्रत्ययहीनत्वापासून उद्भवणारा दुसरा क्लेश म्हणजे शब्दयोगी किंवा उपसर्ग यांची योजना. ह्या योजनेनें शब्दप्रपंच फार वाढतो. आम्ही जेथें ' घरीं ' किंवा 'गृहे ' म्हणून एका शब्दांत संपवूं, तेथें ' इन दि हौस ' किंवा ' ॲट होम ' याप्रमाणें तीन किंवा दोन तरी शब्द घातल्याशिवाय सुटकाच नाहीं. बरें, वाक्य म्हटलें कीं पदोपदीं साविभक्तिक पदें येणारच, आणि दरपदाला अशी द्विगुण त्रिगुण वाढ म्हणजे केवढा जोजार होतो, तो निःपक्षपाती वाचकांनीं ध्यानीं आणावा.

या भाषेंतील तिसरी त्रासदायक गोष्ट म्हणजे तींतील आर्टिकलें किंवा उपपदें. हीं उपपदें पूर्वाश्रमीं कितीही समर्थ असलीं, तरी सांप्रत

स्थितींत आमचा एक विनोदी स्नेही म्हणे 'असून अडचण, आणि नसून खोळंबा' तशांतलीं आहेत. तीं नाहींत त्या भाषांचें काय अडलें आहे? कदाचित् हीं शोभादायक असलीं, तरी बहुतेक अजागलस्तनांचीं भांवडेंच म्हणायचीं. नसती लडबड.

या भाषेंत शब्दप्रपंच वाढविणारी चवथी गोष्ट म्हणजे तींतील संधींचें व सामासिक पदांचें अल्पत्व. संधि व समास यांचे योगानें संस्कृत भाषेला कसें संहतत्व व अल्पाक्षररमणीयत्व प्राप्त झालें आहे, हें अभिज्ञांस परिचित आहेच. मराठींतही ह्या दोन्ही सोई बऱ्याच अंशानें आल्या आहेत, त्यामुळें या उभय भाषांना आटपसरपणा आला आहे. परंतु इंग्रजींत हें संहतिसामर्थ्य अत्यल्प असल्यामुळें तिला आटपसारपणा मुळींच नाहीं. जो मजकूर संस्कृतांत एका ओळींत लिहिला जाईल, त्यालाच इंग्रजींत चारपांच ओळीही कधीं कधीं पुरणार नाहींत. उदाहरणार्थः "मजन्मातंग-कुंभ-च्युत-मद-मदिरा-मोद-मत्तालि-जालम्" ही ओळ घेऊं. हींत दहा शब्द किंवा पदें व २१ अक्षरें आहेत. यांचा अर्थ इंग्रजींत देणें तर दहांच्या तिप्पट तरी पदें व सात-आठ-दहा-पट तरी अक्षरें खर्चिल्याशिवाय निर्वाहच नाहीं. कोण व्याप आणि केवढा आयुष्यक्षय हा! कोणी म्हणेल, संस्कृतांतील ही पदांची दावण उकलण्याला कांहींच क्लेश नाहींत का? —क्लेश आहेत, पण ते एकवार आहेत; आणि हा इंग्रजींतला कालव्यय दर वेळीं आहे, हें विसरतां कामा नये.

शेवटला दोष—म्हणजे इंग्रजी भाषेंतील अफाट शब्दनिधि. वाचक म्हणतील हा दोष कीं गुण?—हा गुण खरा; पण तोच एका अर्थी दोषपदवीला चढला आहे. कारण, असा कोणीही विद्यार्थी नाहीं कीं, त्याची कोशाची अपेक्षा संपली. यामुळें शब्दसंग्रह कधीं पुरेसाच होत नाहीं.

असे अनेक त्रासदायक प्रकार या भाषेंत असल्यामुळें ती अंगवळणीं पडण्यास फार फार कष्ट पडतात. पांच पांच सात सात वर्षें तिच्या अभ्यासांत घालवूनदेखील ती हुकुमांत येण्याइतकी सलगी दाखवीत नाहीं. या गोष्टीची सत्यता यंदांचे प्रवेशपरीक्षेचे निकालावरून सहज पटण्याजोगी आहे. प्रवेशपरीक्षेला बसलेले विद्यार्थी खरें पाहतां अलीकडील दहाबारा वर्षांपासून अंमलांत असलेल्या पद्धतीनें स्वदेशी श्रीगणेपासून क्रमवार शिकत आलेले आहेत. हल्लीं पूर्वींप्रमाणें केवळ शाब्दिक शिक्षण नसून आर्थिक म्हणजे वस्तुपाठसहित आहे. अर्थात् केवळ पोपटपंची किंवा परोक्षज्ञान नसून वास्तव व अपरोक्षपद्धतीनें दिलें गेलेलें हें ज्ञान आहे. शिवाय पंचवीस पानांचे प्रायमरपासून दर इयत्तेस तीनशेंपांसष्ट दिवस खर्चीं घालीत घालीत पक्कीं सात वर्षें खर्चून व एस्. टी. सी. वगैरे शिक्षणकौशल्याच्या परीक्षा देऊन तरबेज झालेल्या अशा शिक्षकांचे तालमींतून तयार झालेले आहेत; असें असून प्रवेशपरीक्षेला पुरेसेंही ज्ञान बिचाऱ्यांना कमावितां येऊं नये, हें काय ? याला अन्य कांहीं कारणें असतीलच, तथापि या विलायती भाषेचें दुराराध्यत्व हें यांतील प्रधान कारण आहे, हें खचित. असली एक भाषा काबीज करण्याकरितां जे श्रम पडतात, तेवढ्यांपेक्षां कमी श्रमांत आपल्या देशांतील गुजराथी, बंगाली, हिंदुस्थानी व कानडी या चारी भाषा आपल्याशा करितां येतील. आणि हिंदुस्थानांत ऐक्यभाव वाढावा म्हणून एकभाषा इष्ट आहे, याकरितां इंग्रजी शिकावयाची हांव धरण्यापेक्षां तिच्याऐवजीं आपल्याच चारी भाषा शिकणें अधिक उपयुक्त व सुखावह होईल, हें खास. कारण, कांहीं झालें तरी चारही इलाख्यांतील प्रत्येक स्त्री-पुरुष-मुलाला इंग्रजी अवगत होणें आणखी पांचशें वर्षांनीं तरी संभवेल कीं नाहीं, याची वानवाच आहे; व ऐक्याचें जें उद्दिष्ट आहे तें जर भाषैक्याचे द्वारें कधीं सिद्ध होईल असें कोणाचें स्वप्न असेल, तर

तें केवळ वरवरचीं माणसें एकभाषी झाल्यानें खरें होणें शक्य नाहीं. कॉंग्रेस-प्लॅटफॉर्मवर ज्यांची जुतेफेक झाली, ते सर्व या विलायती भाषेंत प्रावीण्य संपादलेलेच होते. परंतु त्यांचें हें भाषैक्य मतैक्याला किंवा एकदिलीला पोषक झालेलें अनुभवास आलें नाहीं. नाणावलेल्या शहाण्यांचा हा प्रकार; मग सामान्यांत हें साधन कितपत इष्टापत्ति करील तें दिसतेंच आहे. तेव्हां इंग्रजी भाषेचे ज्ञानानें हा देश आसेतुहिमाचल एकदिल व एकजीव होईल, किंवा इंग्रजीवांचून तसा तो होणार नाहीं, हें म्हणणें वायफळ आहे.

अशा स्थितींत, स्त्री असो, पुरुष असो, त्यास इंग्रजी पढल्यावांचून सद्गति नाहीं, असा जो समज पसरत चालला आहे, तो फारसा समंजस नाहीं. राज्यकर्ते इंग्रजी भाषेचे आहेत व तींत विविध ग्रंथसंपत्ति आहे. त्या अर्थी त्या भाषेचें ज्ञान पाहिजे आहे. परंतु तें आज ज्याप्रमाणें स्त्रीपुरुषें तनमनधनाचा होम करून मिळविण्याचे नादीं पडलीं आहेत, तशा योग्यतेचें खास नाहीं. पुरुषांपैकीं ज्यांना तुकडा मिळविण्यास दुसरें साधन नाहीं अशांनीं, किंवा ज्यांना राजकर्त्यांच्या चुका त्यांचे पदरांत घालणें आपले आयुष्यांतील इतिकर्तव्य धरून चालावयाचें आहे अशांनीं, किंवा जे इंग्रजींतील अनुपम ग्रंथभांडारावर लुब्ध झाले असतील, किंवा ज्यांची इतकी सुखवस्तुस्थिति आहे कीं, ज्यांना वेळ कसा घालवावा हें सुचत नाहीं, अशा पुरुषांनीं या भाषेचें ज्ञान श्रमपूर्वकही संपादावें; इतरांनीं त्याचे इतकें भरीस पडूं नये. निदान आमचे देशांतील सद्यःस्थितींत स्त्रीवर्गानें तरी या परभाषेचें संपादनांत पुरुषांप्रमाणें आपलीं हाडांचीं काडें करूं नये. वरील गोष्टी करण्याला पुरून उरतील इतके पुरुष आजकाल इंग्रजी शिकले आहेत, ते कितपत आकाशांतील चंद्र धरणीवर आणीत आहेत, तें दिसतेंच आहे; मग त्याच नादीं स्त्रीवर्गानेंही लागावें, हें निव्वळ खूळ नव्हे काय ? पण याला

खूळ म्हणावें कोणीं? हें खूळ नव्हे. ही फॅशन आहे. चहा पिणें, थिएटरला जाणें, बूट-स्टॉकिंग्स चढवून व चष्मा घालून यस् फ्यस् करीत इंग्रजी शाळेंत, कॉलेजांत जाणें व पुरुषांचे बरोबरीनें वीस वीस पंचवीस पंचवीस वर्षें वयाला होतपर्यंत इंग्रजी बूक छातीवर घेऊन पडणें, ह्या तर सुधारणेच्या, दिव्यतेच्या आजकालच्या ठळक खुणा आहेत. ह्या जिच्या अंगीं नसतील ती स्त्री केवळ खुळी, अडाणी, गांवढळ, मूढ, रानटी; ती या दिव्यांगनांचे सहवासास किंवा स्नेहास सर्वथा अपात्र, असा समज जोरावत चालला आहे. परंतु या दिव्य मानिलेल्या गोष्टी किती अनर्थक आहेत हें कोणी पुरें पहात नाहीं, किंवा कांहीं आईबापांना त्या दिसत असल्या तरी बहुमतापुढें त्यांचा टिकाव लागत नाहीं. मुलांचे शिक्षणालाच पैसे कसे पुरवावे, ही ज्यांना पंचाईत पडली आहे अशा किती तरी सामान्य स्थितींतील आईबापांना या रूढिराक्षशीचे भयास्तव स्वतःचे पोटाला चिमटा घालून पोरींनाही मुलांचे बरोबरीनें पैसे पुरवावे लागत आहेत. कारण, असें न करील तो बाप मूर्खांत किंवा कर्तव्यशून्यांत गणिला जाणार; आणि जो तो या लोकैषणेला भितो.

पण ही स्थिति सर्वथा शोचनीय आहे. हा चहा, हीं थेटरें, हे बूट, हे चष्मे, हें घोडवय होई तों शाळेंत जाणें व हें पुरुषांचे बरोबरीनें परीक्षा देत बसणें, ह्या सर्व गोष्टी आम्ही एक अपूर्व लाभ असें मानून ज्यांपासून उचलितों आहों, त्यांना ह्या आजकाल किती अनिष्ट वाटूं लागल्या आहेत, हें त्या लोकांतील विद्वानांचे ग्रंथ लक्षपूर्वक वाचील त्याला तेव्हांच कळून येईल. या कामीं अनेक लेखकांनीं आपल्या लेखण्या झिजविल्या आहेत. ह्या अनिष्ट गोष्टी सुटतील कशा, असें तिकडच्यांना होऊन गेलें आहे. असें असून त्याच गोष्टी आम्ही मोठ्या प्रेमानें व अत्यादरानें कवळीत आहों, ही दुर्दैवाचीच निशाणी नव्हे काय? पुढल्यास ठेंच लागलेली

पाहूनही मागल्यानें तसेंच चालावें, हा प्रकार खचित खेदजनक आहे. या प्रकारापासून लोकांनीं परावृत्त व्हावें म्हणून आम्ही या वरील गोष्टींबद्दल तिकडील समर्थ विद्वानांचे अभिप्राय येथें नमूद करितों.

'एनसॅक्लोपीडिया ऑफ फिजिकल कल्चर' म्हणजे शारीरशिक्षणावरील आकरग्रंथ या नांवाचे पुस्तकांत ( पानें ४६४-५ ) मॅकफडन म्हणतो कीं, " अमेरिकेंत चहाचें व्यसन खाचित वाढत आहे. त्यांतूनही स्त्रीवर्गांत तें फारच बळावत आहे. परंतु ही गोष्ट आनंद मानण्यासारखी नाहीं. हें भावी संततीचें विपत्तीचें बीज आहे. या पेयाचे वेडानें आमच्या तरुण मुली लौकरच साठवर्षांच्या पंक्तीस बसूं पहात आहेत. हें आमचें म्हणणें कांहीं तरी कल्पनाचित्र नसून शास्त्रीय सिद्धान्तरूप आहे. कडक चहानें दुर्बलता व निःसत्त्वता येऊन स्नायूंतील शक्ति ऱ्हास पावते व अखेर वलीपलित प्राप्त होतें. चहाचे नादीं जी तरुणी लागली, ती कधींही मुसमुशीत व चित्ताकर्षक होणार नाहीं. 'मत्तकाशिनी' हें स्पृहणीय विशेषण तिचें वांट्यास कधींही येणार नाहीं. शारीरिक दैन्य तिला अकालींच गांठील. परंतु, त्याबद्दलचा दोष दुसरे कोणाकडे नसून तिनें स्वीकारलेल्या ह्या अस्वाभाविक, अनवश्यक व अपायकारक पेयाचे संवयीकडेच आहे."

आमचे ह्या दुर्दैवी देशांतही हें व्यसन पुरुषांपेक्षा स्त्रियांत अति जोरावत आहे. खरोखरच स्त्रियांनीं या बाबतींत केवळ ताळ सोडिला असें म्हणणें भाग येतें. परवांच एका लग्नांत आम्हीं असें पाहिलें कीं, कावळ्यानें काव केलें नाहीं तों घागर दोन घागरी चहा यजमानाचे घरचा पिऊन पुनरापि दोन तासांनीं वरमायेच्या तोंडधुण्यावर विहिणीपासून प्यालेचे प्याले प्रत्येक बाई निःशंक झोंकीत होती व आपला बहुमान झाला असें मानीत होती. बिचाऱ्या दुर्दैवी स्त्रिया!

वरील कोशकार म्हणतो कीं चहाचें हें अनर्थकारित्व ध्यानीं घेऊन प्रत्येक शहाण्या आईबापानें आपले पोरास ही संवय जडणार नाहीं, अशी खबरदारी घेतली पाहिजे, हें उघड आहे.

आतां नाटकगृहांबद्दल सदर लेखक म्हणतो कीं, नाटकगृहांतून परतल्यावर किती तरी स्त्रियांना व पुरुषांना कपाळशूळ उठतांना माझे पाहण्यांत आहे. याचें कारण एक तर थेटरांतील कोंडलेली हवा, आणि दुसरें खेळानें मनावर होणारा परिणाम. कारण, आजकालचे पुष्कळच खेळ केवळ प्रेक्षकांचे ज्ञानतंतु हैराण करून सोडण्याचे उद्देशानें रचिलेले असतात. खरोखर शीणभाग हरण करणारा किंवा सद्बोध करणारा कथाभाग थोडा वेळ एकाद वेळ पाहणें गैर नाहीं; पण निद्रेचा नाश करून दर शनवारबुधवार वेडेवांकडे खेळ पाहत बसणें फार हानिकारक आहे.

आमचे मतें, तरुणांनीं जागून नाटकें पहाण्यापेक्षां, करमणूकच पाहिजे तर दहा वाजावयाचे पूर्वीं आटपणारे सिनीमाचे किंवा सर्कशीचे खेळ पहावे.

नाटकांचेच पंक्तीस वृत्तिक्षोभ करणाऱ्या कादंबऱ्या सदर लेखक बसवितो. आणि तें सर्वथा खरें आहे. परंतु आमचे इकडेही मनोरंजनार्थ असल्या चटकदार कादंबऱ्यांचा आदर करणाऱ्यांचीच संख्या फार.

आतां बुटांचें खूळ. पुरुषांत व विशेषत: सरकारी नोकरीचे लोकांत देशी जोड्याला रजा मिळून बुटाची नेमणूक सरहा झाली आहे. ती अंशत: सकारण तरी आहे; कारण, बूट वापरण्याविषयीं कांहीं अधिकाऱ्यांचा कटाक्षच आहे. परंतु शाळांतून जाणाऱ्या मुलीबाळींत व फॅशनेबल देशी स्त्रियांतही मडमांप्रमाणेंच चवलीटांचेचे विलायती बूट घालून टपटप

---

1. "But most of the drama of the present time is devised simply to harrow the nerves of the spectator." P. 2913.

पाउलें टाकीत जाण्याची हौस वाढत चालली आहे; आणि अमेरिकेसारख्या सुधारलेल्या देशांतील विद्वानांकडे बघावें तर त्यांना हें बूट वापरणें अनिष्ट वाटूं लागलें आहे. त्यांचे मतें, खुले पावलांनीं चालणें फारच उत्तम. हें कदाचित् कोणास साधत नसेल किंवा हीनवाणी वाटेल तर त्यानें चेपल्या किंवा सपात्या वापराव्या; परंतु या बुटांचे नादीं पडूं नये. आणि त्यांतले त्यांत पेटंट लेदर बूट किंवा वाटरप्रुफ तर घेऊंच नये. कारण, असल्या बुटांचें कातडें अति घट्ट कमावलें असल्यानें त्यांत हवेचा कसा तो प्रवेश होत नाहीं, व त्यामुळें आंत पाय उबून जातो; व पायाचा घाम पायालाच जिरून देहांत घाण शिरते. मडमांचे चिमण्या बुटांबद्दल तर याहूनही अधिक ओरड आहे. चिमणीं पाउलें म्हणजे सुंदर अशी एक चुकीची कल्पना स्त्रीजनानें उचलल्यामुळें ती खरी करण्याचे भरांत स्त्रिया चवलीटांचेचे बूट घालून आपले पाय कायमचे बिघडवून घेतात. पुष्कळदां या दुष्ट चालीनें त्यांचे नेत्रांस व एकंदर सौंदर्यासही धक्का पोंचतो; परंतु त्याची कोणाला परवा वाटत नाहीं, एवढें वृथा सुंदर दिसण्याचें वेड! आमचे इकडे स्त्रिया बहुधा पायांत कांहींच घालीत नसत. कारणच तर आमचें देशी खुल्या गळ्याचे जोडे घालीत. या जोड्यांत हवा खेळती राहून शिवाय पाउलाचीं बोटेंही चिमटत नाहींत. सारांश, अपाय न होतां रक्षणमात्र होतें. परंतु सुधारणेचे साम्राज्यांत हे 'बार्बरस' ठरून बुटां-

---

1. Wearing such shoes causes the feet to become over-heated, stewing in their own foul perspiration.

Physical Culture. P. 2821.

2. A mistaken idea of the beautiful leads the average woman to desire the appearance of having small feet.

Ibid P. 2820.

वर घांव चालली आहे. हें पाहून ' इदमहो कालस्य दुश्चेष्टितम् ' असें म्हणावें असें वाटतें.

यापुढील खूळ चष्मे. आपल्यांत चष्म्याला 'चाळिशी' हा शब्द लावीत; याचें कारण वयाला चाळिशी भरली कीं, कांहीं शारीरिक फेर-फारामुळें बहुधा प्रत्येक मनुष्याला अल्पकाळ तरी दृष्टिमांद्य येतें व त्यासाठींच व तितका वेळच चष्म्याचा उपयोग मागील पिढींतील लोक करीत. ह्यानंतर कॉलेजांतील विद्यार्थ्यांत विशींतच हा क्वचित् चमकूं लागला. तरी पण क्वचित्च. गेल्या दहा वर्षांत याचा प्रचार अधिक होऊन तो बरेच विद्यालयीन तरुण मुलगे वापरूं लागले; आणि या पांच वर्षांत तर चष्मा कोणीं वापरावा व केव्हां वापरावा, याला कांहीं धरबंधच उरला नाहीं. पांचपांच सातसात वर्षांचीं मुलेंदेखील चष्मे चढवूं लागलीं. मुलें म्हणजे मुलगे आणि त्यांचे बरोबरीनें मुलीही. आतां प्रश्न असा येतो कीं, विधात्यानें या दहा वर्षांतच इतकी गैरनजर केली कीं काय? पण खरें पहातां ही विधात्याची गैरनजर नसून या सुधारणाप्रिय पिढीची या अलंकारावर झालेली मेहेरनजर आहे. पुष्कळ तरुणांना वाटतें कीं, चष्मा लावणारा तो विद्वान्. ठीकच आहे; त्याला चार डोळे. कित्येक तरुणींना वाटतें कीं, ही वरिष्ठ ज्ञानाची खूण आहे व सौंदर्याला एक मदत आहे. ही एक शोकाची चीज आहे. पण चष्मा जर नेत्रसौंदर्याला खुलावट

---

1. There are women with a perverted sense of beauty who imagine that the wearing of glasses. .... imparts an air of distinction! As well might a lame woman be proud of her crutch. But stay! Did not all the English ladies of fashion once imitate queen Alexandra's limp?

Physical Culture, P. 2815.

आणितो, तर कुबड्याही गतीला शोभा देतात असें मानून त्यांचा अवलंब कां करूं नये? बाकी या प्रश्नाचें कारण नाहीं. फॅशनचे खुळांत बाया काय करतील याचा नियम नाहीं. करतील कशाला? राणी अलेक्झांड्राचे दिडक्या चालीचें अनुकरण मोटमोठ्या इंग्रज स्त्रियांनीं केवळ फॅशन म्हणून केलें नाहीं काय?

हें या लेखकाचें विधान पाहून शेक्स्पिअरनें एके ठिकाणीं " Fashion is allied to folly " म्हणून म्हटलें आहे, त्याची आठवण येते. वाचतांलिहितांना एक वेळ चष्मा लाविला तर असो, पण कित्येकांना तर आठ प्रहरांत त्याचा केव्हांच वियोग सहन होत नाहीं. नेत्रवैद्यांकडे जावें, तर ते डोळे सुधारण्याचे उपायांचे भानगडींत न पडतां चुटदिशीं चष्मा घेण्याचा उपदेश करितात. पहिला चष्मा पुरा पडेनासा झाला, तर तो रद्द करून चढत्या नंबराचा व अधिक किंमतीचा चढवून देतात. संपलें.

सुधारणेच्या नांवाखालीं स्वीकारलेल्या ह्या बूटचष्मानाटकांच्या खुळाहूनही अधिक अपायकारक खूळ म्हणजे प्रौढ मुलींना भावी मातृपदास योग्य होण्यासाठीं अवश्य इतकें रक्तमांस पैदा करण्यास अवसर देण्याचें सोडून मुलांचे बरोबरीनें ( त्यांना ) करारबंदी शाळेचे अभ्यासाचे चरकांत घालण्याचें खूळ होय. जुन्यांना ' गतानुगतिक ' म्हणून नांवें ठेवावयाचीं, आणि आधुनिकांनींही तेंच करावयाचें, हा चमत्कार नव्हे काय? आधुनिक तरुणींना शाळेंत कां ठेवतात? तर त्यांचे गुरु पाश्चात्य हे तसें करितात म्हणून. परंतु पाश्चात्यांनाही ही गोष्ट अलीकडे कशी अनिष्ट वाटूं लागली आहे, याचे प्रासंगिक उल्लेख या लेखमालेचे मागील कांहीं अंकांत अन्य कारणांनीं आलेच आहेत. सांप्रत या स्थळीं शारीरशास्त्राचे दृष्टीनें या पद्धतीची अनिष्टता सुचविणारा एक उतारा अस्सलासह येथें देतों.

"कोणतीही मुलगी वयांत येऊं लागण्याचे सुमारास तिचे शरीर-रचनेंत अनेक महत्त्वाचे फेरफार सुरू होतात व यासाठीं तिची किती तरी शक्ति या कामीं खर्ची पडणें जरूर असतें; आणि म्हणून तिनें अशा वेळीं फार जपून वागलें पाहिजे. विशेषतः तिचे ज्ञानतंतु नाबूद करणारी किंवा दुर्बल करणारी प्रत्येक गोष्ट तिनें टाळली पाहिजे. परंतु दुर्दैवानें आयुष्यांतील या महत्त्वाचे कालांत, शाळांतील अनेक प्रकारचे अभ्यास व विविध विषयांची तयारी यांचे दडपणाखालीं आमच्या बहुतेक मुलींची मानसिक शक्ति ऱ्हास पावत असते. कांहीं वेळा तर या भावी बालमातांचे शक्तीवर इतका जुलूम होतो कीं, तो दडपणच समजला पाहिजे. अशा स्थितींत आमचें म्हणणें असें आहे कीं, या दोनतीन वर्षांत तिचा शाळेशीं अजीबात संबंध तोडून टाकणें व तिची शरीरयष्टि पुरापूर पुष्ट होऊन ती आमच्या शाळांतील शरीर चिरडून टाकणाऱ्या अभ्यासक्रमांना दाद न देई इतकी बळकट होईपर्यंत तिला तशी ठेवणें फार उत्तम होईल."

---

1. A vast amount of energy is required by the changes taking place in a girl's body during the period of puberty, and for this reason it is especially important that she should take good care of herself, especially to avoid all forms of nervous strain. Unfortunately most girls, just at this delicate period are subjected to the very greatest mental strain in their school life, being crowded with studies and duties almost innumerable. In some cases, this demand upon the little potential mother is nothing short of criminal in nature, and in a vast number of instances, it would be best it she were taken out of school entirely for two or three years or until her body has entirely developed and she can spare the energy necessary to keep up with the strain imposed by our exacting and overburdensome curriculums.

"Cyclopedia of Physical Culture"

आपण पहातोंच कीं, या देशांतील हवेंत वाढलेल्या गोऱ्या मुली आमच्या मुलींपेक्षां किती तरी वाढाळ, सणसणीत, जोमदार व टचटचीत असतात; आणि त्यांच्या बहिणी त्यांच्या स्वदेशांतील हवेंत यांहूनही दणकट अर्थात्च असणार. पण अशासंबंधानेंदेखील प्रकृत लेखकाला तक्रार करणें जरूर दिसत आहे. कारण त्याचे दृष्टीनें स्त्रियांची विद्यार्जनाहूनही अधिक महत्त्वाची सामाजिक कामगिरी म्हणजे समर्थ माता होणें ही आहे. पण त्याचे असें नजरेस आलें आहे कीं, शारदासदनांतून निघालेल्या तिकडील पुष्कळ शारदा कदाचित् विद्याविशारद झाल्या, तरी मातृपदवीला सर्वथा अपात्र होतात; इतकेंच नव्हे, तर त्यांना या गोष्टीचा कंटाळा वाटतो. ठीकच आहे; 'शक्ति पुढें भक्ति.' आमच्या या देशांतील हल्लींच्या मुली बघाव्या तों एक मूल होतांच ओढून टाकायला होतात, ही त्यांची शक्ति. अशांना 'अष्टपुत्रा भव' या आशीर्वादापासून सुख कसें लागावें? कारण, दुर्बलतेमुळें गरोदरपण म्हणजे मृत्यूचा दरबार असेंच जिला वाटणार, तिला मातृपदाबद्दल प्रेम वाटावें कसें? व कदाचित् दैवबलानें तिचे इच्छेविरुद्ध तें तिजवर लादलें गेलेंच, तर त्या पदाच्या योग्य कर्तव्याची बजावणी तिचे हातून व्हावी कशी? अर्थात्च होत नाहीं. दीर्घशिक्षणामुळें अंगीं दुबळेपणा आल्यानें हा घातक परिणाम परंपरेनें होतो व दुसरा प्रत्यक्षच होतो. कारण, पुष्कळ शिकल्यासंवरलेल्या तरुणींना 'पोर होणें आत्मनाश करून घेणें' असें एक वाटत असल्यानें त्या कदाचित् सशक्त असल्या, तरीही ह्या प्रसंगास नाकबूल असतात[1]. पण यांना असें कळत नाहीं कीं, आईपण

1. 'She believes that maternity will mean the sacrifice of herself for her child, and this she flatly refuses. Motherhood is not a sacrifice, it is a fulfilment.'

Cyclopedia, P. 2473.

हा आत्मनाश नसून हें कर्तव्यपूरण आहे. परंतु आजकाल बहुतेक सुधारलेल्या देशांत संततिविघाताचें वेड पसरत आहे, यामुळें तेथील राजकर्त्यांचे तोंडचें पाणी पळालें आहे, व समाजहितेच्छूंची या योगानें अकल गुंग होऊन गेली आहे.

ही तिकडील स्थिति इतर गोष्टींप्रमाणें हळूहळू इकडेही रांगत रांगत येत चालली आहे. ही इष्ट आहे काय, याचा आमचे समाजधुरीणांनीं विचार करणें जरूर आहे, असें आम्हांस वाटतें. आपल्या पूर्वजांनीं म्हटलें आहे कीं, 'हतं मिथुनमप्रजम्' म्हणजे संततिहीन दंपत्य असून नसल्यासारखेंच आहे. आणि संततीची तर ही अवस्था या सुधारणेपायीं येऊन ठेपत आहे. तर अशा सुधारणेला आंवळून बसण्यांत कोणता फायदा ? स्त्रियांचें निर्माण मुख्यत: अपत्यनिष्पादनार्थ आहे, असा आपले स्मृतिकारांचा स्पष्ट अभिप्राय आहे; व हें कर्तव्य पुरें करण्यापायीं त्यांना अर्थार्जनादि स्वहिताच्या गोष्टी पुरुषांप्रमाणें करण्याचें साधणार नाहीं, हें जाणूनच त्याच शास्त्रकारांनीं स्त्रीला पतीच्या वैभवाची मालकीण व यावत् सत्कृत्यांचे श्रेयाची निमे हिस्सेदारीण ठरविली. हें त्यांनीं न्यायाचेंच केलें; नाहीं असें कोण म्हणेल ? एकत्र आविभक्त कुटुंबांत दोघे भाऊ असतात. त्यांतील एक जण कृतविद्य होऊन विद्येवर लाखों रुपये मिळवितो, व दुसरा घरीं राहून घरधंदाच पहातो. तथापि आमचीं न्यायकोर्टें दोघांना मिळकतीचा हिस्सा देतात. कांहीं सरकती धंद्यांत एक पातीदार भांडवल घालतो, दुसरा आपलें चातुर्य व अंग-

---

1. "The epidemic of 'race suicide' sweeping over the civilised world is one of the most alarming of all modern social phenomena causing consternation amongst governments and perplexity among students of sociology.
P. 2472.

मेहनत खर्ची घालतो, व दोघेही सारखा हिस्सा घेतात. ह्या जर गोष्टी आपण पाहतों, तर आमचे शास्त्रकारांनीं स्त्री व पुरुष या उभयतांना कुटुंबांत भिन्न कामगिऱ्या सांगूनही श्रेयाचे समविभागी ठरविलें, यांत वेडेपण कुठेसें आहे? आम्हांला तर वाटतें कीं, स्त्रियांनीं पुरुषांप्रमाणें ज्ञानार्जन करणें जरी गर्ह्य किंवा अन्याय्य नसलें, तरी त्यांच्या आद्य कर्तव्याची हानि ज्या ज्ञानार्जनानें किंवा तदंगभूत गोष्टीनें होईल, त्याला त्यांनीं फांटा दिलाच पाहिजे; नाहीं तर परिणाम मोठा दुर्धर होईल. अर्थात् हा टाळणें तर स्त्रियांनीं प्रथम त्यांना गृहिणीपद व मातृपद याला सर्वथा योग्य करणारें शिक्षण संपादून सवड राहिल्यास जाफा शिक्षणाची हांव धरावी, असें आमचें मत आहे.

आमच्या देशाच्या सद्यःस्थितींत स्त्रियांना योग्य गृहिणी व योग्य माता बनविणारें शिक्षण कोणतें व तें कसें देतां येईल किंवा द्यावें, यांचा विचार पुढील अंकावर सोंपवून वाचकांची तूर्त रजा घेतों.

---

## किती विचित्र भेट!

लेखकः—नारायण सिताराम फडके, बी. ए.

आज घरीं परत येतांना आनंदरावांच्या मनांत किती निरनिराळे विचार येत होते! एकदां त्यांना वाटे, आपण आतां लढाईवर जाणार, तेव्हां आपल्याला किती तरी निरनिराळे देश पहावयास मिळतील; किती तरी प्रकारचे स्मरणीय अनुभव येतील; किती तरी नवे नवे मित्र होतील! एकदां त्यांच्या मनांत येई, आपल्या बायकोपासून आपण लांब जाऊन तिला आपण माहेरीं बापाकडे पाठविणार; तर तिला आतां आपल्याशिवाय करमेल तरी कसें? असे विचार मनांत चालू असतांना सभोंवतालच्या

गाडंबडीकडे आणि बाजारांतील दुकानांतून मनोहर रीतीनें मांडून ठेवलेल्या वस्तूंकडे त्यांचें लक्ष गेलें, कीं त्यांना वाटे, हा देखावा आपण आतां शेवटचाच पाहतों आहों. युद्धावर गेल्यावर पुन्हा परत येईपर्यंत आपल्या दृष्टीस हो कांहीं पडणार नाहीं. इतक्यांत, बायको घरीं आपली वाट पहात बसली असेल, हा विचार मनांत येऊन आनंदराव झपाझप वाट चालूं लागले.

घरीं मालतीबाई नवऱ्याची प्रतीक्षा करीत झोंपाळ्यावरच बसल्या होत्या. आनंदराव आल्याबरोबर म्हणाले, ' एहे ! काय ऐटींत बसली आहेस झोंके घेत अगदीं ! '

मालतीबाई उठत उठत म्हणाल्या, ' म्हणजे ! मीं आपल्यासारख्या आय्. एम्. एस्‌ची बायको अन् ब्यारिस्टराची मुलगी असूनसुद्धां ऐट नये का करूं ? ' इतकें बोलून त्या किंचित् हंसल्या.

' बरें, तो वाद नको; घरांत येतेस ना जेवायला ? ' असें आनंदराव म्हणाल्यावर दोघेंही घरांत गेलीं.

जेवतांनासुद्धां सारा विनोदच चालला होता; आणि त्या प्रेमळ नवराबायकोंनीं तो दिवस विनोदांत घालवणें साहाजिकच होतें. आनंदरावांना युद्धावर जाण्याचा हुकूम आल्यामुळें ते आज रात्रीच्या गाडीनें मुंबईस जावयाचे होते. आनंदरावांचें कुटुंब म्हणजे ते व त्यांची बायको. त्यामुळें आनंदराव जावयाचे म्हणजे बिऱ्हाड मोडण्यासारखेंच होतें; म्हणून मालतीबाईंनीं माहेरीं जाण्याचा विचार केला. माहेरींही मालतीबाईंना वडिलांच्याशिवाय कोणी नव्हतें.

जेवण झालें. आनंदराव मालतीबाईंबरोबर गप्पा मारीत, सुपारी चघळीत दिवाणखान्यांत बसले होते. मधून मधून सामान बांधण्याबद्दल गडीमाणसांना ताकीद देत होते. गप्पा मारतां मारतां वेळ केव्हां आणि

कसा गेला, हें त्यांना मुळींच समजलें नाहीं. घड्याळांत दहांचे ठोके पडले, तेव्हां वेळेकडे त्यांचें लक्ष गेलें. लगेच गाडी आणण्याला त्यांनीं गड्याला ओरडून सांगितलें; व आपण पोषाक करायला उठले. मालतीबाईही त्यांना कपडे घालण्यांत मदत करूं लागल्या. मध्येंच एकदम थांबून त्या म्हणाल्या, 'अग बाई, विसरल्येंच मी अगदीं !'

'काय ग ?' आनंदरावांनीं विचारलें.

'आहे आपली एक गोष्ट. अरे, त्रिंबक, एका वाटींत दहीं काढून ठेव रे. विसरूं नकोस हो अगदीं.'

'कशाला ग दहीं ?' आनंदरावांनीं पुन्हा प्रश्न केला.

'निघतांना हातावर देणार आहें मी. दहीं दिलें म्हणजे माणूस लवकर परत येतं.'

आनंदराव हंसून म्हणाले, 'अहाहा ! इतकी शिकलीस, तरी तुझा असल्या गोष्टींवर विश्वास आहे ना ? अगदींच वेडी आहेस !'

'आणखी ढीग शिकल्यें तरी मी अशीच वेडी राहणार.' मालतीबाई हंसत म्हणाल्या.

गाडी आली. सामान गाडींत ठेवण्यांत आलें. आनंदराव व मालतीबाई खालीं उतरलीं. नवऱ्याच्या हातावर दहीं घालतांना मालतीबाईंच्या डोळ्यांत आंसवें उभीं राहिलीं. 'हें काय बरें! पूस तीं आंसवें.' असें जरी आनंदराव म्हणाले, तरी त्यांचाही आवाज सद्गदित झाला होता.

दोघें जणें गाडींत बसलीं. गाडी चालू झाली. आनंदरावांनीं एकवार आपल्या घराकडे पाहिलें. एक एक घर, एक एक आळी, एक एक चौक त्यांच्या मागें राहूं लागला. दोघें जणें एकमेकांशीं कांहीं फारसें बोललीं नाहींत. प्रत्येक जण दुसऱ्याकडे वारंवार पाहीमात्र; आणि दृष्टीस दृष्टि मिळाली कीं, दोघेंही हंसत.

गाडी स्टेशनवर आली. आनंदरावांनीं उतरून आपलें सामान 'लगेज' केलें. तेवढ्या वेळांत मालतीबाईनीं त्यांचें सेकंड क्लासचें तिकीट काढून आणलें. गाडी सुटायला दहा मिनिटें अवकाश असल्यामुळें मालतीबाईही डब्यांत बसल्या. पोंचल्याचें पत्र केव्हां येण्याचा संभव आहे, पत्र घेण्याची व पाठविण्याची काय सोय केलेली आहे, या गोष्टी निघाल्या. 'आज पत्रासंबंधींची चौकशी तूं ही शंभराव्यांदां करते आहेस.' आनंदराव म्हणाले.

घंटा वाजली. मालतीबाई खालीं उतरून खिडकीशीं उभ्या राहिल्या. दोघेंही एकमेकांकडे हंसत पहात होतीं. शिटी झाली आणि गाडी चालू झाली.

युद्ध सुरू झालें. लढायांचा धडाका चालू झाला. छावणींतील चारित्र्याची आनंदरावांना प्रथम प्रथम मौज वाटली; परंतु हळू हळू त्या गडबडीचा आणि झटपटीचा त्यांना कंटाळा येऊं लागला. इकडे पळ, तिकडे धांव, धड जेवायलाही पुरता वेळ नसावयाचा; आणि लढाई चालू असतांना रणांगणावर काम करावयाचें म्हणजे केव्हां गोळी सूं सूं करीत येऊन प्राण घेईल त्याचा नियम नाहीं.. अशा दिनक्रमाला आनंदराव विटून गेले. सगळ्यांत त्यांना ज्यास्त चीड आली ती मालतीबाईना भरपूर लांबलचक पत्रें धाडतां येत नव्हतीं, या गोष्टीची. शेवटीं एके दिवशीं रणक्षेत्रावर एका शिपायाला डोलींत घालीत असतांना एक गोळी त्यांच्या मांडींत येऊन घुसली. जखम फार मोठी झाली नाहीं, परंतु आधींच ते काम करून थकून गेले असल्यामुळें त्या लहानशा धक्क्यानेंही आनंदराव मूर्छित पडले.

इकडे मालतीबाई माहेरीं नवऱ्याची सारखी आठवण करीत दिवस काढीत होत्या. रोज लढाईच्या बातम्या वाचण्यांत त्या दक्ष राहिल्या होत्या. खरें म्हटलें असतां लढाईच्या बातम्या वाचण्यांत मालतीबाईना

काय मौज किंवा उत्सुकता वाटणार ? परंतु केवळ आनंदराव लढाईवर गेले आहेत, या एका गोष्टीनेच त्या बातम्यांना मोठें महत्त्व आलें होतें; आणि बातम्या वाचून वाचून आपल्याला अगदीं हवी अशी कांहींच बातमी मिळाली नाहीं, कीं मालतीबाई क्रॉनिकल पार फेंकून देत.

एके दिवशीं अशाच क्रॉनिकल फेंकून देण्याच्या विचारांत मालतीबाई असतांना त्यांना वाटलें कीं ' दि रोल ऑफ ऑनर ' हा कॉलम वाचावा. अर्धवट घडी केलेला क्रॉनिकल त्यांनीं पुन्हा उघडला; आणि मेलेल्या व जखमी शिपायांची यादी वाचण्यास सुरवात केली:—

कामास आलेले.

१ ले. हेनरीवुड १७ हुस्सार्स.
२ मे. रॉबर्ट्स् ३ डॉर्सेटशायर.
३ क्या. क्लार्क.
४ डॉ. वुइलसन, रेड क्रॉस मिशन.
५ डॉ. आनंदराव परांजपे, रेड क्रॉस मिशन.

शेवटचें नांव वाचल्याबरोबर मालतीबाई दचकल्या. त्यांनीं तीं अक्षरें पुन्हा वाचलीं. क्षणमात्र त्या अक्षरांकडे वेड्यासारख्या त्या पहात राहिल्या. डोकें विचारशून्य झालें. छाती धडधडूं लागली. डोळयांपुढें अंधेरी आली. आणि त्यांनीं आपलें अंग जमिनीवर टाकलें.

आपल्या मुलीवर हा प्रसंग गुदरलेला पाहून गोपाळरावही दुःखानें व्याकुळ झाले. मालतीबाईंचें रडणें कांहीं केल्या कमी होईना. दोन दिवस तर त्यांनीं अन्नपाणीसुद्धां घेतलें नाहीं. गुडघ्यांत मान घालून त्या सारख्या रडत होत्या. तिसऱ्या दिवशीं त्या आपल्या वडिलांना म्हणाल्या, 'आतां मीही आपला देह सत्कार्यीं लावतें. त्यांच्यामागें जिवंत राहून रडत काळ घालवण्यांत मी कोणतें पुण्य जोडणार ? आपली नर्स म्हणून लढाईवर

जाऊन काम केलें, तर माझ्या कायेचा चांगला उपयोग तरी होईल. या कामांत मला आतां मोडता घालूं नका.'

गोपाळरावांनीं त्यांना या गोष्टीपासून परावृत्त करण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. त्यांनीं पुष्कळ आर्जवें केलीं. तरी मालतीबाई म्हणाल्या, 'माझ्या प्राणांची आतां इतकी काळजी अन् जपणूक कशाला हवी? माझें जरी कांहीं बरेंवाईट झालें, तरी काय वावगें होणार आहे? मला मूल ना बाळ!—' बोलतां बोलतां त्यांना हुंदका आला आणि त्या रडूं लागल्या; ती एकंदर स्थिति गोपाळरावांना पाहवेना.

गोपाळरावांचा अगदीं नाइलाज झाला. कांहीं केल्या मालतीबाई आपलें म्हणणें सोडीनात. त्यांनीं आपलें नांव वॉर-ऑफिसमध्यें कळविल्यावर लवकरच त्यांना हुकूम आला; आणि त्यांनीं हिंदुस्थान सोडलें!

छापणाराच्या चुकीमुळें घरीं असें कांहीं झालें असेल, अशी शंकासुद्धां आनंदरावांस आली नव्हती. आजारी असतांना त्यांनीं पत्र पाठविलें नाहीं, परंतु बरें वाटल्याबरोबर मालतीबाईस पत्र लिहिण्यास ते विसरले नाहींत. मात्र बरेंच दिवसांत बायकोकडून खुशालीचें पत्र कां आलें नाहीं, अशी त्यांच्या मनाला हुरहूर लागून राहिली होती. परंतु या दिवसांत पत्र अगदीं वेळच्या वेळेवर येईलच, असा नियम नसल्यामुळें ती हुरहूर थोडा वेळच टिकली.

आनंदरावांनीं आतां रेड क्रॉस मिशनचें काम सोडून दिलें. एक तर सर्जनचें काम करणारी मंडळी पुष्कळ झाली; आणि दुसरें, आनंदरावांना त्या कामाचा कंटाळा आला होता. आतां त्यांनीं स्काउटचें काम आपल्याकडे घेतलें. स्काउटचें काम असें असतें कीं, शत्रूची छावणी कोठें आहे, शत्रूनें सैन्य कोठें दबा धरून बसलें आहे, या गोष्टींचा खात्रीलायक तपास लावावयाचा. या कामांत हुशारीचा आणि समयसूचकतेचा उपयोग

करावा लागतो, असें वाटल्यावरून आनंदरावांनीं स्काउटची वृत्ति पत्करली; आणि आपल्या अकलेनें आणि युक्तीनें चांगलें काम करून त्यांनीं दोन तीन वेळा शाबासकीहीं मिळवली.

आज सकाळच्या प्रहरीं घोड्यावर बसून, सशस्त्र होऊन आनंदराव आपल्या कामावर निघाले. एका अरण्यांत शत्रूचे लोक आहेत किंवा नाहींत, हें आज ठरवावयाचें होतें. या कामाकरितां आनंदरावांनीं निरनिराळ्या युक्त्या योजल्या. प्रथम त्यांनीं आपला घोडा इकडून तिकडे भरधांव असा दोन तीन वेळा पळवला. हेतु हा कीं, आंतल्या शिपायांना एकट्या घोड्याच्या टापा ऐकूं आल्या, कीं त्याला पकडण्यासाठीं ते बाहेर येतील; किंवा दुसऱ्या कांहीं हालचालींवरून आंत शिपाई आहेत किंवा नाहींत हें ठरवितां येईल. परंतु ही युक्ति निष्फळ ठरली. हें पाहून आनंदरावांनीं आपलें बिगुल हातांत घेतलें; आणि गुरगुऱ्या आवाजांत एकदोन तुटक जर्मन वाक्यें उच्चारून, एकदम अरण्यांतून बाहेर निघून एके जागीं जमण्याची इषारत देणारा आवाज त्यांनीं बिगुलांतून काढला. त्याबरोबर तीनशें जर्मन घोडेस्वार झाडीच्या बाहेर पडले. आपलें काम झालेलें पाहून आनंदरावांना समाधान वाटलें, आणि छावणींत परत पळण्यासाठीं त्यांनीं आपल्या घोड्याला टांच मारली. परंतु जर्मन घोडेस्वारांनीं त्यांचा पाठलाग केला. त्यांना पुष्कळ हुलकावण्या दिल्यावर आनंदराव दमून गेले. जर्मन घोडेस्वारांनीं त्यांना पकडलें, व कैदी म्हणून जर्मन छावणींत त्यांची रवानगी करण्यांत आली.

इकडे नर्सच्या कामावर रुजू झाल्यावर मालतीबाई आपलें काम योग्य दक्षतेनें करीत; परंतु कामाच्या वेळीं काय किंवा इतर वेळीं काय, त्या सदा उदासीन असत. नवऱ्याची आठवण त्यांच्या मनांतून कांहीं केल्या बुजेना. घडोघडीं त्यांना वाटे कीं, कोठला हा आयुष्यक्रम आपल्या कपाळीं आला!

आपल्याला अशी स्थिति प्राप्त होईल, असें स्वप्नांतसुद्धां कधीं वाटलें नव्हतें. आनंदराव लढाईवर जाण्यासाठीं मुंबईला ज्या रात्रीं गेले, ती रात्र त्यांना पुन्हा पुन्हा आठवे. त्या रात्रीं डब्यांत बसलेले असे पाहिलेले आनंदराव त्यांच्या डोळ्यांपुढून हालेनात. वारंवार असा विचार त्यांच्या मनांत येई कीं, आपल्यावर असा प्रसंग गुदरण्यासारखा आपण काय अपराध केला होता? असे विचार मनांत अव्याहत चालू असल्यामुळें त्यांचा चेहरा सर्वदा उल्हासशून्य आणि करुणास्पद दिसे. अशी त्यांची एकंदर दीनवृत्ति पाहून एके दिवशीं एका नर्सनें त्यांना हळूच प्रश्न केला कीं, तुम्ही नेहमीं अशा दुःखीकष्टी कां असतां? असा मायेचा प्रश्न ऐकून मालतीबाईना गहिंवर आला व त्या नर्सविषयीं एक प्रकारचा आपलेपणा त्यांना वाटूं लागला. आपलें मन मोकळें करून त्यांनीं तिला सर्व हकीकत सांगितली. तेव्हां ती म्हणाली:—

'अरे देवा! काय हा दैवाचा खेळ! आनंदराव परांजपे तर माझ्याच शुश्रूषेखालीं होते; आणि बरे होऊन एक आठवड्यापूर्वींपर्यंत ते स्काउटचें काम करून शाबासकी मिळवीत होते, हें आम्हांला नक्कीं ठाऊक आहे.'

'काय म्हणतां? तुम्ही सांगतां हें देवाच्या कृपेनें खरं होवो.' आनंद व आश्चर्य पावलेल्या मालतीबाई मध्येंच उद्गारल्या.

'खरें होवो काय? आहेच मुळीं. ते छावणींत असते तर तुमची मीं भेट घालून दिली असती. पण आठ दिवसांपूर्वीं ते कैद झाल्याचें कळलें.

'अग बाई! दोन्ही बातम्या तुम्हीं बरोबर सांगितल्या. दुःख कसें मेलें सुखाच्या पाठोपाठ वाढून ठेवलेलें आहे. असो; पण स्वारी खुशाल आहे, हें केवढें नशीब! देवा, कृपा कर माझ्यावर, अन् स्वारीची व माझी एकदां भेट होऊं दे.'

यानंतर त्या दोघींचें बरेंच बोलणें झालें. आनंदरावांनीं आफिसरां-कडून पुष्कळ वेळा वाहवा कशी मिळविली, तें त्या नर्सनें मालतीबाईंना सविस्तरपणें सांगितलें. छापण्यांत चूक केल्याबद्दल छापणाराला दोघींनीं मिळून अनेक प्रकारें शिव्याशाप दिले. नंतर आनंदरावांना सोडविण्याबद्दल कांहीं खटपट करितां येईल काय, याविषयीं दोघींनीं बेत केले. त्यांना काय माहीत कीं, त्याच वेळीं तिकडे आनंदरावांनीं स्वतःच्या सुटकेची उत्तम युक्ति योजून ठेवली होती! जर्मन गुप्त हेराचा वेष घेऊन निसटण्याच्या बेताची सर्व तयारी आनंदरावांनीं करून ठेवली होती, हें त्यांना कसें कळावें बरें?

दुसऱ्या दिवशीं संध्याकाळीं आनंदरावांच्या सुटकेचा विचार करीत करीत मालतीबाई थोडेंसें फिरावयाच्या हेतूनें बाहेर पडल्या. या वेळीं जरी एक प्रकारच्या चिंतेमध्यें त्यांचें मन होतें, तरी त्यांची एकंदर वृत्ति आनंदलेली अशी होती. आनंदराव जिवंत असल्यावर मग काय. त्यांची सुटका आपण हवी तशी करूंच करूं, असें त्यांना वाटत होतें. परंतु पुन्हा त्यांच्या मनांत येई कीं, जर्मन छावणींतून निसटून येणें फार मुष्किलीचें काम आहे. आणि शिवाय, आपण असे बेत करतों खरे, परंतु जर्मन लोकांनीं आनंद-रावांच्या जिवाला आधींच कांहीं अपाय केला असला तर!––छे, छे! हें मन मोठें दुष्ट आहे; कधीं चांगलें म्हणून चिंतायचें नाहीं. पण जाऊं द्या. तो घाणेरडा विचारच मनांत येऊं देतां कामा नये. अहा! किती गोड वारा वाहतो आहे! प्रदेश मोठा रम्य दिसतो आहे. सूर्य मावळत असल्यामुळें फारच मजा दिसते आहे––अरे देवा, पण मी विचाराच्या भरांत फारच भडकल्यें वाटतें. छावणीपासून पांचसहा मैल खास आल्यें मी! इतकें लांब येणें धोक्याचेंच आहे! चला, परतावें.

इतक्यांत कोणी तरी धांवत येत आहेसें त्यांना वाटलें. त्या जराशा

बाळगल्या एका पिस्तुलाशिवाय त्यांच्याजवळ दुसरें कांहींच हत्यार नव्हतें. एखादा जर्मन सैनिक येत असला तर? सुविचार करून पळावें हेंच चांगलें. त्याच्यावर पिस्तुल झाडणें आपल्याला अपायकारकच आहे. इतक्यांत त्यांना एका सैनिकाची आकृति दिसूं लागली. त्याबरोबर त्या पळत सुटल्या. तें पाहून तो सैनिकही ज्यास्त वेगानें पळूं लागला. मालतीबाई पुढें व तो सैनिक मागें अशी शर्यत सुरू झाली. आपल्या जिवासाठीं मालतीबाई कांहीं न बघतां धांवत होत्या. केव्हां अशा श्रमांची संवय नसल्यामुळें त्या अगदीं थकून गेल्या. परंतु जीव प्यारा आहेना! त्याच्यासाठीं त्या कशाबशा मैलभर पळाल्या. परंतु पुढें त्यांच्यानें एक पाऊलसुद्धां उचलवेना. शेवटीं थांबून पिस्तुल झाडण्याचा त्यांनीं विचार केला. त्यांनीं तोंड फिरविलें आणि पिस्तुल रोखलें. त्यांची व सैनिकाची दृष्टादृष्ट झाली. त्या पिस्तुल झाडतात, इतक्यांत त्यांचा हात खालीं झाला. थकल्यामुळें त्यांच्यानें पिस्तुलसुद्धां धरवेना. नेम चुकून गोळी जमिनींत शिरली. हें सारें पाहून तो सैनिक पुढें झाला. मालतीबाईंना त्यानें आपल्या हाताचा आधार दिला. थोडेंसें हसून तो म्हणाला:—

मालती, मला मारायचा का विचार केला होतास? तुझें तोंड अगदीं सुकून गेलें आहे. किती दमलीस!' असें म्हणून त्यानें मालतीबाईंना छातीशीं घट्ट धरलें.

त्याच्या तोंडाकडे पहात मालतीबाई म्हणाल्या, 'म्हणजे! स्वारी का?'

'होय. मीच तो.' असें म्हणून त्या सैनिकानें आपली दाढी ओढून काढली.

होय. आनंदरावच ते.

'किती विचित्र भेट ही आपली!' त्यांना आलिंगन देऊन मालतीबाई म्हणाल्या.

आपण येथें कशी आल्यें, तें मालतीबाईनीं जेव्हां आनंदरावांना सांगितलें, तेव्हां ते म्हणाले, ' वा ! माझा पुनर्जन्मच होऊन मी तुला परत मिळालों म्हणायचा ! '

---

# कै० गोपाळ कृष्ण गोखले.

---

लें०—प्रो. गोपाळ विष्णु तुळपुळे, एम्. ए.

" Work and sacrifice for the motherland. "
Ranade.

" Most praised, most loved;
A sample to the youngest; to the more mature
A glass that feated them; and to the graver
A child that guided dotards."
Shakespear—" Cymbeline."

कोणत्याही देशांतील अत्यंत मूल्यवान संपत्ति कोणती म्हणून विचार करूं लागल्यास, त्या देशांत उत्पन्न झालेले थोर पुरुष, हें एकच उत्तर येतें. एखादा देश कितीही हीन स्थितीला पोंहोंचला, त्याच्यावर कितीही आपत्ति आल्या, तो दुर्दैवाच्या भोंवऱ्यांत कितीही गटंगळ्या खात असला, तरी त्याला थोर पुरुषांचाच आधार मिळतो. तेच आपल्या बुडत्या देशाला वर काढण्याची खटपट कारितात. बुद्धि, विद्वत्ता, स्वदेशप्रीति, दृढनिश्चय, कळकळ, स्वार्थत्याग वगैरे सर्व गुण ते आपल्या देशाला वाहतात. संपत्ति व शौर्य यांचा कितीही देशांत पुरवठा असला, तरी निर्वाणीच्या प्रसंगीं थोर अंत:करणाच्या बुद्धिमान पुरुषांशिवाय देशाचें चालत नाहीं. संपत्ति व शौर्य हीं दोन्ही त्यांच्याशिवाय लंगडीं पडतात. देशहिताच्या दृष्टीनें

त्यांचा उपयोग कोणत्या रीतीनें केला पाहिजे, हें बुद्धिमान् मुत्सद्दीच सांगूं शकतात; साधारण जनसमूहाला तें धोरण नसतें. म्हणून देशाचें हिताहित देशाभिमानी व बुद्धिमान् पुरुषांवर अवलंबून असतें. तेच देशाचें जीवन असतात, असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. देशाची हरएक बाबतींतील प्रगति त्यांच्यावरच अवलंबून असते. यामुळें थोर पुरुषांच्या मृत्यूइतकी मोठी आपत्ति दुसरी कोणतीही नाहीं. दुसरी कोणतीही हानि पुरवतें, परंतु थोर पुरुषांच्या निधनामुळें होणारी हानि पुरवत नाहीं. त्यांची वेळोवेळीं भासणारी उणीव भरून काढणें अशक्य पडतें. कांहीं काळपर्यंत देशाला मृतकळा येते, व अशा वेळेस देशाची काय स्थिति होईल, या एका विचाराकडे लोकांचें लक्ष लागतें. अशा रीतीनें थोर पुरुषांचा मृत्यु, मग तो त्यांना केव्हांही गांठो, सर्व देशाला अत्यंत दुःखदायक व हानिकारक असतोच. पण दुर्दैवानें ते अकालीं मृत्युवश झाले, तर ती दुःखाची तीव्रता ज्यास्तच प्रखर होते.

शुक्रवार, ता. १९ फेब्रुवारी रोजीं रात्रीं सर्व हिंदुस्थान देशावर गुदरलेल्या प्रसंगाची जेव्हां जेव्हां आठवण होते, तेव्हां तेव्हां वर लिहिलेल्या प्रकारचे विचार मनामध्यें एकामागून एक उत्पन्न होऊन एकच काहूर माजूं लागतें. आपल्या डोळयांसमोर त्यांच्या सर्व गुणांसह उभी राहणारी ना० गोखल्यांची सजीव मूर्ति मृत्यूनें आपल्यापासून याच रात्रीं अकालीं हरण केली ! दुसरे दिवशीं, म्हणजे शनिवारीं सकाळीं, ही अत्यंत शोचनीय वार्ता विजेच्या धक्याप्रमाणें सर्वत्रांस कळतांच, प्रत्येक जण दुःखमग्न होऊन, त्याच्या चेहऱ्यावर शोक व खिन्नता दिसूं लागली. माणूस मेलें म्हणजे दुःख होणार; थोर माणसांच्या मृत्यूमुळें तर तें फारच होणार. परंतु भरतीओहोटीच्या नियमाला अनुसरून दुःखाचा अत्यंतावेगसुद्धां हळू हळू कमी होऊं लागतो, व अशा स्थितींत माणूस विचार करूं लागतें.

गोपाळराव गोखल्यांच्या मृत्यूनें उत्पन्न झालेली दुःखाची पहिली लाट निमाल्यानंतर निरनिराळ्या माणसांच्या मनांत अनेक रूपांनीं एकच विचार उत्पन्न झाला. त्यांच्या मृत्यूमुळें आपली फार मोठी हानि झाली, या थोर पुरुषाची जागा आतां कोण भरून काढणार, असें प्रत्येक जण म्हणूं लागला. लहानमोठ्या संस्था हाच प्रश्न सोडवूं लागल्या. हिंदुस्थानाच्या निरनिराळ्या भागांतील लोकांच्या पुढें हाच प्रश्न आला. तो सर्व देशाचा प्रश्न होऊन बसला. याप्रमाणें प्रत्येक व्यक्तीच्या मनापासून तों सर्व समाजाच्या मनांत, लहानें खेड्यापासून तों सर्व हिंदुस्थानभर याच विचाराचा प्रवाह एकसारखा वहात होता. ना. गोखल्यांच्यासारखा स्वार्थत्यागी व कार्यक्षम मुत्सद्दी कोण मिळणार? राज्यकर्त्यांशीं सनदशीर पद्धतीनें झगडून लोकहित कोण साधणार? प्रसंग पडल्यास निर्भय व निर्भीड रीतीनें सरकारी धोरणावर टीका करून त्याच्यापुढें लोकमत कोण मांडणार? केवळ लोकप्रियतेला बळी न पडतां आपल्या मताप्रमाणें कोण चालणार? वेळ पडल्यास आपल्यास योग्य सल्लामसलत कोण देणार? हे व अशा प्रकारचे प्रश्न साहाजिकपणें लोकांच्यापुढें उभे राहिले. ना. गोखले यांनी केलेली कामगिरी सर्वत्रांस माहीत आहे. अनेक अडचणींना तोंड देऊन त्यांनीं आपला मार्ग कसा काढला, हें नव्यानें सांगण्याचें कारण नाहीं. अशा थोर पुरुषाच्या अकालीं मृत्यूमुळें सर्व देश शोकमय व सचिंत व्हावा, हें अगदीं स्वाभाविक आहे. अशा प्रसंगीं या थोर पुरुषाचें अल्पचरित्र देऊन त्यापासून आपल्याला काय बोध घेतां येईल, हें पहावयाचें आहे.

निरनिराळीं मासिकपुस्तकें व वर्तमानपत्रें यांमधून गोपाळराव गोखले यांच्या चरित्रांतील ठळक ठळक गोष्टी प्रसिद्ध झाल्या आहेत; त्यामुळें या लहानशा लेखांत नवीन कांहीं लिहावयाचें आहे, असें नाहीं. त्याच ठळक ठळक गोष्टींचा पुनरुच्चार करून त्यांत आपल्याला घेण्या

सारखें काय आहे; हें पहावयाचें आहे. गोपाळरावांचा जन्म कोल्हापूर येथें एका गरीब घराण्यांत सन १८६६ सालीं झाला. त्यांच ठिकाणीं त्यांचें कॉलेजचें अर्धे शिक्षण झाल्यानंतर ते बी. ए. चा अभ्यास करण्यासाठीं मुंबईस एल्फिन्स्टन कॉलेजमध्यें गेले; व १८८४ सालीं म्हणजे वयाच्या अठराव्या वर्षी बी. ए. ची परीक्षा पास झाले. याच वर्षी ते डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे तहाहयात सभासद झाले. त्यांच्या मनांत स्वार्थत्यागाची प्रेरणा त्यांचे परमपूज्य व थोर गुरु कै. रानडे यांच्यामुळें उत्पन्न झाली. त्या संस्थेत त्यांनीं निरनिराळे विषय उत्तम रीतीनें शिकवून वहावा मिळविली. नामांकित प्रोफेसरांमध्यें ते गणले गेले. परंतु ते केवळ शिक्षकाचें काम करूनच राहिले नाहींत; त्यांनीं आपल्या आवडत्या कॉलेजची वाढ होण्याकरितां अतिशय प्रयत्न केले. डे. ए. सोसायटी स्थापन करणाऱ्यांपैकीं ते नव्हते, हें खरें; परंतु तिची सांपत्तिक स्थिति सुधारण्याला त्यांचा चांगलाच उपयोग झाला. कॉलेजसाठीं वर्गणी गोळा करण्याचें काम ते शेवटपर्यंत करीत होते. सार्वजनिक संस्थांकरितां वर्गणी गोळा करण्याचें काम किती कठिण आहे, हें सर्वांना माहीत आहे. या कामांत येणाऱ्या सर्व अडचणी सोसून त्यांनीं कॉलेजकरितां वर्गणी गोळा केली. परंतु गोखल्यांच्यासारख्या माणसांचा 'कर्तव्य' हाच धर्म होऊन बसतो, व त्याच्याकरितां भोगाव्या लागणाऱ्या अडचणींतच त्यांना सुख वाटत असतें. त्यांनीं कॉलेजकरितां सरासरी दोन लाख रुपये गोळा केले. याशिवाय त्यांच्या सल्लामसलतीचा सोसायटीला नेहमीं उपयोग होत असल्यामुळें सोसायटीमध्यें त्यांचें चांगल्या प्रकारचें वजन होतें; व जरी ते स्वतः कधीं कॉलेजचे प्रिन्सिपाल नव्हते, तरी कॉलेजचीं सर्व सूत्रें बऱ्याच अंशीं त्यांच्या हातीं असत.

परंतु गोखल्यांच्यासारखा कर्तृत्ववान् पुरुष केवळ कॉलेजांतील कामगिरीवर तृप्त राहणारा नव्हता. ते अतिशय महत्त्वाकांक्षी होते. त्यांच्या हातून

घडणाऱ्या लोकसेवेचीं पूर्वचिन्हें ते प्रोफेसर असतांनाच दिसूं लागलीं होतीं. ते कॉलेजमध्यें शिकवीत असतांनाच कै. रानडे यांच्यापासून सार्वजनिक कामाचे धडे घेत होते. त्या थोर पुरुषामुळें त्यांच्या मनांत जी स्फूर्ति उत्पन्न झाली, तिची ज्योत अखेरपर्यंत एकसारखी वाढतच होती. कै. रानड्यांच्या-सारख्या धोरणी व सभोंवार दृष्टि फिरविणाऱ्या माणसाच्या नजरेंतून ना. गोखल्यांच्यासारखा होतकरू बुद्धिमान् तरुण चुकला नाहीं, यांत आश्चर्य मानण्यासारखें कांहीं नाहीं. पुण्यांतील सार्वजनिक सभा त्या वेळीं चांगलीं लोकोपयोगी कामें करीत असे. या संस्थेचें समाज व सरकार या दोन्हीं ठिकाणीं चांगलें वजन होतें. १८८७ सालीं गोखल्यांनीं सार्वजनिक सभेच्या त्रैमासिकाचें संपादकत्व पत्करिलें. या वेळेस त्यांचें वय २१ वर्षांचें होतें. मतभेदामुळें या संस्थेच्या सभासदांत फूट पडे तोंपर्यंत गोखलेच हें संपादकाचें व सभेच्या सेक्रेटरीचें काम करीत असत. त्याचप्रमाणें सुमारें चार वर्षें 'सुधारक' पत्राचे ते संपादक होते. १८९५ सालीं राष्ट्रीय सभेच्या ११ व्या बैठकीचे वेळीं ते त्या सभेच्या सेक्रेटरींपैकीं एक होते. त्यांचा कांग्रेस-मध्यें पहिला प्रवेश सन १८८९ सालीं झाला. त्या वेळीं सर वुइल्यम वेडर्बर्न अध्यक्ष होते. यानंतर १९०० सालीं सर फेरोजशहा मेथा यांच्या अध्यक्षतेखालीं कलकत्यास भरलेल्या कांग्रेसमध्यें गोखल्यांचें एका विषया-वर लहानसें भाषण झालें. ते सुमारें पंधरा मिनिटेंच 'प्राप्तीवरील करा-' विरुद्ध चार शब्द बोलले. त्यांनीं आपले या कराविरुद्ध असलेले विचार इतक्या मुद्देसूद रीतीनें व जोरानें पुढें मांडले कीं, त्यांचें भाषण झाल्या-वर सर्वांनीं त्यांची वहावा केली. त्यांची बुद्धिमत्ता व वक्तृत्वशक्ति याच खेपेस प्रथम लोकांच्या नजरेस आली.

यानंतरची त्यांची कामगिरी सर्वांस माहीतच आहे. त्यांपैकीं कांहीं ठळक ठळक गोष्टी सांगितल्या म्हणजे पुरे.

ना. गोखल्यांना सार्वजनिक पुढारी म्हणून कायमचा मान प्रथम वेल्बी-कमिशनपुढें झालेल्या साक्षीमळें मिळाला. याच वेळेपासून अग्रेसर सार्वजनिक पुढाऱ्यांत ते मोडूं लागले. कै. रानडे व कै. गणेश व्यंकटेश जोशी यांच्यासारख्या विद्वान् व अनुभवी माणसांकडून पूर्ण माहिती घेऊन, किंबहुना त्यांच्या देखरेखीखालीं साक्षीकरितां सज्ज होऊन ते वेल्बी-कमिशनपुढें साक्षीला गेले. निरनिराळी माहिती एका ठिकाणीं व्यवस्थित रीतीनें मांडण्याची हातोटी त्यांना चांगली साधली होती. वेल्बी-कमिशनचे वेळीं कलकत्याचे बानर्जी, मद्रासचे सुब्रह्मण्य आयर व मुंबईचे वाच्छा त्यांचेबरोबर होते. हीच त्यांची इंग्लंडची पहिली सफर होय. यानंतर आपल्याला पुन्हा पांचचार वेळा इंग्लंडला जावें लागेल, असें गोखल्यांच्या स्वप्नींही आलें नसेल. या निरनिराळया सफरींमुळें इंग्लंड-मधील बड्या वजनदार लोकांशीं त्यांच्या ओळखी झाल्या, राजकीय दृष्टि संकुचित न रहातां विस्तृत झाली, मनांत उदार विचारांची वाढ होऊं लागली, व लॉर्ड मोर्ले यासारख्या उदारमतवादी मुत्सद्द्याशीं निकट संबंध येऊन हिंदुस्थानाला अल्पप्रमाणावर कां होईनात, कांहीं राजकीय हक्क मिळाले. याच वेळेस गोखल्यांच्यासंबंधीं आणखी एक गोष्ट घडून आली. ते विलायतेस असतांना पुण्यांत प्लेगच्या दिवसांमध्यें घरांची तपासणी करणाऱ्या सोल्जर लोकांकडून अत्याचार झाल्याचीं कांहीं पत्रें त्यांना इंग्लंडांत मिळालीं व त्यांनीं तीं इंग्लिश वर्तमानपत्रांत प्रसिद्ध केलीं. ते जेव्हां मुंबईस परत आले, त्या वेळेस मुंबईसरकारानें त्यांना आपल्या बातमीबद्दल पुरावा पुढें आणण्यास सांगितलें. परंतु हवा असलेला पुरावा न मिळाल्या-मुळें त्यांना साहजिकपणें सरकारची माफी मागणें भाग पडल. त्याबद्दल पुष्कळ लोकांनीं त्यांच्यावर खरमरीत टीका केली; पण त्याचें त्यांना कांहीं वाटलें नाहीं. इतकेंच नव्हे, तर जरूर पडल्यास अशा प्रसंगीं मी पुन्हाही माफी मागेन, असें ते म्हणत.

१९०५ सालीं बनारस येथें भरलेल्या राष्ट्रीय सभेचे गोखले अध्यक्ष होते. याच बैठकींत १९०७ सालीं सुरतेस झालेल्या दुफळीचें बीजारोपण झालें. याच सभेंत राष्ट्रीय पक्षानें 'भीक्षांदेही-'च्या धोरणावर कडक टीका करून, 'बहिष्कारा-'च्या चळवळीस सुरुवात केली. सनदशीर पद्धतीनें कलोनिअल पद्धतीवर स्वराज्य मिळविण्याच्या गोखल्यांच्या धोरणावर याच वेळीं वादविवादाला आरंभ झाला. यानंतर गेल्या सात वर्षांत 'डीसेंट्रलायझेशन कमिशन' व 'पब्लिक सर्व्हिस कमिशन' यांनीं गोखल्यांचें बहुतेक सर्व लक्ष वेधलें होतें. पहिल्या कमिशनांत कै. रमेशचंद्र दत्त हे एक सभासद होते. त्यांनीं व इतर सभासदांनीं गोखल्यांच्या कामगिरीची फार प्रशंसा केली. यानंतर परवां सुरू झालेल्या 'रॉयल कमिशन-'चे ते सभासद होते, हें सर्वांस माहीतच आहे. सरकारी नोकरींत आपल्या देशबांधवांस योग्य न्यायानें वागविलें जात नाहीं, याबद्दल त्यांना नेहमीं हळहळ वाटत असे; यामुळें या कमिशनचे वेळीं आपलें सर्व वजन खर्च करून हा अन्याय दूर करण्याचा प्रयत्न करण्यांत ते रात्रंदिवस गुंतले होते. दुर्दैवानें इंग्लंडांतील गेल्या वर्षींच्या आजारीपणामुळें हें जबाबदारीचें काम त्यांना पुरतें करतां आलें नाहीं. कमिशनचे इंडियन व युरोपिअन सभासद यांच्यांत फार मतभेद होता. सर व्हॅलेंटाईन चिरोल यांच्या लेखणींतील विष युरोपियन लोकांत फार भिनलें होतें. गोखले व दुसरे दोघे इंडियन सभासद यांचा सर्व प्रयत्न ह्या विषाचा अंमल दूर करून सरकारी नोकरींच्या नियमांत इष्ट ती सुधारणा करण्याकरितां कमिशनचें एकमत करण्याचा होता. परंतु गोखल्यांच्या अकालिक मृत्यूमुळें हें त्यांचें काम अर्धेंच राहिलें. हें काम त्यांचे हातून पार पडतें, तर त्यांची सर्वांत मोठी कामगिरी झाली असती. शेवटपर्यंत हें काम आपण योग्य प्रकारें तडीस नेऊं व त्याचीं फळें लोकांस चाखावयास देऊं, अशी त्यांना आशा होती.

अलीकडे ' पब्लिक सर्व्हिस कमिशन-'च्या रिपोर्टाकडे सर्वांचें लक्ष लागलें हात. आपल्याला बहुमताविरुद्ध निराळा रिपोर्ट लिहावा लागेल असें गोखल्यांना प्रथम वाटत होतें. परंतु लढाईमुळें परिस्थितीबरोबरच इंग्लिशमत बदलल्यामुळें, बहुमताला आपल्याकडे वळवितां येईल असा त्यांचा अंदाज होता. या वेळीं गोखल्यांची आपल्याला फार जरूर होती. लढाईनंतर सरकारी धोरण बदलण्याचा संभव आहे. अशा वेळेस त्यांच्यासारखा वजनदार मुत्सद्दी असता तर पुष्कळ फायदा झाला असता.

गोखल्यांच्या कौन्सिलमधील कामास सन १९०० सालीं सुरवात झाली. या वर्षी मुंबईच्या कौन्सिलांत ते निवडून आले. त्यानंतर १९०२ सालापासून मरेपर्यंत ते व्हाईसरॉयच्या कौंसिलचे सभासद होते. त्यांनीं गेल्या बारा वर्षांत केलेलें काम लक्षांत ठेवण्यासारखें आहे. त्यांचीं भाषणें लिहून काढलेलीं नसत, तरी प्रत्येक भाषणाची तयारी कडेकोट असे. इंग्रजी भाषेंत ते वाकबगार होते, व त्यांची वाणी जात्याच मनोहर व आल्हादकारक होती. यामुळें कौन्सिलमध्यें त्यांची वक्तृत्वाबद्दल फार प्रशंसा होत असे. त्यांच्या भाषणांत अतिशयोक्ति नसून शब्द विचारपूर्वक योजलेले असत. त्यांची मुद्देसूद विचारसरणी सर्वांस पटण्यासारखी असे, व भाषणें नेहमीं कळकळ, उत्साह, नम्रता व सत्य यांनीं भरलेलीं असत. याच गुणांमुळें ते विशेष लोकप्रिय झाले होते.

याच अवधींत गोखल्यांनीं आणखी एक महत्त्वाची कामगिरी बजावली, तिचा या ठिकाणीं उल्लेख करणें जरूर आहे. त्यांना हल्लींच्या परिस्थितींत एक मोठी उणीव भासत होती. सुशिक्षित, स्वार्थत्यागी व अनुभवी माणसें मिळाल्यावांचून आपली प्रगति होणें शक्य नाहीं, हें त्यांना दिसत होतें. अशा माणसांची उणीव सर्वांसच भासते. अशी होतकरू मंडळी तयार करण्याकरितां त्यांनीं " सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटी "

स. १९०५ मध्यें स्थापन केली. ही संस्था फारच उपयोगी आहे; व अशा संस्था सर्व ठिकाणीं स्थापन व्हावयास पाहिजेत.

१९१२ च्या आक्टोबरमध्यें गोखले आफ्रिकेंत गेले. खुद्द त्या ठिकाणीं जाऊन वस्तुस्थिति समजून घेतल्यास फायदेशीर होईल, असें त्यांना वाटत होतें. बादशहांच्या शांत व न्यायप्रिय हिंदु रयतेस आफ्रिकेंत रहाण्यास काय काय अडचणी येतात, त्यांचे हाल होऊन त्यांना अनेक प्रकारचे अपमान कसे सोसावे लागतात, हें आतां प्रत्येकास माहीत झालें आहे. या अडचणी दूर करण्याचा गोखल्यांनीं शक्य तितका प्रयत्न केला. लो० गांधी यानीं त्यांना मुद्दाम आफ्रिकेंत बोलावलें होतें.

याप्रमाणें कै. गोखले यांच्या चरित्राचें सिंहावलोकन झालें. त्यांच्या अंगांत अनेक सद्गुण असून त्यांनीं ते सर्व देशकार्याकडे लाविलें, त्यांची असाधारण बुद्धिमत्ता त्यांच्या आयुष्यांतील सर्व गोष्टींत दिसून येते. त्यांच्यांत दिसून येणारी कळकळ, उत्साह, नम्रता, सत्यप्रियता, स्वदेशप्रीति वगैरे गुणांनीं ते इतके लोकप्रिय झाले होते. ते बुद्धिमान् व विद्वान् होते, परंतु त्यांना जगाचा फारसा अनुभव नसल्यामुळें त्यांना मनुष्यस्वभावाची चांगली ओळख नसे. कोल्हापूर सोडून सार्वजनिक कामांत पडत तोंपर्यंत त्यांचा सर्व काल अध्ययन व अध्यापन यांतच गेला. शिक्षकवर्ग नेहमीं एकांगी कसा असतो, हें सर्वांस माहीत आहे. ही मंडळी एकमार्गी असल्यामुळें दुसऱ्याचे डावपेंच त्यांना फारसे समजत नाहींत. हीच स्थिति प्रथम बरेच दिवस गोपाळराव गोखले यांची होती. प्रोफेसरचें काम सोडल्यानंतर ते सार्वजनिक कामांत पडले, पण त्यांचा सामान्य जनसमूहाशीं निकटसंबंध कधींही आला नाहीं. ते नेहमीं वरच्या समाजांतच वावरत असत; यामुळें प्रतिपक्षाशीं दोन हात करावयास लागणारा वकिली कावा त्यांच्यापाशीं नव्हता. परंतु अलीकडे त्यांना प्रतिपक्षाचे डावपेंच

समजूं लागले होते. प्रथमपासून ते साधे व सरळ असत. त्यांना भांडणा-पेक्षां समेटच विशेष आवडत असे, व पुष्कळ वेळा तो साधण्याकरितां थोडी हार खाण्याकडेही त्यांची प्रवृत्ति होती.

गोखल्यांच्या एकंदर आयुष्यक्रमाकडे आपण पाहूं लागलों म्हणजे आपल्याला त्यांच्या अंगचे गुण दिसूं लागतात. त्यांच्या मनाला स्वार्थाची कल्पनासुद्धां शिवली नाहीं. रात्रंदिवस आपल्या देशाची उन्नति होण्यास काय केलें पाहिजे, इकडे त्यांचें लक्ष असे. त्यांचा स्वार्थत्याग व देशाभिमान यांबद्दल त्यांच्या प्रतिपक्षालासुद्धां कधींही शंका आली नाहीं. शिक्षण संपल्यावर डे. ए. सोसायटीसारख्या लोकोपयोगी संस्थेंत त्यांनीं पाऊणशें रुपयांवर काम करण्यास सुरवात केली. त्यांच्यामध्यें अनेक गुण असल्यामुळें त्यांनीं मनांत आणलें असतें, तर त्यांना फार मोठ्या हुद्याची जागा मिळवून पुष्कळ द्रव्यसंचय करितां आला असता. परंतु असा विचार त्यांच्या मनांत येणें शक्य नव्हतें. त्यांनीं आपली रहाणी नेहमीं साधी ठेविली होती. त्यांच्या स्वार्थत्यागाचीं अगदीं अलीकडचीं दोन उदाहरणें लोकांच्या डोळ्यांपुढें आहेत. सुमारें सहासात महिन्यांपूर्वी बादशहा पांचवे जॉर्ज हे त्यांना 'के. सी. आय्. ई.'ची बहुमानाची पदवी देऊन त्यांचा गौरव करीत होते; परंतु गोखल्यांनीं विनयपूर्वक ती घेण्याचें नाकारलें. त्याचप्रमाणें परवांच्या पब्लिक सर्विस कमिशनचे जेव्हां त्यांना सभासद नेमलें, त्या वेळेस व्हाईसरॉयच्या कौन्सिलचे ते सभासद असल्यामुळें त्यांना पगार घेतां येईना. जर त्यांनीं कौन्सिलांतील जागा सोडली असती, तर त्यांना पगार मिळाला असता, परंतु त्यांनीं ती जागा सोडण्याचें नाकारलें. त्यांची देशप्रीती केवळ शाब्दिक नसे. ते नेहमीं अंग मोडून मेहनत करण्यास तयार असत. त्यांना विश्रांति हा शब्दच ठाऊक नव्हता. परवां अगदीं आसन्नमरण झाल्यावरसुद्धां पहाटे तीनचार तास ते

लिहीत बसत. त्यांची परिश्रम करण्याची हौस अगदीं आरंभापासून दिसून येते. त्यांनीं एवढ्या लहानपणीं जी कीर्ति मिळविली, ती केवळ त्यांची बुद्धिमत्ता व विशेषेंकरून त्यांचे परिश्रम यांमुळेंच मिळविली. त्यांची एकंदर आयुष्यांतील कामगिरी पाहिली असतां असें वाटतें कीं, अवघ्या ४८।४९ वर्षांच्या अवधींत इतकीं कामें यांना कशीं करतां आलीं! प्रसिद्ध इंग्लिश मुत्सद्दी बुइल्यम पिट् याच्याशीं गोखल्यांची तुलना करूं लागल्यास पुष्कळ बाबतींत दोघांचें साम्य दिसून येतें. दोघेही लहान वयांत शिक्षणक्रम संपवून लोकोपयोगी कामें करूं लागले. दोघांनीं देशाला वाहून घेतलें होतें. दोघांच्यामध्यें वक्तृत्व उत्तम प्रकारचें असून दोघेही मुत्सद्दी होते. बुइल्यम् पिट्चा सन १७५९ सालीं जन्म होऊन तो १७८१ सालीं म्हणजे वयाच्या बाविसाव्या वर्षीं पार्लमेंटांत बसून राजकारण करूं लागला. थोड्याच अवधींत सर्व मोठाल्या जागा पटकावून पुढें लवकरच तो मुख्य प्रधान झाला. हीं सर्व कामगिरी त्यानें अवघ्या सत्तेचाळीस वर्षांच्या आयुष्यांत केली. गोखल्यांच्या आयुष्यांतही याच गोष्टी दिसून येतात. अठराव्या वर्षीं ते बी. ए. होऊन विसाव्या वर्षीं प्रोफेसरचें काम करूं लागले. पंचविसाव्या वर्षीं प्रांतिकसभेचे सेक्रेटरी होते. एकुणतिसाव्या वर्षीं कांग्रेसचे सेक्रेटरी झाले. एकतिसाव्या वर्षीं त्यांनीं रॉयल-कमिशनपुढें साक्ष दिली. चौतिसाव्या वर्षीं ते कौन्सिलचे सभासद झाले. एकुणचाळिसाव्या वर्षीं कांग्रेसचे अध्यक्ष होऊन चाळिसाव्या वर्षीं 'सर्वंटस् ऑफ इंडिया सोसायटी' स्थापन केली. याप्रमाणें लहानमोठीं जबाबदारीचीं कामें अवघ्या एकुणपन्नास वर्षांत करून गोखल्यांनीं आपला कारभार आटपला. मराठा-कर्ते यांनीं म्हटल्याप्रमाणें गोखल्यांच्यासारखा बुद्धिमान् व कर्तृत्ववान् पुरुष इंग्लंडांत जन्मला असता, तर त्याला प्रधानकीचीं वस्त्रें मिळाल्यावांचून राहिलीं नसतीं.

हल्लींच्या तरुण पिढीनें गोखल्यांच्या चरित्रासापासून एक मोठा

धडा शिकण्यासारखा आहे. पुष्कळांना असें वाटत असतें कीं, शाळेंतील व कॉलेजांतील शिक्षणक्रम संपला म्हणजे देशकार्य करूं लागण्यास कांहीं हरकत नाहीं. देशकार्य करण्याकरितां मुद्दाम निराळे शिक्षणाची काय जरूर आहे? परंतु हा विचार केवळ भ्रामक आहे. कोणतीही गोष्ट आपल्या हातून चांगली पार पडावयाची असेल, तर आपण तिच्यासंबंधीं पुरी माहिती करून घेतली पाहिजे. देशकार्य करणाऱ्या माणसापुढें अनेक प्रश्न येतात. सामाजिक, आर्थिक, धार्मिक, राजकीय, नैतिक वगैरे सर्व दृष्टींनी त्याला विचार करावयाचा असतो. आपल्या कामांत येणाऱ्या अडचणी डोळ्यां-पुढें ठेवाव्या लागतात. अंडें फोडून बाहेर पडणाऱ्या बदकाचें पिलूं जितक्या सहज रीतीनें पाण्याकडे धावूं लागतें, तितक्या सहज रीतीनें युनि-व्हर्सिटींतून बाहेर पडल्याबरोबर देशकार्य करावयास जाणें शक्य नाहीं. देशहित साधणाऱ्या माणसानें प्रथम लोकनायकांचीं चरित्रें वाचून, त्यांनीं निरनिराळे प्रश्न कसे सोडविले, हें पाहिलें पाहिजे. त्याचप्रमाणें इतिहास, अर्थशास्त्र वगैरे सामाजिक ऊहापोह करण्यास लागणाऱ्या शास्त्रांचा अभ्यास केला पाहिजे. व विशेषकरून प्रथम कांहीं दिवस दुसऱ्याच्या हाताखालीं कामें केलीं पाहिजेत. गोपाळराव गोखले यांनीं देशकार्याचें शिक्षण याच प्रकारें घेतलें होतें. अशा रीतीनें पुष्कळशीं माणसें तयार केल्याशिवाय देशाचें दिसण्यासारखें फारसें काम व्हावयाचें नाहीं, असें त्यांना नेहमीं वाटत असे; व अशीं माणसें तयार करण्याकरितांच त्यांनीं सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटीची स्थापना केली.

गोखल्यांच्या अंगचे आणखी विशेष घेण्यासारखे गुण म्हणजे सत्य-प्रियता व निर्भीडपणा हे होत. ते कोणाची भीड न धरितां आपलीं मतें स्पष्ट लोकांच्यापुढें मांडीत असत. त्यांचीं कौन्सिलमध्यें वेळोवेळीं झालेलीं व्याख्यानें वाचलीं तर असें दिसतें कीं, सरकारच्या धोरणावर वेळ पडल्यास

कडक टीका करण्यासही ते भ्याले नाहींत. त्यांचा हा गुण विशेषेंकरून लॉर्ड कर्झन यांच्या अरेरावी कारकीर्दीत दिसून आला. बंगालच्या फाळणीच्याविरुद्ध त्यांनीं केलेलें भाषण वाचण्याची आम्ही प्रत्येकास शिफारस करितों. त्याचप्रमाणें त्यांचीं बजेटवरील, लँड रेव्हिन्युवरील, व सर फुलर यांच्या कारकीर्दीवरील झालेलीं भाषणें त्यांच्या निर्भीडपणाची साक्ष देतील. लॉर्ड कर्झनसारख्या सुलतानी अधिकाऱ्याच्या कारकीर्दीस तोंड देणें सोपें नव्हतें. लॉर्ड कर्झन स्वतः बुद्धिमान्, चाणाक्ष व कसलेला वक्ता होता. त्याच्याशीं दोन हात करणारा प्रतिपक्षी त्याच्या तोलाचाच असला पाहिजे. त्यानें स्वतः गोखल्यांच्या वक्तृत्वाचा उल्लेख करून त्यांच्या निर्भीडपणाची प्रशंसा केली आहे.

याप्रमाणें थोडक्यांत गोखल्यांच्या चारित्राचें आपण विवेचन केलें. गोपाळरावांच्या मृत्यूमुळें सर्व देश अंधारांत चांचपडत आहे. पुष्कळ माणसांना त्यांची किंमत त्यांच्या निधनानंतर कळून आली. खोलीमध्यें आपण दिवा लावून आपलें काम करूं लागतों. नेहमीं कामांतच गर्क असल्यामुळें दिव्याकडे आपलें लक्ष जात नाहीं. परंतु कांहीं कारणामुळें दिवा मालवला, म्हणजे त्याची वाण भासूं लागते. हीच स्थिति गोखल्यांच्याविषयीं झाली. त्यांच्या मृत्यूनंतर साहजिकपणेंच त्यांची उणीव भासूं लागल्याकारणानें त्यांची योग्यता लोकांच्या नजरेस ज्यास्त येऊं लागली. सर्वांना अंधारांत सांपडल्यासारखें झालें आहे. अशा वेळीं पाऊल पुढें कसें टाकावें, हा विचार ज्याच्या त्याच्यापुढें आहे. परंतु अशी निराशा बाळगून चालणार नाहीं. प्राचीन काळीं, रोमच्या प्रजासत्ताक राज्यासंबंधीं निराशा बाळगणें कायद्यानें राजद्रोहाचा गुन्हा होत असे. त्याचप्रमाणें आपण जर गोखल्यांच्या मृत्यूमुळें निराश होऊन बसलों, तर तो आपल्या हातून एक गुन्हाच होईल. धीर खचूं न देतां कर्तव्य लक्षांत ठेवून काम करण्यास आप-

त्याला तयार झालें पाहिजे; व अशा रीतीनें सतत काम करून आपण त्यांचे उतराई होण्याचा प्रयत्न केला पाहिजे. त्यांनीं एक उच्च हेतु मनांत धरून काढलेल्या त्यांच्या सोसायटीला मदत करणें हें आपलें कर्तव्य आहे. इंग्लिशांचा जातीविषयीं अभिमान, त्यांची अधिकारवृत्ति, हिंदुलोकांच्या संबंधीं असणारे गैरसमज या सर्व गोष्टी स्वराज्याचे अधिकार मिळाल्या-वांचून घडणार नाहींत, असें त्यांना नेहमीं वाटे. राजकीय हक्कांशिवाय हिंदूंना गत्यंतर नाहीं, अशी त्यांची ठाम समजूत होती; व म्हणून त्यांनीं आपल्या सर्व आयुष्यभर राजकारणच हातीं घेतलें. शिक्षण, व्यापार वगैरे समाजोन्नतींतील बाबी घडून येण्यास स्वराज्य पाहिजे. या सर्वांच्या मुळाशीं स्वातंत्र्य आहे; परतंत्रतेमुळें कांहीं एक होणें शक्य नाहीं, असें ते नेहमीं दर्शवीत असत. परतंत्रतेंत आनंद मानणें मनुष्यप्राण्यास शोभत नाहीं, असें ते नेहमीं म्हणत. हें त्यांचें ध्येय लक्षांत ठेवून आपण वागण्याचा प्रयत्न करावा. कायद्याचें उल्लंघन न करितां आपलें स्वातंत्र्य कायम ठेवण्याचा प्रत्येकानें निश्चय केला पाहिजे. याप्रमाणें निश्चय करून वागल्यास व धीर खचूं न देतां देशहिताकरितां योग्यमार्गानें प्रयत्न करीत गेल्यास कांहीं दिवसांनीं सध्यां उत्पन्न झालेली चिंता दूर होणें कठिण पडणार नाहीं.

# कोलंबोपासून आल्मोरापर्यंत.

( स्वामी विवेकानंद यांचीं व्याख्यानें. )

## व्याख्यान १७ वें.

( मागील अंकावरून पुढें चालू. )

बंधुजनहो, माझ्या अगदीं अंतःकरणांतल्या—माझ्या अंतःकरणाच्या सप्तपाताळांत निरंतर वागणाऱ्या—दुसऱ्या एका गोष्टीचा—माझे गुरु, माझे

आचार्य, माझा आदर्श, माझा कित्ता, माझा प्राणेश्वर, असे जे श्रीरामकृष्ण परमहंस त्यांच्या नांवाचा–उल्लेख तुम्हीं केला आहे. जर कांहीं कायिक, वाचिक, किंवा मानसिक महत्कार्य माझ्या हातून झालें असेल, जगांतील कोणाही व्यक्तीचें कल्याण करणारा असा एकादा शब्द जर कधीं माझ्या मुखांतून बाहेर पडला असेल, तर त्यांत मला मोठेपणा मुळींच नाहीं; त्यांत माझें असें कांहीं नाहींच, त्याचें सर्व श्रेय त्यांना आहे. पण माझ्या जिव्हेनें जर कधींकाळीं अभिशापांचा उच्चार केला असेल, जर माझ्या मुखांतून कधीं द्वेषपूर्ण शब्द बाहेर आले असतील, तर तो सगळा दोष माझा आहे, त्यांचा नाहीं. माझ्यांत (माझ्या भाषणांत) जें जें म्हणून दुबळेपणाचें आहे, तें तें सर्व माझें आहे; आणि जें जें कांहीं उत्साहप्रद, बलप्रद व पवित्र आहे, तें तें सर्व त्यांची शक्ति, त्यांची प्रेरणा, त्यांची वाणी, किंबहुना मूर्तिमंत तेच आहे. बंधुजनहो, खरें बोलायचें म्हटलें म्हणजे जगानें अद्याप त्या महात्म्याला ओळखलेंच नाहीं. जगाच्या इतिहासांत शेंकडों महापुरुषांचीं चरित्रें आपण वाचतों; व शिष्यप्रशिष्यांच्या लेखणीनें व कारवाईनें आज शेंकडों वर्षें सजत सजत तीं आपल्या हातीं आलेलीं असतात. हजारों वर्षें झिलई व उजाळा घेत घेत प्राचीन महात्म्यांचीं चरित्रें आपल्यापर्यंत आलेलीं असतात. असें जरी आहे, तरी ज्यांचें चरित्र मीं या डोळ्यांनीं पाहिलें, ज्यांच्या छायेंत मी वास केला, ज्यांच्या पायांपाशीं बसून मी सर्व कांहीं शिकलों, त्या श्रीरामकृष्ण परमहंसांच्या चरित्राची उज्ज्वलतेंत बरोबरी करील, असें माझ्या मतें त्यांत एकही चरित्र नाहीं.

बंधुजनहो, गीतेचें पुढील प्रसिद्ध वचन आपल्याला ठाऊकच आहे:—

यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत।  
अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ॥

परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम् ।
धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ॥

अर्थः—हे भारता, जगांत धर्मांचा ऱ्हास व अधर्मांचा उत्कर्ष जेव्हां जेव्हां होतो, तेव्हां तेव्हां मी सशरीर होतों. साधूंचें रक्षण करावें, दुष्टांचा संहार करावा, व धर्माची संस्थापना करावी, यासाठीं प्रत्येक युगामध्यें मी जन्मग्रहण करितों.

याबरोबरच आणखी एक गोष्ट आपण लक्षांत ठेविली पाहिजे. ती गोष्ट आज आपल्यापुढें प्रत्यक्ष होत आहे. अशी एकादी धर्माची प्रचंड लाट उसळण्यापूर्वी समाजसमुद्रावर अनेक क्षुद्र क्षुद्र तरंगपरंपरांचा आविर्भाव झालेला दिसून येतो. अशा क्षुद्र तरंगांपैकीं एक—ज्याचें अस्तित्व पहिल्यानें कोणाच्या दृष्टीला गोचरही असत नाहीं, जो पहिल्यानें कोणाच्या लक्षांतही येत नाहीं, ज्याच्या आंगची गूढशक्ति कोणाला स्वप्नींही दिसत नाहीं, असा एक—क्रमशः प्रबल होत होत इतर क्षुद्र क्षुद्र तरंगांना आक्रांत करून आपल्यांत मिळवून टाकतो. अशा रीतीनें प्रचंड आणि प्रबल होऊन त्याला महोर्मीचें स्वरूप प्राप्त होतें; मग तो परिणत तरंग समाजावर इतक्या वेगानें जाऊन पडतो कीं, त्याची गति कोणालाही रुद्ध करितां येत नाहीं. ही क्रिया आज आपल्या देखत चालू आहे. जर तुम्हांला डोळे असतील, तर तुम्हांला ती दिसेल. तुमच्या हृदयाचा दरवाजा जर खुला असेल, तर तिचा तेथें प्रवेश होईल. जर तुम्ही सत्यानुसंधित्सु असाल, तर तिची प्राप्ति तुम्हांला होईल. आजच्या काळाचीं लक्षणें ज्याला दिसत नाहींत, तो आंधळा—अगदींच आंधळा—म्हटला पाहिजे. पहा बरें, ज्या देशांतील लोक आज शेंकडों वर्षं मूर्तिपूजेच्याविरुद्ध सारखी ओरड करीत आहेत, त्याच देशांतील लोक, आज ज्याचें नांवही कधीं कोणाच्या कानांवर आलें नाहीं, अशा एका कोंपऱ्यांतल्या खेड्यांत दरिद्री ब्राह्मण-आई-

बापांच्या पोटीं जन्मलेल्या या मुलाची खरोखर पूजा करीत आहेत. ही शक्ति कोणाची ? माझी का ? तुमची का ? नाहीं. जी शक्ति इथे रामकृष्ण परमहंसांच्या रूपानें प्रकट झाली, तीच ती; दुसरी कोणतीही नाहीं. कारण, तुम्ही, मी, ऋषि, महात्मे, एवढें कशाला ? अवतारी पुरुषही, अखिल ब्रह्मांड, सर्व कांहीं त्याच शक्तीची केवळ व्यक्ति आहे;—मात्र हा तिचा विकास कुठे ज्यास्त, तर कुठे कमी असा असतो. या ठिकाणीं ( श्रीराम-कृष्णांत ) त्या महाशक्तीचा अत्यंत विकास झालेला असून तिच्या खेळाचा आज आपल्याला केवळ आरंभ दिसत आहे; आणि ही पिढी उलटण्या-पूर्वींच तिच्या कर्तृत्वाचा अजब खेळ तुमच्या दृष्टीस पडेल. भारतवर्षाचें पुनरुत्थान करण्याकरितां ती शक्ति अगदीं वेळेवर प्रकट झाली आहे; कारण, ज्या तेजस्वी मूलशक्तीच्या जोरावर भारतवर्ष निरंतर आपलें कर्तृत्व कायम ठेवणार, त्या शक्तीचा वेळोवेळीं आम्हांला विसर पडतो.

प्रत्येक राष्ट्राची कार्याची दिशा वेगळी वेगळी असते. कांहीं राज-कारणाचा अवलंब करून कार्य करीत असतात, कांहीं समाजसुधारणेच्या-मागें लागून आपलें कर्तृत्व दाखवितात, कांहीं दुसऱ्या कांहीं तरी मार्गाच्या रोखानें जात असतात. आम्हांला आपलें कर्तृत्व फक्त धर्मक्षेत्रावरच दाख-वितां येतें. राजकारणाची दुर्बीण लावावी, तेव्हांच इंग्रजांना धर्म दिसतो. समाजसुधारणेचा हात धरल्यावांचून अमेरिकन लोकांना धर्माकडे जातां येत नाहीं. पण हिंदूंची गोष्ट वेगळी आहे. राजकारणाची, समाजसुधारणेची, किंवा दुसऱ्या कशाचीही गोळी जर धर्माच्या साखरेंत घोळलेली नसेल, तर ते तिचें केव्हांही सेवन करणार नाहींत. कारण, त्यांच्या जीवनसंगीतां-तील धर्म हाच प्रधान सूर असून बाकी सगळ्या बाबी म्हणजे त्या सुराचे नुसते आलाप होत. पण हा आमचा सूर सुटतो कीं काय, अशी धास्ती उत्पन्न झाली, आमच्या राष्ट्रीय जीवनाचा हा मूलाधार सोडून देऊन

आम्ही भलत्याच गोष्टीला बिलगणार, ज्या दिव्यौषधीच्या बळावर आमचें जीवित कायम राहिलें आहे, त्या दिव्यौषधीचा परित्याग करून आम्ही दुसरीच कांहीं तरी वस्तु सेवन करूं लागणार, धर्माची आधारयष्टि फेंकून देऊन राजकारणावर आम्ही आपला सर्व भार टाकणार, असा रंग दिसूं लागला. जर हें स्थित्यंतर झालें असतें, तर त्यानें आमचा पुरा विनाश केला असता. पण तसें व्हावें, असा ईश्वरी नेमानेम नव्हता; म्हणून ही महाशक्ति प्रकट झाली. या सत्पुरुषासंबंधानें तुमची दृष्टि कशीही असो; त्याच्यावर तुमची श्रद्धा असो कीं नसो; पण मी तुम्हांला असें छातीला हात लावून स्पष्ट सांगतों कीं, या भारतवर्षांत महाशक्तीची अशी अद्भुत व्यक्ति कित्येक शतकांत झाली नाहीं. आणि या व्यक्तीच्या द्वारें भारतवर्षाचीच नव्हे, तर अखिल जगाची उन्नति किती साधली आहे, जगाचें किती कल्याण झालें आहे, हें समजावून घेण्याकरितां या व्यक्तीच्या चारित्राचें मनन करणें हें तुम्हीं हिंदु असल्यामुळें तुमचें कर्तव्य आहे. जगांतील कोणत्याही देशांत सार्वभौम धर्माचा प्रश्न, किंवा निरनिराळ्या धर्मसंप्रदायांतील लोकांमध्यें भ्रातृभावाचा प्रश्न उपस्थित व चर्वित होण्याच्यापूर्वी याच नगराच्या सन्निकट अशी एक व्यक्ति होऊन गेली कीं, तिचें सर्व चरित्र म्हणजे जणुं काय अखिलधर्मांची परिषदच होती.

निर्गुण ब्रह्म हेंच मनुष्याचें अंतिम साध्य आहे, असें आपल्या शास्त्रांत सांगितलें आहे; आणि ईश्वरकृपेनें त्या निर्गुण ब्रह्माची प्राप्ति जर सर्वांना सहजसाध्य असती, तर फार चांगलें झालें असतें. पण ज्या अर्थी तशी स्थिति नाहीं, त्या अर्थी आपल्याला, सर्व मनुष्यजातीला, कांहीं तरी सगुण ध्येय असावें, हें अत्यंत इष्ट आहे. कोणा तरी महापुरुषाच्या निशाणाखालीं आल्यावांचून—कोणा तरी महापुरुषाचा कित्ता पुढें ठेवून तो वळविल्यावांचून—कोणत्याही राष्ट्राला आपली उन्नति साधतां येणार नाहीं; महत्त्वाच

चढतां येणार नाहीं, कोणतेंही कार्य करितां येणार नाहीं. कोणा राजकारणी पुरुषाचा, किंवा सामाजिक सुधारणेंतील अध्वर्यूचा, किंवा वाणिज्यव्यवहारांतील कोणा नामांकित व्यक्तीचा कित्ता हिंदुस्थानांतील लोकांच्या केव्हांही डोळ्यांत भरावयाचा नाहीं. आम्हांला नेहमीं आध्यात्मिक आदर्श पुढें लागतो. स्वानंदसाम्राज्यपदावर आरूढ झालेल्या व्यक्तींच्या नामगजरांत बेहोषपणें आम्हांला नाचायला पाहिजे. धर्मांगणावर प्रभावशाली ठरलेलेच वीर आम्हांला मान्य होतात. याच मालिकेंतील रामकृष्ण परमहंस हे एक वीर असून त्यांची प्राप्ति आपल्याला ईश्वरी कृपेनें झाली आहे. या राष्ट्राला जर आपली उन्नति हवी असेल, तर मी असें निश्चयानें सांगतों कीं, याच नामाचा जयघोष त्यानें केला पाहिजे. रामकृष्णांचा यशोदुंदुभि मी, तुम्ही, कोणीही पिटो; त्यांत कांहीं मोठेंसें नाहीं. पण हा कित्ता मी तुमच्यापुढें ठेवतों; व बाकी विचाराचा सर्व भार मी तुमच्यावर टाकतों.—आपल्या लोकांच्या—राष्ट्राच्या—कल्याणाकरितां हा कित्ता कसा वळवावा, हें मी तुमच्यावर सोंपवितों. मात्र एक गोष्ट आपण पक्की लक्षांत ठेविली पाहिजे. ती हीच कीं, तुम्हीं आजपर्यंत जितके म्हणून सत्पुरुष पाहिले असतील, किंवा अगदीं स्पष्ट बोलायचें म्हटलें, तर जितक्या सत्पुरुषांचीं चरित्रें तुम्हीं आजपर्यंत वाचलीं असतील, तितक्या सगळ्यांत यांचें चरित्र अत्यंत निर्मल होतें. त्याचप्रमाणें हीही गोष्ट अगदीं स्पष्ट आहे कीं, यांच्यासारखें आध्यात्मिक उन्नतीच्या विकासाचें उदाहरण कुठे तुमच्या वाचनांतही आलें नसेल; मग पाहण्याची गोष्ट तर दूरच. या विभूतीला समाधिस्थ होऊन दहा वर्षें लोटतात न लोटतात, तोंच तिनें आपल्या प्रभावानें सर्व जग व्यापून टाकलें, ही गोष्ट तुम्हांला प्रत्यक्ष दिसत आहे. यासाठीं, केवळ कर्तव्यबद्धतेमुळें आपल्या राष्ट्राच्या कल्याणाकरितां, आपल्या धर्माच्या उन्नतीकरितां हा आध्यात्मिक आदर्श मी तुमच्यापुढें ठेवितों. माझ्यावरून त्यांची

किंमत ठरवूं नका. मी केवळ एक क्षुद्र बाहुलें आहें. मला पाहून त्यांच्या शीलाचा अजमास बांधूं नका. त्यांचें शील इतकें उन्नत होतें कीं, मीं किंवा त्यांच्या कोणत्याही शिष्यानें शेकडों जन्म जरी घेतले, तरी त्यांच्या अंगीं जें खरें पाणी होतें, त्याचा एक कोट्यांशही आमच्या अंगीं यावयाचा नाहीं. तुम्ही आपल्या मनाशींच विचार करा; तुमच्या अंतःकरणांतल्या अंतः-करणांत तो सनातन सर्वसाक्षी विराजत आहे; आणि माझी त्याला, त्या रामकृष्ण परमहंसाला अशी प्रार्थना आहे कीं, आमच्या राष्ट्राच्या कल्याणाकरितां आमच्या देशाच्या उन्नतीकरितां, अखिल मानवजातीच्या हिताकरितां त्यानें तुमचीं अंतःकरणें खुलीं करावीं; व आमचा प्रयत्न असो कीं नसो, पण पुढें जगांत जें स्थित्यंतर घडून यावयाचें आहे, त्याच्या उद्योगाला लाग-णारें सत्य व स्थैर्य त्यानें तुमच्या अंगीं आणावें. कारण, तुमच्यासाठीं किंवा माझ्यासाठीं परमेश्वराचें कार्य कधीं थबकून रहात नाहीं. आपल्या कार्यासाठीं शेंकडों, हजारों माणसें केवळ धुळीपासून उभीं करण्याचें सामर्थ्य त्याचे अंगीं आहे. त्याचें कार्य करण्याची संधि आपल्याला लाधली आहे, हें केवळ आपलें भाग्य आहे. ( अपूर्ण. )

---

## वार्ताविहार. २-८-२-८६

एक जपानी मासिक म्हणतें:—" आज युरोपांत ज्या लढाया होतात, त्यांत एक गोष्ट नेहमीं पाहण्यांत येते; जपानचे शिपाई समरांगणा-वर असले, तर तशी गोष्ट केव्हांच दिसून येत नाहीं. ती गोष्ट ही कीं, कोणतीही लढाई आटोपली म्हणजे दोन्ही पक्षांच्या हातीं आलेल्या बंदि-वानांची संख्या फारच मोठी असते. जपानी शिपाई शत्रूच्या स्वाधीन केव्हांच होत नाहीं. जखमी होऊन जे दुबळे झाले असतील, तेच फक्त

शत्रूच्या हातीं पडतात. चीनशीं जपानचें जें युद्ध झालें, त्यांत एकही जपानी बंदिवान झाला नाहीं. रशियाशीं झालेल्या युद्धांत सुमारें हजार जपानी माणसें रशियाच्या हातीं लागलीं होतीं, पण तीं लष्करी पेशाचीं नव्हतीं; सामान्य माणसें होतीं. जो शिपाई किंवा खलाशी शत्रूच्या स्वाधीन होऊन बंदींत पडतो, तो देशांत परत आल्यावर समाजांतून उठल्यासारखा होतो. त्याला समाजांत कोणीच विचारीत नाहीं. शत्रूच्या हातीं जिवंत सांपडल्याचा त्याला लागलेला डाग केव्हांही नाहींसा होत नाहीं. जपानी सैन्याच्या व आरमाराच्या आंगीं मृत्यूची तुच्छता पक्की मुरलेली असते. आपल्या देशाच्या शत्रूशीं लढाईला उभें राहिल्यावर आपण जिवंत परत येऊं, ही भावनाच कोणी ठेवीत नाहीं. शत्रूचा वेढा पडलेल्या ठिकाणाचें रक्षण जाग्यावर एकही मनुष्य शिल्लक न उरेपर्यंत जपानी लोक करतील. ' किल्ल्याचे मांडीवर उसें ठेवून मरा ' हा मंत्र जपानी शिपाई अक्षरशः पाळतात. ''

---

तेंच मासिक आणखी म्हणतें:—हल्लीं देशांत जिकडे तिकडे जर्मन कैदी पसरले आहेत. ते चैनींत व सुखांत राहात आहेत. सर्व लोक त्यांना सहानुभूतिपूर्वक सर्व प्रकारची मदत करीत आहेत. पण या सगळ्या गोष्टींचा जपानी शिपायांवर वाईट परिणाम होणार आहे. शत्रूच्या स्वाधीन होण्यापेक्षां मरून जाणें चांगलें, हें तत्त्व जपाननें आपल्या शिपायांना शिकविलें आहे; आणि एकादा किल्ला जर शत्रूनें घेतला, तर जपानी सेनापति व त्याचे शिपाई जिवंत कधींही शत्रूच्या हातीं लागणार नाहींत. आतां कांहीं अपमान न वाटतां हे हजारों ( जर्मन ) शिपाई शत्रूच्या

[ रंगीत पृष्ठ २ पहा. ]

# केरळकोकिळ.

वर्ष ४ थें.] मे १९१५. [अंक ११ वा.


## शांतिनिधान.[1]

### फटका.

१

निधान केवळ आनंदाचें मन माझें मज राज्य असे ।
ऐहिक विभवाहुनी श्रेष्ठ तें सौख्य त्यामधें मज गवसे ॥
जग जें उपजवि मनुष्य पिकवी सुख तें सारें मला घरीं-।
बसल्या जागीं कष्ट न करितां प्राप्त होतसे परोपरी ॥
जें बहु मनुजांपाशिं असे ।
तें सारें मज हवें असे ।
तरि मज मागूं देत नसे ।
मन्मन मानी असें असे ।
संतोषाच्या आधारावरि सदा स्वस्थ मी असा असें ॥ १ ॥

२

आवश्यक जें अधिक त्याहुनी कांहिंच मजला नको असे ।
जुलमी सत्ता मला कुणाची सहन निखालस होत नसे ॥
ज्याची ज्याची उणीव सहसा मजला कांहीं पडत असे ।
तें तें सारें सहजासहजीं मन माझें मज पुरवितसे ॥

---

१ 'Contentment' या इंग्रजी चुटक्याचें रूपांतर.

२

तुच्छ जया मम लेखितसे ।
मुळींच तें मज रुचत नसे ।
जितुकें मन्मन आणितसे ।
तृप्त त्यांत मी सदा असें ।
राजापरि मी सकलांवरतीं विजय असा हा मिळवितसें ॥२॥

३

हृष्ट वरी परि मनिं हिरमुष्टी जनता बहुधा मला दिसे ।
बाह्यात्कारीं जरि कष्टी मी तरी अंतरीं तसा नसें ॥
उंचावरतीं जन जे कोणी काल पाहिले मीं बसले ।
दुर्दैवानें ते सारे परि आज पाहतों तळिं आले ॥
तडफड धडपड करोनिया ।
संतत चिंता वाहुनिया ।
घरीं आणिती मिळवुनिया- ।
आय, न पुरवे तरी व्यया ।
चिंतेचे हे गुंते कधिंही सहावया मन सिद्ध नसे ॥ ३ ॥

४

घडो कितीही हानि परांची मला न येई कधीं हंसें ।
परांस घडतां लाभ तसाही कुरकुर माझी मुळीं नसे ॥
कशीहि उसळो लाट जगाची तुच्छ न तिज मी मानितसें ।
ज्यानें व्हावें दुःख परांना तें मी हांसत साहितसें ॥
कशाहि शत्रुस भीत नसें ।
कुणीहि जन मज तुच्छ नसे ।
मी नच विश्वाऽमित्र असें ।
परि मी विश्वा मित्र असें ।
मृत्यूसहि मी भीक न घालीं क्षितीच त्याची मला नसे ॥ ४ ॥

 कृपया पुस्तक जपून वापरा

५

कितीहि संग्रहिं कित्येकांच्या, वाण न त्यांची तरी सरे ॥
अल्प कितीही जरि मजपाशीं मला होइ तें पुरे पुरे ॥
हपापलेले सदासर्वदा दीन भिकारी ते असती ।
अल्पतुष्ट मी धनिक खरोखर, अपूर्व माझी श्रीमंती ॥

दीन मनेंही ते असती ।
धनिक खरा मी परि जगतीं ।
सदा उताणा कर त्यांचा ।
परी पालथा मम साचा ।

उणीव त्यांना, कधीं नसे मज; ते झुरती, मी सुखी वसें ॥५॥

६

इच्छाशक्ती वश मज माझी मला कशाची आस नसे ।
गरजेहूनी अधिकास्तव मी कधींच भटकत फिरत नसें ॥
प्रशांत जीवन मला आवडे गिरिशिखरीं मी चढत नसें ।
भवार्णवींच्या घोर वादळीं जात नसें मी तटीं बसें ॥

जें न चिरंतन त्याकरितां ।
विविध परींनीं ही जनता ।
वृथा पाहुनी श्रम करितां ।
पुरे वाट हो मज हसतां ।

माझें मजला बरें दिसे हें, कारण मजला वाटतसे ।
शांत मनासम मुळींच दुसरें धन श्रेष्ठ या जगीं नसे ॥ ६ ॥

—अनंततनय.

४

# कै० नामदार गोखले यांच्या अकालिक मृत्यूवरून सुचलेले कांहीं विचार.

लेखक—प्रो० गोविंद सदाशिव आपटे, ग्वाल्हेर.

**जगाच्या कल्याणा संतांच्या विभूति ।** तुकाराम.

ईश्वराचें नाटक ईश्वरासच ठाऊक. तो दयाळू असूनही त्यास मधून मधून ज्या निर्दयतेच्या लहरी येतात, त्यांपैकीं एका लहरींत नामदार गोपाळ कृष्ण गोखले हे ता० १९।२।१५ रोजीं सांपडले, असें म्हटल्यावांचून राहवत नाहीं. या आर्यमातेच्या कल्याणाला ज्यांनीं आपला देह वाहून घेतला, व आपलें सर्व बुद्धिवैभव व कर्तृत्वशक्ति यांचा व्यय सर्वस्वीं याच कामाकडे केला, अशा ज्या विभूति क्वचित्काळीं उत्पन्न होतात, त्यांपैकीं नामदार गोखले हे एक होते. या वेळीं सर्व हिंदुस्थान देश त्यांच्याबद्दल शोकसागरांत निमग्न आहे व त्यांच्या मृत्यूमुळें झालेलें नुकसान भरून येणें फार कठिण आहे असें जाणून फार कष्टी होत आहे. एका प्रांताच्या गव्हर्मेंटनें त्यांच्या सन्मानार्थ आपलें निशाण वांकवावें, व लोकांनाही त्यांच्या मरणामुळें तळमळ लागावी, यापेक्षां राजमान्यतेचें व लोकप्रियतेचें आणखी दर्शक तें काय पाहिजे ? ते तर मोठे भाग्यवानच होते; परंतु त्यांच्या भाग्याबद्दल आपणां भारतीयांनाही मोठा अभिमान वाटत आहे. या लेखाचा मुख्य विषय नामदार गोखले यांच्याविषयीं स्तुतिपर लेख लिहिण्याचा नसतां, हें विषयांतर आहे, असें जाणूनही हे उद्गार लेखणींतून बाहेर पडत आहेत, त्यास उपाय नाहीं. त्यांच्या अकालिक मृत्यूवरून कांहीं गोष्टी विचार करण्यासारख्या आहेत त्या पाहण्याचा प्रस्तुत उद्देश आहे. तसा विचार करण्याच्या ओघांत त्या पुण्यवान व

निखिलभारतसेवासंस्थास्थापकाविषयीं जें कांहीं लिहावें लागेल तें टाळतां येणें कठिण आहे.

जन्मास आलेल्यास मरण हें लागलेलेंच आहे. तें केव्हांना केव्हां तरी प्रत्येक प्राण्यास आलेंच पाहिजे; व तें तसें नामदार गोखले यांस आलें यांत कांहींच विशेष नाहीं. लोककल्याणाची एखादी वस्तु प्राप्त जाहली असतां तिचा सहवास दीर्घकाल असावा, असें आपणांस वाटतें. नामदार गोखले यांचेविषयीं याच दृष्टीनें आपण शोक करतों, हें साहजिकच आहे. परंतु त्यांचेसंबंधीं जी गोष्ट मनास फारच चटका लाविते, व जिच्या योगानें आपण आपल्यास विशेषत: भाग्यहीन समजतों, ती गोष्ट त्यांचें मरण हीच केवळ नसून तें मरण अकालीं आलें ही होय. प्रस्तुत लेखकानें नामदार गोखले यांस त्यांच्या पूर्ववयांत पाहिलें आहे, व त्यांच्या अध्यापनाचा लाभही त्यास कांहीं काळ मिळाला आहे. त्यावरून तो असें म्हणूं शकतो कीं, जे कांहीं लोक जन्मत: जरत्कारू व जीवनसौख्यास अयोग्य असे असतात, त्यांपैकीं नामदार गोखले हे नसून, जे कांहीं सुशिक्षित पदवीधर शरीरानें सुदृढ व निरोगी असतात त्यांपैकीं ते एक होते. असें असून पुरत्या पन्नाशीसही न पोहोंचतां त्यांचा अंत झाला, ही गोष्ट फारच शोचनीय वाटते. कै० विष्णुशास्त्री चिपळूणकर, महादेव मोरेश्वर कुंटे, व प्रिन्सिपाल वामन शिवराम आपटे यांच्या मरणसमयींही ज्याच्या त्याच्या तोंडून असेच उद्गार येत होते. श्रीशंकराचार्य व ज्ञानदेव यांची कीर्ति अलौकिक होऊनही ते अल्प वयांतच समाधिस्थ झाले. तसाच कांहींसा प्रकार ना. गोखले यांच्या चरित्राचा झाला. ते मध्यम स्थितींतील गरीब घराण्यांत उत्पन्न झालेले असून इतक्या थोडक्या वयांत राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष झाले, वरिष्ठ कायदेकौन्सिलचे अनेक वेळा मेंबर झाले, व हल्लींच्या पब्लिक सर्व्हिसचे कमिशनांत त्यांची नेमणूक झाली. अशा प्रकारचे

हें उज्ज्वल व अद्वितीय आर्यरत्न आपल्यास आणखी दोनतीन तपें लाभलें असतें, तर आपणां भारतीयांना चांगलें वळण लागून कांहीं नवीन राजकीय हक्क संपादन करून घेण्याची पात्रता आपल्या अंगीं आली असती, असें मानण्यास कांहीं हरकत नाहीं. लोकहित उत्तम तऱ्हेनें साधण्याची त्यांची योग्यता परिपक्व होऊन तिचा मिळावा तितका लाभ त्यांच्या अल्पायुष्या-मुळें आपल्याला मिळूं शकला नाहीं, ही मोठी खेदाची गोष्ट आहे. आपणां भारतीयांना अत्यंत परिश्रमानें व मोठ्या युक्तिप्रयुक्तीनें प्राप्त करून घेत-लेल्या गुणांचा फायदा बहुधा फार काळपर्यंत घेतां येत नाहीं, व एकाचा अनुभव दुसऱ्यास ठीक रीतीनें तेंच काम पुढें चालविण्यास उपयोगीं पडत नाहीं, याचें कारण आपलें अल्पायुष्य हें होय. सन १९१० चे मनो-रंजनाचे दिवाळीचे अंकांत महाराष्ट्रांतील १३४ विभूतींचीं अल्प चरित्रें दिलीं आहेत, तीं पाहिलीं असतां ही गोष्ट ध्यानांत येईल. एखादा गृहस्थ विशेष बुद्धिवैभवानें व मेहनतीनें जों कोठें विशेष तऱ्हेनें योग्य व लोकांस उपयोगीं पडण्यासारखा होतो, तों तो अल्प काळांत नाहींसा होतो. यामुळें जो कोणी दुसरा तशा योग्यतेस चढून जाण्यासारखा असतो, त्यास पुन्हा तशीच मेहनत पडते व तितकाच काळ लागतो. तेव्हां अशा स्थितीचीं कारणें काय आहेत, व त्यांचा प्रतिकार करण्याचे कांहीं उपाय सांपडूं शकतात कीं नाहींत, याविषयीं विचार करण्याचें या लेखांत योजिलें आहे.

आपल्याकडे साधारणतः जे लोक होतकरू असून नांवलौकिकास चढलेले असतात, व जे पुरत्या पन्नाशीपर्यंतही पोहोंचूं शकत नाहींत, ते बहुधा अतिमेहनतीनें क्षीणायु होतात असें नजरेस येईल. ते जी मेहनत करतात ती अतिमेहनतींत जमा असते, ही गोष्ट सकृद्दर्शनीं कबूल कर-ण्यास साधारण लोक तयार नसतात. यदाकदाचित् ही गोष्ट त्यांच्या मनास

पटली, तरी कृतीमध्यें तिजवर उपाय करण्याइतकें आत्मसंयमन त्यांचे ठिकाणीं नसतें. इतकेंच नव्हे, तर व्यसनी लोकांप्रमाणें ते या अतिमेहनतीच्या व्यसनांत इतके फसलेले असतात, कीं ते तिऱ्हाइताच्या सांगण्याकडे लक्ष देत नाहींत; व आपला शरीरावरील ताबा सुटत चालला आहे, ही गोष्ट लक्षांत येऊनही तिजकडे दुर्लक्ष करितात. शेवटीं परिणाम घातक व्हावा हें ओघानेंच येतें.

आपण अशक्त कां, याचीं कारणें शोधून काढणें फारसें कठिण नाहीं; परंतु त्या कारणांचा प्रतिकार करणें हेंमात्र फार कठिण आहे. कारण त्याकरितां सुचविलेले बहुतेक उपाय अशक्य कोटींतले असतात. वास्तविक ते तसे अशक्य नसतात; परंतु त्यांचें फल आपल्या हयातींत पाहतां येणें कठिण आहे व ते उपाय पुढील पिढ्यांपर्यंत चालू ठेवण्याचें आपल्या अंगीं धैर्य नसतें, या योगानें आपण त्यांस अशक्य समजतों. कष्टसाध्य व्याधि जसे दीर्घकाल पथ्याची अपेक्षा करतात, त्याप्रमाणें हा अशक्ततेचा व्याधि वंशपरंपरागत आल्यामुळें त्याच्या निवारणार्थ उपाय कित्येक पिढ्यांपर्यंत पुढें चालले पाहिजेत, हें उघड आहे. आपण आपल्यास अशक्त व अल्पायु समजतों, याचें कारण पाश्चात्य लोक सशक्त व दीर्घायु असलेले आपल्या नजरेसमोर असतात. युरोपच्या इतिहासांतील राजे व प्रसिद्ध पुरुष यांचीं आयुष्यें व तत्कालीन हिंदुस्थानांतील राजांचीं व प्रसिद्ध पुरुषांचीं आयुष्यें यांची तुलना केली असतां ही गोष्ट व्यक्त होणार आहे. रसायनशास्त्राचा इतिहास (History of Chemistry by Ernst Von Meyer.) पाहिला असतां असें सहज लक्षांत येतें कीं, आपलेकडील साठ वर्षांचें मान व त्यांचेकडील ऐशीं वर्षांचें मान शारीर शक्तीनें बहुधा सारखेंच असतें. तसेंच आपलेकडील बत्तीसतेहतीस वर्षांच आयुर्मान हें त्यांचेकडील सत्तेचाळीसअठ्ठेचाळीस वर्षांचें आयुर्माना-

बरोबर असतें. म्हणजे त्यांचेकडील व आपलेकडील इतक्या आयुष्यानंतर मरणाऱ्यांचें शेंकडा प्रमाण सारखेंच बसेल, असें म्हटलें तरी चालेल.

या प्रमाणांतील १५।२० वर्षांच्या फरकाचीं कारणें शोधून पाहतां (१) हवा हें एक मुख्य कारण असावें, असें वाटतें. परंतु तें दूर करण्याविषयीं उपाय शोधून काढणें व्यर्थ आहे. कारण ती बदलणें आपले हातीं नाहीं. करितां तिजविषयीं फारसा विचार करतां येत नाहीं.

दुसरें कारण (२) अन्न असावें असें दिसतें; तथापि तें एक मुख्य कारण असावें असें दिसत नाहीं. कारण पुष्कळ लोक मांसभक्षक नाहींत तरी एकंदरींत मांस खाणारांची संख्या मांस न खाणाऱ्यांच्या संख्येपेक्षां ज्यास्त खचित आहे; तथापि तेही पाश्चात्य लोकांसारखे दीर्घायु नसतात.

तिसरें कारण पाहूं जातां आपली (३) राहणी. ही पुष्कळ अंशीं आपल्या अशक्ततेस कारणीभूत असली पाहिजे, असें वाटतें. या 'राहणी' शब्दांत आपलें धर्मशास्त्र व सामाजिक रूढी यांसंबंधीं कारणांचा समावेश होतो. त्यांचें दिग्दर्शन पुढें केलें आहे.

(अ) बालविवाहपद्धति ही या सर्व कारणांच्या बुडाशीं आहे; व त्याच दृष्टीनें तिचेविषयीं विचार व उपाययोजना हीं प्रत्येक सामाजिक परिषदेंत होत असतात, हें योग्यच आहे.

(ब) स्त्रियांचा विवाह अवश्य जाहला पाहिजे, या धर्मबंधनामुळेंही बरेच अनिष्ट परिणाम होतात. पुरुषाला एक परी अविवाहित राहतां येतें. त्याबद्दल त्याला प्रायश्चित्त घ्यावें लागत नाहीं व त्याला धर्मबाह्यत्वही येत नाहीं. परंतु स्त्रीची गोष्ट तशी नाहीं. ती आंधळी असो, पांगळी असो, बहिरी असो, अति क्षीण असो, रोगी असो, बावळी असो, किंबहुना वेडसर असो; लग्न हें तिचें झालेंच पाहिजे. कोणता तरी पुरुष त्याच्या किंवा त्याच्या पालकाच्या इच्छेनें किंवा अनिच्छेनें त्या स्त्रीकरितां

जाडलाच पाहिजे. कित्येक समजदार मुलगे पुष्कळ वेळा लग्न करण्यास मनापासून तयार नसतात. परंतु मुलीच्या अडलेल्या आईबापांनीं गळ घातल्यामुळें त्या मुलांच्या आईबापांना व कधींकधीं त्या मुलांना रुकार द्यावा लागतो. या व्यवहारांत जेव्हां तो मुलगा किंवा ती मुलगी रोगी अथवा अशक्त असते, तेव्हां त्यासंबंधाचे परिणाम त्यांजवर व त्यांचे संततीवर अनिष्ट होतात. या बाबीचाही समाज विचार करीत आहे, ही आनंदाची गोष्ट आहे. अविवाहित पुरुषाच्या ठिकाणीं कार्यक्षमता व उद्योगसातत्य हे दोन गुण कसे जोरानें वास करीत असतात, याविषयीं शेंकडों उदाहरणें आपल्याला पाश्चात्य लोकांत दिसतात. आपणमात्र या फायद्यास अंतरतों.

( क ) आपल्या अशक्ततेचें एक आधुनिक कारण विशेष तऱ्हेनें लक्षांत येतें. त्याविषयीं आपण विचार केला पाहिजे. आपल्या भोजनाचे काळ हल्लींच्या परिस्थितीशीं विसंगत आहेत किंवा कसे, व ते विसंगत असल्यास दुसरे कोणते **भोजनाचे काळ** ठरविले पाहिजेत, याविषयीं आपण कांहीं निश्चित केलें पाहिजे. कदाचित् हा प्रश्न पुष्कळांच्या ध्यानांत पूर्वींच येऊन गेला असेल. परंतु त्याची जशी चिकित्सा व्हावी तशी ती अद्याप झाली नाहीं, किंवा त्याचें तितकें महत्त्व अद्याप मानलें जात नाहीं. आपला हिंदुलोकांचा मुख्य भोजनाचा काळ मध्यान्ह म्हणजे दिवसा बारा वाजतां मानला आहे. त्या वेळीं आपण जड व पौष्टिक अन्न पोटभर खातों व रात्रीं अल्प आहार करितों. ही चाल आपणांमध्यें अनादि कालापासून चालत आली आहे व आपल्या हाडामासांत खिळली आहे. परंतु ती हल्लींच्या परिस्थितीशीं विसंगत आहे असें प्रस्तुत लेखकास वाटतें. जर कांहीं कारणानें आपणांस असें करावें लागलें कीं, दुपारचें खाणें अल्पाहार असावें व रात्रीं मुख्य भोजन करावें, तर तें आपल्यास किती जड जाईल, हें सांगावयास नको. परंतु हल्लींच्या स्थितींत आपण जर आपल्या-

करितां तसा निर्बंध केला, तर त्यांत आपलें हित आहे असें वाटतें. आपल्या वैद्यशास्त्रांत लिहिलें आहे कीं, जेवल्याबरोबर जो धांवतो त्या रोग्यास वैद्यानें हातीं धरूं नये. इंग्रजींत म्हण आहे कीं, After dinner rest a while; after supper walk a mile: म्हणजे अल्पाहारानंतर थोडा व्यायाम ( शतपावलीसारखा ) करावा व मुख्य जेवणानंतर थोडी विश्रांति घ्यावी. पोटभर अन्न खालें असतां सुस्ती येते व विश्रांति घेण्याची इच्छा होते, याचा अनुभव प्रत्येकास आहे. असें असून अकराची घंटा चुकेल या भीतीनें किती तरी मुलें जेवल्याबरोबर शाळेकडे धांवत असतात. इतकेंच नव्हे, तर कधीं कधीं अर्धपोटीं जेवून, कधीं कधीं अति कढत, तर कधीं कधीं अर्धकच्चें शिजलेलें अन्न खाऊन जाण्याची व क्वचित् प्रसंगीं उपाशीं जाण्याची पाळी कित्येकांवर तरी येते !

शरीराचें उत्तम तऱ्हेनें पोषण होण्याचे दिवसांत याप्रमाणें खाण्यापिण्याची गैरव्यवस्था व हाल होतात. याचा परिणाम आरोग्यावर कशा तऱ्हेचा होत असेल याचा थोडा विचार केला, तर आरोग्य बिघडविण्यास हें एक नवीन कारण उत्पन्न झालें आहे, असें आपल्या लक्षांत येईल. शाळेंत व कॉलेजांत जाणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शरीराची याप्रमाणें पहिल्यापासून हेळसांड होत असल्याकारणानें व साधारणत: आपल्या कर्तृत्वानें प्रसिद्धीस येणारे लोक यांपैकींच असल्याकारणानें त्यांचा सहवास आपल्यास पाश्चात्यांप्रमाणें दीर्घकाल घडूं शकत नाहीं. त्यांच्या मुख्य व अल्प भोजनाच्या वेळा आपल्या अगदीं उलट असल्याकारणानें व त्यांची सर्व वागणूक या वेळांच्या अनुरोधानें नियत असल्याकारणानें अकरांपासून पांच वाजतपर्यंत काम करणें सोईचें पडतें. आपणांस त्याप्रमाणें वागणें म्हणजे आपली दीर्घकाळाची संवय बदलावी लागते. कामाची वेळ ११ ते ५ पर्यंतची बदलतां येणें अशक्य आहे, करितां आपला भोजनकाळ आपण बदलला

पाहिजे. म्हणजे सकाळीं दहा वाजण्याचे सुमारास अल्प आहार करून रात्रीं कामावरून परत आल्यावर मुख्य जेवणाचा काळ ठेवला पाहिजे. असें केल्यानें अशक्ततेचें निदान एक तरी कारण दूर होईल. मात्र ही गोष्ट जितकी सोपी वाटते तितकी सोपी नाहीं. तथापि अशक्यही नाहीं. शाळेंत जाणारे विद्यार्थी व नोकर यांजकरितां प्रत्येक घरीं स्वयंपाक बहुधा लवकर होतो. तथापि तो घाईनें केलेला व कधीं कधीं अपुरा असतो. हा प्रघात बदलून संध्याकाळीं मुख्य जेवणाचा स्वयंपाक करण्याचा पारिपाठ प्रचारांत आणावा, म्हणजे स्वयंपाक करणारांची व जेवणारांची तारांबळ उडणार नाहीं. या सूचनेवर असा एक आक्षेप येऊं शकतो कीं, इतर लोक याप्रमाणें वागत नाहींत, यामुळें कांहीं अडचणी उत्पन्न होतील. याप्रमाणें व्यवस्था करण्यांत तिसऱ्याचा कांहीं फारसा संबंध पोहोंचत नाहीं. तरी सुट्टीच्या दिवशीं व्यवस्था पहिल्याप्रमाणेंच म्हणजे दुपारचें भोजन मुख्य व सायंकाळचें अल्प, अशी साहजिक होणार. शिवाय जेव्हां आपण दुसऱ्याच्या येथें भोजनास जातों, तेव्हांही याच व्यवस्थेनें चालावें लागतें. म्हणजे कांचेचें भांडें थंड पाण्यांतून कढत पाण्यांत, व कढत पाण्यांतून थंड पाण्यांत घातलें असतां त्याला जशी फुटण्याची भीति असते, त्याप्रमाणें हे भोजनाचे उलट सुलट क्रम प्रकृतीस नुकसानकारक होतील. शिवाय हा कामाचा ११ पासून ५ पर्यंतचा वेळ खेडेगांवांत नसतो, त्यामुळेंही आपण जेव्हां गांवीं जातों किंवा प्रवासांत असतों तेव्हां आपली शहरांतील संवय आपणांस बदलावी लागणार. या आक्षेपांचे समाधान इतकेंच आहे कीं, स्थलांतर केल्यानें ज्याप्रमाणें कांहीं रोग पूर्णपणें नाहींत तरी अंशतः कमी होतात, व तो फायदा आपण अल्प समजत नाहीं, त्याप्रमाणेंच विरुद्ध भोजनकाळामुळें होत असलेला आरोग्याचा ऱ्हास या सुचविलेल्या उपायानें जरी अंशतः कमी झाला, तरी तो फायदा लहान-

स्थान आहे असें मानतां येणार नाहीं. हा उपाय आपल्या हातचा आहे. व समजदार मनुष्यानें तो सहज अंमलांत आणण्याजोगा आहे, त्याकरितां लागणारी व्यवस्था कांहीं अंशीं पराधीन आहे, म्हणजे घरांतील स्वयंपाक करणाऱ्या व इतर मनुष्यांवर अवलंबून आहे. तथापि ती होण्यासारखी आहे. शिवाय तशी व्यवस्था केल्याबद्दल इतर लोक नांवें ठेवतील किंवा धर्मविरुद्ध वर्तन केल्याचा आरोप आणतील, अशांतलाही प्रकार नाहीं.

( ड ) कोणत्याही वस्तूची किंमत ती आयतीच प्राप्त झाली असतां, किंवा तिच्या अभावीं होणारें दुःख अनुभवास आलें नसतां कळून येत नाहीं. आरोग्याचेंही तसेंच आहे. परंतु त्यांत दुःखाची गोष्ट इतकीच आहे कीं, आरोग्य एकदां गेलें म्हणजे पुनः परत मिळत नाहीं. करितां जसे आपण विषाची परीक्षा पाहण्याचे नादीं पडत नाहीं, त्याप्रमाणें याही गोष्टीची परीक्षा पाहण्याची अपेक्षा करूं नये. आईबाप अशा तऱ्हेचीं उदाहरणें नेहमीं पाहत असतात. तेव्हां त्यांनीं आरोग्याचें महत्त्व आपले मुलांबाळांचे लक्षांत वरचेवर आणावें; व मुद्याची गोष्ट अशी कीं, आरोग्याचें सशास्त्र रक्षण कसें करावें, हें त्यांचे वरचेवर निदर्शनास आणावें. आपण अन्न खाऊन शरीराचें भरण करितों, परंतु पथ्याहारविहारानें त्याचें पोषण करीत नाहीं. इंग्रज लोकांशीं आपली तुलना करतांना ही निर्दिष्ट केलेली गोष्ट आपण विसरतों.

ज्या लोकांचे व्यवसाय अशा प्रकारचे असतात कीं, त्यांना उद्योग व विश्रांति हीं आपोआप आलटून पालटून मिळत असतात, त्यांना आरोग्यरक्षणाची विशेष काळजी करण्याचें कारण नसतें. परंतु ज्यांचे व्यवसायांत विश्रांति बुद्ध्या घेतल्याशिवाय मिळत नाहीं, अशा लोकांनीं आत्मसंयमन व कधीं कधीं त्यांना तात्कालिक वाटणाऱ्या स्वार्थाचा त्याग करण्यास तयार झालें पाहिजे. ना. गोखले यांचे उद्योग दुसऱ्या प्रकारचे होते. लोक-

सेवा हेंच त्यांचें मुख्य ब्रीद होतें, व हेंच त्यांचें मुख्य भूषण होतें. ही लोकसेवा करण्याच्या भरांत आपली शक्ति व आपलें आरोग्य हीं अतिश्रमाच्या खालीं दबत चाललीं आहेत, हें त्यांच्या ध्यानीं आलें नाहीं; अथवा जरी ध्यानांत आलें असलें तरी तें फार उशीरां आलें किंवा जाणून बुजून त्यांनीं या गोष्टीकडे डोळेझांक केली असेल. कसेंही असो; त्यांच्यासंबंधीं आतां प्रश्नच उरला नाहीं. त्यांच्या उदाहरणावरून मोठमोठीं जोखमीचीं व महत्त्वाचीं कामें करणाऱ्या लोकनायकांनीं, अधिकाऱ्यांनीं व उद्योगधंदा करणाऱ्यांनीं सावध व्हावें, इतकी त्यांना प्रार्थना आहे. तसेंच या तत्त्वाचें वळण पुढील पिढीस लागावें याबद्दल खटपट करावी अशीही त्यांस विनंती आहे. अशा प्रकारचीं उदाहरणें म्हटलीं म्हणजे आपल्या दृष्टीपुढें असणारे, अतिमेहनत करणारे कांहीं विद्यार्थी होत. योग्यता नसतां खालचे वर्गांतून वरचे वर्गांत चढविला जाणें, व्यायाम न घेतां दिवसा अभ्यास करणें, व रात्रीं अभ्यासाकरितां जागणें, या सर्व गोष्टी या प्रकारच्या होत. परीक्षेंत स्कालरशिप मिळवून अथवा पहिल्या वर्गांत पास होऊन कांहीं विद्यार्थी संसारयात्रेस थोडक्याच काळांत मुकतात. अतिश्रमानें शरीर दुर्बल झाल्याकारणानें संसार-सुख चांगले तऱ्हेनें अनुभविण्यास असमर्थ झालेले किती तरी विद्यार्थी आपण नेहमीं पाहतों. एवढ्याकरितां अतिश्रमानें होणाऱ्या या अनर्थपरंपरेकडे लोकांचें लक्ष हल्लींपेक्षां ज्यास्त जोरानें वेधलें पाहिजे; ही गोष्ट अवश्य आहे.

इंग्रज लोक व जर्मन पंडित आपल्या दृष्टीनें फार भयंकर मेहनत करतात, तथापि त्यांस ती ज्यास्त होत नाहीं. मग आपण त्यांच्यापेक्षां कमी मेहनत करीत असून ती आपणांस ज्यास्त कां व्हावी? अशा तऱ्हेचा खल करीत बसण्यांत व हट्टानें वस्तुस्थितीकडे दुर्लक्ष करण्यांत कांहीं अर्थ नाहीं. जी स्थिति आहे ती खरी. त्याच स्थितींत साधेल तें हित करून घेतलें

पाहिजे. इंग्रज अधिकारी व मोठमोठीं हुद्याचीं कामें करणारे लोक काम करण्याचे वेळीं जबर मेहनत करतात, हें खरें; तथापि कामाची निकड संपतांच ते वेळांत वेळ काढून हटकून विश्रांति घेतात. ही गोष्ट आपण विसरतां कामा नये. सहा दिवस काम केल्यावर सातवा दिवस विश्रांतीचा, ही गोष्ट ते पक्की ओळखतात, व त्याप्रमाणें वागतात. शनिवार येतांच Week-end करितां म्हणजे आठवड्याची विश्रांति घेण्याकरितां काम सोडून कोठें तरी गेलेंच पाहिजे, व सोमवारपर्यंत कामाचा फारसा विचार करावयाचाच नाहीं, असा त्यांचा क्रम असतो. Play while you play, and work while you work म्हणजे खेळणें हें मन मोकळें करून खेळावें व काम करणें तें मन लावून करावें. एवढींच त्यांच्या वर्तनक्रमांतील सूत्रें नसून Do work and do play म्हणजे काम केलेंच पाहिजे व विश्रांति घेतलीच पाहिजे, असें एक तिसरें सूत्र ते काळजीपूर्वक पाळीत असतात. लढाई सुरू असतां वेळ सांपडतांच क्रिकेट, टेनिस, वगैरे खेळ खेळणें; पाणबुडीं जहाजें पाण्याचे खालून शत्रूवर चालून जाण्याकरितां प्रवास करीत असतां त्यांतील अधिकाऱ्यांचे पत्ते वगैरे खेळणें, या गोष्टीही अशाच प्रकारच्या आहेत. विश्रांति ही श्रम केल्यानंतर घेतलीच पाहिजे, ती घेतांना मुख्य काम थोडें दिरंगाईवर पडलें किंवा त्यामुळें मुख्य उद्योगांत थोडें नुकसान झालें तरी चालेल, असें मानणारे लोक आपल्यामध्यें कितीसे आहेत ? फारच थोडे आहेत. ही शोचनीय स्थिति दूर होईल तेव्हां अल्पायुत्वाचें एक कारण कमी झालें असें म्हणतां येईल.

या कामीं आपली सुधारणा सर्वस्वीं आपलेच हातीं आहे. किती मेहनत केली असतां आपणांस ज्यास्त होते, याचा अदमास प्रत्येकास असतो. मितश्रमाची मर्यादा उल्लंघन होतांच शरीर व मन हीं थकव्याच्या

रूपानें बजावीत असतात; तथापि आपण तिकडे दुर्लक्ष करितों. स्वार्थ-दृष्टीनें आपण व्यवसायांत मग्न असल्याकारणानें, पंक्तीमध्यें बसल्यानंतर ज्याप्रमाणें मन पुरे म्हणत असतांनाही आपण ज्यास्त अन्न खातों व त्यापासून होणाऱ्या परिणामाकडे दुर्लक्ष करितों, त्याप्रमाणेंच मितश्रमाची मर्यादा आपण उल्लंघीत आहों व हें उल्लंघन आपलें नुकसान करणारें आहे, या गोष्टीचा आपण विचार करीत नाहीं. दुसरे दिवशीं पुन्हा पंक्तीस बसण्याची वेळ आली व तशीच आणखी पुढें लागोपाठ २।३ दिवस आली, तर तेंच रुचिकर अन्न नकोसें होतें व त्या योगानें प्रकृति बिघडते. श्राद्धास बसणाऱ्या ब्राह्मणांसही पितृपक्षामध्यें अन्न बाधूं नये म्हणून रात्रीं फराळाचे फांके करावे लागतात. श्राद्धाचें अन्न खाल्ल्यानंतर रात्रीं भोजन वर्ज्य आहे, यांत तरी तथ्य हेंच असावेंसें वाटतें. अतिश्रमाचे परिणाम एकदम दिसूं लागत नाहींत, यामुळें आपण त्यांची पर्वा करीत नाहीं; व बैल गेल्यानंतर झोंपा लावण्याप्रमाणें आपण फार उशीरां जागे होतों. ही स्थिति पालटावी म्हणून आपण यत्न केला पाहिजे. प्रत्येक ऑफिसरानें विशेष काम पडत असलेल्या आपले हाताखालचे नोकरांस रविवारीं विश्रांति घेण्याकरितां विशेष उत्तेजन दिलें पाहिजे व कधीं कधीं त्यास ती घेण्यास भाग पाडिलें पाहिजे. यामुळें काम करणाऱ्यांच्या मनास ताजेतवानेपणा येऊन कामही चांगल्या प्रकारें होईल, यांत संशय नाहीं.

वाचकवृंदास अशी विनंती आहे कीं, ना. गोखले यांच्या अकालिक निधनाच्या प्रसंगानें या लेखांत जी आपल्या क्षीणजीवनकलेची ( low vitality ) मिमांसा केली आहे, तिच्यांत जरी नवीन कांहीं नाहीं, तरी तिजकडे डोळेझांक करण्यासारखी ती टाकाऊही नाहीं, असें आपल्या लक्षात येईल. कामानंतर विश्रांति घेण्याविषयीं आपला हलगरजी-

व हींच्या परिस्थितीशीं विसंगत भोजनाचा क्रम हीं जीं आपल्या

अशक्ततेचीं कारणें या लेखांत विशिष्ट रीतीनें प्रतिपादिलीं आहेत, त्यांचा आपण चांगला विचार केला पाहिजे व त्यांचें महत्त्व विशेष मानिलें पाहिजे. त्यांसंबंधीं पर्यायानें किंवा प्रत्यक्ष रीतीनें चौकशी झाली पाहिजे. सूर्योदयीं मिष्टान्न भोजन करण्याची आपणांस जशी लाज वाटते, तशी ती दुपाराह्य वाटली पाहिजे; व विवाहामध्यें सासुरवाडीस असतांना सारखा अभ्यास करण्याची जशी जांवईबोवांस लाज वाटते, तशी ती रविवारीं किंवा सुट्टीचे दिवशीं आठवड्याचा व्यवसाय करणारासही वाटली पाहिजे. याप्रमाणें आपला वर्तनक्रम बदलला, म्हणजे क्षीण व अल्पायु संततीचें प्रमाण पुढील पिढींत कमी होऊन परोपकारी, देशसेवक, विद्वान्, दूरदर्शी व अनुभविक अशा लोकांचा सहवास आपणांस दीर्घकाळ घडेल व देशकल्याणाचे प्रयत्न हल्लींप्रमाणें पावलोपावलीं खंडित न होतां अकुंठित रीतीनें चालतील अशी आशा करण्यास जागा आहे.

---

# कोलंबोपासून आल्मोरापर्यंत.

( स्वामी विवेकानंद यांचीं व्याख्यानें. )

## व्याख्यान १७ वें.

( मागील अंकावरून समाप्त. )

याच विचाराचा येथून पुढें विकास होतो. आपल्याला सगळें जग जिंकावयाचें आहे, असें तुम्हीं म्हटलें. होय, आम्हांला तसें करावयाचें आहे. भारतानें सर्व पृथ्वी जिंकली पाहिजे; माझें तेंच ध्येय आहे.—यापेक्षां खालचें ध्येय मनांत बाळगून माझें केव्हांच समाधान व्हावयाचें नाहीं. हें ध्येय कदाचित् मोठें असेल, हें ऐकून तुम्हांपैकीं बरेच

कदाचित् आश्चर्यानें थक्क होऊन जातील, पण माझें तसें ध्येय आहे खरें. आपल्याला सगळें जग जिंकलें तरी पाहिजे, नाहीं तर मरून तरी गेलें पाहिजे; दुसरा उपाय नाहीं. क्रमशः विकास पावत जाणें, हेंच जिवंतपणाचें लक्षण आहे. आपल्याला बाहेर सरलें पाहिजे, आपला विकास करून घेतला पाहिजे, आपण जिवंत आहों असें दाखविलें पाहिजे; किंवा हीनावस्थ होऊन पचून मरून गेलें पाहिजे, दुसरा मार्ग नाहीं. दोहोंतली एक गोष्ट पत्करा;—मरा किंवा जगा. आतां आपल्या देशांत उठल्यासुटल्या कलह होतात—द्वेष माजतात, ही गोष्ट आपणां सगळ्यांना विदित आहे. पण, माझी एक गोष्ट ऐकून ठेवा; जिथे जाल तिथे हेंच आहे. राजकारण हेंच इतर राष्ट्रांचें जीवितसार पडल्यामुळें विदेशी राजकारणाचें तोंडीलावणें नेहमीं त्यांचे हातीं असतें. घरीं फार भांडणें माजलीं, असें त्यांना दिसलें कीं, तीं कुठे तरी परदेशांत कुरापत काढितात; तेणेंकरून घरचें भांडण आपोआप शमतें. आपल्याकडे गृहकलह आहेत, पण ते बंद पडण्याला विदेशी राजकारण नाहीं. तेव्हां, पृथ्वीच्या पाठीवरील राष्ट्रांमध्यें आपल्या शास्त्रांतील सनातन तत्त्वांचा प्रसार करणें, हें आपलें विदेशी राजकारण आपण बनविलें पाहिजे. येणेंकरून आपल्यांत एकराष्ट्रीयत्व येईल. या गोष्टीला तुम्हांला अन्य पुरावा पाहिजे का ? तुमच्यांपैकीं राजकारणाकडे ज्यांच्या मनांचा विशेष ओढा असेल, त्यांना मी हा प्रश्न विचारतों. आजची सभा हेंच या गोष्टीचें मुख्य प्रत्यंतर आहे.

दुसरें असें कीं, हे सर्व स्वार्थी विचार जरी सोडून दिले, तरी पाठीमागें होऊन गेलेल्या स्वार्थत्यागी महापुरुषांचीं जिवंत उदाहरणें आपल्याकडे पुष्कळ आहेत. भारताच्या पतनाच्या व विपत्तीच्या अनेक कारणांपैकीं एक महत्त्वाचें कारण असें आहे कीं, त्यानें आपल्या कार्यक्षेत्राचा संकोच केला, कालव जसें आपल्या शिंपांत चिकटून बसतें, तसा तो घरं

धरून राहिला, आर्येतर सत्यपिपासु राष्ट्रांना त्यानें आपलें रत्नभांडार– जीवनप्रद अशा सत्यरत्नांचें भांडार–खुलें करून दिलें नाहीं. आमच्या पतनाचें प्रधान कारण असें आहे कीं, आम्ही मुळींच बाहेर पडलों नाहीं, व इतर राष्ट्रांचीं व आपली कधीं तुलना करून पाहिली नाहीं.—आणि तुम्हांपैकीं प्रत्येकाला ठाऊक आहे कीं, आज हिंदुस्थानांत जी थोडीशी हालचाल दिसते आहे, जो थोडासा जिवंतपणा दिसतो आहे, तो, राजा राममोहनरायानें ज्या दिवशीं त्या घरकोंबडेपणाला लाथ मारली, त्या दिवसापासून दिसूं लागला आहे. त्या दिवसापासून हिंदुस्थानच्या इतिहासाला निराळेंच वळण लागलें आहे; व आज त्याची दिसेंदिवस झपाट्यानें उन्नति होत आहे. मागें जर इथे ओढे वाहिले असतील, तर आतां महापुरानें दुथडी भरून चाललेले नद इथे वाहणार आहेत; व त्यांचा प्रतिरोध कोणालाही करितां येणार नाहीं. तात्पर्य, आपल्याला परदेशा गेलें पाहिजे.

' दे वाण नी घे वाण ' हीच अभ्युदयाची मूळ किल्ली आहे. आपण निरंतर हात पसरण्याचेंच व्रत चालविणार का? प्रत्येक गोष्ट—धर्मसुद्धां– शिकण्यासाठीं पाश्चात्त्यांच्याच पायांशीं नेहमीं बसणार का? यंत्रकला आपल्याला त्यांपासून शिकतां येईल. आणखी दुसऱ्या पुष्कळ गोष्टी शिकतां येतील. पण आपणांला त्यांना कांहीं तरी शिकविलें पाहिजे. आपला धर्म, आपली आध्यात्मिकता आपण त्यांना शिकविली पाहिजे. हिंदुस्थानचें रत्नभांडार खुलें होऊन आपली संस्कृति सर्वांगपरिपूर्ण केव्हां होते, याची जग वाट पाहात बसलें आहे. पूर्वजांपासून वारसहक्कानें धर्मरूप अमूल्य ठेवा जो आपल्या हातीं आला आहे, त्याच्या प्राप्तीसाठीं सर्व जग सतृष्ण नयनांनीं आपल्याकडे पहात आहे. शेंकडों वर्षें अनेक दुःखें व विपत्ति भोगूनही जो रत्नांचा ठेवा आपल्या राष्ट्रानें उराशीं बाळगून ठेविल

आहे, त्याकरितां आज सगळें जग केवळ आ पसरून बसलें आहे. तो ठेवा आज जगाला हवा आहे; या आपल्या वडिलार्जित अपूर्व रत्नभांडारासाठीं हिंदुस्थानच्या बाहेरचे लोक किती उत्कंठित झाले आहेत, याची तुम्हांला कल्पनाही नाहीं. आम्ही इथे अनर्गलपणें बोलतों, आपसांत भांडणें करितों, पवित्र गोष्टींची टर व उपहास करितों;—याचा परिणाम असा झाला आहे कीं, जें जें कांहीं पवित्र म्हणून आहे त्याची टर उडवून देणें, हें आमच्या राष्ट्राच्या अंगीं एक व्यसनच जडून गेलें आहे. या आपल्या आर्यभूमींत आपल्या पूर्वजांनीं जें अमृत सांठवून ठेविलें आहे, त्याच्या प्राप्तीसाठीं परदेशी लोकांचीं अंतःकरणें कशीं पिळवटत आहेत, त्याचा अल्प कण तरी हातीं पडावा म्हणून ते कसे हात पसरून बसले आहेत, वें मी तुम्हांला काय सांगूं! तात्पर्य, आपल्याला बाहेर पडलें पाहिजे; परदेशीयांपासून जें काय घेण्यासारखें आहे, तें घेऊन त्याबद्दल आपलें धर्मज्ञान त्यांना दिलें पाहिजे; आध्यात्मिक प्रदेशाचा दिव्य देखावा त्यांना दाखवून उलट जडशक्तींच्या अद्‌भुत लीला त्यांच्या द्वारें आपण ठाऊक करून घेतल्या पाहिजेत. नेहमीं शिष्यत्व पत्करून आपलें चालणार नाहीं; आपल्याला गुरुही झालें पाहिजे. समानत्व असल्यावांचून मित्रत्व केव्हांही शक्य नाहीं; आणि एक मनुष्य जर निरंतर गुरुपदीं विराजत असेल, व दुसरा त्याच्या पदतळीं नेहमीं बसणारा असेल, तर त्या दोघांत समानता केव्हांही येणार नाहीं. इंग्रजांशीं किंवा अमेरिकनांशीं आपली समानता असावी, असें जर तुम्हांला वाटत असेल, तर अध्ययन व अध्यापन हीं दोन्ही व्रतें तुम्हांला अंगीकारिलीं पाहिजेत.—तुम्हांला शिकलें पाहिजे व शिकविलें पाहिजे. शेंकडों वर्षें जगाला शिकवायला पुरेल, इतकी सामुग्री अद्याप तुमच्याजवळ आहे. तेव्हां आज ही गोष्ट केली पाहिजे. तेज व उत्साह हीं आपल्या अंगीं पाहिजेत. बंगाली लोकांची कल्पनाशक्ति दांडगी, असें

म्हणतात, आणि मला वाटतें तें खरेंही आहे. आम्ही केवळ कल्पनेंत रमणारे आहों, भावनाप्रधान आहों, असें उपहासपूर्वक आम्हांला म्हणतात; पण मित्रहो, मी आपल्याला असें सांगतों कीं, हा उपहासाचा विषय नाहीं; कारण, तत्त्वालोचनाचें स्फुरण अंतःकरणांतून, केवळ अंतःकरणांतूनच होतें. बुद्धिशक्ति, विचारशक्ति मोठी खरी, पण तिची उडीच बेताची. कांहींशी मजल मारली कीं, ती थांबतेच. भावनेच्या बळावरच गहन रहस्यांचें उद्घाटन करितां येतें. तात्पर्य, बंगाली लोकांच्या हातूनच—भावनाप्रधान अशा बंगाली लोकांच्या हातूनच—हें कार्य साध्य होणारें आहे.

'उत्तिष्ठत, जाग्रत, प्राप्य वरान्निबोधत।'—उठा, जागे व्हा, आणि कार्यसिद्धि होईपर्यंत थांबूं नका. कलकत्तावासी तरुणांनो, उठा. जागे व्हा. कारण, शुभ वेळा येऊन ठेपली आहे. सर्व गोष्टींची आपल्यापुढें तयारी होऊन राहिली आहे. धैर्य धरा नी भिऊं नका. 'अभी' असें विशेषण भगवंताला फक्त आपल्याच शास्त्रांत दिलें आहे. आपल्याला 'अभी' (निर्भय) झालें पाहिजे, तरच आपल्या कार्यांत यशोलाभ होईल. उठा, जागे व्हा; कारण, तुमच्या देशाला असा जोराचा स्वार्थत्याग आज पाहिजे आहे. तरुण माणसांच्याच हातून तो होण्यासारखा आहे. "तरुण, आशिष्ठ, द्रढिष्ठ, बलिष्ठ, मेधावी"—अशांच माणसांच्या हातून हें कार्य पार पडणारें आहे. आणि कलकत्त्यामध्यें अशीं शेंकडों, हजारों तरुण माणसें आहेत. माझ्या हातून कांहीं कार्य झालें आहे, असें आपण म्हणतां; पण आपण हें लक्षांत ठेवावें कीं, मी केवळ एक *सामान्य मुलगा* होतों,—याच कलकत्त्याच्या रस्त्यांत खेळणारा व भटकणारा मी एक सामान्य मुलगा होतों. असें असतां माझ्या हातून जर इतकें कार्य झालें आहे, तर तुमच्या हातून यापेक्षां किती अधिक होईल? उठा, जागे व्हा! सर्व जग तुमच्याकडे डोळे लावून बसलें आहे. हिंदुस्थानच्या इतर भागांत

बुद्धिबल आहे, द्रव्यबल आहे; पण उत्साहबल केवळ माझ्याच जन्मभूमींत आहे. तो उत्साहाग्नि भडकला पाहिजे. तेव्हां, कलकत्तावासी तरुणांनो, अंतःकरणांत तो भडकवून उठा, जागे व्हा! आपण दरिद्री आहों, आपल्याला पाठबळ कोणाचें नाहीं, असा विचार मनांत आणूं नका. पैशानें मनुष्य बनविला, असें कधीं कोणीं पाहिलें आहे का? मनुष्य नेहमीं पैसा उत्पन्न करितो. जगाची जी कांहीं आजपर्यंत उन्नति म्हणून झाली आहे, ती मनुष्याच्या शक्तीनें, उत्साहाच्या बळानें, श्रद्धेच्या बळानें झाली आहे.

सर्व उपनिषदांमध्यें अत्यंत मनोरम जें कठोपनिषद् तें तुम्हांपैकीं ज्यांनीं वाचलें असेल, त्यांना आठवत असेल कीं, तो राजा एक महायज्ञ करीत असतां चांगल्या चांगल्या जिनसा दान करण्याऐवजीं निरुपयोगी गाई व घोडे दान करण्यास तयार झाला. तेव्हां, त्या पुस्तकांत असें लिहिलें आहे कीं, त्या राजाचा मुलगा नचिकेत याच्या अंतःकरणांत श्रद्धेनें प्रवेश केला. या 'श्रद्धा' शब्दाला इंग्रजी प्रतिशब्द येथें घालावा, असें मला वाटत नाहीं. तसा प्रतिशब्द घातल्यानें खऱ्या अर्थाचें दर्शन होणार नाहीं. या अपूर्व शब्दाचें रहस्य लक्षांत येणें फार कठिण आहे. श्रद्धेचा प्रभाव मोठा विलक्षण आहे. नचिकेताच्या अंतःकरणांत श्रद्धेचा उदय झाल्याबरोबर काय चमत्कार झाला पहा! नचिकेताच्या मनांत लागलाच असा विचार उभा राहिला: "अनेक माणसांपेक्षां मी श्रेष्ठ आहें, थोड्याच माणसांपेक्षां मी योग्यतेनें कमी आहें, कनिष्ठ असा मी कशांतच नाहीं, माझ्या हातूनही कांहीं तरी होण्यासारखें आहे." हा त्याच्या ठिकाणीं उत्पन्न झालेला आत्मविश्वास पुढें वाढूं लागला. मृत्यूचें कोडें त्याच्या मनांत घोळत होतेंच. हें कोडें सोडवावें, असें त्याला नंतर वाटूं लागलें. यमाच्या घरीं गेल्याशिवाय हें कोडें उकलण्यासारखें नव्हतें; म्हणून तो

मुलगा तिथें गेला. तो निर्भय बालक यमाच्या दाराशीं तीन दिवस तिष्ठत राहिला. पुढें यमापासून त्यानें इष्टप्राप्ति कशी करून घेतली, हें तुम्हांला ठाऊकच आहे. ही श्रद्धा आपल्याला पाहिजे आहे. दुर्दैवाची गोष्ट एवढीच कीं, आज हिंदुस्थानांत तिचाच लोप झाला आहे; आणि आम्हांला आजची दशा येण्याचें मूळ कारण तेंच आहे; माणसामाणसांत जें अंतर दिसून येतें, तें केवळ या श्रद्धेचें अंतर आहे, दुसरें कशाचें नाहीं. श्रद्धाच आपल्या अस्तित्वानें एकाला मोठा, व आपल्या अभावानें एकाला दुबळा करून टाकते. माझे गुरु म्हणत,—जो आपणाला दुबळा मानतो तो दुबळाच होतो; आणि तें खरें आहे. या श्रद्धेचा प्रवेश तुमच्यांत झाला पाहिजे. पाश्चात्य लोकांनीं जड-शक्तींवर जें आधिपत्य संपादिलें आहे, तें केवळ या श्रद्धेचें फळ आहे. त्यांच्या मनगटांतील जोरावर त्यांचा विश्वास आहे; पण तुम्ही जर आपल्या आत्म्याच्या सामर्थ्यावर विश्वास ठेवाल, तर केवढें अद्भुत कार्य तुमच्या हातून होईल! तुमचीं शास्त्रें, तुमचे ऋषि यांनीं एकमतानें ज्याचें वर्णन केलें आहे, त्या अनंत अशा आत्म्याच्या सामर्थ्यावर, त्या अनंत शक्तीच्या अधिष्ठानावर तुमचा विश्वास असूं द्या. ज्या आत्म्याचा कशा-नेंही नाश होत नाहीं, त्या आत्म्याचे ठिकाणीं अनंत सामर्थ्य भरून राहिलें आहे. फक्त त्याचें उद्बोधन झालें पाहिजे. भारतीय तत्त्वज्ञान व इतर देशांतील तत्त्वज्ञान यांत मोठा भेद आहे. आपल्याकडे सगळ्यांची —मग ते द्वैती असोत, विशिष्टाद्वैती असोत, कीं अद्वैती असोत—अशी दृढ समजूत आहे कीं, आत्म्याचे ठिकाणीं सर्व शक्ति अवस्थित आहे; फक्त ती व्यक्त केली पाहिजे. तात्पर्य, ही श्रद्धा मला पाहिजे आहे; आप-ल्याला सगळ्यांना पाहिजे आहे. हा आत्मविश्वास आपल्यांत आला पाहिजे. आणि या श्रद्धेचें, या आत्मविश्वासाचें संपादन किंवा उपार्जन

करणें हेंच पहिलें महत्कार्य आज तुमच्यापुढें आहे. प्रत्येक गोष्ट हंसण्यावारी उडवून द्यावयाची, गंभीरपणें कशाचाच विचार करावयाचा नाहीं, या भयंकर रोगाचें बीज आपल्या लोकांच्या अंगांत हळूच शिरूं पाहात आहे. हा दोष अगदीं काढून टाकला पाहिजे. याचें पूर्णपणें निर्मूलन करा. वीर्यशाली व्हा. श्रद्धासंपन्न व्हा. मग बाकीच्या सगळ्या गोष्टी आपोआप होतील.

अद्याप माझ्या हातून कांहींच झालें नाहीं; सगळें काम तुम्हांलाच केलें पाहिजे. मी जरी उद्यां मेलों, तरी मूळ कार्य कांहीं मरत नाहीं. माझी अंतःकरणपूर्वक अशी खातरी आहे कीं, या जनसमूहांतून हजारों व्यक्ति पुढें येऊन हें कार्य अंगावर घेतील, व त्याची उठावणी करून त्याचा इतका विस्तार करतील कीं, तितका कधीं काळीं होईल, असें माझ्या स्वप्नींही आलेलें नाहीं. माझ्या देशांतील लोकांवर—विशेषतः तरुण पिढीवर—माझा पक्का भरंवसा आहे. बंगाली तरुणांच्या डोक्यांवर तर मोठेंच ओझें आहे;—एवढें ओझें आजपर्यंत कुठल्याही तरुणांवर पडलें नसेल ! गेल्या सुमारें दहा वर्षांत मीं बहुतेक सर्व हिंदुस्थानभर प्रवास केला आहे. त्यावरून माझी अशी खात्री झाली आहे कीं, हिंदुस्थानाला पुन्हा आध्यात्मिक अधिकाराच्या योग्य पदावर प्रस्थापित करणारी शक्ति बंगाली तरुणांतच प्रकट होईल. मी असें निश्चयानें सांगतों कीं, भावनाप्रधान किंवा सहृदय व उत्साहशाली अशा बंगाली तरुणांमधूनच असे शेंकडों वीरपुरुष पुढें येतील कीं, ते आमच्या पूर्वजांच्या सनातन आध्यात्मिक तत्त्वांचा उपदेश व प्रचार करीत जगाच्या या कोंपऱ्यापासून त्या कोंपऱ्यापर्यंत फिरतील. तुमच्यापुढें महत्कार्य काय तें हेंच आहे. तेव्हां, " उत्तिष्ठत, जाग्रत, प्राप्य वरान्निबोधत । " या महावाक्याचें तुम्हांला पुन्हा एकदां स्मरण देऊन मी आपलें भाषण पुरें करणार आहे. भिऊं नका; कारण, सर्व मनुष्यजातीचा

इतिहास पाहिला असतां असें दिसून येतें कीं, महत्कार्यें करणारीं माणसें सामान्य जनसमूहांतूनच पुढें आलेलीं आहेत. आजपर्यंत जगामध्यें जेवढे म्हणून नामांकित प्रतिभासंपन्न पुरुष उत्पन्न झाले आहेत, तेवढे सगळे साधारण लोकांतूनच झालेले आहेत; आणि इतिहासाची नेहमींच पुनरावृत्ति होत असते. भीति म्हणून कशाची बाळगूं नका. तुमच्या हातून अद्भुत कार्य होईल. ज्या क्षणीं तुमच्या हृदयांत भयाचा संचार होईल, त्या क्षणीं तुम्ही दुबळे बनाल. भय हेंच जगांतील एकंदर दुःखाचें मूळ आहे. भयासारखा दुसरा कोणचाच कुसंस्कार नाहीं. आमच्या सगळ्या विपत्तीचें आदिकारण भयच; निर्भयतेनें स्वर्गही एका क्षणांत हातीं येईल. तेव्हां ' उत्तिष्ठत, जाग्रत, प्राप्य वरान्निबोधत. ! '

सद्गृहस्थहो ! तुम्हीं माझ्यावर जो अनुग्रह केला, त्याबद्दल पुन्हा एकदां मी तुमचे आभार मानतों. जगाची---विशेषेंकरून माझ्या देशाची व देशबंधूंची—अत्यल्प तरी सेवा माझे हातून घडावी, अशी माझी इच्छा— अगदीं अंतःकरणापासूनची खरी खरी इच्छा—आहे.

---

# ' राजा कालस्य कारणम् । '

लेखक—मयूरेश, पुणें.

रविवारचा दिवस. लगबगीनें कसे तरी दोन घास खाऊन कचेरीच्या रस्त्यानें धांवपळ करीत जाण्याचा लकडा आज मागें नव्हता. परंतु दररोजच्या संवयीप्रमाणें लौकर उठल्यामुळें आतां जेवणापर्यंतचा सकाळचा काळ कसा कंठावा हा एक मजपुढें प्रश्नच उभा राहिला. मार्केटांतून भाजीबिजी आणण्यामध्यें काळाचा सद्व्यय करावा असें मनांत येऊन घरांत

मोठ्या ऐंटीनें, "आज काय भाजी आणायची ?" म्हणून विचारलें; पण त्यावर, "भाऊजींनीं कालच संध्याकाळीं भाजी आणली आहे." असें उत्तर मिळालें. अर्थातच माझ्या मनोरथाचा थोडासा भंग झाला, हें सांगणें नकोच. तरी पण मीं बाहेर जाण्याचा माझा बेत मुकरर केला, व चहा घेऊन सुमारें आठ साडे आठांच्या बेताला घराच्याबाहेर पडलों. शाळेंत असतांना, Think twice before you leap अशी एक म्हण माझ्या वाचनांतून गेली होती. त्या म्हणीचा बरोबर अर्थ मला आतां समजला. मी बाहेर पडलों खरा, पण कोठें जायचें हें मनाशीं पक्कें न ठरल्यामुळें, माझे पाय मला जिकडे नेतील तिकडेच जाणें भाग पडलें. अशा स्थितींत चालतां चालतां मी एका चहाच्या दुकानासमोर आलों. तेथें येतांच दुकानांत चालणारा कपबशांचा मनोहर खडबडाट माझ्या कानांवर येऊन आदळला. त्याबरोबरच माझ्या अंगांत एक प्रकारची नवी वीरश्री आल्यासारखें झालें. हिंदुस्थानचा शोध लावण्याकरितां समुद्रावर भटकत जाणाऱ्या कोलंबसाला मध्यें अनायासें अमेरिका सांपडून, हेंच तें हिंदुस्थान, असा त्याचा समज झाल्यामुळें, जसा तो आनंदसागरांत पोहूं लागला, तशीच माझी स्थिति झाली. कपबशांचा तो सुस्वर ध्वनि कानीं पडतांच हेंच तें माझें इच्छित ठिकाण असें मला वाटलें व त्याप्रमाणें माझा मोर्चा ताबडतोब तिकडे वळला.

आंत गेल्यावर 'एक सिंगल!' असा हुकुम सोडून, बाजूच्या खोलींतील—या खोलीवर 'ब्राह्मणांकरितांच' अशी पाटी लावली होती— एका रिकाम्या खुर्चीवर जाऊन सिंगलची मार्गप्रतीक्षा करीत बसलों. माझ्या आजूबाजूला बरीचशी गर्दी असल्यामुळें व त्या गर्दींत अनेक प्रकारचे लोक असल्यामुळें त्यांच्या अवलोकनानें मला थोडीबहुत करमणूकच झाली असें म्हणण्यास हरकत नाहीं. कोणी सिंगलच्या जोडीला

पावाचा एक ठोकळा घेऊन त्याचे हातानें तुकडे करून ते चहांत बुडवून मिटक्या मारीत खात होता. कोणी चहाच्या अगोदर भर्जी खाण्यांत गुंग झाला होता. कोणी चपाती व कांद्याबटाट्यांची पातळ भाजी यांवर ताव मारीत होता. कोणी पोटभर आहार झाल्यावर पिऊन उरलेल्या ग्लासांतील पाण्यांतच हात धुऊन टाकण्याची खटपट करीत होता. कोणी धूम्रपान करून दुकानाची रजा घेण्याच्या विचारांत होता. कोणी किती पैसे झाले म्हणून चौकशी करीत होता. अशा प्रकारच्या अनेकविध गोष्टी एकसमयावच्छेदेंकरून चालल्या असल्यामुळें मनाला एक प्रकारची चांगली करमणूक झाली. इतक्या अवधींत माझ्यापुढें ' सिंगल ' आला व मीं तो घेण्यास सुरुवात केली. कपांतील चहा बशींत ओतल्यावर ती बशी तोंडाला लावतांच कांद्याचा असा कांहीं भपकारा आला कीं, चहामध्येंच कांद्याचा रस पिळला आहे कीं काय, असें मला वाटलें. व तो भपकारा सहन न होऊन मला त्याची किळस आली. म्हणून बशी तशीच ठेवून कपानेंच चहा पिऊन टाकावा म्हणून मी कप तोंडाशीं नेला, तोंच त्यांत कांहीं तरी आहे असें मला वाटलें. काय आहे तें काढून टाकावें म्हणून मीं आंत बोट घातलें. बाहेर काढून पहातों तों तो एक पुरीचा तुकडा आहे असें माझ्या दृष्टोत्पत्तीस आलें. बशीला येणाऱ्या कंदर्पाच्या दर्पानें माझें डोकें अगोदरच फिरलें होतें, व त्यांत हा पुरीचा तुकडा सांपडला. तेव्हां माझी तळपायांची आग मस्तकास गेली. मी तसाच लागलीच उठून त्या दुकानाच्या मालकाकडे गेलों. संतापाच्या भरांत मनुष्य आपलें स्वतःचें हंसें कसें करून घेतो, याचा मला एक चांगलाच अनुभव तिथे मिळाला. एका हातांत तो कप व दुसऱ्या हाताच्या बोटावर तो पुरीचा तुकडा घेऊन मीं मालकाला मोठ्या रागानें म्हटलें, "हें हो काय ? ही कसली व्यवस्था ? यापेक्षां दुकान मोडून चालते व्हानात ! गिऱ्हाईक म्हणजे काय वाटेवर पडलें आहे होय ? "

माझें बोलणें त्या मालकानें अगदीं संथपणें ऐकून घेतलें. त्याचा तो अढळ संथपणा पाहून मीमात्र अधिकच चिडलों. मला असा चिडलेला पाहून सभोंवारच्या मंडळीस एक प्रकारची करमणूक झाल्यासारखी झाली; व बहुतेक सर्व जण दांत विचकून माझ्याकडे पाहूं लागले. आतां मात्र माझा संताप अनिवार झाला; व मी कांहीं बोलणार इतक्यांत मालक माझ्यापुढें हात जोडून म्हणाला "महाराज, चूक झाली असेल, त्याचा राग कशाला ? आपण स्वस्थ बसा. मी तुम्हांला पुनः चहा देवावितों. सकाळची वेळ म्हणजे जरा अशीच गडबडीची असते. विसळतां विसळतां एखादा तुकडा उडून इकडचा तिकडे झाला असेल. असें पुष्कळदां होतें. तरी मी इतकी काळजी घेतों. पण नोकर म्हणजे येथून तेथून सारखेच. स्वतः मन घालून, अक्कल खर्चून काम करतील तर शपथ." एवढें बोलून 'कायरे राम्या, गाढवा ! कुणाचें काम हें ? दिसत नव्हतें का तुला ?' असें म्हणून मालकाची स्वारी नोकरलोकांवर घसरली. राम्या थोडाच मालकाचें बोलणें ऐकून घेणारा होता ! त्यानें एकदम सणसणून उत्तर दिलें,— "मला नाहीं कांहीं माहीत ! मला उगाच बोलूं नका. तुम्हांला काय विचारायचें तें त्या तुक्या गुरवाला विचारा. आज त्या खोलीवर त्याची नेमणूक आहे." असें म्हणून तो आपल्या उद्योगास लागला. "तुक्या गुरवाला विचारा" हे त्याचे शब्द ऐकतांच मला जरा आश्चर्य वाटलें. ब्राह्मणांकरितां म्हणून राखून ठेवलेल्या खोलीवर तुक्या गुरवाची नेमणूक ! मी तर मग गुरवाच्या हातचा चहा प्यालों ! अन् तोसुद्धां ब्राह्मणांच्या खोलींत बसून ! खूपच आहे सांवळा गोंधळ ! असें मी मनाशीं म्हणत आहें तोंच त्या मालकानें तुक्या गुरवाची हजेरी घेण्यास सुरवात केली. "गाढवा ! कामावर लागून पंधरा दिवससुद्धां झाले नाहींत तों लागलास का असले गुण उधळायला! बेशरम नाहीं तर ! काम नीट होत नसेल तर उद्यांपासून येऊं नकोस, समज-

खास ! " तुक्या गुरख गरीब होता. तो अगदीं नम्रपणानें कॅविलवाण्या स्वरानें म्हणाला " दादासाहेब, एकवार मला क्षमा करा ! त्या दिवशीं त्या महाराला चहा दिला होता त्या कपांत. तो आज दोन दिवस तसाच पडला होता. त्याचे तळाला पुरीचा तुकडा अगदीं वाळून घट्ट बसला होता. हें पहा, माझ्या दोन्ही हातांला खरूज झाली असल्यामुळें, मीं पुष्कळ प्रयत्न केला, पण तो निघेचना. मला वाटलें तो कांहीं आज वर येणार नाहीं. अन् दुसरा कप हाताशीं नव्हता. यांची खोटी होऊं नये म्हणून तो लौकर दिला. चूक झाली असली तर दया करा महाराज ! " असें म्हणून आपले खरजेनें फुललेले हात मोठ्या कष्टानें जोडून तो मालकाची विनवणी करूं लागला.

तो सर्व देखावा पाहून माझा संताप तर नाहींसा झालाच, पण उलट मनापासून हंसूंमात्र आलें. कामाची हयगय केल्याबद्दल मालक रागें भरत असतां त्या भोळसर तुक्यानें मध्येंच नवें पिल्लूं सोडून दिलें. तुक्या नवीनच कामावर लागला असल्यामुळें आपण काय बोलावें व काय न बोलावें, हें शहरचें धोरण त्याला नव्हतें. त्यानें आपलें सरळ होतें तेंच सांगितलें. पण इतक्या गिऱ्हाइकांदेखत तुक्यानें अशा प्रकारची जबानी देणें आपणां स्वतःच्या इभ्रतीला अहितकारक आहे, व अशा प्रकारानें गिऱ्हाइकांच्या मनांवर भलताच परिणाम होऊन गिऱ्हाइकी बुडेल, अशी मालकाला भीति वाटूं लागली. व तो कांहीं अंशीं कावऱ्याबावऱ्यासारखा तुक्याच्या तोंडाकडे बघत राहिला. तें त्याचें चित्र पाहून मला हंसूं लोटलें. तुक्याचें भाषण संपून दया करण्याबद्दल त्यानें जेव्हां हात जोडले, तेव्हां मालकानें तुक्याचें म्हणणें अगदीं असत्य आहे, हें सिद्ध करण्याकरितांच कीं काय कोण जाणे, त्याच्या दोन श्रीमुखांत भडकावल्या. " गाढवा, नाहीं नाहीं तें भकतोस ? कोण लेका, तुझा बाप आला होता का महार होऊन, त्याला

चहा दिलास तो ? कोणाचें दुकान हें आहे, तुला समजत नाहीं ? गद्ध्या ! गिऱ्हाइकांदेखत वाटेल तें बरळतोस ? " असें म्हणून मालकसाहेबांचा हात त्या बिचाऱ्या तुक्याच्या कानाकडे धांवला, व थोडक्याच वेळांत खालीं वांकलेल्या तुक्याच्या तोंडांतून " अग. आई ! नको दादासाहेब; चुकलों. पुनः नाहीं बोलणार !" असे रडके शब्द निघाले. मालकसाहेबांचा राग तुक्याच्या गरीबपणामुळें बराच जोरांत आलेला होता, त्यामुळें खालीं वांकलेल्या तुक्याच्या कमरेंत डाव्या हाताचा एक सणसणीत रट्टा बसलाच. या वेळेस गिऱ्हाइकांपैकीं कांहीं जण व मी मालकाच्या हाताला धरून "जाऊं द्या हो, तो नवीनच आहे; त्याला कांहीं माहीत नाहीं. सोडा !"असें म्हणून तुक्याची सुटका करण्याची खटपट करीत होतों. आम्ही इतके सारे जण तुक्याकारितां बिनपैशानें वकिली करण्यास प्रवृत्त झाल्याचें पाहून मालकाला विशेषच अवसान आलें व आणखी थोडीशी धक्काबुक्की झाली. शेलक्या शेलक्या शिव्यांचा तर सारखा भडिमार चालला होताच. पण लौकरच तुक्याची मुक्तता झाली, व तो कोपऱ्यांत एका बांकावर बसून सत्यपणाबद्दल व सरळपणाबद्दल मिळालेल्या पारितोषिकाचा आस्वाद घेत स्वस्थ राहिला.

" तसें नव्हे हो ! " मालक गिऱ्हाइकांना उद्देशून गर्जना करीत म्हणाले. " आतां तुम्ही समंजस आहांत, म्हणून तुम्हांला कांहीं निराळें सांगावयाचें कारण नाहीं; पण तिसरा एखादा जर असता तर तो काय बरें म्हणता ? निष्कारण अब्रू जायची ! "

" हो हो नाहीं तर ! " गिऱ्हाइकांपैकीं एक जण हांसत हांसत म्हणाला. " तुमचें म्हणणें अगदीं उघडच आहे. कारण—"

"कारण कसलें आलें आहे हो मास्तर ? " मालक मध्येंच म्हणाला. "येथें तुमच्यासारखे चांगले बी. ए. एम्. ए. लोक येतात, वकील येतात, बॅरिस्टर येतात, शाळेचे विद्यार्थी येतात, कॉलेजचे विद्यार्थी येतात; असे

मोठमोठे लोक माझे गिऱ्हाईक आहेत. तुम्ही बघतांच, त्यांच्याकरितां तर इतकी व्यवस्था केली. ती पहा मुद्दाम पाटी तयार करून आणून लावली, तेथें कोणीं गलिच्छ लोकांनीं जाऊं नये म्हणून. अहो, दुकान पडलें रस्त्यावर. सारखे लोक येतजात असतात. त्यांच्याच पैशानें त्यांची सोय पहायची. कां पाहूं नये? अहो, थोडक्यांत जर गिऱ्हाइक खुष होत आहे तर कां करूं नये?"

"हो हो अलबत! गिऱ्हाइकांची तर सोय अगोदर बघितली पाहिजे." मास्तर म्हणाले. "अहो, गिऱ्हाईक आहे तरच दुकान आहे!"

"कसें बोललांत मास्तर अगदीं बरोबर! पण हें या मठ्ठ डोक्यांच्या काटर्यांना कोठून समजणार? मेला तर मालक मरेल; त्यांच्या बापाचें काय जातें!" मालक दांत विचकीत विचकीत तुक्याकडे पाहूत म्हणाले.

"ही जी पाटी लावली आहे, ती ब्राह्मण गिऱ्हाइकांच्या सांगण्यावरूनच लावली वाटतें?" मीं विचारिलें.

"छे छे! अहो, गिऱ्हाईक कशाला सांगत बसतें? तें त्याच्या वागण्यावरूनच आम्हांला समजतें. "ब्राह्मणांकरितां" म्हणून पाटी असली तरी इतर लोकांना तेथें मज्जाव आहे असें नाहीं. फक्त ड्रेसमात्र चांगला पाहिजे. मनुष्य अमंगळ दिसतां उपयोगी नाहीं, एवढेंच. तुम्ही पहा, आलेल्या इसमाला त्याची जातगोत विचारीत बसायचें, कां त्याला कांहीं हवें नको तें विचारायचें? चांगला स्वच्छ व्यवस्थेशीर ड्रेस करून बाहेरचा कोणीही आंतमध्यें येऊन बसला, तर आम्ही त्याला बिलकूल विचारीत नाहीं. आतां रात्रीच्या वेळीं दारूच्या अंमलांत कांहीं लोक येतात, त्यांना आंत जाऊं देण्याची सोय नसते. एक तर त्यांचा पोषाख गलिच्छ असतो,

आणि तोंडाला घाण येत असते हें दुसरें; पण याशिवाय आणखी एक कारण असतें तें वेगळेंच. ''

'' तें कोणतें बुवा ? '' मास्तर मध्येंच म्हणाले.

'' त्यांत कांहीं विशेष नाहीं. अहो, ते लोक निश्चंत असतात, आचरटासारखे खातात; व तिथेच एकादे वेळीं ओकतात. त्यापासून आम्हांला व इतर लोकांनासुद्धां त्रास होतो, म्हणून अगोदरच व्यवस्था करून ठेवावी लागते. ''

'' हें सगळें ठीक आहे, पण जरा थोडी काळजी घ्यावी म्हणजे झालें. विशेषतः स्वच्छता असली म्हणजे बरें. '' मीं म्हटलें.

'' तुम्ही म्हणतां तें कांहीं खोटें नाहीं. मला सारें समजतें. पण एकटा मी नाचणार तरी कुठे कुठे ? प्रत्येक कपबशी का मी विसळूं ? शक्यच नाहीं. अहो, हें असेंच चालायचें. एका पुरीच्या तुकड्याकरितां चहा न घेणारा असा तुमच्यासारखा एखादाच. नाहीं म्हटला तरी चालेल. चमचा असतोच. चमचानें बाजूला काढून टाकला म्हणजे झालें. असे जर सगळेच लोक इतके चिकित्साखोर असते, तर दुकानांतून मग चहा घ्यायला हो कां येते ? त्यांना काय घरें नसतात म्हणून ? ''

मला वाटलें कीं मलाच उद्देशून हा बोलतो कीं काय कोण जाणे ! पण तसाच धीर धरून मीं म्हटलें ' हो, हो, बहुतेक ज्यांचीं बिऱ्हाडें येथें नसतात, असेच लोक येथें येत असतील ! '

'' तर मग अगदींच तुमची चूक आहे ! '' मालक म्हणाला. '' अहो, येथें येणाऱ्यांपैकीं पुष्कळ लोक असे असतात कीं, त्यांची मंडळी येथें आहे. आणि विशेष गंमत तर हीच आहे. ज्यांची मंडळी येथें नसेल, जे खाणावळींत तुकडे मोडीत असतील, ते येथें येतील यांत कांहीं नवल नाहीं ! अहो, तुम्हांला सांगितलें तर आश्चर्य वाटेल. इथे असे कांहीं

लोक आहेत कीं, जेवणाबरोबर रोज तोंडीं लावण्याकरितां लागणारी भाजी, उसळ वगैरे ते येथून घेऊन जातात, समजलां ? ''

मला हें ऐकून खरेंच आश्चर्य वाटलें व म्हणून माझ्या तोंडावाटे आपोआपच शब्द गेले–" मूर्खच बेटे ! ''

माझ्या ह्या शब्दांनीं दुकानाच्या मालकास जरासा विषाद वाटल्यासारखें दिसलें. तो माझ्याकडे टवकारून पाहून म्हणाला, " कां हो, मूर्ख कां ? यांत त्यांचा मूर्खपणा काय होतो ? भाजी, भर्जी, उसळ इत्यादि पदार्थ नेणारे जर मूर्ख ठरतात, तर तुमच्यासारख्या एक कपभर चहा घेण्यास येणाऱ्यांनासुद्धां मूर्ख कां म्हणूं नये ? कां तुम्ही नुसता चहाच घेतां म्हणून स्वतःला त्यांच्या पंक्तीला बसविण्यास नाखूष आहां ? आपल्या पायांखालीं काय जळतें आहे, हें न पहातां दुसऱ्यास नांवें ठेवण्याची आपल्या लोकांना संवयच लागली आहे. हा एक शिष्टपणाचा प्रकार आहे, नाहीं ?"

हे त्याचे शब्द मला बरेच झोंबले. दुसऱ्यांस नांवें ठेवीत असतां मनुष्याच्या हातून तसेंच अश्लाघ्य वर्तन कधीं कधीं घडत असतें; पण असें वर्तन आपण करितों, याची जाणीव त्यास नसते. या वेळीं माझी स्थिति कांहीं अंशीं अशीच होती. परंतु दुकानदाराच्या शब्दांनीं माझ्या अंतःकरणांत चांगलाच उजेड पडला. ज्या दोषाकरितां मी दुसऱ्यास नांवें ठेवीत होतों, तोच दोष माझ्यामध्येंही आहे, हें माझ्या पूर्णपणें नजरेस आलें. स्वतःचे दोष दुसऱ्यानें दाखविल्यावर आपणांस एक प्रकारचा आपला अपमान झाल्यासारखें वाटतें–निदान मला तरी तसें वाटलें. परंतु झालेल्या अपमानाबद्दल सूड घेण्याची शक्ति नसल्यामुळें मला हिरमुष्टी होऊनच बसावें लागलें.

माझी ही करुणास्पद स्थिति पाहून, सांत्वन करण्याकरितां कीं काय, तो मालक म्हणाला—" तुम्हांला इतकें वाईट वाटण्याचें कारण

नाहीं. साधारण सगळ्यांचीच ही तऱ्हा आहे !" इतक्यांत पांच रुपयांच्या नोटेची मोड आहे का, म्हणून एक जण विचारावयास आला, व त्याला ती देण्याकरितां मालक आपल्या पेटीकडे निघून गेला. तेव्हां तेथून पाय काढण्यास ही संधी चांगली आहे असें पाहून, टेबलावर एक पैसा टाकून मुकाट्यानें मी दुकानांतून बाहेर पडलों.

बाहेर पडलों, रस्त्यानें चालूं लागलों; पण मी कोठें जात आहें याचें मला भानच नव्हतें. माझ्या डोक्यांत, चहाच्या दुकानांत घडलेला एकंदर प्रकार सारखा घोळत होता. " मी दुकानांत चहा घेण्यास कां गेलों व कां जातों ? लोक कां जातात ? बरें, दुकानांत गेल्यावर लोक विशेषसे चहाच घेतांना दृष्टीस पडतात, अशी त्या चहांत जादू तरी काय आहे ? चहाचें व्यसन—व्यसन म्हणणें चूक होईल काय ?—जडण्याच्या अगोदर असें सार्वजनिक व शिष्टसंमत असें दुसरें कोणतें एखादें व्यसन आपल्या समाजांत प्रचलित होतें कीं काय ? चहा घेणेंच असेल तर असल्या गलिच्छ, घाणेरड्या दुकानांत ( आणि कोणतेंही चहाचें दुकान गलिच्छ, घाणेरडेंच असणार ) घेण्यापेक्षां घरीं करून घेतलेला काय वाईट ? आरोग्याच्या दृष्टीनें यांत अपायकारक असें कांहींच नाहीं काय ? स्पर्शजन्य रोग अगर त्वग्रोग ( Skin diseases ) यांसारख्या सुलभ प्रसार होणाऱ्या रोगांचीं मूळबीजें असल्या दुकानांत एकवटलीं जाऊन त्यांचा प्रसार चोहोंकडे होण्याची भीति मुळींच नाहीं काय ? ' दुसऱ्यांचें उष्टें खाऊं नये; दुसऱ्याच्या उष्ट्या झालेल्या भांड्यानें पाणी पिऊं नये; कांहीं-ही खावयाचे आधीं अगर प्यावयाचे आधीं हात, पाय, तोंड हीं स्वच्छ धुवावीं; अमंगल लोकांच्या हातचें अन्न अगर पाणी घेऊं नये; ज्या वस्त्रांवर दिवसाचे सर्व व्यवहार होतात, तीं वस्त्रें भोजनाचे वेळीं उतरून ठेवून त्यांऐवजीं दुसरीं स्वच्छ वस्त्रें परिधान करावीं; भोजनाचे वेळीं

एकमेकांस चिकटून बसूं नये; ' इत्यादि प्रकारचे आरोग्यरक्षणाचे जे कांहीं सुंदर नियम आमच्या धर्मशास्त्रांतून दिलेले आहेत व जे आम्हीं पाळिले पाहिजेत, पण जे पाळण्याविषयीं आमच्या लोकांत अलीकडे अनास्था दिसून येते, त्या नियमांत खरोखरच का कांहीं अर्थ नाहीं ? कां पाश्चात्त्य संस्कृतीच्या झगझगीत प्रकाशामुळें नेत्रांस अंधत्व येऊन या नियमांत कांहींच सत्यता वाटत नाहींसें झालें आहे ? धर्म म्हणून वाटलें तर हीं तत्त्वें पाळूं नये, पण स्वतःच्या आरोग्याचा बचाव व्हावा व आपल्या जिवांत जीव आहे तोंपर्यंत, आपण कष्ट करून मिळविलेल्या संपत्तीचा ( थोडी असो किंवा फार असो हा प्रश्न नाहीं ) आपणांला आनंदानें उपभोग घेतां यावा, ह्याकरितां तरी ह्या धर्मतत्त्वांची अंमलबजावणी झाली असतां वावगें होणार नाहीं. सिरप, सार्सापरिला अगर हायपोफास्फेट्स् हीं सेवन करून सशक्त होण्यापेक्षां, अगोदरच पथ्याशुद्ध वागून या दिव्य वनस्पती-औषधराजींना दूर राखणेंच फायदेशीर नाहीं का ? पण याचा कोणीच कसा विचार करीत नाहीं ? हें काय गूढ आहे ? अशा अनेक प्रकारच्या प्रश्नांनीं माझ्या डोक्यांत एकच काहूर करून सोडलें. मी घरीं पोंचलों तरी तेच विचार चालू होते. अखेरीस मी आपल्या स्वतःबद्दलच विचार करूं लागलों. मी स्वतः दुकानांत कां गेलों ? एकदां, दोनदां, चारदां तोच तो प्रश्न मनांत घोळला. परंतु आत्मनिरीक्षणाची संवय नसल्यामुळें म्हणा, अगर प्रश्नच तितका बिकट असल्यामुळें म्हणा, त्याचें समर्पक निराकरण मला सांपडेना. दुकानावरून जातां जातां मला लहर आली म्हणून मी गेलों. अशी लहर तरी कां यावी ? चहा पिण्याची चटक असल्यामुळें कपबशांचा आवाज ऐकल्याबरोबर मनांत एक प्रकारची उत्कट प्रेरणा झाली. चटक तरी कशी लागली ? स्नेह्यांसोबत्यांबरोबर सहज एकाद्या दुसऱ्या वेळीं जाण्याचा प्रसंग आल्यामुळें व असे प्रसंग वरचेवर येत

गेल्यामुळें या संवयीचा माझ्यावर न कळत पगडा बसला. स्नेह्यांसोबत्यांबरोबर मी कां गेलों ? त्यांनीं 'चला' म्हटल्यावर 'नाहीं' म्हणून त्यांचें मन दुखवावें हें मला बरें वाटेना, तितका मला धीर होईना, म्हणून मला त्यांचेबरोबर जाणें भाग पडलें. स्नेहीसोबती तरी कां जात असत ? त्यांना संवय म्हणून, अगर चारचौघांनीं एके ठिकाणीं बसून चहा पिण्यांत कांहीं अतर्क्य सुख वाटत असावें, अगर आधुनिक काळचा एक रूढ-संप्रदाय, म्हणून ते जात असावे. 'आधुनिक काळचा रूढ संप्रदाया' हा विचार येतांच पुनः आपला पूर्वीचा, 'असा संप्रदाय तरी कां पडावा ? असा विचार दत्त म्हणून पुढें राहिलाच. ही कदाचित् सुधारणा असेल, असेंही वाटलें. पण अशी तरी सुधारणा कां यावी ? या प्रश्नाचा उलगडा होईना.

अशा प्रकारें मी आपणाशीं विचार करीत असतां, माझ्या जवळच माझा धाकटा भाऊ कालिदासाचें 'विक्रमोर्वशीयम्' नांवाचें संस्कृत नाटक वाचीत बसला होता. वाचतां वाचतां त्या पुस्तकांतील त्यानें 'राजा कालस्य कारणम्' हें वाक्य सहजगत्या वाचलें.

हें वाक्य त्यानें सहजगत्या वाचलें खरें, पण तें माझ्या कर्णरंध्रांत जातांच माझ्या डोक्यांत लखलकन प्रकाश पडला; व माझा विकट प्रश्न सुटला, अशी मनाची खात्री होऊन माझ्या तोंडावाटे एकदम उद्गार निघाले, 'Oh yes, that's it.'

---

# समाजशास्त्रावरील व्याख्यानें.

## ( परीक्षण. )

### लेखांक २.

हिंदुसमाजव्यवस्थेंत प्रो. भाटे यांना जे दोष दिसून येत आहेत, त्यांतील पहिला म्हणजे हिंदूंचा 'कृत्रिम शुचिर्भूतपणा' हा होय. 'कांहीं

जातींच्या लोकांनीं स्पर्शिलेलें अन्न दुसऱ्या कांहीं जातींतल्या लोकांस बाटलें असें वाटतें. आणि तें त्यांच्या खाण्यास अयोग्य ठरतें.' या गोष्टीस ते 'कृत्रिम शुचिर्भूतपणा' हें नांव देतात. एकादी गोष्ट वाईट आहे असें कोणीं म्हटलें, तर त्या गोष्टीचे वाईट परिणाम काय होतात, असें आपण त्यास साहाजिकपणेंच विचारतों. हिंदूंच्या या 'कृत्रिम' शुचिर्भूतपणापासून त्यांचें नुकसान काय होतें, असा प्रश्न रा. भाटे यांस आपण आपल्या मनांत विचारतों. वास्तविक पहातां वाईट परिणाम घडवून न आणणारी एकादी वाईट गोष्ट असेल, तर ती अहितकारी नाहीं एवढ्या सबबीवर राहूं देणें इष्ट नाहीं. कारण आजच्या परिस्थितींत नाहीं तरी भिन्न परिस्थितींत ती बाधल्यावांचून रहाणार नाहीं. तेव्हां कांहीं चर्चेनें जरी असें ठरलें कीं, हा 'शुचिर्भूतपणा' अहितकारी नाहीं, तरी तो तसाच राहूं देणें इष्ट नाहीं, असें एकपक्ष म्हणेल; आणि हें त्याचें म्हणणें खरोखर संयुक्तिक आहे. आतां आपणांस असें पहावयाचें कीं, हा 'शुचिर्भूतपणा' जात्या वाईट आहे कीं चांगला आहे? त्याच्या परिणामाकडे लक्ष न देतां त्याचें अस्तित्व उचित आहे कीं अनुचित आहे? म्हणजे त्याची कुळी व त्याचा जगांतील पसारा तत्त्वतः शुद्ध आहेत कीं नाहींत? व हें पाहिल्यानंतर म्हणजे त्याचें स्वरूप, धर्म ठरविल्यानंतर, त्याचे परिणाम हितकारी अगर अहितकारी आहेत, हें पहावयाचें. तर आतां यांपैकीं पहिला प्रश्न आपण विचारासाठीं घेऊं.

प्रो. भाटे यांनीं या शुचिर्भूतपणाला 'कृत्रिम शुचिर्भूतपणा' असें नांव दिलें आहे. शुचिर्भूतपणा हा स्पृहणीयच आहे, पण तो कृत्रिम नसावा असा त्यांच्या म्हणण्याचा आशय. खरें म्हटलें म्हणजे सर्व शुचिर्भूतपणा हा कृत्रिमच आहे. स्वच्छता ही बुद्धिपुरस्सर यत्न करून आपण ठेवतों, तेव्हां ती कृत्रिमच. सहजांत येणारा गुण म्हणजे अमंगळपणा हा होय.

कांहीं एक श्रमांशिवाय तो साध्य आहे. मग रा. भाट्यांच्या ‘ कृत्रिम ’ शब्दांचा अर्थ काय? या शब्दाला येथें त्याचा नेहमींचा अर्थ नाहीं. मनांत असलेला अर्थ नीट पिंजून त्याला नेमकें नांव देण्याची दगदग रा. भाट्यांनीं केली नाहीं. त्या शब्दाचा अर्थ असा दिसतो. शुचिर्भूतपणा म्हणजे मलिनपणापासून दूर रहाणें. पण प्रस्तुत स्थलीं आपण मळापासून दूर रहात नाहीं; मळ नसतोच. अमक्याच्या बोटांचा मळ माझ्या भाकरीला लागला, तर माझा शुचिर्भूतपणा आणि म्हणून भाकरी विटाळली. मळच जर नाहीं तर विटाळ कसला? आपल्याला मळाचा विटाळ होतच नाहीं; तर मळाच्या कल्पनेचा विटाळ आपण मानतों. केवळ स्पर्शांत मळ येतो कुठून? आपणां सर्वांच्या हातासारखाच त्याचा हात असतो. म्हणजे कल्पनेनें तो मळ आपल्या अन्नांत शिरलासें आपण मानतों. असा ‘ कृत्रिम ’ या शब्दाचा अर्थ. आतां येथें असें शोधावयाचें कीं, ही मळाची कल्पना आली कोठून? प्रस्तुत वादाचा कमकुवतपणा आणि त्याचें बळ हीं दोन्ही या एकाच ठिकाणीं आहेत. हा गृहस्थ मांस खातो आणि म्हणून त्याचा स्पर्श माझ्या अन्नाला नको. पण तो गृहस्थ तुझ्या अन्नाला मांस आणून लावीत नाहीं. हें खरें, पण तो गृहस्थ व त्याचें तें मांस यांचें, या खाण्यापिण्याच्या बाबतींत, इतकें साहचर्य आहे कीं, तो आला कीं त्याच्या मांसाची कल्पना मला येते. तर मग तूं केवळ कल्पनेनें नाखुष होतोस? एकदम कबूल: पण कल्पनेनें नाखुष होण्यांत एवढें बिचकण्यासारखें काय आहे? मी त्या अस्पृश्यापासून निराळा कशांत आहें? तर आहारांत आहें व तोही इतका दूर कीं, त्याचा व माझा दुसरा कसलाही संबंध आला, तरी या बाबतींत त्याच्यामाझ्यामधलें अंतर एक केंसही कमी होणार नाहीं. असें जर आहे तर ज्यांत माझें वैशिष्ट्य त्यांत त्याचा माझ्याशीं संबंध कशाला? शिवाय मी त्याचा विटाळ मानतों,

इतकेंच नव्हे, तर, ' आपल्या स्पर्शाचा याच्या अन्नाला विटाळ होतो ' यांत त्या मांसाहारी माणसालाही कांहीं अचंबा वाटत नाहीं. तो म्हणतो, बरोबर आहे: ' मी मांस खातों व हा खात नाहीं; माझा स्पर्श याच्या अन्नाला योग्य नाहींच.' या त्या मांसाहारी माणसाच्या उद्‌गारांतील रहस्य काय ? मांसाहार हा हलका आहे आणि वनस्पत्यन्न शुचि आहे; तेव्हां त्याला स्पर्शून आपल्या अन्नाच्या दर्जाला आणूं नये, हाच भाव त्याच्या मनांत असतो. तुम्ही म्हणतां कीं ' साहेबलोकांना या गोष्टीचें मोठें आश्चर्य वाटतें. ' कबूल आहे; तसें होणें अगदीं साहजिक आहे. वनस्पत्याहार माहीत असेल, तर त्याची शुचिता व त्याबद्दलची पवित्र-भावना मनांत उदित होतील, एरवीं तसें होणें केवळ अ-शक्य. आमच्या अस्पृश्यांना ही भावना लवकर पटते. कारण त्यांना वनस्पत्याहाराची शुचिता माहीत आहे. शिवाय तुम्ही हेंही ध्यानांत घेतलें पाहिजे कीं, प्रसंगोपात्त मांसाहार करणाराचा माझ्या अन्नाला झालेला स्पर्श मी इतकासा मानीत नाहीं, पण तुम्हीं जों जों खालीं जाल, व जसे जसे सदा मांस खाणारे, इतकेंच नव्हे, तर त्यांतच व्यवहार करणारे लोक तुम्हांला भेटतील, तशी तशी माझी विटाळाची भावना प्रखर होत जाते. म्हणजे अमंगलपणा माझ्या विटाळकल्पनेला मूलभूत आहे, हें तुमच्या ध्यानांत येईल. हें सर्व खरें, पण तूं कल्पनेनें नाखुष होतोस, हें शेवटीं ठरलेंच ! होय, पण तें तर मी आधींच कबूल केलें आहे. एकाद्या तत्त्वावर म्हणजे प्रस्तुत प्रसंगीं शुचितेच्या तत्त्वावर उभारलेल्या कल्पनेनें जर आचाराला वळण मिळत असलें, तर त्यांत गैर काय आहे ? निदान तसें सर्व काळीं व सर्व स्थलीं घडून येतें, एवढ्यावरूनसुद्धां त्याच्या ठिकाणीं कांहीं सामर्थ्य आहे असें नाहीं का निघत ? समजा, तुम्ही आगगाडींत बसलां आहांत; तुमच्या शेजारीं कांहीं महार मंडळी बसली आहे.

त्यांनीं आपले पदार्थ—मांसादि—काढून ते खावयास सुरुवात केली. त्यांची घाण तुम्हांस मुळींच येत नाहीं; पण दर्शनमात्र होत आहे. तुम्हांसही भूक लागली आहे. आतां अशा प्रसंगीं तुम्हीं आपला डबा काढून फराळ सुरू कराल का? वादासाठीं अथवा तत्त्वतः कांहीं हरकत नाहीं म्हणून 'हो, हो! सुरू करूं!' असें उत्तर वाटेल तर द्या. पण माझी अशी बळकट खात्री आहे कीं, तुम्ही तसें करणार नाहीं. कां? ते महार आपले पदार्थ तुमच्यांत टाकताहेत? नाहीं. ते तुमच्या मांडीला मांडी लावून घाण जवळ, अगदीं जवळ आणताहेत? नाहीं. मग कशांत अडतें? तुम्हांला एकाद्यानें 'खा' म्हणून सुचविलें, तर उलट तुम्ही म्हणाल, 'येथें नको. गलिच्छ, सगळी घाण आहे.' पण घाण आहे म्हणजे काय आहे? घाण तुम्हांला येऊन चिकटत नाहीं. मग ही घाण कोठली? ही घाण तुमच्या कल्पनेंतली. घाण प्रत्यक्ष यावयास नको; तुमच्या कल्पनेला शिवलेली तेवढी तुम्हांला पुरली! असें जर आहे, तर तुम्ही व मी फार दूर नाहीं. घाणीची कल्पना ज्या वेळीं अत्युग्र व दर्पयुक्त बनली, त्या वेळीं ती तुम्हांला प्रखर वाटली. पण माझ्या ठिकाणीं, इतकी उग्र नसतांनाच, तुमच्यांतल्यासारखें संवेदन तिनें चालू केलें. इतकाच फरक. तुम्हांला अत्यंत घनता पटते; मला अस्पष्ट छाया पटते. तव्यावर चिटकर खरखरविलें म्हणजे तुमच्या अंगावर शहारे येतात; माझ्या अंगावर, धान्य भरतांना जमिनीवर नख घासलें तरीसुद्धां येतात! एवढ्यासाठींच तुम्ही शहाणे व मी मूर्ख होय? तुमची संवेदनमर्यादा तीच सर्वांची व्हावी हा आग्रह कोठला? तर कल्पनेनें नाखुष होण्यांत मला विशेष चमत्कारिक कांहीं वाटत नाहीं. तुम्ही केवळ बौद्धिक युक्तिवादानें बोलतां आहां, हें मी जाणतों. मला प्रतिपादावयाचें तें हें कीं, केवळ बौद्धिक दृष्टीनें आपला आचार चालत नाहीं.

वर सांगितल्याप्रमाणें या शुचिर्भूतपणाची कुळी शोधण्याचा हा प्रयत्न केला आहे. तत्त्वतः त्याची खंबिरी किती आहे, हें पाहिलें आहे. आतां या शुचिर्भूतपणाचा जो अतिरेक सर्वत्र झालेला आढळतो, त्याचा पुरस्कार या समर्थनानें आम्ही करूं पहातों, असें प्रो. भाटे यांनीं मुळींच समजूं नये. समाहारी असणारे व त्या आहारावर बांधलेले सारखेच आचार आचरणारे पुरभय्यांसारखे लोक एकमेकांपासूनमुद्धां जेव्हां दूरदूर सरतात, तेव्हां ते या शुचिर्भूतपणाची केवळ थट्टाच करतात हें खरें आहे! पण हें शुचिर्भूतपणाचें प्रकरण केवळ 'कृत्रिम'च आहे, कीं त्याच्या बुडाशीं कांहीं मननीय गोष्टी आहेत, हें पहाण्याचा हा प्रयत्न आहे. एकादी गोष्ट हातीं धरून भरकटत सुटणें ही अज्ञानाला संवयच असते. हें भरकटणें मर्यादित करणें खरोखरच जरूर आहे. पण रा. भाट्यांचा रोंख ती गोष्टच अजीबात उपटून टाकण्याकडे आहे. त्या गोष्टींचें वैय्यर्थ्य आमच्या बुद्धीस पटेल, पण कल्पनेस पटणार नाहीं; आणि कल्पनेप्रमाणें आचरणें युक्त नाहीं असें तार्किकांना तर्कात वाटेल; सामाजिक माणसांना—सामान्यजनसमूहाला—आचरणांत बरें वाटणार नाहीं. समाज बुद्धिप्रस्थापित तत्त्वांवरच चालला पाहिजे, हा रा. भाट्यांचा आग्रह केवळ आग्रह आहे.

पुन्हा असें कीं, रा. भाटे यांनीं या अन्नविटाळाला 'समाजव्यवस्थेंतील दोष' असें जें नांव दिलें आहे, तें ठीक दिसत नाहीं. जातिभेद वगैरेंसंबंधानें असा शास्त्रीय शब्दप्रयोग केला तर जुळेल. पण अन्नविटाळासारख्या सामान्य गोष्टीला समाजव्यवस्थेच्या नियमाचें महत्त्व देणें विपरीत आहे. हा एक काल्पनिक बुन्हा आहे. त्याला इतकें महत्त्व द्यावयास नको आहे. हीच गोष्ट नंबर दोनचा मुद्दा चर्चितांना आपल्या लक्षांत अधिक चटकन भरेल.

तो मुद्दा असा कीं, अन्नविटाळ हा यद्यपि वाईट असला, तरी त्या-

पासून नुकसान कांहीं होतें कीं काय ? या दोषाची कुळी शोधणें आणि त्यापासून कांहीं नुकसान होतें कीं काय हें पाहणें, असें द्विविध काम आरंभींच आपण आंखून घेतलें होतें. त्यापैकीं पहिला कुळी शोधण्याचा मुद्दा झाला. आतां नुकसानासंबंधीं. रा. भाटे यांनीं हें नुकसान स्पष्ट शब्दांनीं कुठे सांगितलेलें नाहीं. परंतु एक पुरेसें सूचक वाक्य त्यांच्या लिहिण्यांत सांपडतें; आणि त्यावरून या नुकसानासंबंधीं कल्पना बांधावयाची आहे. तें वाक्य हें: " असल्या धर्मकल्पना जेथें रूढ आहेत, त्या समाजांतील व्यक्ति एकमेकांशीं तुटून वागणार. " या शब्दांवरून भाट्यांचें असें मत दिसतें कीं, हिंदुसमाजांतील व्यक्ति एकमेकांशीं एकी केव्हांही करणार नाहींत. त्या अलग अलगच रहाणार. म्हणजे कोणचेंही संघशक्तीनें करावयाचें काम, राष्ट्रकार्य साधण्याचें काम, हिंदूंच्या हातून होणार नाहीं. हा जर रा. भाट्यांच्या लिहिण्याचा अर्थ नसेल तर दुसरा कोणचा ? ' व्यक्ति एकमेकांशीं तुटून वागणार. ' या शब्दांच्या अर्थाचें पर्यवसान त्या शब्दसमुच्चयांतच होत नाहीं. ' तुटून तुटून वागणार ' म्हणजे काय ? या शब्दांतील सूचना दीर्घ आहे व वर निर्दिष्ट केलेला अर्थ आपल्या मनांत भरविल्यानंतर ती विराम पावते. सदर दोषापासून नुकसान काय होतें, हें दाखविण्याच्या हेतूनें हें वाक्य लिहिलेंसें दिसतें. असें नसेल तर या दोषांत अहितकारीपणा नाहीं असें निघतें, व अहितकारीपणा जर या दोषांत नसेल तर दोषदर्शनाचा खटाटोप—आणि तोही सर्वसाधारणसमाजापुढें—निरर्थक केल्याच्या आपत्तींत रा. भाटे येतील. तेव्हां वर सांगितलेला अर्थच त्यांच्या वाक्यांतून निर्विवाद निघतो. आतां असें पहावयाचें कीं, या अन्नविटाळाच्या दोषापासून काय काय अनर्थ संभवतात.

आमच्या सोंवळ्यानें अमुक अनर्थ ओढवले आहेत, असें दाखवून देणें कठिण आहे; एरवीं त्यापासून उद्भवणाऱ्या एक दोन अनर्थांची

नांवें सांगितल्यावांचून रा. भाटे पुढें जातेना. आमच्या घरांत सोंवळें जब्बर असलें, तर आमच्या घरांतील माणसें काय फुटून वागतात ? इतकेंच नव्हे, तर सोंवळ्याच्या अतिरेकाचें उदाहरण म्हणून घेतलेली भय्यांची गोष्टच जरी घेतली, तरी 'बारा परदेश्यांत तेरा चुली' असूनसुद्धां, परदेशी लोकांत एकमेकांशीं फटकून वागणें सरसहा चालू आहे, असें आम्हांस वाटत नाहीं. पहिला मुद्दा चर्चितांना पुढें आणलेलें कल्पनेचें प्रमाण क्षणभर बाजूस ठेवून, सोंवळें हें वाईट आहे, असें जरी पत्करलें, तरी त्यापासून मोठे अनर्थ ओढवतात, ही जी रा. भाट्यांची सूचना ती नेहमींच्या अनुभवावरून पटण्यासारखी नाहीं. या ठिकाणीं विधिनिषेधपर उत्तर देतां येण्यासारखें आहे. सोंवळें असूनसुद्धां एकी संभवते व तें नसूनसुद्धां एकी संभवत नाहीं, असें सहज दाखवून देतां येईल. पहिल्याचें उदाहरण म्हणजे आमचा पूर्व इतिहास व सध्यां आमचें इतरांशीं होणारें सहकारित्व, व दुसऱ्याचें उदाहरण म्हणजे सोंवळेंशून्य खालच्या जातींत होणारे तंटे, अथवा मुसलमानख्रिस्त्यांत चाललेली गळेकापी. आपल्याला नापसंत गोष्ट नापसंत इतकेंच म्हणून प्रो. भाटे थांबते तर बरें झालें असतें. प्रत्येक वाईट गोष्टीचा संबंध थेट राष्ट्रविचारापाशीं जाऊन पोहोंचलाच पाहिजे असा कांहीं नियम नाहीं. शिवाय या सोंवळ्याला समाज केव्हां व किती मानतो, हेंही प्रो. भाटे यांनीं ध्यानांत घ्यावयास पाहिजे होतें. या सोंवळ्याचा अंमल सदासर्वदा सारखाच करडा असतो काय ? आपण प्रवासांत काय करतों ! खाणावळींत काय करतों ? कॉलेजांतून बाहेर पडल्यावर पुन्हा घर सुरू झाल्यावर जे सोंवळें नेसतात ते क्लबांत असतांना काय करीत ? सदरील ठिकाणीं भांडणाचे प्रकार कितीसे दिसतात ? तुटून वागण्याची आणि फटकून वागण्याची सबब उगाच आहे. ए, बी, सी, करावयास लागलेले चार खालचे लोक आमच्या सोंवळ्यास दू-

षवूं लागले, तर तें त्यांच्या अल्प विद्येला शोभेसेंच आहे. शिक्षणानें मनुष्य अन्तर्मुख बनता तर काय न होतें ? आपल्या आहारांत आणि जे कोणी ' माझ्या अन्नाला शिवूं नको ' म्हणतात, त्यांच्या आहारांत खरोखरीच भयंकर फरक आहे, हें प्रामाणिकपणें लक्षांत घेणारा, आणि ' बुद्धिमत्तेशिवाय मनुष्यावर अंमल चालविणारी कल्पना नांवाची एक शक्ति आहे, ' इतपत कळण्यासारख्या दर्जाची ज्याच्या मनाला संस्कृति प्राप्त झाली आहे असा कोणीही महार, ' माझ्या अन्नाला शिवूं नको ' म्हटलें असतां अपमान वाटून घेणार नाहीं. स्पर्शास्पर्शासंबंधानें प्रो. भाटे यांचे व आमचे विचार अगदीं जमतात, पण अन्नस्पर्शासंबंधानेंमात्र त्यांचा आमचा मतभेद रहातो. जोंपर्यंत आम्हां उभयतांच्या आहारांतील फरक कायम आहे, तोंपर्यंत ही शिसारी वाटणारच. परदेशगमन केलें असतां काय कराल ? असा कोणीं प्रश्न केल्यास त्यास उत्तर म्हणून, आमचें सोंवळें डोईजड नाहीं, असें वर सुचवून ठेवलेलेंच आहे.

इत्यर्थ काय कीं, शुचिर्भूतपणा ' कृत्रिम ' आहे, म्हणजे केवळ कल्पनेंत राहणारा आहे, असें प्रो. भाटे यांचें मत आहे. आमची याला कबुली आहे; पण कल्पनेचें स्वामित्व स्वतःवर चालवून घेण्यांत कोणच्याही समाजाला जशी, तशी आम्हांलाही लाज वाटत नाहीं. ज्या कोणास ही कल्पना जिंकतां येईल ते चांगलेच; पण ज्यांना तसें करतां येत नाहीं, ते वाईट नाहींत. 'माझ्या अन्नाला शिवूं नको ' असे शब्द ऐकून इंग्रजी शिकलेल्या महारानें रागावूं नये; आहारांतील फरक पहावा. दुसरें, या सोंवळ्यानें राष्ट्रांत फुटाफूट रहाते, असा रा. भाट्यांचा सिद्धान्त. यावर म्हणणें इतकेंच कीं, वर्तमानाची आणि भूताची साक्ष याविरुद्ध आहे. पुढील मुद्दे पुढील लेखांत.

---

# पोंच व अभिप्राय.

१ बालबोध---वर्ष ३५ वें, अंक १ ला. कै० विनायक कोंडदेव ओक यांच्या शोकजनक मृत्यूनें पोरक्या झालेल्या या उपयुक्त मासिकाची पुढें काय वाट होते, इकडे अखिल महाराष्ट्राचें लक्ष लागून राहिलें होतें. त्याच्या संगोपनासंबंधानें ज्याला त्याला मोठी फिकीर वाटत होती. दोन महिन्यांपूर्वी निर्णयसागरच्या मालकांनीं योग्य संपादकाच्या अभावीं सदर मासिक बंद करण्याचा आपला विचारही जाहीर केला होता. तो विचार बाहेर पडल्याबरोबर आम्हांला फारच वाईट वाटलें.—तसें पुष्कळांना वाटलें असेल. पण ईश्वरी नेमानेम निराळा होता. त्या नेमानेमानें या मासिकाला नवीन 'घर' मिळालें, हें पाहून आम्हांस अत्यानंद होत आहे. नवीन संपादक रा. गजानन भास्कर वैद्य बी. ए. हे या मासिकाची कीर्ति व उपयुक्तता निदान कायम ठेवतील, अशी आम्हांस पूर्ण उमेद आहे. यांच्या संपादकत्वाखालीं निघालेला हा पहिला अंक पाहून एकदम कोणतेंही मत देणें अदूरदृष्टीचें होणार आहे; तरी हा अंक आमच्या उमेदीला पुष्टिच देणारा आहे असें आम्हांस वाटतें. या नवीन घरीं वागत असतांना 'बालबोधा' ला 'जुन्या घरची आठवण होईल, परंतु ती कमी होईल असें आम्ही करूं,' असें जें संपादकांनीं म्हटलें आहे, तें केवळ विनयमूलक ठरेल अशी आमची आशा आहे. 'मराठी भाषेच्या द्वारें आपल्या राष्ट्रांतील मुलांस अल्पायासें व अल्प खर्चानें ज्ञानप्राप्ति व्हावी, असें कांहीं तरी साधन असावें,' यासाठीं मूळ बालबोधाचा जन्म झाला. हेंच धोरण नव्या घरीं 'साधारणपणें' कायम ठेवण्याचा आपला हेतु संपादकांनीं या अंकांत नमूद केला आहे. आमच्या मतें यांत 'साधारणपणें' हा शब्द नसता, तर बरें झालें असतें. तरी आपले धोरणाची रूपरेखा जी संपादकांनीं पान १७ वर दिली आहे, ती पाहतां 'साधारणपणें' हा शब्दही विनयमूलकच

आहे, असें दिसतें. याचा निर्णय भविष्यकाळाच्याच पोटांत आहे. तूर्त आम्ही नवीन संपादकांना त्यांनीं हौसेनें हातीं घेतलेल्या त्यांच्या कामांत यश चिंतून पुरे करितों.

पण जातां जातां रा. वैद्यांना एकदोन सूचना केवळ प्रेमानें करा-व्यासें वाटतें. त्यांचा ते योग्य विचार करतील अशी आशा आहे. पहिली सूचना भाषेची. महाराष्ट्रांतील मुलांकरितां ज्ञानप्राप्तीचें साधन म्हणून जर बालबोध अवतरलें आहे, व तें तसें साधन रहावें, अशी जर रा. वैद्यांनीं आपली इच्छा या अंकांत प्रदर्शित केली आहे, तर बालबोधाची भाषाही कायम ठेवण्याचा शक्य तितका प्रयत्न झाला पाहिजे. बालबोधी भाषेला ' भेंड्यांची भाजी ' म्हणणारे म्हणोत, पण भेंड्यांची भाजी ही पथ्यकर व पौष्टिक आहे, व ज्यांच्या कोळ्यांत ती घालावयाची त्यांना ' घोळ ' चालणार नाहीं, हें विसरतां कामा नये. त्या दृष्टीनें प्रस्तुत अंका-तील भाषा तितकी चांगली नाहीं. बरेच शब्द अवजड पडले आहेत. शिवाय समासघटित शब्द न जोडणें, अशीं कांहीं अशुद्धें राहिलीं आहेत. या गोष्टीकडे लक्ष जाईल तर बरें.

दुसरी सूचना थिऑसफीची. ' थिऑसफीचे लेख यांत येणार कीं काय ? ' या लोकांच्या प्रश्नाला रा. वैद्यांनीं गुळमुळीत उत्तर दिलें आहे. तें ' नाहीं ' असें स्पष्ट उत्तर मिळणें श्रेयस्कर आहे. सामान्य धार्मिक लेख त्यांत यावे; पण थिऑसफी या संस्थेबद्दल अनेक कारणांनीं महारा-ष्ट्रांत सार्वत्रिक आदर नाहीं. पण बालबोधाबद्दल आहे. जर बालबोधाला पूर्वीच्या घरची खरोखरीच आठवण होण्याचा प्रसंग आणावयाचा नसेल, तर त्याचें पूर्वीचें धोरणच कायम ठेविलें पाहिजे. म्हणजे तें थिऑसफीचें ' मुख ' होतां कामा नये. नाहीं तर त्याचा विश्वासघात केल्याचें पातक-मात्र माथीं येईल. तें रा. वैद्यांनीं घेऊं नये, अशी आमची त्यांना विनंती

आहे. स्पष्ट लिहिल्याबद्दल रा. वैद्यांचा रोष होणार नाहीं, अशी आशा आम्ही बाळगतों.

---

२ भारतमुक्ताहार—आर्यसंस्कृति-परिचय-मालेंतील हें दुसरें पुष्प आहे. पहिलें पुष्प 'बालमनुस्मृति' यावर आम्ही मागें अनुकूल अभिप्राय दिलाच आहे. हें पुष्पही रा. वासुदेव दामोदर मुंडले यांनींच निर्मिलें असून 'साहित्यप्रकाशक मंडळी' नागपूर, हिनेंच तें प्रसिद्ध केलें आहे. आर्यसंस्कृतीचा तरुण पिढीला परिचय करून देऊन तिच्या अंगीं सदभिमान जागृत करणें, हा या मालेचा साधारण उद्देश आहे. व तो आम्हीं मनुस्मृतीवर अभिप्राय देतांना सविस्तर नमूद केलाच आहे. प्रस्तुत पुस्तकांत धर्म-तत्त्वज्ञान, नीति-व्यवहार, समाजानुशासन, स्त्रीधर्म, व संकीर्ण विषय या पांच मथळ्याखालीं महाभारतांतील तद्विषयक निवडक विचार दिले आहेत. ते वाचून आर्यांच्या प्राचीन संस्कृतीची तरुण पिढीला चांगली कल्पना येईल, अशी आमची खात्री आहे. भाषा चांगली व शुद्ध आहे. एकंदरींत पुस्तक सर्वांच्या हातीं जावें अशी आमची इच्छा आहे. पुस्तकाची किंमत ८६ जरी ठेविली आहे, तरी 'मालेचा हेतु सफल होण्याचा मार्ग विशेष सुलभ व्हावा, म्हणून प्रस्तुत पुस्तक केवळ ट. ख. पुरते पैसे घेऊन फुकट वांटण्याची योजना प्रकाशकांनीं केली आहे,' हें पाहून त्यांच्या औदार्याचें, खऱ्या स्वाभिमानाचें व ज्ञानप्रसाराच्या उत्कट इच्छेचें आम्ही सकौतुक अभिनंदन करितों. उत्तम पुस्तक फुकट देण्याची तयारी असतांही जे तें आणवून प्रकाशकांच्या हेतूचें चीज करणार नाहींत, त्यांना काय म्हणावें बरें !

---

# अमृताचे थेंब.

( स्वामी विवेकानंद यांचे उद्गार. )

स्पर्धेचा–अहमहमिकेचा–वरवंटा मोठा कठिण आहे. तो सगळ्यांची चटणी करून टाकतो. जर तुम्हांला वांचावयाचें असेल, तर कालमानाप्रमाणें तुम्हांला वागलें पाहिजे. आपल्याला जर जिवंत राहावयाचें असेल, तर भौतिक शास्त्रांत आपण आपलें राष्ट्र नेहमीं पुढें राहील, असें केलें पाहिजे. बुद्धिशक्तीचा प्रभाव फारच मोठा आहे. युरोपियन लोकांचें व्यवस्थाचातुर्य तुम्ही उचललें पाहिजे. तुम्हीं शिक्षण संपादन केलें पाहिजे व आपल्या स्त्रियांना शिक्षण दिलें पाहिजे. बालविवाह तुम्हांला बंद केला पाहिजे.

---

कृष्ण लुच्चा होता का ? अर्थात् नव्हता. भारतीय युद्ध होऊं नये म्हणून त्यानें शिकस्त केली. युद्धाचा पीळ कुंतीनें भरला. एकदां एकाद्या कामांत पडल्यावर मागें घेतां कामा नये;—असें करतो तोच खरा कर्तव्यपर मनुष्य ! पाय टाकल्यावर तो मागें घेऊं नका; तसें करणें हेंच भीरुत्व. कोणत्याही कामांत एकदां तुम्ही पडलां, कीं तें तुम्हीं पार पाडलेंच पाहिजे. तिळमात्रही मागें सरूं नका;—अर्थात् चांगल्या कामांत ! भारतीय युद्ध हें न्यायमूलक होतें.

---

मिळकतीचा खर्च करतांना गृहस्थानें पुढील नियम पाळावा: उत्पन्नाचा चतुर्थांश कुटुंबाकरितां खर्च करावा; चतुर्थांश दानधर्माकडे द्यावा; चतुर्थांश शिलक ठेवावा; चतुर्थांश स्वतांकरितां खर्चावा.

---

नुसत्या कारणाचें अस्तित्व नाकबूल करून कसें चालेल ? जर

कारण नाकारावयाचें, तर कार्यही नाकारलें पाहिजे. जें जें कार्यांत असतें, तें तें कारणांत असलेंच पाहिजे.

---

ख्रिस्तानें लोककल्याणाचें कार्य फक्त अठरा महिने केलें; पण तेवढ्याकरितां बत्तीस वर्षें त्याची गुपचिप तयारी चालली होती. चाळीस वर्षांनंतर महंमद जगापुढें आला.

---

आध्यात्मिक भांडार जर संभाळावयाचें असेल, तर कामवासनेच्या तोंडांत लगाम घाला.

---

विकार हा मोठा पटाईत बहुरूपी आहे. पुष्कळ वेळा तो मोठीं मोहक रूपें घेतो. क्रोध न्यायाच्या मिषानें येतो. काम कर्तव्याचें पांघरूण घेतो. पहिल्यापहिल्यानें माणसाला त्याची ओळख पटते; पण पुढें मनुष्य तन्मय होतो. याला उदाहरण वकिलाच्या अंतःकरणाचें देतां येईल. धंद्यांतला बदमाषपणा पहिल्यानें त्याला दिसतो; पण अशिलाकरितां कर्तव्य म्हणून तो सर्व लबाड्या करितो. पण पुढें होतां होतां त्याच्या अंतःकरणाला धर्माधर्माचा विचारच शिवत नाहीं. म्हातारपण झालें म्हणजे आपण परमार्थाकडे वळूं, असा विचार करून आज ( तरुणपणीं ) स्वस्थ चैनींत बसूं नका. कारण, म्हातारपणीं तुमच्या मनाची लय परमेश्वराकडे लागणार नाहीं. परमेश्वरचिंतन करण्याचें सामर्थ्य मनाचे ठिकाणीं तरुणपणींच—मन जेव्हां जोमांत असतें, दुबळें झालेलें नसतें—तेव्हांच—वाढत जातें.

---

आपण सृष्टीचे गुलाम आहों. परमेश्वर तिचा धनी आहे. तिचे कायदे आपल्याला बाधक होतात, त्याला होत नाहींत. कर्तुमकर्तुं सामर्थ्य त्याचे ठिकाणीं असल्यामुळें तो तिला आपल्या इच्छेनुरूप खेळवितो.

---

# केरळकोकिळ.

वर्ष ४ थें.] जून १९१५. [अंक १२ वा.

## सरिद्वायन !

५
२८२८६

पद–( चाल–बघुनि त्या भयंकर भूता. )

१

" लघुरूपें कंदरकुहरीं निर्जन या गहनीं विपिनीं । ध्रु० ॥
बहु दूर वसें मी जरि त्या गर्जत्या निर्धीपासोनी ॥
तरि वाटे येई त्याचें स्फुंदन हें माझे कानीं ।
वाहतो गमे तो मातें ताररवें आक्रंदोनी ॥
हृदय हें जणों कीं भासे वाहतें सागरा तैसें ।
'मं मं मा' ध्वनि काढोनी मातेस बाळ तें जैसें ॥
आस हीच चित्तीं वागे तज्जलीं आजि पहुडोनी ।
भुजवलयीं निद्रा घ्यावी हृदयावरि शिर ठेवोनी ॥ १ ॥

२

झांकुनी कान हे दोन्ही जरि घेत्यें डोळे मिटुनी ।
गंभीर गर्जना त्याची तरि येई ऐकूं कानीं ॥
क्रोधराशि लहरी त्याच्या धावुनी पूर्ण खवळोनी ।
आदळतां वप्रप्रांतीं दिसती त्या मजलागोनी ॥
धवलित हा फेन तयाचा शोभतो मुकुट रजताचा ।

२

चक्राकृति विहरे गगनीं संघ हा मुदा क्रौंचांचा ॥
मंद मंद सुखकर वाहे मारुत मधु मंथरगतिनीं ।
नृत्य या तयासह करिती दिसती मज नौकारमणी " ॥२॥

३

परिसिलें न जों हें ऐसें सरितेचें मंजुल गाणें ।
तळमळूं जीव हा लागे चित्तेंही त्यजिलें ठाणें ॥
हृदयातें भरतें आलें बाष्पपूर वाहे नयनीं ।
प्रस्फुरे अधरही तैसा गहिंवरे कंठ दाटोनी ॥
उत्कंठित मन होवोनी प्रेमाब्धिकृष्णसंस्मरणीं ।
जाहलें लीन रंगोनी रसनाही रमली गानीं ॥
कधिं करुणासिंधो ! बंधो ! दर्शन वा ! निज देवोनी ।
करिशील दीन दासाला वद रे ! वद ! धन्य निदानीं ॥ ३ ॥

४

चपलचित्तचकोरा माझ्या चारुचंद्र तूं वा असशी ।
कधिंच तें तुजकडे गेलें मधुरसुधा प्राशायासी ॥
जीर्ण हें सदन मी त्यजुनी कधिं येइन तुझिया भवनीं ।
मृदु तुझ्या हृदयपर्यंकीं सुखशयन आपुलें करुनी ॥
कल्याणी सुखदा भद्रा घेईन शांत मी निद्रा ।
श्रीकृष्णा मोहकमुद्रा ! हे मधुरा प्रेमसमुद्रा ॥
परि विनति, न बुडवीं मजला वाटे कीं सखया ! स्वमनीं-।
शर्करा न होतां स्वांगें सेवावी मोदें हंसुनी ॥ ४ ॥

—अनंततनय.

# स्त्री-पुरुष-शिक्षण.

## लेखांक ११.

लेखक—एम्.

"I am a very firm believer in the new woman, but the only new woman in whom I believe is she who adds new qualities to, and does not try to substitute them for, the primal, the fundamental, virtues of the 'old' woman-she who was the wife, the mother, the sweatheart, the sister of the past."

"No career is so useful and honorable, nor needs such selfsacrifice and wisdom as the career of a good and wise mother."

"The best career for the man is to be the breadwinner for his wife and children; let his career outside this be an addition to it and not a substitute for it."

Theodere Roosevelt.

---

१ 'मला आजकालची सुधारलेली स्त्री पाहिजे; परंतु ती आमच्या जुन्या पुरतकाळी स्त्रियांचे गुण फेंकून देऊन केवळ नव्या ढंगांनीं चालणारी असेल तर नको; तर 'भोज्येषु माता, शयनेषु रंभा, कार्येषु मंत्री, वचनेषु दासी,' इत्यादि स्पृहणीय गुणांनीं युक्त ज्या पुरातन स्त्रिया त्यांचे सर्व गुण अंगीं वागवून त्यांत अधिक भर घालणारी असेल तर पाहिजे.'

"भली व शहाणी माता होणें याहून स्त्रीत्वाचें अधिक चीज कोणत्याही गोष्टींत नाहीं. पण या गोष्टीला फारच शहाणपण व स्वसुखत्याग लागतो."

'पुरुषाचें सार्थक म्हणजे दारापुत्रांचें भरण करणें. हें त्यानें योग्य प्रकारें प्रथम साधून, मग अन्य काय साधणें तें साधावें." थिओडोर रूजवेल्ट.

किंग्स्ले या विद्वानाचें असें म्हणणें आहे कीं, सरकारांत ज्याप्रमाणें कोणाही मनुष्याला कसल्याही अधिकारावर नेमावयाचें तर तो त्या अधिकारास पात्र आहे कीं नाहीं, याची प्रथम परीक्षा घेऊन पसंती पटल्यास त्याला तो अधिकार देतात; त्याचप्रमाणें समाजांतही कोणा पुरुषाला (-स्त्रीला) पितृ(-मातृ)-पदवीवर आरूढ होण्याची पात्रता अंगीं आली न आली याबद्दलची खात्री करून घेतल्याशिवाय तो अधिकार दिला जाऊं नये. किंग्स्लेचें हें म्हणणें ऐकतांच कित्येकांस हंसूं येईल. कित्येकांस नवल वाटेल. कित्येकांस रागही येईल. ते म्हणतील, सत्तेच्या स्त्रीशीं एकान्त करण्याला किंवा मुलें होण्यालादेखील पसंत्या आणि परवानग्या मागणारे हे विलायती शहाणे दीर्घच म्हटले पाहिजेत. परंतु हे श्रोते जर पहिला लोंढा वाहून गेल्यावर सदर विद्वानाचे उक्तीचा संथपणें विचार करतील, तर ती सर्वथा न्याय्य व सदिच्छाप्रेरित आहे, असें त्यांचा आत्माराम त्यांस सांगितल्यावांचून रहाणार नाहीं, हें खास. आम्हांला तर असें वाटतें कीं, कोणात्याही समाजांत किंवा एकूण मानवी जातींतही 'दुःख पर्वताएवढें' या वचनाचा जो पुष्कळदां प्रत्यय येतो, याचें कारण त्या समाजांतील किंवा एकूण मानवजातींतील अनेक स्त्री-पुरुषांचा अविचार हेंच होय. सामान्यतः शोध करून पाहील त्याला असें कबूल करावें लागेल कीं, आजकाल समाजांत जे कोणी विपद्ग्रस्त प्राणी आढळतात, त्यांपैकीं किती तरी जणांचे विपत्तीचें बीज त्यांचे स्वतःचे किंवा त्यांचे जनक स्त्री-पुरुषांचे अविचारांत किंवा अपात्रतेंत आहे. वैद्यशास्त्रावरील आमचे पुराणग्रंथ किंवा त्याहूनही अलीकडील पाश्चात्त्य वैद्यकग्रंथ यांतील 'निदान' प्रकरणें वाचलीं असतां लोकांत प्रसृत असलेले किती तरी 'दुर्धर' रोग हे आनुवंशिक कारणांनीं उद्भवलेले म्हणजे पूर्वपूर्वजांचे किंवा मातापितरांचे अंगचे किंवा दुर्वर्तनाचे दोषांमुळें

पुढील पिढीचे अंगांत शिरलेले असतात. अर्थात् मागील पिढ्यांतील स्त्री-पुरुष जर सद्वृत्त व विवेकसंपन्न असती तर त्यांचे संततीला आजच्या-प्रमाणें हे रोग त्रास देतेना. परंतु मनुष्यप्राणी एक वेळ पशूपेक्षांही अधिक उच्छृंखल वृत्तीनें, किंबहुना केवळ विकारवशतेनेंच वागतात, व त्या वर्त-नाचा परिणाम पुढील कित्येक पिढ्यांना सव्याज भोगावा लागतो. कारण डॉक्टर लोकांचा अनुभव असा आहे कीं, आगंतुक रोगांपेक्षां hereditary म्हणजे आनुवंशिक व congenital म्हणजे सहजात रोग अत्यंत दुश्चिकित्स्य असतात. आमचे धर्मशास्त्राकारांची दृष्टि या गोष्टीकडे गेली होती, व त्यांनीं असल्या दोषांनीं युक्त असलेल्या स्त्री-पुरुषांनीं विवाह करूं नये किंवा असलीं स्त्री-पुरुषें निवडूं नये असें सुचविलें आहे; पण धर्मशास्त्राला मानितो कोण ?

धर्मशास्त्राप्रमाणेंच वैद्यशास्त्रही या बाबतींत ओरड करितें, व शिवाय रोगी नसलीं तरी अपक्वबीज अशीं अल्पवयी स्त्रीपुरुषें यांनीं किंवा अतिवृद्ध स्त्रीपुरुष यांनीं संतति निर्माण करूं नये असें सांगतें. कारण, असली संतति हीनतेज निपजते. परंतु ह्या गोष्टीकडे लक्ष देऊन चालणारीं जोडपीं कितीशीं आहेत ? आमच्यांत तर मुलीला चुटपुटतें रजोदर्शन झालें नाहीं, तोंच ' मुक्या ' नातवाचे नांवानें आगाऊ साखरा वांटल्या जातात, व पहिले सोळा दिवसांतच एकदां संस्कार उरकून घ्या असें म्हणून वडील माणसांकडून कोण उचल होते ! आणि अविचारी तरुण जोडप्या-सही ती इष्टच वाटत असल्यानें दूरवर दृष्टि कोणीच देत नाहीं. वास्तविक पहातां ऋतुदर्शन म्हणजे तारुण्याचा परिपाक नसून केवळ ओनामा

.1 In hereditary syphilis disorders of the bones and eyes are very common. Epilepsy is sometimes the result.

Cyclopedia of P. C.

आहे. त्यानें इतकेंच सुचविलें कीं, कौमार्य किंवा शिशुत्व संपलें. परंतु अपत्यनिर्माणाला शरीराची योग्यावस्था, निदान शास्त्रसंमत अवस्था, येण्याला ऋतुदर्शनानंतर कमींत कमी तीन वर्षे तरी गेलीं पाहिजेत. कोणी म्हणतील, पहिल्याच पाळीवर गर्भधारणा झाल्याचीं शेंकडों उदाहरणें जर सांपडतात, तर अंगीं पात्रता आली नाहीं, असें कसें म्हणतां येईल ? तर, यावर उत्तर एखाद्या कुशल बागवानाला विचारावें, म्हणजे तो सांगेल कीं, पहिल्या मोसमाला जरी कित्येक वृक्षांना फळें येणें शक्य दिसलें, तरी भावी फळांचे चांगुलपणासाठीं 'तूर्तदाना'चा सर्व मोह एकीकडे ठेवून त्या झाडाचा मोहर किंवा फुलोरा मुद्दाम खुडून टाकावा लागतो. अर्थात् पहिल्याच ऋतूला गर्भ शक्य असला, तरी शास्त्रतः इष्ट नाहीं. आणि सहज प्रवृत्तीची सबब पशूंना, मनुष्यांना नाहीं. मनुष्य हा चर्मचक्षु नसून 'शास्त्रचक्षु' आहे–निदान असला पाहिजे, या म्हणण्यांतलें रहस्य हेंच आहे. शिवाय, कांवळेपणांत देहधर्मानें मूल झालें, तरी तें कांहींसें बुद्धीनें अपक्व असतें, या म्हणण्याला बळकटी लोकांत पहिल्या किंवा वडील मुलाला 'दादा' म्हणून जें निंदागर्भ विशेषण देण्याची चाल आहे तींतही अंशतः सांपडते. पुष्कळदां आपण असें पहातों कीं, भावंडांत पुढले पुढले नंबर अधिक चुणचुणीत असतात. त्याचें कारण ते दंपत्याचे शास्त्रमान्य अवस्थेंत पैदा झालेले असतात.

---

1. "Although a girl may menstruate at the age of fifteen, it does not follow that she is then fit to bear children, as her whole frame is as yet immature, and the bones of the pelvis are not properly developed till after twenty. The best age for childbearing is between twenty-three and thirty-five." Marriage and Motherhood.

By Davidson M. B.

आईबाप होणाऱ्यांनीं ध्यानांत वागविण्याजोगी तिसरी गोष्ट म्हणजे आपली सांपत्तिक स्थिति. आपण जे प्राणी निर्माण करणार त्यांचे भरण-पोषणाची आगाऊ तरतूद किंवा खातरी असल्याशिवाय संततीचे भरीं पडल्यामुळें आपल्या भावी संततीला विपत्तींत टाकणारे किती तरी आईबाप या सृष्टींत आढळतात. कोणी म्हणतील कीं, वार-माधुकरीवर वाढलेलीं मुलेंच सुखवस्तु मुलांपेक्षा अधिक उदयास येतात, मग दरिद्री आईबापांना अविचारी कां म्हणावें ? तर,—एक तर दारिद्र्यांजनामुळें विशद दृष्टि प्राप्त झालेले जरी कित्येक लोक आढळतात, तरी त्यावरून दरिद्री तेवढे उदयशील असा अबाध नियम बांधतां येत नाहीं. शिवाय, दारिद्र्यामुळें उदयास आलेल्यांची संख्या जी सांपडेल तिजहून दारिद्र्यामुळें जागचे जागींच म्हणजे गुडघाभर पाण्यांतच रहावें लागलेल्यांची संख्या अधिकच सांपडेल, हें खास. यासाठीं मातृपितृपदाचा अभिलाष बाळगणारांनीं प्रथम स्वास्थ्य पैदा केलें पाहिजे; नाहीं तर संततिरूपानें " जगा घालावें सांकडें, दीन होऊनी बापुडें । हेंचि अभाग्य रोकडें, मूळ आणी विश्वासा ॥ " या आरोपास तीं पात्र होतील.

या लोकांनीं संपादण्याची चवथी अवश्य गोष्ट म्हणजे स्वतःचा मनोजय किंवा वृत्तिस्वाम्य. या मनोजयाची जरूरी मातृपितृदशेंत तर आहेच आहे, पण तत्पूर्वी म्हणजे पतिपत्नीदशेंत अधिकच आहे. कारण, आईबापांचे अनावर वृत्तींचा दुष्परिणाम पुढें संततीवर तर होतोच होतो, याचीं वैद्यकग्रंथांत किती तरी उदाहरणें आढळतात. पण ही गोष्ट पुढली. अगोदर त्यांचें पतिपत्नीत्व परस्परसुखकारक होण्यालाच ह्या वृत्तिजयाची अत्यंत अपेक्षा असते, आणि तो नसल्यामुळें किती तरी दंपत्यें उघड नसलीं तरी अंतर्यामीं खिन्न असतात. आणि जेथें सवड असेल तेथें हा संबंध

नसावा अशी इच्छा किंवा तजवीजही करितात. पण तीं असें ध्यानांत घेत नाहींत कीं, सुख पाहिजे त्यांनीं परस्परांचे स्वभावांचे मेळ घालून घेतले पाहिजेत. नित्यक्रियेंत एकानें आपली लहर एकीकडे ठेवून दुसऱ्याचे मर्जीनें चालण्याचें पत्करिलें पाहिजे. त्याचप्रमाणें आपण प्रथम केलें काय, आपणांस चौघें काय म्हणतील, आपले मुलबाळांची अशानें कशी स्थिति होईल, इत्यादि विचारांनीं आपापले उच्छृंखल वृत्तींस आळा घातला पाहिजे. हें आपलें आतां कर्तव्यच आहे, आणि कर्तव्य करणें कितीही कडु असलें, तरी त्यांतच आनंद आहे, ह्या गोष्टी तीं विसरतात; व केवळ वृत्तीचे मेळ पडत नाहींत असें म्हणून दूर होतात व सुखाचे शोधांत अन्यत्र भटकतात. पण त्यांचें पाप त्यांजपाशींच आहे हें स्मरत नाहींत. आमचेकडे जरी अजून काडी मोडून नवें घर धुंडण्याची सोय झाली नाहीं, तरी स्वभावांचे मेळ नसल्यानें असुखी असणारीं दंपत्यें थोडीं नाहींत. उघड ज्वाळा न दिसली तरी गोंवरी अखंड धुमसतांना ध्यानांत येते. याकरितां पति किंवा पत्नी यांपैकीं कोणताही भाग ज्याचे वांट्यास येणार त्यानें वृत्तिजय करण्याचा धडा प्रथम वळविला पाहिजे. त्यांनीं हें ध्यानांत घेतलें पाहिजे कीं, अक्षरांत-

---

1. "They cannot be reconciled. They conclude that happiness for them is impossible and, therefore, the marriage should be dissolved. That happiness comes in mutual adjustment, in daily selfdenials one for the other, in the surrender of one's own idiosyncrasies and in respect for the idiosyncrasies of one's mate; that they owe any duty to society, or duty to their children; or, in fact, that there is any such experience as duty and any joy in performing it, does not enter their shallow minds. They seperate and begin a new quest for happiness in the same spirit of self-indulgence and selfwill." Rev. Dr. Lyman Abbott.

देखील संधि करणें म्हणजे दोन्ही शब्दांना, निदान एकाला तरी आपलें रूप बदलावें लागतें. रसायनांत दोन पदार्थ (हळद+चुना) यांना एकजीव होणें तर आपले अंगचा रंग एकीकडे ठेवण्यास तयार व्हावें लागतें. मग दोन मनुष्यप्राणीच या नियमास अपवाद कसे होतील? अर्थात् दंपत्यास सुख पाहिजे तर परस्परवृत्तींचा मिलाफ करून घेतलाच पाहिजे. दंपत्यपण ज्यांना सुखानें नांदवितां आलें, त्यांना मातृपितृपणासाठीं निराळें व्रत नको. मनोजयाची उपयुक्तता व महती आयुष्यांतील सर्व नात्यांत व सर्व प्रसंगीं आहे. म्हणून मुलांमुलींचे शिक्षणांतील अनेक विषयांत या विषयाला अगदीं पहिली जागा दिली पाहिजे; पण तिजकडे बरेंचसें दुर्लक्ष दिसतें व त्यामुळें पुष्कळ असुख पैदा होतें. जपानी लोकांचे शिक्षणांत ही बाब प्रधान[1] आहे, व त्यांचे राष्ट्रीय अभ्युदयाला हेंच शिक्षण मुख्य कारण आहे, असें आमचें मत आहे. आणि हें शिक्षण ज्या स्त्रीपुरुषांना मिळालें तीं कोणत्याही स्थितींत सुखी होतील. असली स्त्री मुलगी असो, बायको होवो, आई होवो, बहीण होवो, जाऊ होवो, सवत होवो, मालकीण होवो, सून होवो, या सर्व अवस्थांत ती सुरळीत वागूं शकेल व त्या त्या अवस्थेला उचित अशीं सर्व कर्में मोठ्या प्रेमानें व आनंदानें, निदान बिनतक्रार तरी करील. तोच न्याय पुरुषाला. यासाठीं स्त्रीपुरुषांना पतिपत्नी किंवा मातापिता होणें तर त्यांचे अंगीं वृत्तिस्वाम्य असलें पाहिजे.

अखेर किंवा सर्वांआधीं, कसेंही म्हणा, दंपत्याचे ठिकाणीं आस्ति-

---

1. "Japanese boys and girls behave as quietly and with as much composure as grown up men and women. From the first moment that it can understand anything, a Japanese baby is taught to control its feelings."

'Japan' (Peeps at Many Land).

क्यबुद्धि व ईशभक्ति पाहिजे; त्याशिवाय संसार सुखावह होणार नाहीं. मुलांचे शिक्षणांतही ही गोष्ट प्राधान्यानें आली पाहिजे. प्रसिद्ध ड्यूक ऑफ वेलिंग्टन म्हणाले, 'तुम्ही मुलांना असलें एकतर्फी शिक्षण द्याल, तर तीं हुशार होतील, पण पिशाचें होतील, देवमाणसें होणार नाहींत.' वाटर्लूच्या विजयी योद्ध्याचा हा बोध सर्वांनीं ध्यानांत ठेवण्याजोगा आहे. आपल्या भगवद्गीतेचा अखेरचा श्लोकही हेंच सांगतो. पार्थ हा धनुर्धर अप्रतिम खरा; पण त्याला विजयश्रीनें माळ घातली याचें कारण त्याला श्रीकृष्णाचें ऊर्फ **भगवंताचें** पाठबळ. याचप्रमाणें व्यावहारिक शिक्षणानें मनुष्य कितीही हुशार झाला, तरी त्याला यश, उत्कर्ष व समाधान हीं भगवत्कृपेवांचून प्राप्त होणें कठिण. यास्तव आस्तिक्यबुद्धि हेंही एक स्त्रीपुरुषांचे ठिकाणीं अवश्य लक्षण पाहिजे.

सारांश, पतिपत्नी व त्याहूनही अधिक मातृ-पितृ या पदांचा अधिकार ज्यांना संपादणें त्यांचे ठिकाणीं १. निर्व्यसनिता, २. शरीरदार्ढ्य, ३. स्वास्थ्य, ४. मनोजय व ५. आस्तिक्यबुद्धि या पांच गोष्टी अगत्य पाहिजेत.

आमच्यांत मातापितरांना एक बहुमानाचें विशेषण किंवा उपपद देतात. त्याचें सखोलपण जर प्रत्येक स्त्रीपुरुष ध्यानांत वागवील, तर तेवढ्या एका शब्दानेंच येथवरील सर्व उपदेशाची कामगिरी होईल. मातापितरांना आमच्यांत '**तीर्थरूप**' हें विशेषण लावितात. या एका शब्दांत

---

1. "If you are only going to educate your children you are only going to make clever devils of them! He recognised the need of something to change the heart before the education could be safe and of the highest value."

W. I. Mosier (The Purity Advocate.)

२. यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः ।
तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवा नीतिर्मतिर्मम ॥ –श्रीमद्भगवद्गीता.

किती कल्पना भरल्या आहेत पहा! 'तीर्थ' शब्द उच्चारितांच प्रत्येक हिंदूचे–आर्यांचे–मनापुढें अत्यंत पवित्रतेचें व पूज्यतेचें चित्र उभें राहतें. अर्थात् ही पदवी सार्थ करणारांचें वर्तन अंतर्बाह्य गंगाजळाप्रमाणें शुद्ध पाहिजे. अर्थात्च शरीराला अपाय करणारीं व्यसनें व क्रोधादि मनोमल यांपासून तीं निर्मुक्त असलीं पाहिजेत; व आपल्या वर्तनानें ते पूजनीय झाले पाहिजेत. म्हणजे त्यांचे अंगीं उत्तम पात्रता पाहिजे. दुसरी 'तीर्थ' या शब्दांतील कल्पना तारकत्वाची. 'तीर्थ' हा शब्द 'तॄ=तरणें' या धातूवरून साधला असल्यामुळें त्याचा अर्थ 'तारणारें किंवा उद्धार करणारें,' असा होतो. अर्थात् 'तीर्थरूप' पदवी घेणारांचें श्रेष्ठ कर्तव्य म्हणजे आपले अपत्यांचें तारण म्हणजे उद्धार करणें हें आहे. अर्थात् केवळ वासनातृप्त्यर्थ अविचारानें संतति उत्पन्न करून तिला दारिद्र्यादिक लौकिकी व दौर्बल्यादि शारीरिक विपत्तींत पाडणारे स्त्री-पुरुषांना हें उच्चपद शोभणार नाहीं. तें पद बाळगणारांनीं आपल्या संततीला या संकटमय व्यवहारांतून क्षेमरूपानें पार पडण्यास समर्थ केलें पाहिजे; तरच ते तीर्थरूप. आणि हें पार पडण्याचें सामर्थ्य लौकिकी व पारमार्थिक ज्ञान त्यांस पुरापूर दिल्याशिवाय साधणें नाहीं. म्हणून हीं दोन्ही ज्ञानें अपत्यांस अवश्य देण्याची पात्रता पितरांचे ठायीं पाहिजे. 'तीर्थ' या शब्दांतील आणखी एक गर्भित कल्पना म्हणजे 'जीवनाची'! तीर्थ आहे तेवढें जीवनमय आहे (जलमय आहे). अर्थात् तीर्थाचे ठिकाणीं ज्याप्रमाणें निर्मळ जीवनाची प्राप्ति, त्याप्रमाणें 'तीर्थ' पदवी घेणारांपासून त्यांचें अपत्यांला निर्मळ जीवन (उपजीविका किंवा तिचें साधन) मिळालें पाहिजे हें उघड आहे. स्त्री-पुरुषांनीं या एका तीर्थरूप पदाचें महत्त्व ध्यानीं बाळगून जर आपला वर्तनक्रम ठेविला, तर त्यांत सर्व कांहीं आलें; एवढा हा शब्द गंभीर आहे. पण याचे खोलींत शिरणारे कितीसे?

एतावता स्त्री होवो, पुरुष होवो; वरील पांच गोष्टी प्राप्त होतील अशा प्रकारें तिचें अगर त्याचें शिक्षण झालें पाहिजे. तें आतां कसें मिळावें याचा विचार यापुढें कर्तव्य.

वरील बाबतींत पहिलें कलम म्हणजे 'निर्व्यसनिता.' ही मुलांस शिकविणें तर आईबापांनीं अंगीं स्वत: ती पाळली पाहिजे, व शिवाय मुलांना सोबतीसंगतीपासून व्यसन लागण्याचा रंग दिसल्यास त्यांस कांहीं दाबानें व कांहीं उपदेशानें परावृत्त केलें पाहिजे. 'आम्ही करतों तें करतों, पण तूं करूं नको!' असें मुलांस सांगणारे आईबाप आहेत, पण अशांचे शब्द परिणामकारक होत नाहींत. कारण उघडच आहे. 'व्यसन' म्हणजे केवळ गांजा, दारू, अफू इ. समजूं नये. नसत्या उचापती करणें, न बोलवितां परगृहीं जाणें, कोणीं न पुसतां मात सांगणें, इ. इ. वर्तनांतील अनेक गैर गोष्टी यांचा या कलमांतच आम्ही अंतर्भाव कारितों, असें समजावें; व यांपासून संततीस दूर ठेवण्याविषयीं पालकांनीं जपावें. हें शिक्षण अगदीं लहानपणापासून पाहिजे. कांहीं आईबापें लाड म्हणून मुलांना घरचें व बाजारचें खाऊ आणून देणें, चहापाणी देणें इत्यादि गोष्टी कारितात; पण त्या पुढें संवयीच होऊन अत्यंत घात कारितात. कारितां वेळींच जपावें.[1]

---

1. Most parents allow their children in swaddling clothes to indulge in a diet only suitable for adult age. Do they not konw that condiments, animal food, coffee early arouse the slumbering passions of the young? These articles of diet at once impart undue warmth to the blood and awaken early sexual desires in their children, leading boys to acquire the arts of the libertine and rendering girls susceptible to the amorous advances of the opposite sex. Thus from one parental error spring up on one side a post of

शिक्षणाची दुसरी बाब म्हणजे, मुलांचें शरीर जेणेंकरून निरोगी व दृढ होईल असें शारीरिक शिक्षण त्यांस देणें. यापैकीं निरोगीपणाला कसरत, व्यायाम इत्यादि गोष्टींपेक्षांही आहारविहारांत नेमस्तपणा, निद्रादिकांत नियमितपणा, दुष्ट संवयींपासून अलिप्तपणा, सुविचारांचा समागम, वृत्तीचा आनंदीपणा या गोष्टी मुलांकडून अंमलांत आणविणें अति अगत्याचें आहे. वृत्तीचे आनंदीपणाचा प्रकृतीवर फारच इष्ट परिणाम होतो. आणि उलट पक्षीं क्रोध, द्वेष, असूया, अविश्वास, संशयीपणा यांनीं रोग उत्पन्न होतात, असा डॉक्टरांचा अनुभव आहे. करितां मुलें निरोगी व्हावीं तर त्यांना आनंदी वृत्तीचें महत्त्व कळवून दिलें पाहिजे.

दुसरी गोष्ट म्हणजे अनेक प्रकारचे व्यायाम, कसरती, खेळ यांचे योगानें शरीरशक्ति वाढविणें व शरीर सुदृढ करणें ही होय. ह्या गोष्टीचें महत्त्व गावें तितकें थोडेंच आहे. या मालेच्या एका लेखांत आम्हीं दाखविलें आहे कीं, महाराष्ट्रांतील विभूति म्हणून मनोरंजनांत शेंसवाशें पुरुषांची यादी दिली आहे. पण ह्यांत सत्तरीचें घर गांठणारे दहादेखील नाहींत. यावरूनच आमचे चालू पिढीचें शारीरिक दौर्बल्य स्पष्ट होणार आहे. या दौर्बल्याला अनेक कारणें आहेत, हें खरेंच; तथापि शरीरकमावणीचे कामीं असणारी आमची अनास्था हेंच मुख्य कारण आहे. इंग्रज लोक या शिक्षणाला फार महत्त्व देतात व म्हातारपणींदेखील पोरांप्रमाणें खेळ खेळतात. आमच्यांत हें करणें पोरकट समजतात. पण हें दुर्दैव म्हटलें

---

amative libertines and on the other, scores of voluptuous women,-who are required by custom to abstain from legal marriage until they have nearly passed their teens.

Dr. Foote's Home Cyclopedia. P. 218.

1. Anger, jealousy, envy, distrust all tend to induce nervous diseases. Ibid. P. 308.

पाहिजे. ॲरिस्टाटल म्हणे कीं, ' शिक्षणाचे विषयांत पहिला विषय तालीम किंवा कसरत हा पाहिजे. ' तें सर्वथा बरोबर आहे. पण आम्ही हें विसरलों आहों. शाळांतून व्यायामाच्या कांहीं सोई केल्या आहेत हें खरें; पण एक तर सर्वांवर सक्ती नाहीं व दुसरें मुलांस अभ्यासाचा चेप इतका असतो कीं त्यांना तो व्यायाम धड सुचत नाहीं व अंगीं लागत नाहीं. सरकारनें अलीकडे शाळाखात्यांत बरीच सुधारणा केली आहे; तथापि मुलांचे डोकीवरील निरर्थक विषयांचा बोजा कमी केला नाहीं, ही गोष्ट मोठ्या खेदाची आहे. भावी पिढीचें खरें कल्याण व्हावें असें इच्छिणारांनीं या कामीं यत्न केला पाहिजे,–निदान हीं परीक्षांची कातर तरी कमी केली पाहिजे.

असो. मुलांचे कामीं जरी शारीरिक शिक्षणाची वाढ पाहिजे आहे, हें खरें, तथापि त्यांना त्या कामीं थोड्याबहुत तरी सवलती आहेत. निदान मुलगा आपण होऊन कसरत, मेहनत करूं लागला, तर कोणी त्याला हंसत तरी नाहीं. परंतु मुलींची स्थिति याहूनही शोचनीय आहे. आमच्या विशिष्ट आचारविचारांमुळें मुलींचें शारीरिक शिक्षण ही एक अगत्याची बाब आहे, हें आमच्या ध्यानांतही येत नाहीं. किंबहुना, कोणी असें बोलल्यास आम्ही त्याचा उपहासदेखील करूं इतकें त्याचें बोलणें आम्हांस तऱ्हेवाईक वाटतें. आम्ही लगेच विचारितों कीं, पोरींना शारीरिक शिक्षण! चमत्कारच! त्यांना कुठे कुस्ती मारावयाची आहे, कीं कुठे लढाईवर जायचें आहे? त्यांना हो शारीरिकशिक्षण कसलें बोलतां? आजपर्यंत कधीं कुठे ऐकिलें आहे का? होय, आजपर्यंत ऐकलें नाहीं; पण याचीं कारणें निराळीं होतीं. पूर्वीची रहाणी व परिस्थिति निराळी होती. त्यामुळें दोन पिढ्यांमागील स्त्रिया घरधंदा करण्यापलीकडे कांहीं यत्न न करितांच आजकालचे पुरुषांपेक्षांही अधिक सशक्त होत्या, हें कोणाच्याही ध्यानांत

असेल. अर्थात्च सहजप्राप्त जी गोष्ट आहे, तेथें प्रयत्न कशाला? परंतु सद्यःस्थिति फार बदलली आहे. पूर्वी आजच्या इतकी अन्नचिंता तीव्र नव्हती. पूर्वी हल्लींप्रमाणें शरीराला अपाय करणारीं चहा, आइस इत्यादि पेयें, नाटकी खेळांसारखीं निद्रानाश करून अनारोग्य आणणारीं मनोरंजनें, हीं वायकांना ठाऊक नव्हतीं. पूर्वी एकत्र कुटुंबें असल्यानें मुलींवर संसाराचा भार—म्हणजे जबाबदारी (कामकाज नव्हे)—दोन चार मुलें होत तों पडत नसे. आतां जिथे तिथे मियाबिबी हाच मासला झाल्यामुळें व हनीमूनबरोबरच संसाराची माळ गळ्यांत आल्यानें अल्पवयांतच मुलींवर संसाराचें ओझें येऊन पडतें. याशिवाय पूर्वींचे स्त्रियांना आजकालचे मुलींच्याप्रमाणें मेंदूचें व तद्द्वारा शरीराचें भूस पाडणारें उदार शिक्षण नसे. त्यामुळेंही त्यांचीं शरीरें अमोड वाढत. तसेंच पूर्वी मुंबईसारख्या शहरांत व तेथील टीचभर खोल्यांत आयुष्य काढण्याचे प्रसंग नसत. खेड्यापाड्यांतील खुल्या घरांत व मोकळ्या हवेंत मुलगेमुली वाढल्यानें त्यांचीं शरीरें सहजच वाढत. पूर्वी मुलींस वाचनलेखनही यथातथाच होतें, निदान अकालीं विकारजागृति करणारीं कादंबर्यादि मनोरंजनें नव्हतीं, यामुळें त्यांचीं शरीरें कालक्रमाप्रमाणें यथास्थित वाढत. शिवाय दहांचे कुटुंबांत घरकामही पुष्कळ पडे व ह्यामुळें शरीरास सहजींच व्यायाम होऊन शरीर आयतें सुदृढ होई. पण हल्लींच्या मनूंत ह्या शरीराला स्वाभाविक शक्ति व आरोग्य देणाऱ्या सर्वच गोष्टी बदलल्या. तेव्हां नूतन परिस्थितीप्रमाणें आपणही बदललें पाहिजे.

---

1. Reading of this sort ( erotic and exciting novels ) has a truly pernicious influence upon the physical development and nervous system of young girls, and every effort should be made to keep them rather in the open air and engage in active play. Physical Cyclopedia P. 2504.

कारण या सृष्टींत प्रकृति ( Nature ) व कृति ( Art ) या दोहोंचा खेळ आहे. प्रकृति म्हणजे सहज स्वभावच जेथें इष्टार्थ घडवून आणीत असेल तेथें कृतीची अपेक्षा नाहीं. सहज बसल्या ठिकाणीं जर मंद-सुगंध मलयानिलाची झुळूक अंगावर येऊन आनंदवीत आहे, तर मग मुद्दाम पाणी शिंपलेला वाळ्याचा पंखा हलवीत बसण्याचे श्रम कोण करील ? आणि केल्यास, त्याला हंसतील. परंतु उकाड्यानें जीव चालला आहे आणि हवा साफ बंद आहे, तर पंखा घेणें भागच आहे; निदान उपहासास्पद तरी नाहीं, हें उघड आहे.

प्रकृतीची उणीव कृतीनें भरून काढणें हा मनुष्याला उपजत छंदच दिसतो. किंबहुना हीच गोष्ट मनुष्यत्वाचें लक्षण किंवा मनुष्य प्राण्याची व्याख्या म्हणून मानण्यालादेखील हरकत नाहीं. कारण, इतर सर्व प्राण्यांपेक्षां मनुष्यप्राण्यानें या बाबतींत फारच कमाल केली आहे; व हीमुळें कधीं कधीं तो आपणाला प्रतिसृष्टिकर्ता म्हणवून घेण्यासही कमी करीत नाहीं. आणि तें ठीकच आहे. ख्रिस्ती शास्त्रांत मनुष्य म्हणजे ' ईश्वरानें निर्माण केलेली स्वतःची प्रतिमा ' असा उल्लेख आहे, आणि तो शोभे अशी मनुष्याचे अंगीं करामतही दिसते व उमेदही आहे. तर त्यानें आपल्या ह्या बहुमानाची सार्थकता करण्यास झटणें यांत त्यास कमीपणा आणणारें कांहीं नाहीं. तेव्हां इतर बाबतींत जसें प्रकृतीचें उणेपण कृतीनें पुरें करणें हें त्याचें कर्तव्य आहे, त्याचप्रमाणें शरीराचे बाबतींतही कां नसावें ? अलबत, असलेंच पाहिजे. आणि म्हणूनच आजकाल जर आमचे मुलांमुलींचीं शरीरें सहजीं दृढ व श्रमक्षम नसतील, तर आम्हांस तीं कृतीनें तशीं बनविलीं पाहिजेत. आम्ही असें न करूं तर, ' येथें कोणाचें काय गेलें ? ज्याचें त्यानें अहित केलें. ' असें म्हणण्याची पाळी येईल. ही टाळणें तर आम्हीं कृत्रिम उपाय योजिलेच पाहिजेत.

कोणी म्हणतील कीं, मुलींना शीतळ सावलींत जन्म काढावयाचा; त्यांना कुठे टकरा घ्यावयाच्या आहेत, म्हणून त्यांना दृढ शरीरें तयार करण्यास सांगतां?--तर आम्ही म्हणतों कीं, टकरा घेणाऱ्या पुरुषजातीपेक्षांही स्त्रीजातीला निरोगी व सुदृढ शरीराची अधिक अपेक्षा आहे. स्त्रिया ह्या आमच्या माता म्हणा, गृहिणी म्हणा, मोहिनी म्हणा, कोणत्यांही दृष्टीनें पाहिलें, तरी त्यांचीं शरीरें सुदृढ, जोमदार व रसपूर्ण असणें जरूर आहे. कारण माता ही भूमि आहे, क्षेत्र आहे; आणि अनुभव असा आहे कीं, पिकाचा जोमदारपणा बीजापेक्षांही क्षेत्राच्या किंवा भूमीच्या कसदारपणावर अधिक अवलंबून असतो. प्रदर्शनांतून कधीं कधीं फळांमुळांचे विशाळ वाढीचे नमुने आपण पहातों. या वस्तूंचें बीज निराळें असतें असें नव्हे, तर त्यांना क्षेत्र विशेष पौष्टिक मिळाल्यामुळें त्या इतक्या पोसल्या असतात. यावरून बीजापेक्षांही क्षेत्राचा कसदारपणा फळाचे प्रौढतेला अधिक अवश्य आहे. हाच नियम मानवी बीजालाही लागू आहे. मनुष्यें सशक्त पाहिजेत, तर मूळ स्त्रिया-मुली-जोमदार पाहिजेत. आमचे संस्कृतांत जननीला 'मातृ' (मा-माते-a measurer) हा शब्द आहे. यांतच ही गोष्ट स्पष्ट आहे. कारण, मातृ शब्दाचा अर्थ मापन करणारी, अर्थात् आई हें मुलाचे वाढीचें मापच आहे. आईचा कुसवा जसा असेल, तसें मूल पोसेल. मुलें

1. "No race can be healthier than its girls; for the girls become the mothers of sons as well as daughters. So anything that tends to weaken the girl, tends to demoralise the race. Let the new slogan go forth: Physical culture for girls, even more than for boys. If I had a family of girls, I would spend more time in seeing that they gained health and strength than I would over boys."

Macfadden, E. P. C. P. 596.

मोठीं थोराड पाहिजेत, तर त्यांच्या 'माता' तशा असल्या पाहिजेत. अर्थात् माता या दृष्टीनें स्त्रियांस सशक्त व सुदृढ काठीची अवश्यकता आहे.

आतां गृहिणी या दृष्टीनें पाहिलें तरीही तसेंच. कारण, सामान्य स्थितींतले कुटुंबांतील ( आणि अशांचीच संख्या फार ) गृहिणी म्हणजे हरदास-बोवांचें कंठाळी घोडेंच. आमचे शास्त्रकारांनीं ' भोज्येषु माता, शयनेषु रंभा, कार्येषु मंत्री, वचनेषु दासी, कर्मानुकूला, क्षमया धरित्री ' या स्तोत्रानें तिजवर हें षाड्गुण्य लादून तिचें मोठें गौरव केलें खरें; पण हें गौरव ऐकायला जितकें चांगलें आहे, तितकेंच तें वागवावयास अवघड आहे. इतके पोटें एकाच जीवानें आणि तेही उत्तम रीतीनें करणें सोपें नव्हे. आणि ते करणें तर शरीरही दमदारच पाहिजे.

तिसरी बाजू मोहिनीत्वाची. पुरुषही सुंदर असतात; तथापि पुरातन कालापासून सौंदर्य किंवा मोहकपणा ही स्त्रीजातीची विशिष्ट मत्ता मानिली जाते; आणि तिला कांहीं स्वाभाविक कारणें आहेत. सृष्टिकर्त्याचीही या बाबतींत तिकडे अधिक मदत दिसते. तथापि येथेंही प्रकृतीला कृतीची भर लागते. जन्मत: केवळ रेखींव नाकडोळे व सुंदर कांति इत्यादि असूनही जर शरीर दुर्बल असेल, तर त्या रूपाचा उठाव दिसत नाहीं, व त्याची छाप प्रेक्षकावर बसत नाहीं. त्यापेक्षां सामान्य प्रतीचे नाकडोळे असूनही बांधा भरदार, अंगप्रत्यंग परिपुष्ट व त्वचेवर शक्तीची चमक इत्यादि असेल, तर तें रूप डोळयांत अधिक भरतें. कधीं कधीं डोईओझें वाहणाऱ्या गरिबांच्या बायांत एकादे बाईचे मुखावर सशक्ततेची अशी कांहीं विलक्षण रवणूक दिसते, कीं तिची ती तजेलदार मुखश्री प्रेक्षकाला ओढतेच; आणि तिच्यापुढें मोठ्या महालांतून रुजाम्यांवरून चालणाऱ्या रेखींव

I. ' For the average housewife, these burdens are such as to demand the most perfect physical condition.'
Ibid. P. 594.

पुतळ्याच हीनवर्ण दिसतात. आणि हें बरोबरच; कारण पूर्ण आरोग्या-शिवाय खरें सौंदर्य नाहीं. एतावता स्त्रीजातीला आपलें मोहिनीत्व जर कायम ठेवणें, तर शरीर जोमदार ठेवण्याकडे लक्ष असलेंच पाहिजे. स्त्रियांना आमचे वाङ्मयांत 'प्रमदा' असें विशेषण दिलेलें आढळतें. प्रकृष्टः मदः यस्याः म्हणजे 'जिची मस्ती शिगेस आली आहे,' असा शब्दार्थ होतो. तरी त्यांतील 'मद' पदाचा झोंक शरीराचे रगदारीकडे फारसा दिसत नाहीं. खरोखर तो तसा मानीत आले असते, तर फार बरें झालें असतें. परंतु काव्यांत, नाटकांत व अन्यत्र संस्कृतवाङ्मयांत पहावें तों 'भीरु' 'अबला' 'ललना' इत्यादि विशेषणेंच फार प्रेमानें वापरलेलीं दिसतात; व सतत हींच विशेषणें कानीं पडत राहिल्यानें त्यांचा स्त्रीजातीवरही असा कांहीं विलक्षण परिणाम झाला कीं, त्या जाती-ला 'भित्रेपणा' हें एक भूषणच वाटूं लागलें. हा प्रकार मोठा घातक झाला. शालीनता निराळी आणि भीरुता निराळी. पहिला गुण आहे, दुसरा दोष आहे. परंतु हा दोषच गुणपदवीला चढल्यानें आमचें फार नुकसान झालें आहे. कारण आयांची ही भीरुता पुष्कळदां मुलांना भों-वते. आई म्हणते बाळा 'रात्रीचा ओसरीवर नको रे जाऊं.' मग अशा आयांचीं पोरें धीट कशीं व्हावीं ? हा अनिष्ट प्रकार मोडला पाहिजे. व हा मोडणें तर प्रथमतः स्त्रियांस सशक्त व घट्ट शरीरें प्राप्त करून देण्याची तजवीज झाली पाहिजे. कारण, शरीरांत धमक असली म्हणजे भीरुता सहजच कमी होते.

स्त्रियांचे उन्नतीसाठीं व दुःखहरणाप्रीत्यर्थ आजकाल अनेक दिशांनीं प्रयत्न होत आहेत. स्त्रियांना पुरुषांचे बरोबरीनें सर्वज्ञान देण्या-

---

1. "Beauty is the expression of a vigorous and harmonious condition of the entire body." Ibid P. 996.

चीही जारी खटपट चालू आहे, परंतु सर्व उन्नतीला व ज्ञानसंग्रहाला आधारभूत जें शरीर त्याचे कामीं कोणीं कळकळीची चळवळ केलेली आढळत नाहीं. स्त्रियांचें मनरंजन करणारीं पुस्तकें, मासिकें अनेक आहेत. तथापि त्यांच्या शरीरस्थितीची फिकीर करणारीं व तत्संबंधें स्त्रीवर्गांत जागृति करणारीं पुस्तकें कोठें आढळत नाहींत. फिमेल हायस्कूलसारख्या संस्थेंत मुलींना व्यायामाचीं जरी कांहीं साधनें उपलब्ध आहेत, हें खरें, तरी या विषयासंबंधानें सार्वजनिक आस्था उत्पन्न झालेली आढळत नाहीं. अलीकडे प्रत्येक बाप मुलाप्रमाणेंच मुलीला शाळेंत पाठवूं लागला आहे. म्हणजे तिचे बौद्धिक शिक्षणाविषयीं त्याला अगत्य वाटूं लागलें आहे. परंतु शरीराचे दिशेला उदासीनताच आहे. हें बरें नव्हे. कारण चतुर्विध पुरुषार्थाचें साधन शरीर, तें जर अदृढ व भंगुर स्थितींत, तर "मूले कुठारः" असाच प्रकार होणार. करितां आमचे मतें अपत्यकल्याणेच्छु (आणि असा कोण नसेल?) प्रत्येक बापानें मुलींच्या मानसिक उन्नती-आधीं शारीरिक उन्नतीकडे लक्ष पोंचविलें पाहिजे. त्याचप्रमाणें मुलींचे आप्त, इष्ट, बंधु, स्नेही, हितेच्छु वगैरे सर्व मंडळींनीं या गोष्टीचें महत्त्व त्यांचे मनांत भरून दिलें पाहिजे. आणि हा विषय इतका दृढमूल झाला पाहिजे कीं, पिढीजाद संस्कारानें ज्याप्रमाणें प्रत्येक मुलीला कळूं लागलें कीं 'माझें लग्न होईल, मला मुलें होतील, मीं संसार करीन,' वगैरे स्वप्नें पडूं लागतात, त्याप्रमाणेंच सहासात वर्षांची होतांच तिला आपणाला शरीर कमाविलें पाहिजे, आपली प्रकृति पुरुषांप्रमाणें दणदणीत करीन अशीं उत्कट स्वप्नें पडूं लागलीं पाहिजेत. कारण आधीं मन तयार होईल तेव्हां पुढें शरीर तयार होईल. याकरितां सर्व मुलींचे मनांत या कल्पनेचा संचार होईल, असा यत्न झाला पाहिजे. नुसतें हें तत्त्व दृढरूढ झालें तरी पुष्कळ कामगिरी होईल. कारण, काटकसरीचें तत्त्व ज्याचे मनांत बिंबलें तो मनुष्य जसा ज्या त्या बाबतींत दमडीपासून जपू

लागतो, किंवा ज्ञानार्जनाचें महत्त्व ज्याच्या हृदयांत ठसलें, तो जेथें तेथें ज्ञानकण वेंचूं लागतो, त्याचप्रमाणें हें वारें मुलींचे चित्तांत वावरूं लागलें, म्हणजे देहाची प्रत्येक हालचाल त्या या दृष्टीनें करूं लागतील, व त्यानेंच केवढा तरी फायदा होईल. व्यवहारांतील किती तरी गोष्टींचें प्रियाप्रियत्व व कुशल परिणामित्व मनाचे समजुतीवर अवलंबून असतें, याचा अनुभव प्रत्येकास आहे. आमचे घरीं विहिरीला पंप आहे व शेजारीं पन्नाससाठ घागरींचा हौद आहे. हा हौद नळ नसेल. तेव्हां केव्हां केव्हां भरावा लागतो. घरांत दोन उमेदवार मुलगे आहेत, त्यांपैकीं एकाला शरीराचा शोक आहे व व्यायामाचें महत्त्व पूर्ण कळलें आहे. दुसऱ्याची गोष्ट जवळ जवळ उलट आहे. याचा परिणाम असा होतो कीं, पहिला मुलगा हौद रिता दिसतांच न सांगतां आपण होऊन तो भरून काढतो. कारण, त्याचे मनानें घेतलें आहे कीं, पाणी लाटल्यानें आपले दंड, छाती भरतील. दुसऱ्याला ही दृष्टि नसल्यानें हौद भरण्यास सांगितलें, तरी तो कंटाळा करितो. ह्या दोघांचे वर्तनांतलि तफावतीला हेतु केवळ इतकाच कीं, एकाला तत्त्वदृष्टि आली आणि दुसऱ्याला ती नाहीं. ग्लॅडस्टनसारख्याला लांकूडतोड्याचें काम करण्यांत कमीपणा न वाटण्यांतलें रहस्य हेंच आहे. जोर किंवा दंड काढल्यानें आपले दंड भरतात, असें ज्याचे मनानें घेतलें, तो सूर्याला नमस्कार घालूं लागला, तरी दंडाचे वळणावर घालतो. सारांश, मनुष्याचा हा स्वभावच आहे कीं, जें तत्त्व त्याचे मनानें दृढ घेतलें, तें त्याच्या प्रत्येक क्रियेंत अनायासें उमटूं लागतें. याप्रमाणेंच मुलींचे मनांत शारीरिक व्यायामाचें महत्त्व एकदां ठसलें, म्हणजे त्यांची प्रत्येक हालचाल त्या दृष्टीनें प्रेरित होऊं लागेल. त्यांचा आळस कमी होईल. स्वस्थ बसण्याची प्रवृत्ति कमी होऊन कामधंद्याविषयीं प्रेम वाढेल. शरीराला कसें जपावें हें कळूं लागेल. व केलेल्या कृतीचा फायदा दृष्टीस पडूं लागला, म्हणजे

मनुष्य ती उत्तरोत्तर अधिकाधिक करूं लागतो. अर्थात् त्याचें शारीरिक प्रेम उत्तरोत्तर दृढावत जाईल. यासाठीं या कामीं सार्वजनिक जागृति पाहिजे.

येथवर शिक्षण विषयांतील मूळ जें शरीरशिक्षण त्याचें स्त्रीजनासही अगत्य आहे, हें दाखविलें; आतां त्याचें विशिष्ट स्वरूप व त्यापुढें मानसिक व बौद्धिक शिक्षणाची मर्यादा व स्वरूप हीं सांगून ही लेखमाला पुरी होईल.

---

# जग नव्हे, राक्षसांचा बाजार!

लेखकः—नारायण सिताराम फडके, बी. ए.

संध्याकाळ म्हणजे किती रमणीय वेळ! त्यांतून पौर्णिमा असल्यामुळें, एकीकडे अस्तास जाणारा लाल तप्तलोहगोलाप्रमाणें दिसणारा सूर्य, आणि दुसरीकडे उदयास येणारा लालच परंतु गुलाबी झांक असणारा चंद्राचा वाटोळा मुखचंद्र हे दोन्ही एकदम दृष्टीस पडत असल्यामुळें सृष्टिदेवतेचें सौंदर्य खुलून दिसत होतें. हे दोन सृष्टीचे नेत्र तर नव्हत, अशी शंका एखाद्या सहृदय कवीला आल्यास नवल नाहीं. अशा वेळीं पुण्याच्या बाहेर, चतुःशृंगीच्या रानांतील झोंपड्यांतून लहान मुलें खेळतबागडत होतीं. वामनराव तुळपुळ्यांची झोंपडी लहानच होती. बिचारे मोठी झोंपडी बांधणार कोठून? पगार सारा चाळीस रुपये मिळणार, त्यांत सारा संसार हांकलून मोठी झोंपडी उभारण्यासाठीं शेंदोनशें रुपये आणणार कुठले! कुटुंब कांहीं लहान नव्हतें. त्यांची आई, बायको, एक लहान मुलगा आणि लग्नाला झालेली मुलगी, इतकीं माणसें त्यांच्या कुटुंबांत होतीं. परंतु गरिबीचे दिवस कसे तरी काढायाचे. त्यांतून प्लेगोबा आले. परंतु वामनराव करतात काय? झोंपडीचा खर्च टाळून गांवांत राहावेंसें

त्यांना वाटे; परंतु पुन्हा लोकगंगेच्या भीतीस्तव झोंपडीवर गेल्याशिवाय इलाज नाहीं, ही गोष्ट त्यांच्या मनांत येई. म्हणूनच ते झोंपडींत रहावयास आले होते. तेथें पाण्याची गैरसोय, खाण्यापिण्याची, निजण्याबसण्याची, सगळ्याचीच आबाळ होई. परंतु कुरकुर न करतां दिवस ढकलण्याचा वामनरावांनीं निश्चय केला होता; आणि त्यांच्या कुटुंबांतील सर्व माणसेंही संतोषानें आणि आनंदवृत्तीनें राहत असत.

असो. रोजच्याप्रमाणें आज संध्याकाळींही वेणू आणि केशव (वामनरावांचीं मुलें) झोंपडीच्या पुढील बाजूस बापाची वाट पहात व सभोंवतालची मौज पहात आनंदांत बसलीं होतीं. वामनराव रोज सातांच्या आंत घरीं येत असत. आज सात वाजून गेले तरी ते आले नाहींत. केशव पुन्हा पुन्हा आपल्या बहिणीला विचारी, 'ताई, अजून बापू कसे ग नाहीं आले? गांवांत इतक्या उशीरपर्यंत राहूं नये असे तेच नाहींत का ग म्हणत?'

वेणूच्याही मनाला जरा तळमळच लागली होती. मन मोठें वाईट असतें. अशा वेळीं वाईट गोष्टी तेवढ्या मनांत कशा झटकन येतात. साऱ्या भयंकर कल्पना तेवढ्या डोळ्यांपुढें एकदम उभ्या राहतात. झोंपडींतील आंतल्या बाजूसही वामनरावांची आई सत्यभामाबाई पुन्हा पुन्हा सुनेला म्हणे: 'आज अजून ग कसा बापू नाहीं आला?'

मनाला सारखी काळजी लागली असतांही म्हातारीला धीर देण्याकरतां रमाबाई (वामनरावांची बायको) म्हणे 'आत्तां येणें होईल. मंडईबिडईत जायचें असेल. अजून कांहीं फार नाहीं झाला उशीर.' इतक्यांत बाहेर वामनराव आले; आणि धाकटा केशव घरांत धांवत येऊन आजीला म्हणाला, 'आजी, आले ग बापू, आले ते बघ.'

बाप आल्याचा आनंद केशवास झाला खरा, परंतु, बिचाऱ्याचा बाप कोणत्या स्थितींत आला होता, हें त्याला काय समजणार! बाहेर उभी

असलेल्या वेणूस वामनराव म्हणाले, ' वेणूताई माझा हात धर ग. मला बघ घेरी आल्यासारखें होत आहे.'

हें ऐकून वेणूच्या पोटांत धस्स झालें. ' घेरी ' हा शब्द ऐकल्या-बरोबर चुलीशीं असलेली रमाबाई धांवतच बाहेर आली. पाहते तों वेणूच्या आधारानें वामनराव कसे तरी येत आहेत. रमाबाईला पाहून वामनराव म्हणाले ' आधीं अंथरूण घाला. माझ्याच्यानें नाहीं उभें राहवत.'

रमाबाईची कंबरच खचली. तिच्यानें उभेंच राहवेना. आकाशांतील ढगांप्रमाणें तिच्या मनांत अनंत विचार एका क्षणांत येऊन गेले तिनें झटकन अंथरुण उलगडलें. तें पाहून म्हातारी वेड्यासारखी पाहूं लागली. इतक्यांत वामनराव वेणूच्या अंगावर भार टाकून आंत आलेले पाहून तर ती इकडे तिकडे पाहूं लागली. ' कायग रमा, अंथरुण कोणाला ? बापू, काय झालें रे ? रमा, बोल काय झालें ?'

रमाबाई काय बोलणार ? आपले उत्कट विकार हृदयांत अगदीं दाबून ठेवलेले असले, आणि अशा वेळीं जर एखाद्यानें मोठ्या कळकळीनें आणि सहानुभूतीनें आपणांस ' काय झालें ? ' म्हणून विचारलें तर जो हुंदका, उमाळा येतो, तोमात्र अनावर असतो. रमाबाईची एकदम अशीच स्थिति झाली. अगदीं रडक्या आवाजानें ' येतांच सांगितलें मला पसरायला अंथ-रुण ' असें म्हणून तिनें अश्रूंनीं डवडवलेल्या नेत्रांनीं वामनरावांकडे पाहिलें. वामनराव एकदम अंथरुणावर येऊन पडले. म्हातारी उशाशीं येऊन बसली. रमाबाई पायाशीं उभी राहिली. केशव तिच्या कंबरेला विळखा घालून बापाकडे कावराबावरा पाहूं लागला. वेणूही शेजारींच उभी राहिली. सत्यभामाबाईनीं विचारलें,—

' काय रे बाबा, काय झालें ? सांग लवकर. '

थोडा वेळ दम खाऊन वामनराव म्हणाले, 'आई अशी घाबरतेस काय ग? दुसरें कांहीं नाहीं. आज कचेरींतच चार वाजतां थंडी वाजून ताप आला. घरीं येणार होतों, परंतु साहेबानें सोडलें नाहीं. उलट आज ज्यास्त काममात्र दिलें. त्यामुळें मीं अगदीं गळलों. घाबरूं नकोस.'

म्हातारी म्हणते, 'जळ्ळा मेला साहेब! तूं सोडून कां नाहींस देत ती कचेरी? मेल्यांनो, जिवाला बरें नाहीं अन् काम कसलें त्यांच्या टांग्याचें!'

तिला बिचारीला काय ठाऊक कीं, या जगांत माणसें अशीं फार थोडीं आहेत! ती पुन्हा म्हणते,'बरें पण, आतां कसें आहे?' असें बोलून तिनें वामनरावांच्या अंगाला हात लावून पाहिला. बघते तो अंग नुसतें फणफणलें होतें. 'अग बाई! रमा काय ग हें? तूं बघ बरें!' असें म्हणून म्हातारी लेंकाकडे पाहूं लागली. वामनरावांनीं ताप आलेला लपविण्याचा प्रयत्न केला. पण ती गोष्ट आतां कळली हें पाहतांच त्यांनाही अगदीं रडूं कोसळलें. रमाबाई तर वेड्यासारखीच अंगाला हात लावून बसली; तिच्यानें उठवेना, किंवा बोलवेना. परंतु असें स्वस्थ राहून कसें चालणार?

'कांहीं खायला, नाहीं तर प्यायला देऊं का?' असें तिनें वामनरावांस विचारलें. 'दूध दे' असें वामनरावांनीं म्हटलें. परंतु घरात दूध होतें कोठें? आणि दूध आणायला तरी कोण जाणार? लग्नाला झालेली मुलगी, मोठी दिसत असलेली, म्हणून सत्यभामाबाई वेणूला बाहेर जाऊं देत नसत. लोकांना भ्यावें तितकें थोडेंच. परंतु या वेळीं वेणू आईला विचारून भांडें घेऊन बाहेर पडली. झोंपडीपासून बऱ्याच अंतरावर एके ठिकाणीं दूध मिळत असे. वेणू जवळ जवळ धांवतच तिकडे गेली. गवळ्याच्या झोंपड्यापाशीं जाते तों दाराशींच दोन विधवा बायका तिला भेटल्या. वेणूला पाहून एकमेकींत कुत्सितपणें हंसावयास त्या विसरल्या नाहींत. वेणूनें गवळ्यापाशीं अच्छेर दूध मागितलें. त्याच्यापाशीं शेर

दीडशेर दूध होतें. इतक्यांत त्या दोन बायकांनीं दोन शेर दूध मागितलें. गवळ्यानें लागलीच आंत जाऊन भांड्यांत पाणी घालून दुधाची मागणी पुरी केली. वेणूला बिचारीला काय माहीत, कीं आपल्या आजारी पित्याला आपण दूध नव्हे पाणी नेत आहों! गवळ्याला कांहीं तरी हृदय असेल, जगांत माणसें राहत असतील, अशी तिची मुग्ध समजूत होती. परंतु आपण दिलेलें दूध लोकांना अपायकारक झालें तर त्याची जबाबदारी आपल्या शिरावर आहे, इतकें कळण्याइतकें गवळ्याचें मन समंजस कोठलें असावयाला?

वेणू दूध घेऊन धांवत घरीं आली. आपण जाईपर्यंत बापूंचें काय होईल असा विचार तेवढ्या वेळांत तिच्या मनांत कितीदां तरी आला. ती घरीं आली तेव्हां वामनरावांची प्रकृति ज्यास्तच बिघडली होती. त्यांनीं थोडेंसे दूध कसेंबसें घेतलें. परंतु दूध वाईट असल्यामुळें त्यांना लगेच ओकायला झालें. रमाबाईंनें आल्याचा रस वगैरे दिला. डोकें दुखतें असें वामनराव म्हणाले, म्हणून सत्यभामाबाई डोकें चोळूं लागली. मध्यंतरीं रमाबाईनें केशवाला जेवूं घालून निजविलें. सत्यभामाबाई डोकें चोळीत होत्या. वामनरावांचा डोळा लागला होता. इतक्यांत एकदम वामनरावांनीं 'हाय!' असें केलें, आणि त्यांनीं आईचा हात धरून ठेवला. 'आई ग! नको चोळूंस ग! तूं चोळलेंस तों माझ्या मानेशीं डाव्या बाजूला दुखलें!'

'दुखलें' हा शब्द ऐकल्याबरोबर रमाबाईच्या हृदयाचा थरकांपच झाला. प्लेगचे दिवस, ताप आलेला, आणि 'दुखतें' हीं अक्षरें! आतां-मात्र तिनें अगदीं धीर सोडला. वामनरावांकडे पहात तिनें दीर्घ निश्वास टाकला. सासूकडे जाऊन तिनें हलकेच हुंदका दाबून म्हटलें, 'काय करूं हो आतां मी! काय हा आपल्यावर प्रसंग देवा! वेणे, एखाद्या डाक्त-

रला आण बाई बोलावून. मला बाई सुचत नाहीं कांहीं. सासूबाई आतां आपलें कसें होणार ? देवा, नकोरे बाबा ! वेणे, कोणत्या डाक्तरला आणशील बाई ? शेजारच्या बापटांच्या ओळखीचे आहेत वाटतें ते डोंगरे डाक्तर, त्यांना तरी विचार. नाहीं तर सासूबाई, तुम्हीच जाल तर त्यांना थोडी भीड वाटेल. '

सत्यभामाबाईचें डोकें जागेवर होतें कोठें ! वामनरावांनीं ' दुखलें ' म्हटल्याबरोबरच त्यांच्या डोक्यांत घाव बसल्यासारखी त्यांना चक्कर आली. काय करूं आणि काय नाहीं असें त्यांना होऊन गेलें. कोठें उडून जाऊं आणि धन्वंतरीची मात्रा मिळवून माझ्या मुलाला बरा करूं, अशी त्यांची स्थिति झाली. पोटचा मुलगा, कुटुंबाचा एकटा आधार, त्याच्यावर घाला पडला म्हणजे आकाशच कोसळलें. मग माझी सून, माझीं पोरकीं नातबंडें—नको रे देवा असले विचार ! बापू बराच होईल मुळीं. काय माझ्या वेडीच्या मनांत घाणेरड्या कल्पना येतात. अशा मनःस्थितींत असतांना रमाबाईनें सत्यभामाबाईस जाण्याविषयीं पुन्हा सूचना केली. तेव्हांमात्र आपल्या विचारांतून म्हातारी दचकून जागी झाली. बापटांच्या घरीं जाण्यास तिनें क्षणाचाही विलंब केला नाहीं. बापटांचें जेवण होऊन ते पान खात बसले होते. म्हातारीनें रडत रडतच सारी हकीकत सांगितली. तिचे अश्रुप्रवाह, तिची दीनवाणी मुद्रा, तिला पुन्हा पुन्हा येत असलेले हुंदके, तिचा दीन विनवणीचा स्वर, हें सर्व पाहतांच एखाद्या पाषाणासही पाझर फुटला असता. परंतु बापटांचें हृदय पाषाणापेक्षांही कठोर होतें. त्रासिक मुद्रा करून ते मनांत म्हणतात, ' कुठली ब्याद आली म्हातारडीची कोणास ठाऊक ! गावांत राह्यचें दिवसभर, अन् मग उलथून जायला लागले कीं, लोकाचे उंबरठे झिजवून त्यांना त्रास द्यायचा ! ' बापट स्तब्ध बसलेले पाहून सत्यभामाबाई हात जोडून म्हणाल्या ' मीं तुमच्या पायां

पडत्यें; पण एवढी आम्हांला गरिबाला मदत करा. सध्यां घरांत पैसा नाहीं; नाहीं तर मी एखाद्या डाक्तरकडे गेल्यें असत्यें. डाक्तर तुमच्या ओळखीचे; तेव्हां पैसे उशिरां दिल्यास चालतील, असें वाटून मीं तुमच्याकडे धांव घेतली. आम्ही मोठ्या संकटांत आहों. या वेळीं शेजारधर्मानें मदत केलीत, तर देव तुमचें कल्याण करील. तुमच्या पायां पडत्यें, एवढें साहाय्य करा. आम्हांला घरांत पुरुष माणूस कोणी नाहीं. आम्ही बायाबापड्या काय करणार ? ' असें म्हणून म्हातारीनें बापटांचे पाय खरोखरीच धरले. ती अगदीं मोठ्यानें रडूं लागली. परंतु बापटांच्या मनांत दुसराच प्रश्न घोळत होता. आपल्या ओळखीनें आपण डाक्तरांना आणलें आणि या मंडळीनें त्यांचे पैसे दिले नाहींत तर आपल्याला पैसे भरावे लागतील. छे ! हें भलतें लोंगडें आपण गळयामध्यें घेणें बरोबर नाहीं. परंतु त्यांची अर्धवट मेलेली विवेकबुद्धि त्यांना पुन्हा पुन्हा सांगे कीं, एकदोन रुपड्यांसाठीं असा निष्ठुर होऊं नकोस. तरी पण या जागृतीलाही गप करण्यास बापटांच्या कठोर अंतःकरणांत युक्त्या थोड्या नव्हत्या. ' मीं डाक्तर आणून तरी काय होणार ? तो लेकाचा मरायचा असला, तर कांहीं वांचत नाहीं, अन् जगायचा असला तर कांहीं मरत नाहीं, ' अशा तत्त्वज्ञानानें त्यांनीं विवेकबुद्धीची वटवट बंद केली.

' आजीबाई मी तरी काय करूं ? डोंगरे माझ्या ओळखीचे आहेत, परंतु ते गेले आहेत गांवाला. ' अशीं त्यांनीं थाप ठोकून दिली. अरेरे ! एका दोन हतबुद्ध म्हातारीची त्यांनीं केवढी निराशा केली, याची त्यांना काय कल्पना ! बिचारी म्हातारी मोठ्या आशेनें त्यांच्याकडे धांव घेत आली. डॉक्टर आल्यावर आपला बापू खास बरा होईल, अशी तिनें आपल्या मनाची समजूत घातली होती. परंतु त्या पापी नरपशूचें उत्तर ऐकून तिचा धीर सुटला. पैशाच्या अभावामुळें डॉक्टरला तर आणतां

येत नाहीं. छे ! छे ! आतां काय करूं ? आपल्या लेंकाला आपल्या हा-तून ओढून नेत आहेत असें तिला वाटलें. आपण, आपली सून, आपलीं लहान बापडीं नातवंडें यांची गति काय होणार ? देवा, मीं पूर्वजन्मीं असें काय पातक केलें होतें ? माझ्या देखत माझ्या बाळाची अशी स्थिति— नको रे ईश्वरा ! तुला दयासागर म्हणतात. त्याचें मरण माझ्यावर येऊं दे. तो बरा होऊं दे.

'अहो, मग तुमच्या ओळखीचे दुसरे कोणी वैद्य असले, तर सांगा मला. मी जन्मभर तुमचे धन्यवाद गाईन. माझ्यावर एवढे उप-कार करा. सांगा मला. मी धांवत जात्यें.'

नाहीं, त्या पाषाणहृदयी राक्षसाला दया आली नाहीं ! म्हातारी विचारी रडतच झोंपडीकडे परतली. तिनें वर आकाशाकडे पाहून ईश्व-राची अनन्यभावानें प्रार्थना केली. इतक्यांत आकाशांतला एक तारा तु-टून खालीं पडला. अग बाई ! माझा नक्षत्रासारखा बापू असाच आम्हांला सोडून जाणार का ? छे छे ! हे असले अमंगळ कुतर्क कां बरें माझ्या म-नांत येतात ?

डॉक्टर मिळत नाहीं हें पाहून रमाबाईही घाबरून गेली. वामन-राव आतां तर मुळीसे शुद्धीवरसुद्धां नव्हते. आपण मृत्यूला बळी पडणार अशी त्यांच्या मनाची खात्री झाली होती. आपली बायको आपला पाय उघडा पडूं नये म्हणून त्याच्यावर पांघरूण घालीत आहे, असें पाहून ते म्हणतात, 'काय वेडी तूं ! माझा पाय झांकायासाठीं तूं धडपडतेस, पण जिथनें माझा प्राण जाणार ती वाट बंद करावयाचें तुझ्या हातांत आहे का ?'

वामनराव असें कांहीं बोलले म्हणजे रमाबाईच्या पोटांत कालवा-कालव होई. जवळ सासू बसली आहे, याचें भान न राहतां तिनें

वामनरावांना घट्ट मिठी मारली, आणि मुक्तकंठ रुदन करण्यास तिनें प्रारंभ केला. आजी रडते आहे, आई आक्रोश करते आहे, हें सारें वेणूला पाहवेना. डाक्तर न मिळाल्याची तिच्या मनाला रुखरुख लागली होती. तिच्या एका मैत्रिणीच्या नवऱ्यानें नुक्तेंच प्रॅक्टिस सुरू केलें होतें. तिच्याकडे धांव घ्यावी असें तिला वाटलें. आपल्याबरोबर डाक्टर येत असलेले लोकांनीं पाहिले, तर कुतर्क बांधण्यास त्यांच्या दुष्ट सर्पासमान गरळ ओकणाऱ्या जिव्हा कमी करणार नाहींत, असा विचार तिच्या मनांत आला. परंतु अशा दुःखप्रसंगीं या पिशाचांना भिऊन उपयोगी नाहीं, असा विचार करून तिनें आईस विचारलें. मैत्रीण वरीच लांब रहात होती. परंतु वेणू जी निघाली ती वेड्यासारखी पळतच सुटली. लोक आपल्याकडे पाहून हंसताहेत, असल्या क्षुद्र विचारांना तिच्या प्रेमाच्या उमाळ्यांत केव्हांच जलसमाधि मिळाली होती.

मैत्रिणीला हकीकत सांगतांच तिनें आपल्या पतीला ती कळविली. सहस्रबुद्धे सहृदय मनुष्य होता. त्यानें लगेच टांगा जोडला. वेणू टांग्यांत बसली आणि टांगा भरधांव निघाला. परंतु काळजीनें जळणाऱ्या वेणूच्या मनाला वाटत होतें कीं, टांगा हा किती हलके चालला आहे. 'आणखी जोरानें टांगा हांका!' असें हलकेच नारायणरावांना तिनें पुन्हा पुन्हा म्हणावें. वाटेंतच वेणूनें त्यांना सर्व हकीगत सांगितली. 'घाबरूं नका' असें नारायणराव पुन्हा पुन्हा म्हणाले.

वेणूनें मध्येंच विचारलें, 'उद्यां आमचें काम कराल का? घरांत कांहीं पैसे नाहींत. अशा वेळीं पैशांची तर फार जरूर पडते. बँकेंत आमचे शंभर रुपये आहेत, तेवढे उद्यां काढून आणाल तर बरें होईल.'

'करीन बरें. तुम्ही आतां अगदीं घाबरूं नका' असें नारायणरावांनीं आश्वासन दिलें. झोंपडीच्या दारापाशीं आल्यावर वेणूनें आंत

जाऊन आजीला सांगितलें ' आजी, हे बघ डाक्टर आले !' म्हातारी ताडकन उठली. पुढें होऊन तिनें नारायणरावांचे पाय धरले आणि सद्गद कंठानें ती म्हणाली ' तुम्हांला शंभर वर्षे आयुष्य आहे. माझ्या कातड्याचे जोडे करून तुम्हांला दिले तरी तुमचे उपकार फिटायचे नाहींत. ' आंतल्या बाजूस वामनरावांच्यापाशीं बसलेल्या रमाबाईचें अस्पष्ट रुदन ऐकून आणि तशा करुणास्पद स्थितींत म्हातारीला पाहून नारायणरावांच्या अंतःकरणाला पीळ पडून त्यांच्या डोळ्यांत अश्रू उभे राहिले. सत्यभामाबाईना उठवीत ते म्हणाले, ' तुम्ही असें काय बरें करतां ? तुम्ही माझ्या आई-सारख्या. मींच तुमच्या पायां पडून आशीर्वाद मागायचा, तें हें काय बरें ? त्यांतून आत्तांची वेळ फार महत्त्वाची. कुठे आहेत वामनराव ! "

रमाबाई वामनरावांपासून दूर झाल्या. त्यांचें रडणें सारखें चालूच होतें. ' रडूं नका. घाबरण्याचें कांहीं एक कारण नाहीं.' असें नारायणरावांनीं अनेक वेळा सांगितलें; परंतु प्रेमाचा दुःखावेग थांबावा कसा ? आजपर्यंत ज्यांच्या प्रेमळ सहवासांत खडतर दिवससुद्धां मोठ्या आनंदानें काढले, ज्यांनीं आपल्या अंगच्या मेहनतीनें आजपर्यंत आपला प्रेमळपणें प्रतिपाळ केला, त्या प्राणाहून प्रिय असलेल्या आपल्या पतीची अशी भयंकर स्थिति झालेली पाहिल्यावर जे दुःखाचे दारुण खदिरांगार रमाबाईच्या मनावर पडले, ते चार धिराच्या शब्दांच्या सिंचनानें विझणार कसे ?

नारायणरावांनीं वामनरावांची प्रकृति पाहिली. ताप अतिशय होता, आणि मानेवर गांठ आली होती. डाक्तरांच्या मनाला चरकाच बसला. परंतु औषधोपचार केल्याशिवाय मनाचें समाधान होणार कसें ? बाहेरून जरी ते त्या दोन्ही तिन्ही बायकांना धीर देण्याचा प्रयत्न करीत होते, तरी-सुद्धां त्यांच्या मनांत ते पक्के समजले होते कीं, हा पुरुष कांहीं आतां जगत नाहीं. त्यांनीं औषध दिलें आणि वेणूच्या हातांत दहा रुपयांची नोट दिली. सकाळीं येईन असें सांगून नारायणराव घरीं गेले.

त्या कुटुंबाला ती रात्र म्हणजे काळरात्रच ! रडावें रडावें, एक-मेकींकडे पुन्हा पुन्हा पहावें, पुन्हा रडावें ! याशिवाय त्या बिचाऱ्या बायका काय करणार? वामनरावांचे कण्हणें ऐकून तर त्यांच्या काळजांचें पाणी होई. कोणी शेजारी समचाराला येतील असें त्यांना वाटे. परंतु असल्या भूतदयेच्या पवित्र कार्याला प्रवृत्त होण्याइतकी माणुसकी मनुष्याच्या अंगांत राहिली नाहीं. रात्रीची शांततासुद्धां त्या बायकांना भीतिप्रद वाटूं लागली. बराच वेळ वामनराव अगदीं स्वस्थ पडले कीं, त्यांनीं एकमेकांच्या गळ्यांत गळा घालून ' काय ग करूं आतां ' असा टाहो फोडावा. वामनराव या कुशीवरून त्या कुशीवर होत. मध्येंच ते शून्यदृष्टीनें पहात म्हणत,–'आई, आई ग ! नकोरे देवा यातना ! छे रे देवा, असा कां विस्तवांत भाजतोस मला ? ' हे शब्द ऐकले कीं काळजाचें पाणी पाणी होऊन रमाबाईनें आणि सत्यभामाबाईनीं वामनरावांच्या अंगावर अंग टाकून किंकाळी फोडावी. त्यांच्या डोळ्यांच्या पाण्याला तर खळच नव्हती. रडणार तरी किती ? रडून रडून थांबावें, आणि स्वस्थ बसावें. पुन्हा पुन्हा वामनराव विव्हळून म्हणत: ' अरेरे, कोणी तरी मला गोळी घालून ठार करा हो ! नाहीं तर द्या विषाचा पेला प्यायला. नकोत या यातना !'

रात्र चालली. त्या बायकांना कसली रात्र आणि कसला दिवस. तहान नाहीं भूक नाहीं. वामनरावांच्याजवळ बसून राहावयाचें या गोष्टीखेरीज त्यांना दुसरें काय सुचणार ? शिवाय धीर द्यावयास जवळ कोणी नाहीं. अरेरे ! जग किती निष्ठुर होत चाललें ! परमेश्वरा मनुष्यसृष्टि उत्पन्न करतांना आतांशा तूं अंतःकरण द्यावयास विसरतोस काय ? रुदनस्वर ऐकला कीं प्रेमरज्जु हादरून जाणारीं अंतःकरणें गेलीं कोठें ? ' पीडित जन देखतां स्वसुखा त्यागी दया ' असलें निर्मल स्वार्थत्यागी प्रेम जगांतून नाहींसें झालें कसें ? जगांत भावांप्रमाणें नांदावयास पाठविलेले मानव

राक्षसी अंतःकरणाचे होत चालले, इकडे तुझी सर्वसाक्षी दृष्टि जात नाहीं असें कसें म्हणूं ? परंतु शेजाऱ्याला मदत करण्याइतकी निःस्वार्थता ज्या जगांत नाहीं, तें जग नसून राक्षसांचा बाजार आहे, असें कसें वाटणार नाहीं ? सन्निध असणाऱ्या दारुण प्रसंगांत सांपडलेल्या बंधुभगिनींचे अश्रु पाहून अश्रूंनीं डबडबून येणारे नेत्र गेले काय ? दुःस्थितींत पडलेल्या शेजाऱ्याचा टाहो ऐकून सद्गदित होणारे प्रेमळ कंठ गेले काय ? दुःखाचे हुंदके ऐकून थरकांप होऊन मदतीस धांवून येणारीं उदार मनाचीं माणसें गेलीं कोठें ? अरेरे ! प्रेमाचे, सहृदयतेचे दिवस जाऊन पांढऱ्या रुपड्याला भुलणाऱ्या आणि क्षुद्र सुखांचा त्याग करण्यासही बलहीन असणाऱ्या राक्षसी अंतःकरणांचें युग खचित आलें ! असो. तशी भयंकर रात्रही सरली. सकाळचे सहा वाजले, इतक्यांत नारायणराव येऊन उभे राहिले. ' अहाहा ! डाक्टर किती तरी प्रेमळ आणि उदार ! ' असा विचार मनांत येऊन वेणूताईचें अंतःकरण कृतज्ञतेनें भरून आलें. वामनरावांची प्रकृति रात्रीपेक्षां सुधारली होती. ते आतां नीट शुद्धीवर आले होते. डाक्टरांना पाहून ते हलकेंच म्हणाले,--

' तुमचे आमच्यावर अनंत उपकार आहेत. दुपारीं बँकेंतून तेवढे पैसे काढून आणले तर---

' शुः ! तुम्ही बोलूं नका, मी सारें करीन. उपकाराचें पुन्हा नांव काढूं नका. '

वामनरावांना नीट बोलतांना पाहून त्यांच्या आईच्या, बायकोच्या, वेणूच्या, सर्वांच्या जिवांत जीव आला. इतक्यांत बाहेर ' आजीबाई ! ' म्हणून कोणी हांक मारली, म्हणून सत्यभामाबाई बाहेर गेल्या. पाहतात तों बापट आणि झोंपडीच्या जागेचे मालक व्यंकटराव उभे होते. म्हातारीला

वाटलें हे लोक समाचाराला आले आहेत; म्हणून ती म्हणाली,—'आंत या, बाहेर कां उभे ?'

परंतु व्यंकटराव बापटांच्याकडे वांकडें तोंड करून पहात म्हणतात,—'ह्यः ह्यः ! आम्ही कांहीं समाचाराला नाहीं आलों. तुमचा मुलगा म्हणे आजारी आहे !'

'होय हो !' म्हातारी दीनवाणीनें म्हणाली.

'त्याला काय प्लेग झाला आहे का ?'

'हो किं हो ! मानेशीं चांगली गांठ आली आहे. आतां मी कसें करूं ?'

व्यंकटराव म्हणाले 'आजीबाई, तुमच्या मुलाला प्लेगाचा विकार झाला आहे, तर तुम्हांला त्या मुलाला या झोंपडींतून बाहेर काढून दुसरीकडे नेलें पाहिजे. किंवा—'

सत्यभामाबाई एकदम घाबरून म्हणाल्या, 'तुम्ही हें म्हणतां तरी काय ? माझ्या बापूला कुठें टाकून देऊं अन् मी चांडाळीण या झोंपड्यांत राहूं म्हणतां ? त्यापेक्षां—'

मध्येंच बापट हंसून म्हणाले 'ह्यः आजीबाई, नाहींतर तुम्ही असं करा, तुम्ही सगळींच माणसें झोंपडी सोडून जा कुठें तरी दुसरीकडे.'

त्याला पुष्टी देऊन व्यंकटराव म्हणाले, 'साऱ्या कँपाची तुमच्यामुळें नुकसानी होईल. छे ! तें कांहीं उपयोगी नाहीं. तुम्ही आपले बिऱ्हाड इथून आत्तांच्या आत्तां हालवलें पाहिजे.'

सत्यभामाबाई वेड्यासारख्या त्या दोघा नरपशूंच्या तोंडाकडे पहात होत्या. त्यांचीं बोलणीं ऐकून त्यांची स्थिति भ्रमिष्टासारखी झाली !

'अरे बाबांनो, बोलतां तरी काय हें तुम्ही ? घरांत त्याची काय भयंकर स्थिति अन् त्याला घेऊन जाऊं कुठें मी ? तुम्हांला कांहीं दया

येऊं द्या. गरीबाचा असा कां छळ करतां ! मेल्यांनो, मज म्हातारीकडे पहा ! या लहान पोराकडे पहा ! तुम्हांला दया माया कशी येत नाहीं ? आम्हांला रानांत भटकायला लावून तुम्ही कोणतें पुण्य जोडाल ? असा व्यर्थ छळ नका करूं ! नरकाचें साधन कां करून ठेवतां ? तुम्ही—'

'हं ! आजीबाई, तोंड वाटेल तसें सोडण्यांत कांहीं अर्थ नाहीं ! तुम्ही बऱ्या बोलानें इथून जाणें बरें. नाहीं तर पोलिसांच्याकडून तुम्हांला बाहेर काढावें लागेल.'

'अरे बाबांनो, असे नका रे निष्ठुर होऊं ! तुमच्या पायां पडते ! पदर पसरते. मला येवढी भीक घाला. कांहीं तरी दया करा. मी इथून निघालें तर जाऊं तरी कोणीकडे ? या बिचाऱ्या पोरांना अन् आम्हांला अन्नही नाहीं खायला अन् जाऊं कुठे ? माझ्या बापूला कुठे नेऊं अन् त्याचें काय होईल ? नकारे असा छळ करूं आमचा ! आम्ही बायामाणसें, तुमच्या आयाबहिणी आम्ही; हें पहा मी तुमचे पाय धरते. तारा नाहीं तर मारा. पण माझ्या पोटच्या पोराचे हाल माझ्याच्यानें पाहवायचे नाहींत.' असें म्हणून म्हातारीनें व्यंकटरावांच्या पायांवर खरोखरीच डोकें ठेवलें !

अरेरे ! परमेश्वरा, पोटच्या गोळ्यासाठीं तळतळणाऱ्या म्हातारीच्या डोळ्यांतील पवित्र अश्रु ज्या नरपशूनें आपल्या पायांवर वाहूं दिले, त्या दुष्टाचे पाय तूं तात्काळ भस्म करून कां टाकले नाहींस ? मातेच्या पवित्र प्रेमाला लाथाडून देणाऱ्या राक्षसांचे देह त्या मायेच्या तेजानें दग्ध कां केलें नाहींस ?

सत्यभामाबाई मोठ्यानें रडून त्या दोघा चांडाळांच्या विनवण्या करूं लागल्या. तें आंत ऐकूं आल्याबरोबर वेणूबाई व नारायणराव बाहेर आलीं. वामनरावांच्या जवळच रमाबाई बसून राहिली. केशव एकदां बापाकडे डोकावून पाही, एकदां बाहेर चाललेल्या प्रसंगानें घाबरून जाऊन मना-

शींच विचार करीत दारांत उभा राही. नारायणरावांना बाहेर आलेले पाहून मात्र व्यंकटराव आणि त्यांचे दोस्त मनांत चरकले. घरांत कोणी पुरुष नसेल आणि या बायांना आपल्याला पुरतें छळतां येईल अशा समजुतींत ते आतांपर्यंत बोलत होते. नारायणरावांनीं आधीं आजीबाईना उठविलें आणि 'आपलें काय म्हणणें आहे?' असें त्या दोघांस विचारलें. बापटांनीं लगेच कुत्सितपणानें हंसत उत्तर दिलें, 'वेणूबाई लग्नाच्या झाल्या आहेत, तेवढें उरकून घ्या आपण.'

नारायणरावांनीं सर्व राग गिळून उत्तर दिलें, 'ठीक आहे. आतां आपण जाल तर बरें होईल.'

इतक्यांत व्यंकटराव म्हणतात, 'वा महाराज, आम्ही जाऊं काय म्हणून? ही झोंपडी सोडून ही मंडळी आत्तांच्या आत्तां गेली पाहिजे.'

आतां मात्र नारायणरावांचा क्रोध अनावर झाला. खवळून त्यांच्या अंगावर धावून ते ओरडले, 'खाटकांनो, इथून काळें करा, नाहींतर माझ्या हातून कांहीं भलताच प्रकार होईल. चांडाळांनो, कांहीं हृदय म्हणून पदार्थ आहे कां नाहीं तुमच्याजवळ? यांच्यावर ओढवलेल्या संकटाची कल्पना करा! यांच्या दुःखाची, यातनांची कल्पना करा! घरांत एकटा असलेला पुरुष आज मरणाच्या दारीं पडलेला आणि दुष्टांनो, तुम्ही त्यांना घराच्याबाहेर ओढून काढतां? कांहीं दयेचा अंश तरी असू द्या! पण नाहीं, तुमच्यापाशीं असलीं बोलणीं उपयोगीं नाहींत. मूर्खांनो, तुम्हांला मीं असें सांगतों कीं, ही मंडळी झोंपडी सोडणार नाहींत. तुमच्या लुडबुड्यांच्या काय हातांत असेल तें करून घ्या. जा, चालते व्हा!–आजीबाई, चला तुम्ही आंत.'

हें नसतें आलेलें विघ्न टळलें. आंत गेल्यावर बामनरावांनीं डाक्तरना म्हटलें, 'हें बँकेचें पुस्तक घ्या, आणि माझे सर्व पैसे दुपारीं काढून आणा.'

दुपारच्या सुमाराला वामनरावांना बरेंच बरें वाटूं लागलें. त्यांनी थोडीशी पातळशी कण्हेरीसुद्धां खाल्ली. मंडळींना वाटलें कीं, आतां वामनराव बरे होणार. अरेरे ! पण बिचाऱ्यांना काय ठाऊक कीं, हें सारें सुचिन्ह नसून दुश्चिन्ह होय. जगांतील माणसांच्या बरोबरच सृष्टिदेवताही किती निर्घृण झाली आहे ! समुद्रांत भयंकर तुफान होण्याच्या अगोदर निःसीम शांतता, दिवा जावयाच्या आधीं त्याची ज्योति मोठी आणि त्याप्रमाणेंच प्राणज्योति शांत होण्यापूर्वी तिच्यांत तडफ ! शेवटचा संकटाचा घाव घालावयाचा पण तो सुद्धां एक घाव नि दोन तुकडे येवढीसुद्धां दया न दाखवतां ! सृष्टिदेवते, या जगांतील राक्षसांच्या सहवासानें तुझाही स्वभाव राक्षसी बनला असेल, त्याला तूं तरी काय करणार ?

नारायणराव पैसे काढायला म्हणून दुपारीं बँकेंत जातात तों बँकेनें देवघेव बंद केलेली. ही बातमी कळतांच वामनराव अगदीं खचले. संकटें येऊं लागलीं म्हणजे एकटीं दुकटीं येत नाहींत. काय जी थोडी पुंजी होती तीहि नाहींशी झाल्यावर काय, उद्यांच्याच जेवणाची काळजी ! पेढीवाल्यांनो, तुमचेही स्वभाव अमानुषच ना ! गरीब बाया बापडे जेव्हां ठार बुडालें म्हणून टाहो फोडतील त्या वेळीं तो करुणस्वर ऐकून तुमच्या हृदयाचे शतशः तुकडे होणार नाहींत काय ? ऊर बडवून घेतांना अनाथ लोकांनीं अंतःकरणावर केलेला प्रत्येक प्रहार तुमच्या अंतःकरणावर दाणदिशीं येऊन आदळणार नाहीं काय ? नाहीं, तुमचीं अंतःकरणें पिशाच्चांप्रमाणें निष्ठुर झालीं असल्याशिवाय तुम्हीं असलें कृत्य आपल्या हातून होऊं दिलें नाहीं !

पैसे बुडाल्याची बातमी ऐकल्यापासून वामनरावांची प्रकृति एकाएकीं अतिशय बिघडली. त्यांना वात झाला आणि ते वाटेल तें बरळूं लागले. तिन्ही सांजा नारायणराव आले तों काय भयंकरच स्थिति ! सत्य-

भामाबाई व रमाबाई यांना वामनराव आंवरतसुद्धां नव्हते. भेदरून जाऊन रडणाऱ्या केशवाला वेणूताईनें कसा तरी संभाळला होता. नारायणरावहि गडबडले. नारायणरावांनीं कांहीं औषधें दिलीं. बायकांनीं मात्रा वगैरे दिल्या. रात्रीं आठाच्या सुमारास वामनरावांचें बरळणें बंद झालें, तेव्हां सगळ्या मंडळीस जरा धीर आला. परंतु त्यांना काय माहीत कीं, मृत्यू-सुद्धां कठोरपणें त्यांच्याशीं खेळत होता. निराशेच्या समुद्रांत फेंकून देऊन मध्येंच एक आशेचा खडक दाखवावयाचा. परंतु त्या आशेनें पाय ठेवतांच तो खडक नसून दलदल आहे असें कळून येऊन पाय खोल खोल जाव-याचा, अशा निष्ठुर लीला करण्याची मृत्यूनें तयारी केली होती. वामन-राव जे गप राहिले ते कायमचे! त्यांची वाचा मुळींच बंद झाली. त्यांच्या-मनांतून पुष्कळ बोलावयाचें होतें असें दिसलें, परंतु त्यांची जीभ त्यांना बोलूं देत नव्हती. ईश्वरनिर्मित इंद्रियेंसुद्धां पाषाणहृदयी झालीं ! मायेच्या माणसांशीं शेवटले चार शब्द बोलण्याची जी इच्छा तीसुद्धां पुरी करूं दे-ण्याइतकी सहृदयता त्या जड अवयवांत देखील उरली नाहीं ? आपल्याला प्राणाहून प्रिय असलेल्या माणसाकडे शेवटची दृष्टि फेंकण्याची उत्कंठा पूर्ण करण्याची परवानगी न देण्याइतके वामनरावांचे नेत्र निष्करूण झाले ? त्यांच्या डोळ्यांवर अतिशय झांपड येऊन त्यांना डोळे मिटणें भागच पडलें. बोलण्याचा ते प्रयत्न करीत, परंतु अस्पष्ट अशा एखाद्या शब्दाशिवाय त्यांच्यानें कांहींच बोलवेना. कर्णेंद्रिय आपलें काम करीत होतें. परंतु तें-सुद्धां केवळ दुःख देण्याकरतां. बायकोचे, आईचे, मुलांचे हुंदके, करुणा उत्पन्न करणारे असे त्यांचे दीन प्रश्न, त्यांचा सारा हाहाकार ऐकूं आला म्हणजे वामनरावांना अनंत यातना होत. इतर इंद्रियांप्रमाणें कानही ब-धिर कां झाले नाहींत असें त्यांना वाटे. केव्हां एकदां कुडीला सोडून हा प्राण जातो असें त्यांना झालें.

वामनरावांची तळमळ पाहून त्यांच्या माणसांना वाटे नको हें बघणें. देवा, आमचे सर्वांचे डोळे मिटूं दे. इतक्यांत वामनराव एकदम उठून बसले. पायगतीं त्यांची पत्नी बसली होती. डोळे उघडण्याचे पराकाष्ठेचे श्रम करून वामनरावांनीं एकदां रमाबाईकडे पाहिलें. तिच्या खांद्यावर त्यांचें मस्तक पडलें आणि त्यांची प्राणज्योति निमाली !

हरहर ! कोण हा प्रसंग त्या कुटुंबावर ! वाचकहो, त्यांचे विलाप, त्यांचे टाहो, त्यांच्या किंकाळ्या वर्णन करून तुमच्या हृदयाचें पाणी पाणी करून सोडण्याचें सामर्थ्य माझ्यामध्यें आहे कोठें ? असतें तर त्या बाय-कांच्या दुःखाचें शब्दचित्र रेखाटून बापट व व्यंकटराव यांच्यासारख्या नर-पशूंचीं अंतकरणें खचित भाजून काढलीं असतीं ?

'माझा बापू कुठे गेला हो !' हा म्हातारीचा हंबरडा ऐकून तुमच्या मनाचा थरकांपच झाला असता. 'देवा, मला रांडिचीला कां रे नाहीं मरण आणलेंस ?' हा रमाबाईचा विलाप तुमच्या कानावर पडतांच तुमच्या अंगावर रोमांच उभे राहिले असते. 'बापू, कसे हो अगदीं दोन दिवसांत आम्हांला टाकून गेलांत ?' हे वेणूचे करुणास्पद शब्द ऐकून तुमच्या नेत्रांतून अश्रूंच्या धारा सुरू झाल्या असत्या, तुमचे पाय लटलट कांपायला लागले असते, तुमचा गळा भरून आला असता आणि तुम्हीं आपलें हृदय घट्ट दाबून धरलें असतें.

परंतु जगांत इतकीं प्रेमळ माणसें आहेत कोठें ? ज्या वेळीं वामन-रावांच्या घरीं ही अशी रडारड चालली होती, त्याच वेळीं त्यांच्या झोपडी-पासून पन्नास एक पावलांच्या अंतरावर बापट, व्यंकटराव आणि शिवाय पांचसहा मंडळी पत्ते खेळत बसली होती. वामनरावांच्या घरचा कल्होळ त्यांना ऐकूं आला, परंतु त्यांच्या मनांत येवढेंसुद्धां आलें नाहीं कीं, जरा जाऊन पाहावें काय आहे तें ! बापट म्हणाले, 'मरेनाका जाईना !' व्यंकट-

राव म्हणाले, ' तो डाक्तर आहे जाळायला. ' तिसरे म्हणाले, ' कोणी जाव रात्रीचें येवढ्या ? ' परंतु त्यांच्यांत केळकर म्हणून एक गृहस्थ होते, त्यांनीं पत्त्याचा डाव फेंकून दिला. सर्वांकडे पाहून ते म्हणाले, ' पंढांनो, तुमच्या-सारखे राक्षस मीं नव्हते पाहिले ! '

नारायणरावांनीं निश्चय केला होता कीं, या पाजी लोकांकडे मदत मागायाला काहीं जावयाचें नाहीं. केळकर आले तेव्हां त्यांना जरा बरें वाटलें. दोघांनीं मिळून कशी तरी तयारी केली. शव बाहेर काढतांनां सत्यभामाबाई, रमाबाई, वेणू, सर्वांनीं एकच हंबरडा फोडला. ' कुठं हो नेतां त्यांना ! ' असें म्हणून रमाबाईनें धरणीवर अंग टाकलें !

' ईश्वर जें करतो तें आपल्या बऱ्याकरतां ' हें वाक्य या वेळीं डोळ्या-समोर उभें राहिलें म्हणजे ' बरें ' काय, हेंच कळेनासें होऊन ईश्वराविषयीं उद्वेग वाटल्याशिवाय कसा राहील ?

---

# समाजशास्त्रावरील व्याख्यानें.

## ( परीक्षण. )

### लेखांक ३.

आमच्या समाजव्यवस्थेची दुसरी चुकीची मूलभूत कल्पना म्हणजे आमचे स्मृतिकार समाजाला केवळ मूल समजतात ही होय, असें रा. भाटे यांचें मत आहे. शास्त्रांनीं व्यक्तीचें प्रत्येक कृत्य नियमबद्ध करून ठेविलें आहे, ही गोष्ट त्यांना पसंत नाहीं. धर्मशास्त्रांनीं जेथें तेथें आपला अंमल चालवावा, ही गोष्ट खरोखरीच थोडी पंचायतीची. ज्या गोष्टींचा अंतर्भाव धर्मांत होत नाहीं, आणि प्रसंगीं होत असला तरी थोडेंसें

आजूबाजूस सरकल्यानें ज्या गोष्टींत विशेष कांहीं हाहाकार उडत नाहीं; असल्या बाबींतसुद्धां शास्त्राच्या पंतोजीची छडी कशाला ? माझ्या शेजाऱ्याहून मी थोडासा निराळा वागलों, म्हणून त्यांत मोठेंसें काय बिघडलें ? आतां एवढेंच पहावयाचें कीं, यांत शास्त्रांकडे दोष कितीसा जातो. शास्त्रें रचलीं एका काळांत आणि त्यांची अंमलबजावणी भलत्या काळांत. मूळ रचणारांनीं त्या त्या वेळची परिस्थिति नीट न्याहाळून लागू पडेसे नियम बांधले. हे नियम अगदीं बारीकसारीक कलमांपर्यंत जरी जाऊन पोहोंचले असले, तरी त्यांत हरकत घेण्यासारखें कांहीं नाहीं. जे लोक ते नियम पाळीत, त्यांची जर कांहीं हरकत नव्हती, तर आपण उगाच कां आरडा करा ? ज्या काळीं या नियमांसंबंधानें एकही माणूस तक्रार करीत नसेल, त्या काळचें, शास्त्र व लोकांचा कल यांचें ऐकमत्य खरोखर मोठें कौतुकास्पद खरें; पण एकाच तऱ्हेची परिस्थिति सदैव टिकणार नाहीं, हें उघड आहे. व त्याबरोबर, त्या परिस्थितीला जमेसें रचलेलें शास्त्रही सदैव टिकणार नाहीं हेंही उघड आहे. आतां मुद्दा असा कीं, आपलीं शास्त्रें रचलीं तेव्हांच्या व आतांच्या स्थितींत फरक पडला आहे कीं नाहीं ? या प्रश्नास एकदम ' होय, पडला आहे. ' असा जबाब दिल्यास त्यांत कांहीं अविचार होईल असें मुळींच नाहीं. मग असें जर आहे, तर भलत्या परिस्थितींत निर्मिलेल्या शास्त्रानें आपले पाय आतां कां बांधून घ्या ? शास्त्राविरुद्ध लोक तक्रार करतात ती तरी काय उगाच तक्रारीची हौस असते म्हणून ? नाहीं. लोकांना शास्त्र हवेंच असतें. पण अमुक एक तऱ्हेचें नको, इतकेंच त्यांचें म्हणणें असतें. एक शास्त्र गेलें तर त्या ठिकाणीं दुसरें येऊन बसेल. शास्त्रावांचून समाजाला स्थिरता उरणार नाहीं. जे कोणी समाजसंबंधीं कसलेंच शास्त्र नको म्हणत असतील, ते मानव्याचे शत्रु गणले जातील. असे लोक फार कमी. 'हें शास्त्र नको ' म्हणतांना बोल-

णाराचा जोर ' हें ' वर असतो; ' शास्त्र ' शब्दावर नसतो. असो. गोष्ट बनते ती ही कीं, समाजासाठीं शास्त्र असतें ही भावना लोपून शास्त्रासाठीं समाज वर्ततो, ही भावना बद्धमूल होते. आणि असें झालें म्हणजे परिस्थितीच्या गरजा निराळ्या आणि शास्त्रांच्या योजना निराळ्या, असा भेद पडूं लागतो. शास्त्र व परिस्थिति यांचा कलह लागतो, लोकांवर नास्तिकपणाचा अथवा बेफामपणाचा शिक्का बसतो, आणि परत भेट म्हणून शास्त्रांची संभावना ' जुनीं पुराणीं ' या शब्दांनीं होते. प्रस्तुत आपल्या येथें हाच प्रकार चालू आहे. पण इतकें म्हणावयास हरकत नाहीं कीं, शास्त्रांच्या पूर्वीच्या सक्तींत जब्बर फरक केल्याशिवाय समाजाला स्थिरता आणतां येणें शक्य नाहीं, ही गोष्ट विचारवंतांच्या मनांवर पुरी बिंबून गेली आहे. परकीय समाजदर्शनानें उत्पन्न झालेल्या भिन्न भिन्न भावना समाजाच्या सर्व शरीरभर खेळूं लागल्यामुळें आणि सुखसंपादनाचा हक्क कर्तबगारीच्या मानानें नव्हे, तर जन्मत: मनुष्य या नात्यानें तरी निदान सारखा असावा, अशी प्रबल इच्छा जोरावूं लागली आहे.

या इच्छेला प्रतिबंध घालणें सोपें नाहीं आणि हिताचें नाहीं. तेव्हां शास्त्रमर्यादा न उल्लंघण्याचा हट्ट चालणें शक्य नाहीं. समाजांत उत्पन्न झालेला खळबळाट झटकन् समाजकल्याणाचाच पोषक करून घेणें जरूर आहे. तसें न केलें व हट्टानें शास्त्रमर्यादेच्या आंतच वावरणार म्हणून बळकटी धरली, तर समाजभंगाचें अरिष्ट येऊन ठेपेल. समाजाच्या ज्या अवयवांत स्वतांच्या महत्वाची जाणीव उत्पन्न झाली आहे, त्याला जर त्या जाणीवेसकट आपला न म्हटलें, तर तो विथरण्याचा आणि जवळच्या जवळ शत्रु बनून रहाण्याच्या संभव आहे. शास्त्रानें ज्याला कनिष्ट धंद्यांत वर्तण्याविषयीं बजाविलें आहे, तो म्हणणार, " मी येथेंच कां राहीन? मीं दुसरा कांहीं धंदा केला, तर मला अधिक पैसे कमावतां येतील, व

मला माझी जीवितयात्रा अधिक सुखाची करतां येईल. कांहीं कांहीं वर्गांनीं मात्र गबर व्हावें, उंच हवेल्यातून रहावें, आणि आम्ही मात्र अधिक धनोत्पादन करण्याची शक्ति असूनसुद्धां, सदा हलाखींत रहावें हा न्याय कोठला? ज्याच्या बुद्धीला जें करावयाची ऐपत असेल, तें त्यानें करावें आणि आपली सुखोपभोगाची पात्रता ठरवून घ्यावी. शास्त्र माझ्या विरुद्ध असेल हें खरें, पण शास्त्रानेंच पहावें कीं, तें जेव्हां ज्या स्थितींत अस्तित्वांत आलें तेव्हांची ती स्थिति आजला आहे का? धार्मिकपणाचा आणि इहलोकच्या भंगुरतेचा कितीही विचार केला, तरी आपली सगळी धडपड सुखासाठीं आहे हें विसरतां येत नाहीं. आणि जर असें आहे, तर प्रामाणिकपणें सुखासाठीं मी खटपट करूं लागलों तर शास्त्रानें माझ्या आड कां यावें?" हा युक्तिवाद एकाद्या परटाचा आहे, असें आपण समजूं. या परटाला 'आपआपल्या जन्मजात कर्तव्यापासून पराङ्मुख होऊं नको' हा उपदेश मानत नाहींसें दिसतें. पण याला पटेसें कोणचें उत्तर द्यावें? आम्हांस तर असें वाटतें कीं, बिनवकिलीचें सरळ उत्तर देतां येणें शक्य नाहीं. त्याचा युक्तिवाद सुयुक्त आहे, कालाला अनुरूप आहे, आणि म्हणून त्यांतील प्रमेयाचा जबाबदार माणसांनीं वेळींच उदारपणें विचार केला पाहिजे. आपली आपणच जर व्यवस्था लावली नाहीं, तर ती काळाच्या झपाट्यांत लागेल, आणि मग तीमात्र अमुकच तऱ्हेनें लागेल, असें सांगतां येणार नाहीं. पण या ठिकाणीं शास्त्रमार्गवर्ग आणि हल्लीं जागृत झालेले वर्ग या उभयतांनाही मनाच्या समतोलाची खरोखर फार जरूर आहे, असें म्हटलें पाहिजे. कोणच्याच पक्षानें भरकटत जातां उपयोगी नाहीं. आपपले गुणदोष बरोबर ओळखून त्या त्या मानानें पुढें सरकण्याचा मोह आंवरून धरला पाहिजे, आणि हातचें खरोखरीचें मोठेपण औदार्याच्या भरांत

न गमवण्याविषयीं सक्त खबरदारी ठेविली पाहिजे. एका पक्षानें उड्या मारीत मोठेपणाकडे न येतां जलद चालीनें यावें; कां कीं, मधलें अंतर न पडतांच ढांगा टाकण्याकडे मनाची ओढ लागल्यानें भासमात्र मोठेपण त्याला प्राप्त होईल. आणि दुसऱ्यानें अनुदारतेच्या गांठीं तडातड तोडण्याच्या भरांत आपल्या सामर्थ्यपुंजावर सुद्धां तडाके देऊं नयेत; कारण तशानें सार्विक मोठेपण उत्पन्न होण्याच्या आंतच असलेलें अल्प स्वल्प—मग विशिष्ट-वर्ग-मर्यादित कां असेना—नष्टप्राय होईल; आणि राष्ट्र हिणकस बनेल. या तात्विक विवेचनाला प्रत्यक्षाची जरूर आहे. आणि म्हणून प्रो० भाटे यांचा पुढील जातिभेदाचा मुद्दा विचारासाठीं घेऊं. 'माणसामाणसांत जन्मजात विषमता आहे.' ही गोष्ट आतां कोणी मोठ्या आग्रहानें प्रतिपादीत असेल, असें वाटत नाहीं. पण असें जरी कोणी प्रतिपादीत नसला, तरी जातिभेद पाहिजे असें म्हणणारा वर्ग बराच मोठा आहे. या ठिकाणीं नेहमीं एक घोंटाळा होतो. 'जातिभेद पाहिजे' असें जेव्हां एखादा म्हणतो, तेव्हां त्याला काय म्हणावयाचें असतें? माणसांमाणसांत जन्मजात विषमता जी मानली आहे, ती राहिलीच पाहिजे, असा त्याचा भाव बहुधा नसतो. त्याच्या मनांत इतकेंच असतें कीं, एकंकार नको. त्याला अशी जाणीव असते कीं, मी कांहींसा मोठा आहें, आणि मिसळीनें माझें मोठेपण हीन होण्याचा संभव आहे. अमुक एक वर्ग महारच रहावा, अशी त्याची वासना नसते; तर मीं खालीं जाऊं नये अशी त्याची आकांक्षा असते. आणि ही आकांक्षा अनुदार आहे असें म्हणण्याचें धाडस महारसुद्धां करणार नाहीं. तेव्हां आपणांस असें पाहिलें पाहिजे कीं, ब्राह्मणाचा इष्ट परद्वेष नसून आत्मसंरक्षण हा आहे. द्वेष उभयपक्षांतही निघावयाचेच, त्याला इलाज नाहीं; पण तात्विक विवेचनांत त्यांना जागा देतां लागीं नाहीं. यावर असा पूर्वपक्ष होण्यासारखा आहे कीं,

एवढें जपून ठेवण्यासारखें ब्राह्मणांपाशीं आहे काय? महार माणूस, ब्राह्मण माणूस; त्यांत एवढा भेद कसला? ही विचारसरणी ज्ञानशील पण गडब-डींत असलेल्या म्हणून कमी समतोल अशा महारानें अवलंबिली, तर मंद-कौतुकास्पद बनेल; पण जर कां ती एखाद्या सुसंस्कृत ब्राह्मणानें पतकर-ली तर अनुकंपनीय ठरेल. ब्राह्मणाचें मोठेपण महाराला न कळलें तर त्यांत आश्चर्यजनक असें कांहींच नाहीं. पण ब्राह्मणाचेंच जर ब्राह्मणाला कळेना-सें झालें तर मात्र तो महार होणार, हें अंदाजावयास हरकत नाहीं. केवळ सद्धेतु आणि अमर्याद कार्यक्षमता एवढीच सामग्री सामाजिक प्रश्न सोडविण्यास पुरे-शी आहे, असें मानण्यांत चूक होईल. सर्व तऱ्हेच्या विषयकलांकडे तीक्ष्ण दृष्टि राखून साकल्यानें विचार करण्यासारखी बुद्धीची ऐपत पाहिजे. ब्राह्मण हा आचारानें, आहारानें, विहारानें, विचारानें, आणि बुद्धीनें वरचढ आहे, असें म्हणण्यांत समजशास्त्रज्ञानें कसूर करूं नये, आणि सुज्ञ महारानें खंती मानूं नये. पण मधूनच असा एक प्रश्न उपटतो कीं, महारांना तरी तुम्हींच तसे ठेवले ना? वास्तविक या प्रश्नाची ही जागा नव्हे. पण मानहानीनें भ्रांत झालेलें अगर एकांगी विचारास चटावलेलें मन असा प्रश्न करतें. या प्रश्नाला उत्तर इतकेंच कीं, 'होय, मला कबूल आहे; पण जरा तोंड आ-टोप. कारण या कामांत माझा एक वांटेकरी आहे. तुझें मीं नुकसान केलें आहे, हें मला कबूल आहे. त्याबद्दल माझें मन मला खातेंसुद्धां. जवळ जवळ घेण्याची इच्छासुद्धां आहे, पण प्रश्न असा आहे, कीं, मी तुझ्या हून मोठा आहे कीं नाहीं? आणि त्याचें उत्तर द्यावयाचें सोडून तुम्हींच मला हलकें ठेवलें, असा प्रत्यारोप करतोस? पण मित्रा, या प्रत्यारोपाच्या भरांत तूं कबुली देऊन चुकलास कीं, तूं मजपेक्षां हलका आहेस. आतां माझा वांटेकरी कोण हें तुला लवकरच कळेल. पण प्रस्तुत प्रश्नाकडे लक्ष्य दे. ब्राह्मणाचा आहार महारापेक्षां शतपट शुद्ध आहे व महाराच्या वरच्या

जातीपेक्षां पुष्कळपट शुद्ध आहे. विशिष्ट तऱ्हेचें बौद्धिक कर्म आचरल्यानें त्याच्या बुद्धीला तेजस्विता आणि वाणीला शुद्ध पाणी चढलेलें आहे. तो राहणीनें साधा पण स्वच्छ रहातो व त्याचे विहार मुक्तमर्याद नसतात. विपरीत उदाहरणें आढळतील पण तीं अपवादभूत होत. सर्वसामान्य नियमाला त्यांनीं बाध येत नाहीं. घाई झालेले सुधारक शुद्धबुद्धीचे आहेत, याविषयीं कोणास शंका नाहीं. शंका त्यांच्या तारतम्याविषयीं व सर्वद्रष्टित्वाविषयीं आहे. त्यांला वाटतें, उद्यां सहस्रभोजनांत ब्राह्मणा-महारां-च्या पंक्तीवर पंक्ति उठाव्या. या पंक्तींतून महार-वरांच्या ब्राह्मण वधू वाढा-यला याव्या, असें जरी अजून कोणी उद्गारला नाहीं, तरी वरील इच्छे-सारखी इच्छामात्र कांहीं अतिपोक्त तपस्व्यांनीं व्यक्त केली आहे. गुरुवर्य रा. भांडारकर यांनीं कांहीं दिवसांपूर्वीं जातीजातींच्या एकीकरणास उपाय म्हणून सहभोजनें प्रतिपादिलीं. गुरुजींच्या अंदाजानें या भोजनांनीं एकी वाढावी असें आहे. सहभोजनांनीं एकी वाढते कीं काय, हा प्रश्न इति-हासवाल्यांकडे सोंपवून देऊन गुरुजींस इतकें नम्रपणें विचारूं कीं, 'मी महाराबरोबर जेवणार नाहीं' या ब्राह्मणाच्या बोलण्यांत दुराग्रहाच्या आढी-शिवाय कांहींच नाहीं कीं काय? एखादे वेळेस, 'महाराबरोबर जेवणें शक्य आहे कीं नाहीं?' हें उदाहरण गुरुजी व गुरुजींचे शिष्य सोडवून दाखवितील, पण तेवढ्यानें सामाजिक प्रश्न सुटला असें कसें झालें?

( अपूर्ण )

# तोतयाचें बंड.

———:o:———

## ( नवीन ऐतिहासिक नाटक. )

हें नवीन गद्य नाटक केसरीपत्राचे सुप्रसिद्ध संपादक रा. **नरसोपंत केळकर** यांनीं लिहिलेलें आहे. पानिपतच्या प्रसिद्ध लढाईंत सदाशिवराव-भाऊ पेशवे हे गर्दींत नाहींसे झाले; त्यांचें काय झालें हें निश्चितपणें कोणास कळलें नाहीं. या गोष्टीचा फायदा घेऊन एका कनोजी ब्राह्मणानें भाऊसाहेबांचा तोतया बनून पेशवाई मिळविण्याचा यत्न केला; पण नाना फडणविसांच्या चातुर्यामुळें तोतयाचें कारस्थान बाहेरं पडून अखेर त्याचें पारिपत्य झालें. तथापि ह्या तोतयाला खरा समजून सदाशिवरावभाऊंच्या बायकोनें—पार्वतीबाईनें—नाना फडणविसांच्या तोतयाविषयक राजकारणांत जो निष्कारण अडथळा उत्पन्न केला, त्यामुळें तोतयास फाजील महत्त्व येऊन त्यास बंड करतां आलें. हा जो कांहींसा अप्रसिद्ध परंतु काव्याच्या दृष्टीनें अत्यंत रमणीय असा प्रसंग, त्यास रा. केळकरांनीं नाटकाचें रूप देऊन तो महाराष्ट्रसमाजाच्या डोळ्यासमोर ठळक रीतीनें मांडला आहे. रा. केळकर यांचें हें पहिलें नाटक आजपर्यंतच्या सर्व ऐतिहासिक नाटकांत ऐतिहासिक दृष्ट्या विशेष महत्वाचें व जास्त योग्यतेचें आहे. इतिहासाचा विपर्यास अगर नसता फेरबदल न करितांही काव्याच्या दृष्टीनें मनोहर व हृदयंगम असें नाटक कसें लिहितां येतें, हें ज्यास पहावयाचें असेल, त्यानें प्रस्तुत नाटक अवश्य वाचावें. चांगुलपणाचा अतिरेक झाला असतां त्याचा परिणाम किती अनिष्ट होतो, हें या नाटकांतील पार्वतीबाईच्या पात्रावरून चांगलें लक्षांत येईल. राज्यतृष्णा मनुष्याच्या हातून केवढीं घोर कृत्यें करविते, हें तोतया 'सुखनिधान' या पात्रावरून स्पष्ट

निदर्शनास येईल. नाना फडणवीस व पार्वतीबाई यांच्यामधलि संभाषणें वाचून वाचकांच्या मनांवर विलक्षण परिणाम झाल्यावांचून रहाणार नाहीं. तसेंच अमलेचें निस्सीम पतिप्रेम व त्याकरितांच अखेर तिचा पडलेला बळी हीं पाहून वाचकांच्या मनोवृत्तींत परस्परविरोधी अशा विकारांनीं खळबळ उडाल्यावांचून रहाणार नाहीं. नाटकांतील शेवटचा अंक व विशेषतः शेवटचा प्रवेश तर ग्रंथकारानें इतक्या खुबीनें रचिला आहे कीं, तो वाचून संपतांच क्षणभर तरी जिवास चटका लागल्यावांचून रहात नाहीं. या नाटकांत प्रसंगानुसार अनेक चित्रें घातलीं असून छपाई व बांधणी सुंदर केली आहे. पृष्ठसंख्या २४०, किं. १ रुपया. ट० खर्च निराळा.

---

## अभिप्राय.

उषाः—'तोतयाचे बंडा-'ची उभारणी इतक्या कुशलतेनें कधींही झाली नव्हती व 'तोतयाच्या बंडा-'ची अखेर इतक्या अकल्पित तऱ्हेनें झालेलीही क्वचितच आढळण्यांत येत असेल. ह्या नाटकाचा आरंभ व अखेर, आदि व अंत, अतिशय खुबीदार आहे व त्यामुळें हें नाटक नाट्यग्रंथांत वरिष्ठ स्थान पटकावील ह्यांत मुळींच शंका नाहीं. नाटक म्हणजे काय व त्याचा प्रधानहेतु काय असावा, ह्यासंबंधानें अलीकडे फार चर्चा ऐकूं येते. परंतु नाटक म्हणजे त्यांत योजलेल्या पात्रांची खुबीदार, समप्रमाणांत व अन्योन्यपोषक योजना असा जर अर्थ असेल तर त्या दृष्टीनें ह्या नाटकांतील पात्रांची 'ठेवण' फार पहाण्यासारखी आहे. जर उत्तम उत्तम कल्पनांचा व्यवस्थित संगम असा 'नाटक' शब्दाचा अर्थ असेल, तर त्याही दृष्टीनें ह्या नाटकाची प्रत्येकास स्तुतिच करावीशी वाटेल. उगीच शिरा ताणताणून आणलेल्या उसन्या आवेशाच्या भाषणापेक्षां ज्यांस मृदु, कोमल, साधी व परिणामकारक भाषा नाटकांत आवडत असेल त्यांची हौस पुर-

ण्यासारखे अनेक मनोरम प्रसंग त्यांस ह्या नाटकांत आढळून येतील. तोत-याचें बंड मोडण्याकरितां नानाफडणिसांस कोणकोणत्या युक्त्या योजाव्या लागल्या, तें प्रत्यक्ष आतां समजण्याचा मार्ग उरलेला नाहीं. तें रहस्य गत इतिहासानें आपल्या हृदयांत गुप्तपणें सांठवून ठेवलेलें आहे. परंतु नानाफडणिसांच्या मनोवृत्तीशीं आपलें तादात्म्य करून घेऊन विचारी मुत्सद्यांच्या अनुमानें बांधण्याच्या बिकट पद्धतीचें सुंदर दिग्दर्शन ह्या नाट-कांत झालेलें असल्यामुळें नानाफडणिसांनीं कोणत्या प्रकारच्या युक्त्या योजल्या असतील, त्यांचें स्वरूप प्रस्तुत नाटकावरून चाणाक्ष वाचकांच्या सहज लक्ष्यांत येण्याजोगें आहे. पतिप्रेमामुळें क्षणोक्षणीं आंदोलन पाव-णारें चित्त, पतिमुखावलोकनाकरितां क्षणोक्षणीं उत्कंठित होणारें हृदय, पतिवियोगामुळें पावलोपावलीं वाटणारी खिन्नता, पतिसमागमाकरितां व्या-कूळ झालेल्या चित्तामुळें स्फूर्ति पावलेलें साहस, पतिगुणांचा ध्यास, पति-मूर्तीचें चिंतन, उदार परंतु भिरु हृदय, कठोर परंतु कातरत्वानें हीनसत्व झालेला शब्दप्रहार, संकटांमुळें उत्पन्न झालेला संशयीपणा, अवश्यकते-मुळें आंगीं आलेला भोळेपणा ह्या सर्वांचें मिष्टमिष्ट संमिश्रण ज्या कोणास पहावयाचें असेल त्यानें हें नाटक वाचल्यावांचून कधींही राहूं नये. ह्या नाटकांतील मुख्य दोन स्त्रीपात्रें—खऱ्या सदाशिवरावभाऊंची पत्नी पार्व-तीबाई व खोट्या सदाशिवरावभाऊची स्त्री अमला—ह्यांचें स्वभाव-चित्र ह्या नाटकांत इतकें बहारीचें उठविलें आहे कीं, थोर मनाच्या स्त्रि-यांच्या हृदयाचें नाजुक मर्म इतक्या अचुक रीतीनें ओळखल्याबद्दल सर्व प्रमदावर्ग श्रीयुत केळकरांची पाठ थोपटल्यावांचून कधींही राहणार नाहीं. त्याचप्रमाणें खरे सदाशिवरावभाऊ मेले कीं जिवंत आहेत, ह्याचें कोडें नाना फडणिसांस पडलें असतांना पुराव्याचा एक एक हप्ता इतक्या खुबीदार रीतीनें त्यांच्यापुढें येऊन पडलेला आहे व त्याची सांखळीही त्यांनीं इतक्या

चतुरतेनें जोडली आहे कीं, इतका हुषार वकील आपणांस न लाभतां, शूद्रक राजाप्रमाणें, नाटकें लिहीत बसला ह्याबद्दल अनेक फांशीं गेलेल्या गुन्हेगारांना हळहळ लागली असेल! नाटकांतील भाषेविषयीं तर बोलावयास नको. कारण सरस्वतीदेवीचें आजन्म आराधन करून तिचा कृपाप्रसाद प्राप्त करून घेण्यांतच ज्यांनीं इतिकर्तव्यता मानली, त्यांनीं लिहिलेली मराठी भाषा नुसती सुंदरच नव्हे तर 'कित्तेवजाही' असली तर त्यांत नवल कोणतें?

नाटकाचें 'संक्रमण' क्रमवार होऊं देणें हा प्रत्येक नाटकांत मोठा गुण असावा लागतो; नाहींतर नाटक तुटकें तुटकें दिसतें, अथवा मध्येंच संपलें असें वाटतें. प्रस्तुत नाटकाचें संक्रमण समक्रम व छानदार झालें आहे व त्यामुळें शेवटपर्यंत वाचकांची उत्सुकता व दर्शनलालसा कायम राहते. शेवटचा 'सीन' तर फारच बहारीचा आहे. ज्याप्रमाणें देशपर्यटन करित असतां एकदम एकाद्या प्रियजनाची गांठ पडावी, जुने कागद चाळीत असतांना ज्याप्रमाणें एकदम एखादी शंभर रुपयांची नोट आढळावी, औषध म्हणून घेत असतांना चुकून 'थंडाई सरबत-' च हातीं लागावें, त्याप्रमाणें 'तोतयाचे बंडां-'तील शेवटचा प्रवेश पाहून प्रेक्षकवर्ग आनंदानें, आश्चर्यानें व अनपेक्षतेनें इतका थक्क होऊन जातो कीं, शेवटचा पडदा पडून नाटक संपलें ह्याचें त्यास भानही राहात नाहीं. आरंभीं अथवा शेवटीं प्रेक्षकांस चकित करण्याची नाटककारांस नेहमीच इच्छा असते, परंतु ती इच्छा श्रीयुत केळकर ह्यांस इतक्या सुरेख रीतीनें पूर्ण करितां आली, याबद्दल आम्ही त्यांचें अभिनंदन करितों. नाटकांत जे इतर सरस प्रवेश आहेत, त्यांत राजमाची किल्ल्यावरील हैबतराव व तोतया ह्यांच्याही संवादाचा प्रमुखत्वानें उल्लेख केला पाहिजे. ह्याशिवाय नानाफडणीस व पार्वतीबाई, विठाई व बगंभट वगैरे प्रवेशही चटकदार झाले आहेत. अमला व

पार्वतीबाई ह्यांच्या स्वभावचित्रांचा वर परिचय करून दिलाच आहे, पण त्याशिवाय नानाफडणीस, रामचंद्र नाईक किल्लेदार व खुद्द तोतया ह्यांच्या स्वभावाचेंही यथार्थ चित्र ग्रंथकारांनीं रेखाटलें आहे. रामचंद्रनाईक किल्लेदार खोट्या स्वामिभक्तिला कसा बळी पडतो, व नानाफडणीस त्यांस प्रामाणिक बुद्धीनेंच फितुरी कसें समजतात हें पाहिलें म्हणजे परमेश्वराचें सर्व क्रीडाकुतूहल परस्परांच्या गैरसमजुतीवर कसें चाललेलं आहे हें लक्ष्यांत येऊन सृष्टीच्या व्यवहाराचें थोडेंसे गूढ उकलल्यासारखें वाटतें. तोतया ह्यास राज्यतृष्णा आहे, परंतु विषयतृष्णा नाहीं; त्यास सदाशिवरावभाऊंच्या राज्यलक्ष्मीची आवड आहे, परंतु त्यांच्या पवित्र पत्नीस कलंकित करण्याची त्याची छाती होत नाहीं, म्हणून त्याच्या त्या स्वनिमंत्रित आपत्तींतही त्याचेविषयीं आदर वाटूं लागतो व त्यास हत्तीच्याच पायाशीं केवळ देऊं नये असें वाटतें. पण ह्यास आपला काय उपाय ? पेशव्यांनीं त्यास हत्तीच्या पायाशीं देऊनही टाकलें. आतां त्याचा शोक करावयास वेळ आहे कोणाला !

हें 'तोतयाचें बंड' नाट्यवाङ्मयांतील उच्च मंजूषेमध्यें मोठ्या आनंदानें आम्ही ठेवून देतों व नाटकवाङ्मयाचें विशुद्ध स्वरूप ह्या दृष्टीनें त्याचें वाचन करण्याविषयीं वाचकांस शिफारस करितों.

---

**पंचम-जॉर्ज-विजयः**---उत्तम गोड भाषा, हें या पंचांकी ऐतिहासिक नाटकांतील विशेष होय. नाट्यशास्त्राच्या दृष्टीनेंही रा. केळकर यांची ही कृति बरीच सरस आहे. परवां परवां अस्तंगत झालेल्या स्वराज्यसूर्याची विस्मृति महाराष्ट्रभूला अद्याप पडली नसली तरी अंतर्बाह्य संकटरूपी केतूंनीं तो सूर्य ग्रस्तास्त होण्याची अखेर अखेर कशी स्थिति आली होती व त्या वेळच्या नानाफडणीसादि खंद्या मुत्सद्यांना बुद्धिसर्वस्व

खर्च करून स्वराज्य राखण्याची कशी शर्थ करावी लागत होती, हें या 'बंडा-'नें अगदीं डोळ्यापुढें उभें राहील. आम्हां मराठ्यांची दौलत बुड-वून टाकूं पहाणाऱ्या पेशवाई दौलतगिरांचाही आदर्श सध्यांच्या महाराष्ट्राला झाला तर हितकरच होईल. एकंदरींत विद्यमान नाटकग्रंथांत हा प्रयत्न बऱ्याच वरच्या प्रतीस येईल यांत शंका नाहीं. आतां सर्वांगपूर्ण असें काय आहे ? तरी लेखकाच्या लौकिकाप्रमाणेंच त्याची ही कृति उठली आहे यांत शंका नाहीं.

---

ज्ञानोदयः—ह्या नाटकाचे कर्ते रा. रा. नरसिंह चिंतामण केळकर, 'केसरी'चे संपादक हे महाराष्ट्रांतले एक अग्रगण्य लेखक आहेत. ह्यांच्या ह्या प्रयत्नानें ऐतिहासिक मराठी नाटकांच्या परिमित संख्येंत एका चांग-ल्या नाटकाची भर पडली आहे. दोष असले तरी ते किरकोळ असून ग्रंथकर्त्याला ते सहज काढून टाकितां येण्यासारखे आहेत. आमच्या मतें ह्या नाटकाचें संविधानक चांगलें रंगविलें असून, त्यामुळें हें वाचनीय व प्रेक्षणीय झालें आहे....यांत नाना फडणीस व पार्वतीबाई हीं मुख्य पात्रें कल्पि-लीं असून तीं फार चांगलीं उतरलीं आहेत. तोतयाची पत्नी अमला हिची करुणमूर्ति नाटक वाचीत असतां मनाला चटका लाविते, पण ही कल्प-नेच्या मुशींतून बाहेर पडली आहे, हा विचार मनांत आला कीं थोडा विरस होतो. तोतयाचें पात्रही चांगलें साधलें आहे. एकंदरींत हें नाटक आम्हांला आवडलें; व तें मनाला चटका लावण्यासारखें उतरलें आहे असा तें वाचून आमचा ग्रह झाला.

---

लोकमित्रः—हें शब्दचित्र असून तें श्री० केळकर यांच्या योग्यतेस शोभण्यासारखेंच वठलेलें आहे. सुसंगतता, स्वाभाविकता व मार्मिकता हे

गुण नाटकांत सर्वत्र व सारखेच दृगोचर होतात. नानासाहेबांची मुत्सद्देगिरी त्यांच्या भाषणावरून उत्तम रीतीनें व्यक्त होत असून इतर सर्व पात्रेंही आपआपल्या दर्जास शोभण्यासारखीं वठलेलीं आहेत. यामुळें नाटक सर्वांगसुंदर झालें आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

---

करमणूकः—पानिपतच्या लढाईत सदाशिवरावभाऊ धारातीर्थी पडले; परंतु त्याबद्दल खात्री नव्हती. क्वचित् ते नुसते नाहींसे झाले असतील असा पुष्कळांस संशय होता. त्या संशयाचा फायदा घेऊन उत्तर हिंदुस्थानांतला एक कनोजा आपण भाऊसाहेब म्हणून पुढें आला. हा प्रसंग हृदयंगम वाटून व त्यास हृदयंगम स्वरूप देऊन हें नाटक रचलें आहे. यांत मुख्य पात्रें नानाफडणवीस, पार्वतीबाई, तोतया व त्याची बायको हीं सर्व फार चांगलीं रंगविलीं आहेत. विनोदाच्या मिश्रणाकरितां कांहीं गौण पात्रें घातलीं आहेत, त्यांचाही उठाव बरा आहे. पुस्तक अवश्य संग्रहणीय व [illegible]वनीय झालें आहे.

---

मराठा-मित्रः—नाटकांतील कथाभाग हृदयंगम असून ऐतिहासिकदृष्ट्या आजपर्यंतच्या ऐतिहासिक नाटकांमध्यें याचा पहिला नंबर लागेल. पार्वतीबाई व अमला यांची विलक्षण पतिभक्ति आर्यस्त्रियांच्या उज्ज्वल गुणांची साक्ष पटविते. संविधानक ऐतिहासिक सत्यास तिळमात्रही न सोडतां जुळविलें आहे. निरनिराळ्या पात्रांचे स्वभावगुणधर्म रेखाटण्यांत लेखकानें बरेंच चातुर्य खर्च केलें आहे. भाषा प्रौढ, शुद्ध व चटकदार आहे. अवश्य वाचून पहावें.

---

इंदुप्रकाशः—नाना फडनवीस व पार्वतीबाई या मुख्य पात्रांचें स्वभाववर्णन नाटकांत चांगलें उतरलें आहे. इतर पात्रेंही बऱ्याच समाधानकारक

रीतीनें नटाविण्यांत आलीं आहेत. गेल्या दहा वर्षांत प्रसिद्ध झालेल्या ऐतिहासिक नाटकांत भाषा, विचार, रसपरिपोष आणि स्वभाववर्णन या चारी दृष्टींनीं या नाटकाचा नंबर पहिला दुसरा लागला पाहिजे, असें आमचें मत आहे. शेवटच्या अंकाचा शेवटचा प्रवेश लिहितांना रा. नरसोपंत यांनीं जी कुशलता व्यक्त केली आहे, ती अर्वाचीन मराठी वाङ्मयांत दुर्मिळ आहे. नाटकांतील निरनिराळ्या प्रसंगांस अनुलक्षून जीं चित्रें दिलीं आहेत, तींही प्रेक्षणीय आहेत.

---

**वंदे जिनवरम्**—केळकरांसारख्या विद्वान् व कसलेल्या लेखकाच्या लेखणींतून हें पुस्तक उतरलेलें आहे एवढ्यावरूनच या पुस्तकाचें महत्व सहज समजून येणार आहे.

---

**प्रकाश ( सातारा )**—या पुस्तकांत ऐतिहासिक भाग मोठ्या खुबीनें घालून हें नाटक तयार केलें आहे. कांहीं चित्रेंही आहेत. नाटक उत्तम साधलें आहे. एकदां हें पुस्तक वाचण्यास सुरवात केली म्हणजे शेवट झाल्याशिवाय हातांतून तें खालीं ठेववत नाहीं.

---

**शुभसूचक ( सातारा )**—ऐतिहासिक सत्यास न सोडतां या नाटकाची रचना केली असून निरनिराळ्या पात्रांचें स्वभावचित्र रेखाटण्याचें कामीं रा. केळकर यांनीं बरेंच कौशल्य दाखविलें आहे. भाषाही भारदस्त व चटकदार आहे. त्यामुळें हें नाटक प्रसिद्ध असलेल्या ऐतिहासिक नाटकांत बऱ्याच वरच्या दर्जाचें झालें आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. शोकपर्यवसायी नाटकांत याचा नंबर बराच वरचा लागेल, असा आमचा अभिप्राय आहे. हृदयभेदक कथानक, शुद्ध भाषेची मांडणी व मार्मिक विचारसरणी या तिन्ही गुणांनीं हें नाटक मंडित असल्यानें विदग्ध-

वाङ्मयाला ललामभूत होणारें झालें आहे. नाट्यलेखनाच्या कामीं रा. केळकरांनीं दाखविलेली कळकळ पाहून महाराष्ट्ररंगभूमीवर उत्तम उत्तम स्वभावचित्रें प्रेक्षकांना दृग्गोचर होऊं लागतील, असें आम्हांस वाटतें. आमच्यांतील होतकरू नाट्यलेखकांनीं या हृदयंगम नाटकाचा मार्मिक अभ्यास करावा, म्हणजे त्यांच्याही लेखनप्रतिभा उज्ज्वल होऊन त्यांना बराच फायदा होईल असें आमचें मत आहे.

---

धर्मदीपिकाः—नाटकाची भाषा रा. रा. केळकरांच्या कसलेल्या लेखणीला साजेशीच आहे. विशेषेंकरून अंक ३ रा, प्र० २ रा, ह्यांत पार्वतीबाई व नाना ह्यांचीं भाषणें फारच खुबीदार साधलीं आहेत. नाना हें 'नाकापेक्षां जड झालेलें मोतीं' असें पार्वतीबाईना वाटत आहे; तरी स्वतःची इभ्रत कायम ठेवून नानाला तर टोंचावें पण बाहेरून सहजगत्या ओघाओघानें बोलल्यासारखें दिसावें, अशीच बाईच्या भाषणांतील शब्दयोजना साधली आहे.

---

प्राचीप्रभाः—( फोंडा गोवें ) नाटकाचें संविधानक चित्ताकर्षक आहे. भाषा प्रौढ व सभ्य असून सरळ व सोपी आहे. विचारसरणी भारदस्त आहे. किंचित् हास्य आणि बराचसा करुणरस वाचकांच्या मनाला चटका लावून पुष्कळ वेळपर्यंत उद्विग्नता उत्पन्न केल्यावांचून सोडीत नाहीं. हें सर्व नाटक या वस्तूला अनुसरून यथायुक्त आहे.

---

के. व्ही. के. ( ज्ञानप्रकाश )—अमलेचें पातिव्रत्य व स्वार्थत्याग हे अश्रुतपूर्व आहेत; अशा प्रकारच्या पातिव्रत्याचें चित्र, अस्पष्ट कां होईना, पण मोहकपणानें रेखाटल्याबद्दल रा. केळकरांचे धन्यवाद गावेसे वाटतात; परंतु बिचाऱ्या अमलेला तिच्या तपश्चर्येचा मोबदला देहांत-

शासनांत मिळावा, हें सात्विक वृत्तीच्या माणसास निर्घृण व अन्यायाचें वाटल्याशिवाय राहणार नाहीं. तिसऱ्या अंकांतील नाना व पार्वतीबाई यांच्या प्रवेशांत नानांची भूतदया, तसेंच त्यांचा करडा अम्मल व पेशव्यांविषयीं विशेषतः भाऊंच्याविषयीं त्यांची कृतज्ञताबुद्धि हीं नाटककारांनीं अप्रतिम रेखाटलीं आहेत. नानांच्या कीर्तीच्या डंक्यानें अमलेचें पुण्यास येणें व तिचा पार्वतीबाईबरोबर वास इत्यादि गोष्टी नानांच्या कीर्तीची व अक्कलहुशारीची चांगलीच साक्ष पटवून देतात. रा. केळकरांसारख्या लोकमान्य पुढाऱ्यांनीं सवडींत सवड करून रंगभूमीकडे लक्ष द्यावें ही गोष्ट त्यांस व मराठी रंगभूमीसही भूषणावह आहे.

---

**चित्रमयजगत्**—इतिहासाचा विपर्यास न होऊं देतां रा. केळकर यांनीं हें संविधानक अत्यंत हृदयंगम केलें आहे. नाना फडणवीस यांची सद्बुद्धि, मुत्सद्दीपणा व पेशव्यांच्या घराण्याविषयींची त्यांची निष्ठा, सात्विक व भोळ्या पार्वतीबाईच्या मनाची प्रेमामुळें झालेली ओढाताण, राज्यतृष्णेच्या पायीं महत्त्वाकांक्षी माणसांकडून होणारीं पातकें, खऱ्या प्रेमाबद्दल मिळालेला निव्वळ दुःखाचा मोबदला, या गोष्टी रा. केळकर यांनीं या नाटकांत फारच कुशलतेनें दाखविल्या आहेत. खरें आणि खोटें यांची निवड करणें किती कठीण असतें, सद्बुद्धीनें कित्येक लोक खोट्यास खरें समजून कसे चिकटतात आणि खरें जाणणाऱ्या व त्याप्रमाणें आचरणाऱ्या सज्जनासही सद्बुद्धीच्या पण मूर्ख लोकांच्या अपवादास कसें पात्र व्हावें लागतें, हें या नाटकांत अत्युत्कृष्ट रीतीनें दाखविलें आहे. अतिशयोक्ति, असंभवनीय प्रसंग, खोटा आवेश, ओढून ताणून आणिलेला विनोद, फाजिल शृंगार किंवा बोजड अगर नाटकास अननुरूप अशी भाषा या नाटकांत कोठेंही आढळत नसून यांतील निरनिराळीं माणसें आपल्या दर्जा-

प्रमाणेंच बोलतांना आढळतात. चिकटंभट व पिकटंभट, बगंभट व हैबतराव, आणि हैबतराव व तोतया यांच्या प्रवेशांत मार्मिक विनोद साधला आहे. सोदा तोतया व पाजी बगंभट यांनीं नाना फडणवीस यांची स्थिति कशी बिकट केली व दूरदर्शी नानांनीं पार्वतीबाईचा मान ठेवून योग्य तेंच धोरण कसें स्वीकारिलें व राखिलें हें फारच समर्पकपणें यांत दाखविण्यांत आलें आहे; आणि विशेष हा कीं, रा. केळकर यांची लेखणी स्वाभाविकतेपासून बिलकूल ढळलेली नाहीं. मार्मिक पण सभ्य विनोद, हृदय हालवून सोडणारा पण अगदीं अकृत्रिम दुःखावेग, कर्तव्याकर्तव्याचा लढा व लोकमताला कित्येकदां लागणारें चुकीचें वळण, परस्परविरोधी मनोविकारांचें रण किंवा गुंतागुंतीचे प्रसंग, हें सारें या नाटकांत रा. केळकर यांनीं इतकें उत्कृष्ट दाखविलें आहे कीं, त्यावरून ते 'केसरी-' चे संपादक या नात्यानें जशी आपली कामगिरी उत्कृष्ट बजावूं शकतात त्याप्रमाणें ते अत्युत्कृष्ट नाटकही लिहूं शकतात, हें सिद्ध झालें आहे. पार्वतीबाई व बगंभट, विठी व बगंभट, पार्वतीबाई व नाना फडणवीस यांच्या प्रवेशांतील भाषणें हे अत्युत्कृष्ट मराठी भाषेचे मासले असून, नानांचीं भाषणेंही सन्मनोविकारांनीं व प्रेमळ विचारांनीं रसपूर्ण व अंतःकरण सद्गदित करून सोडणारीं झालीं आहेत. नाना व पार्वतीबाई यांचे संवाद व वेशीवरच्या शिपाईगड्यांची मौज, अमलेशीं-तोतयाच्या बायकोशीं-बोलतांना झालेली पार्वतीबाईच्या मनाची स्थिति, हे निरनिराळ्या प्रकारचे प्रसंग असून ते रा. केळकर यांनीं सारखेच चांगले वठविले आहेत. सारांश, शुद्ध भाषा, स्वाभाविक प्रसंग, मार्मिक कोटिक्रम, रसिक विनोद, सत्यासत्याचा जगांत उडणारा घोटाळा, व सद्बुद्धि आणि अज्ञान यांच्या संयोगानें उत्पन्न होणारी परिस्थिति, यांचें यथार्थ दर्शन करून देणारें हें नाटक असल्यामुळें अत्यंत वाचनीय

रंजन आणि बोध यांचा लाभ एकसमयावच्छेदेंकरून करून देणारें व आबालवृद्ध स्त्री-पुरुषांस पहाण्यास योग्य असें झालें आहे.

---

" I like your play very much on the whole. The plan.... is ingeuious. Nana's character is well conceived. Parvatibai's faith in her delusion is indeed touching. The scene in which she rebukes Nana is perhaps the best in the whole play. You have attacked superstition out with weapons borrowed from modern armoury. The three entities will, I daresay, please the andience. I liked the play so much that when the clerks of pleaders came to me the other day to ask what play they should perform, I mentioned your play." R. B. V. M. Mahajani, M. A.

---

I have read your drama with great interest and think it to be a first class production. The sentiments, with which it is interspersed, the unfolding of the plot, the delineation of character, all these mark it out as one of the greatest contibutious to Marathi dramatic literature."

R. G. Pradhan, B. A. LL. B.

**मागविण्याचा पत्ता:—भट आणि मंडळी.**
**बुधवार पेठ, पुणें शहर.**

विक्रीस तयार!                विक्रीस तयार!!

आवृत्ति २ री.] **मौनयौवना.** [किं. १। रु.

सुमारें वीस वर्षांपूर्वी **नाईट क्रयानें** प्रसिद्ध केलेली व महाराष्ट्रांत अत्यंत लोकप्रिय झालेली, मनोरंजक व बोधप्रद म्हणून नाणावलेली कादंबरी. प्रथमावृत्ति खपून बरींच वर्षें झालीं. आकार डेमी अष्टपत्री, पृष्ठ सं० सुमारें ३५० किं. १। रु. ट. ख. नि. पण तूर्त थोडे दिवस किं. फक्त १ रु. शिवाय २०० पृष्ठांचें अत्यंत बोधप्रद **श्रीशिवाजीचरित्र** (नवीन) बक्षीस. टपाल ख. निराळा.

## श्रीशिवछत्रपति-चरित्र.

भाषा सरळ, सोपी व चटकदार. विचारसरणी गंभीर. आरंभीं महाराजांचा अश्वारूढ उमदा फोटो. सर्व वर्तमानपत्रांचे अभिप्राय उत्तम. बांधणी जाड व मजबूत. पृ. सं. २००. किं. ॥१२. असें हें सुंदर लिहिलेलें नवीन चरित्र प्रत्येक महाराष्ट्रीय कुटुंबांत अवश्य संग्रहीं असावें. तूर्त फक्त ॥८ स पाठवूं. ट. ख. माफ.

## श्रीगुरुचरित्र.

कागद ग्लेज व जाड. अक्षर मोठें टाइप ठळक. प्रत्येक अध्यायास सुंदर रंगीत चित्र. प्रत्येक पेजला सुंदर वेल. सुटी प्रत किं. १। रु. रेशमी बांधणी १॥ रु. चातुर्मास्यांत मागविणारास दत्तजन्मकथा, बावन श्लोकी गुरुचरीत्र, दत्त-स्तोत्रें, अष्टकें, आरत्या, पदें, मानसपूजा, ध्यान, गुरुगीता, अभंग, विडा इत्यादि सुंदर प्रकरणें असलेला संपूर्ण श्रीदत्तभजनसंग्रह किं. ॥४चा, बक्षीस पाठवूं. ट. ख. नि.

**श्रीमयूरेशपुस्तकालय, बेलबाग, पुणें सिटी.**

नवीन पुस्तक ] **काव्यामोद.** [ विक्रीस तयार !

तुकाराम, मुक्तेश्वर, वामन, मोरोपंत, या जुन्या, व केशवसुत, टिळक, मुजुमदार, गोविंदाग्रज, रेंदाळकर, भिडे, अनंततनय, माधवानुज, मोगरे, लेंभे, इत्यादि अनेक नव्या कवींच्या काव्यांतील **हृदयंगम** वेंच्यांचें पुस्तक. काव्यलोलुपांस रसभरित मेजवानी ! वेंचणार- **कृष्णाजी गोविंद किनरे.** किं० दहा आणे. ट० ख० निराळा.

---

सुप्रसिद्ध कादंबरीकार

## रा. हरि नारायण आपटे यांचीं पुस्तकें.

### सामाजिक कादंबऱ्या.

| नांव | किं. रु. | आ. |
|---|---|---|
| भयंकर दिव्य ! ... ... ... ... ... | २ | ४ |
| मायेचा बाजार. ... ... ... ... ... | २ | ८ |
| मधली स्थिति. ... ... ... ... ... | २ | ० |
| पण लक्षांत कोण घेतो ! ... ... ... ... ... | २ | ० |
| आजच ... ... ... ... ... | २ | ० |
| गणपतराव. ... ... ... ... ... | २ | ० |
| यशवंतराव खरे. ... ... ... ... ... | २ | ० |
| जग हें असें आहे ! ... ... ... ... ... | २ | ० |
| भाग्यश्री. ... ... ... ... ... | २ | ० |
| कर्मयोग. ... ... ... ... ... | २ | ० |
| आणाक्षपणाचा कळस ! ... ... ... ... | ० | १२ |

### ऐतिहासिक कादंबऱ्या.

| नांव | किं. रु. | आ. |
|---|---|---|
| उषःकाल. ... ... ... ... ... | २ | ० |
| रूपनगरची राजकन्या. ... ... ... ... | १ | १२ |
| चंद्रगुप्त. ... ... ... ... ... | १ | ० |
| गड आला पण सिंह गेला ! ... ... ... ... | ० | ८ |

### नाटकें.

| नांव | किं. रु. | आ. |
|---|---|---|
| तीन नाटकें व तीन प्रहसनें. ... ... ... | १ | ८ |

[ १ जयध्वज. २ श्रुतकीर्तिचरित. ३ सुमतिविजय. ४ धूर्तविलसित. ५ माकन मुळकुम बेवकोबा. ६ जबरीचा विवाह. ]

| नांव | किं. रु. | आ. |
|---|---|---|
| संगीत संत सखूबाई. ... ... ... ... | ० | १२ |

**भट आणि मंडळी, पुणें शहर.**

पुणें नगर वाचन मंदिर, पुणे